# ‘बारामती पॅटर्न’ या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमुळे घडून आलेल्या सामजिक परिवर्तनाचा अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
तात्त्विक व सामाजिकशास्त्रे
विद्याशाखांतर्गत, समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी सादर करण्यात आलेल्या शोध प्रबंध.


संशोधक
प्रा. सुवर्णा सुरेश रासकर

मार्गदर्शक
डॉ. अनुपमा केसकर
(एम.ए.पीएच.डी)
समाजशास्त्र विभाग प्रमुख.
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.
पुणे.


अभ्यासकेंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
पुणे

एप्रिल २०१३

# प्रतिज्ञापत्र

प्रस्तुत शोध प्रबंधात समाविष्ट करण्यात आलेले संशोधन कार्य हे मी स्वत: केलेले आहे. मी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनाच्या संदर्भाखेरीज कोणाकडूनही मदत घेतलेली नाही. असे मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करते. या संशोधनासाठी उपयोगात आणलेली संदर्भ पुस्तके, नियतकालिके व प्रश्नावल्या या सर्वांचा संदर्भसूचीमध्ये निर्देश करण्यात आलेला आहे.

**स्थळ:** बारामती

**दिनांक:** / /२०१३

**संशोधक**

**प्रा. रासकर सुवर्णा सुरेश.**
विद्या प्रतिष्ठानचे,
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, विद्यानगरी.
ता. बारामती. जि. पुणे.

# प्रमाणपत्र

**''बारामती पॅटर्न' या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मुळे घडून आलेला सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास.'** या संशोधन विषयावर **प्रा. सुवर्णा सुरेश रासकर** यांनी सादर केलेल्या संशोधन अहवालाचे संशोधन कार्य त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. त्यांनी केलेले कार्य हे त्यांचे स्वत:चे असून त्यांनी वापरलेल्या संदर्भ स्त्रोताचा योग्य निर्देश या अहवालात करण्यात आलेला आहे असे मी प्रमाणित करते.

हा शोध प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

**स्थळ:** पुणे.

**दिनांक:** / /२०१३

मार्गदर्शक

**डॉ. अनुपमा केसकर**
(एम.ए.पीएच.डी)
समाजशास्त्र विभाग प्रमुख.
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.
पुणे.

# ऋणनिर्देश

प्रत्येक व्यक्तीचे काहीतरी ध्येय असते ते ध्येय त्या व्यक्तीला मिळालेल्या प्रेरणेतून निश्चित होते. बालपणापासूनच आई—वडिलांची इच्छा होती मुलीने खुप शिकावे घराण्याचे नाव मोठे करावे. त्यामुळे त्यांनी मला शिकविले. आमच्या गावातून पहिली पदवीधर मुलगी होण्याचा मान मला मिळाला. गावातल्या शाळेत माजी विद्यार्थिनी म्हणून जेव्हा सत्कार झाला त्याचवेळी ठरविले होते कुटुंबासाठी, समाजासाठी व महिलांसाठी कार्य करायचे. आईवडिलांचे स्वप्न होते मुलीने डॉक्टर व्हावे ते स्वप्न आज मी खऱ्या अर्थाने सत्यात उतरविले आहे. आईवडिलांच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहून केलेल्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटते. समाजसेवेचे, आईवडिलांच्या संस्कारातून घेतलेले समजासेवेचे व्रत अखंडपणे चालू आहे. त्याचाच एक भाग म्हणून महिलांच्या संदर्भात संशोधन करण्याची खूप इच्छा होती. ती आज खऱ्या अर्थाने पूर्ण झाली आहे. संशोधन कार्य करत असताना खूप परिश्रम पडले परंतू संशोधन कार्य पूर्ण झाल्यावर मिळणारे समाधान कशातही न मोजता येणारे आहे.

संशोधन कार्य करण्याकरिता मला प्रेरणा देणाऱ्या संशोधनाच्या प्रत्येक वळणावर अत्यंत तळमळीने संशोधनातील छोटया छोटया पैलूंवर मार्गदर्शन करणाऱ्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाच्या विभाग प्रमुख व माझ्या मार्गदर्शिका डॉ. सौ. अनुपमा केसकर यांनी केलेल्या सूचनेमुळेच हे संशोधन कार्य वेळेत पूर्ण करू शकले. मी कायमस्वरूपी त्यांच्या ऋणात राहू इच्छिते व त्यांचे मन:पूर्वक आभार मानते.

विद्या प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष, सर्व सन्माननीय पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी मला संशोधन कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करते.

विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अरूण अडसूळ यांनी संशोधनाकरिता सतत प्रोत्साहन देऊन संमती दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानते.

या संशोधनासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ टिळक, महाराष्ट्र विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे डीन डॉ. कारेकर सर यांनी संमती व प्रेरणा दिली. त्यामुळे मी त्यांची सदैव ऋणी आणि कृतज्ञ राहील. तसेच प्रा. सरिता जाधव (नाशिक) डॉ. ज्योती गगनग्रास (पुणे) यांचेही मनपूर्वक आभार.

फर्ग्युसन महाविद्यालयातील डॉ. शर्मिष्ठा सातव तसेच औरंगाबाद विद्यापीठातील डॉ. संग्राम गुंजाळ, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्रा. कृष्णा कुलकर्णी, विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयातील सर्व माझे सहकारी प्राध्यापक, डॉ. राजेंद्र खैरनार, डॉ. शामराव घाडगे, डॉ. श्रीराम गडकर, डॉ. ज्योती कुलकर्णी, डॉ. उत्कर्षा ठाकरे, डॉ. सुषमा चाफळकर, डॉ. जयश्री चिमणपुरे, डॉ. नागेश लामतुरे, डॉ. महादेव देवकर, डॉ. साधना देशपांडे, प्रा. उदय पाटील, प्रा. अंकुश खोत, प्रा. मनिषा काकडे, प्रा. मगर, प्रा. ज्योती जगताप, प्रा. पंढरीनाथ साळुंके, प्रा. सुनिल ओगले,प्रा. नामदेव मधुरे, प्रा. बाळकृष्ण पेंढारकर प्रा. भिमराव मोरे, प्रा. ज्ञानदेव जगताप, प्रा. बिना तावरे, सौ.

पल्लवी जगताप, श्री श्रीरंग दिक्षीत या सर्वांनी मला संशोधन कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत व मार्गदर्शन केले त्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार व्यक्त करते.

विद्या प्रतिष्ठानच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील डॉ. सुप्रिया जोशी, प्रा. रविंद्र टिळेकर, प्रा. एम.एम.कुलकर्णी, यांनी केलेल्या सहकार्याबद्दल यांची मन:पूर्वक आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील प्रा. जंगण कराडे, शारदाबाई पवार महिला महाविद्यालयातील प्रा. विक्रम गायकवाड, विद्या प्रतिष्ठानच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल प्रा. सौ. अलका घोडके, सौ मंजिरी भोयरेकर, सर्व ग्रंथालयातील सेवकवर्ग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल, सेवकवर्ग, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. राजेंद्र टपळे, जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठातील कर्मचारी, टिळक महाराष्ट्र ग्रंथालय यांनी मला वेळोवेळी ग्रंथ उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी सर्वांचे कायम ऋणी राहीन.

या संशोधन कार्यात कृषि विकास प्रतिष्ठान बारामती, बारामती नगरपरिषद बारामती, पंचायत समिती बारामती यांनी वेळोवेळी माहिती उपलब्ध करून दिली. तसेच बारामती चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष श्री. प्रमोद काकडे व सौ संगिता काकडे यांचे मी आभार मानते. प्रबंध लेखनासाठी संगणक सुविधा उपलब्ध करून देणारे श्री प्रविण व सौ. अश्विनी बनकर यांचेही आभार मानते. तसेच सौ पूनम आटोळे व श्री. कुंडलिक लोणकर, कु. मोहिनी झांजड, श्री सारंग दिक्षित यांचे आभार.

या संशोधनातील महत्त्वाचा घटक म्हणजे श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडचे पदाधिकारी, सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड चे मा. पाटील

साहेब, बारामती तालुका सहकारी दूध संघाचे व्यवस्थापक श्री. कदम साहेब व त्यांचे सर्व सहकारी, बारामती तालुक्यातील दूध उत्पादक संस्थाचे सचिव, बारामती तालुक्यातील दूग्धव्यावसायिक विशेषतः महिला दूध दूग्धव्यावसायिक, श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी व कामगार, परप्रांतीय कामगार व अधिकारी यांचे वृद्ध माता पिता व मुले यांचे मोलाचे सहकार्य मिळाले त्यामुळे मी हे संशोधन कार्य पूर्ण करू शकले. त्यामुळे मी या सर्वांची मन:पूर्वक आभार मानते.

पशुवैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती बारामती, जिल्हा पशुसंवर्धन व सांख्यिकी विभाग, पुणे, गोखलेनगर, पुणे जिल्हा सांख्यिकी अधिकारी पुणे, यांचेही आभार मानते.

या संशोधन कार्यास श्री समीर बोरावके, डॉ. मनिषा सपाटे, सौ. अर्चना बरळ, श्री. संजय बरळ, आत्या सौ. प्रमिला बोरावके, श्री रामचंद्र बोरावके बहिण जयश्री झगडे भाऊ श्री सतिश गायकवाड श्री. राजेंद्र गायकवाड, भाचा मयुर गायकवाड, यांनी मोलाचे सहकार्य केल त्यामुळे मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

संशोधन कार्यास सतत प्रेरणा देऊन प्रोत्साहीत करणारे व संशोधन कार्यकाळात माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे असणारे माझे पती प्रा. श्री. सुरेश रासकर, माझ्या सासुबाई श्रीमती भगीरथी रासकर तसेच चुलत सासरे श्री. अंकुश रासकर व श्री. आनंदराव रासकर माझी जाऊ सौ. मनिषा रासकर यांचे सहकार्य मिळाले. माझा मुलगा अनिकेत व मुलगी अंकिता रासकर यांनी केलेले सहकार्य व दाखविलेला समजूतदारपणा शब्दात मांडणे कठीण आहे. त्यांचे वेळोवेळी

मिळालेल्या सहकार्याशिवाय हे संशोधन कार्य पूर्ण होऊच शकले नसते त्यांनी वेळोवेळी केलेली मदत अविस्मरणीय आहे.

माझ्या आईवडिलांचे शुभ आशिर्वाद सतत मिळणारी प्रेरणा व त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला मिळालेले सततचे प्रोत्साहन यामुळे मी यशस्वी होऊ शकले. मी सदैव त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ज्यांचे सहकार्य मिळाले त्यांचे पुन्हा मन:पूर्वक आभार व्यक्त करते.

**दिनांक:** / /२०१३

**प्रा. रासकर सुवर्णा सुरेश.**
(विभाग प्रमुख)
**समाजशास्त्र विभाग**
विद्या प्रतिष्ठानचे,
कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, विद्यानगरी.
ता. बारामती जि. पुणे

# अनुक्रमणिका


| मुख्य मुद्दा क्र. | उपमुद्दा क्रमांक | तपशील | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| | | **प्रकरण पहिले — प्रस्तावना** | **१ ते ५०** |
| १.१ | | प्रस्तावना | १ |
| १.२ | | पॅटर्न व्याख्या | ५ |
| १.३ | | बारामती पॅटर्न म्हणजे काय? | ७ |
| १.४ | | बारामती | १४ |
| १.५ | | संकल्पना | १७ |
| १.६ | | सामाजिक परिवर्तन | १७ |
| १.७ | | अनिल कुमार लखीना पॅटर्न | २२ |
| | १.७.१ | लातूर पॅटर्न | २३ |
| १.८ | | दूधाचा गूजरात पॅटर्न | २४ |
| १.९ | | बारामती ऐतिहासिक व भौगोलिक | २५ |
| | १.९.१ | ऐतिहासिक माहिती | २५ |
| | १.९.२ | भौगोलिक माहिती | २९ |
| | १.९.३ | बारामतीची लोकसंख्या | ३० |
| | १.९.४ | बारामतीची साक्षरता | ३१ |
| | १.९.५ | बारामतीचा शैक्षणिक विकास | ३२ |
| | १.९.६ | बारामतीचा वैद्यकीय विकास | ३४ |
| | १.९.७ | बारामतीचा औद्योगिक विकास | ३५ |
| | १.९.८ | क्रिडा विकास | ३५ |
| | १.९.९ | सांकृतिक विकास | ३५ |
| १.१० | | सहकारी संस्था | ३६ |
| | १.१०.१ | शेती विकास | ३६ |
| | १.१०.२ | कृषी उत्पन्न बाजार समिती | ३७ |
| | १.१०.३ | खरेदी विक्री संघ | ३७ |
| | १.१०.४ | फलोत्पादन संघ | ३७ |
| १.११ | | गोधन | ३८ |
| | १.११.१ | दूधाचे महत्त्व | ३९ |
| १.१२ | | भारतीय डेअरीचा आढावा | ३९ |
| १.१३ | | बारामती तालुका सहकारी दूध संघ | ४० |
| | १.१३.१ | पशुखाद्य उत्पादन विभाग | ४२ |
| | १.१३.२ | पशुचिकित्सा व कृत्रीम रेतन विभाग | ४२ |
| | १.१३.३ | डेअरी साहित्य विभाग | ४३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १.१४ | | दूध उत्पादन वाढीसाठी प्रयत्न | ४३ |
| १.१५ | | अतिरिक्त दूध उत्पादन | ४४ |
| १.१६ | | खाजगी दूध उत्पादकांसाठी दूध प्रक्रिया उद्योग खुला | ४५ |
| १.१७ | | श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्प परवाना | ४५ |
| | | सारांश | ४९ |
| **प्रकरण दुसरे: अध्ययन पद्धती** | | | **५१ ते ८३** |
| | | **विभाग : अ** | |
| २.१ | | प्रस्तावना | ५१ |
| २.२ | | संशोधन विषय | ५२ |
| २.३ | | विषय निवडीचे कारण | ५४ |
| २.४ | | संशोधनाची उद्दिष्टे | ५५ |
| २.५ | | गृहीतकृत्ये | ५६ |
| २.६ | | अध्यापनाचे क्षेत्र | ५७ |
| २.७ | | नमुना निवड | ५९ |
| | २.७.१ | दूग्ध व्यावसायिकाची निवड | ६० |
| | २.७.२ | अधिकारी वर्गाची निवड | ६१ |
| | २.७.३ | कामगार वर्गाची निवड | ६१ |
| | २.७.४ | कालावधी | ६२ |
| २.८ | | तथ्य प्रक्रियन | ६३ |
| २.९ | | साहित्य परीक्षण व संशोधनाचे महत्त्व | ६३ |
| २.१० | | संशोधनाचे महत्त्व | ६४ |
| २.११ | | संशोधनाच्या मर्यादा | ६४ |
| २.१२ | | प्रकरणीकरण | ६५ |
| | | **ब) साहित्य परिक्षण** | |
| | २.२.१ | प्रस्तावना | ६७ |
| | २.२.२ | संबंधित संशोधनाचा आढावा | ६७ |
| | २.२.३ | संदर्भ पुस्तके | ७० |
| | २.२.४ | वृत्तपत्रे | ७८ |
| **प्रकरण तिसरे — बारामती पॅटर्न** | | | **८४ ते ११९** |
| ३.० | | बारामती पॅटर्न | ८४ |
| ३.१ | | कृषी विकास प्रतिष्ठान | ८६ |
| | ३.१.१ | शेती विभाग | ८६ |
| | ३.१.२ | फलोत्पादन प्रकल्प | ८६ |
| | ३.१.३ | शेती विज्ञान मंडळ | ८६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३.१.४ | प्रशिक्षण | ८७ |
| ३.२ | | जलसिंचनाच्या आधुनिक पद्धती | ८८ |
| ३.३ | | कृषी व औद्योगिक विकास | ८८ |
| | ३.३.१ | साखर उद्योग | ८९ |
| | ३.३२ | द्राक्ष प्रक्रिया उद्योग | ९० |
| | ३.३.३ | फलोत्पादन | ९० |
| | ३.३.४ | रेशीम सुत व कापड निर्मिती उद्योग | ९१ |
| | ३.३.५ | शेतीपूरक जोडधंदे | ९१ |
| | ३.३.६ | दूध उत्पादन व शेतीपूरक जोडधंदा | ९२ |
| | ३.३.७ | डेअरी औद्योगिक महत्त्व | ९३ |
| | ३.३.८ | डेअरी जोडव्यवसाय म्हणून ग्रामीण भागाकरिता महत्त्व | ९५ |
| ३.४ | | कृषी व उद्योग पायाभूत सुविधा | ९७ |
| ३.५ | | महिला सबलीकरण | ९९ |
| ३.६ | | शैक्षणिक विकास | १०३ |
| ३.७ | | आरोग्य सुविधा | १०९ |
| ३.८ | | स्वच्छतेचा बारामती पॅटर्न | ११० |
| ३.९ | | शारदा कृषी वाहिनी | १११ |
| ३.१० | | एक्झीबीशन हब | १११ |
| ३.११ | | मत्स्य बाजार | ११४ |
| ३.१२ | | स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न | ११५ |
| ३.१३ | | करिअर मार्गदर्शनाचा बारामती पॅटर्न | ११५ |
| ३.१४ | | विज्ञान प्रदर्शनाचा बारामती पॅटर्न | ११६ |
| | | सारांश | ११८ |
| | | | |
| | | | |
| **प्रकरण चौथे — श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेची कार्यप्रणाली १२० ते १६२** | | | |
| ४.१ | | प्रास्ताविक | १२० |
| | ४.१.१ | भारतातील दूग्धव्यवसाय | १२४ |
| | ४.१.२ | महाराष्ट्रातील दूग्धव्यवसाय | १२६ |
| | ४.१.३ | पुणे विभाग दूग्ध उत्पादन | १२७ |
| | ४.१.४ | बारामती तालुक्यातील दूग्धव्यवसाय | १२८ |
| ४.२ | | श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड | १३० |
| | ४.२.१ | सुरूवात | १३० |
| | ४.२.२ | प्रकल्पाचे नांव | १३० |
| | ४.२.३ | औद्योगिक स्थान निश्चिती | १३५ |
| | ४.२.४ | मध्यवर्ती ठिकाण | १३६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.२.५ | कच्चा मालाची उपलब्धता | १३६ |
| | ४.२.६ | मनुष्यबळाची उपलबधता | १३८ |
| | ४.२.७ | रस्ते, पाणी, वीज | १३९ |
| ४.३ | | कार्यप्रणाली | १३९ |
| | ४.३.१ | प्रकल्पाचा हेतू | १३९ |
| | ४.३.२ | स्वयं उत्पादन | १४१ |
| ४.४ | | दूध संकलन | १४३ |
| | ४.४.१ | श्रायबर डायनामिक्स डेअरीची दूध हाताळणी क्षमता | १४८ |
| ४.५ | | दूध दर | १४९ |
| ४.६ | | दूध वाहतूक | १५० |
| ४.७ | | दूध प्रक्रिया व विविध उत्पादने | १५० |
| ४.८ | | विक्री व वितरण व्यवस्था | १५४ |
| ४.९ | | प्रशिक्षण | १५७ |
| ४.१० | | श्रायबर डायानमिक्स डेअरीला गोल्ड मानांकन | १५९ |
| | | सारांश | १६२ |
| | | | |
| **प्रकरण पाचवे — तथ्य संकलन व विश्लेषण** | | | **१६३ ते २६३** |
| ५.१ | | प्रास्ताविक — | १६३ |
| | ५.१.१ | आर्थिक वर्गीकरण | १६३ |
| | ५.१.२ | निवास | १६४ |
| | ५.१.३ | वैद्यकीय सुविधा | १६६ |
| | ५.१.४ | विमा | १६७ |
| | ५.१.५ | वाहतूक | १६८ |
| | ५.१.६ | बोनस | १७० |
| ५.२ | | शिक्षण | १७१ |
| | ५.२.१ | पुढील शैक्षणिक सुधारण्याचे प्रयत्न | १७२ |
| | ५.२.२ | मुलांचे शिक्षण | १७३ |
| ५.३ | | सामाजिक | १७५ |
| | ५.३.१ | कामाच्या ठिकाणची परिस्थिती | १७५ |
| | ५.३.२ | स्थलांतरितता | १७६ |
| | ५.३.३ | साामजिक संम्मीलनता | १७८ |
| ५.४ | | सांस्कृतिक | १८० |
| | ५.४.१ | परकेपणा | १८० |
| | ५.४.२ | कार्यसंस्कृती | १८२ |
| | ५.४.३ | कामगार वर्गाचे सहकार्य | १८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ५.४.४ | स्थानिकांशी संपर्क | १८५ |
| ५.५ | | कामगार वर्गाचे विविध पैलूंचा अभ्यास | १८६ |
| | ५.५.१ | आर्थिक वर्गीकरण | १८६ |
| | ५.५.२ | पगारासंबंधी समाधानी | १८७ |
| | ५.५.३ | बोनस | १८८ |
| | ५.५.४ | वैद्यकीय सुविधा | १८९ |
| | ५.५.५ | विमा | १९० |
| | ५.५.६ | औद्योगिक सुरक्षितता | १९१ |
| | ५.५.७ | वाहतूक | १९३ |
| | ५.५.८ | कामाच्या ठिकाणची परिस्थिती | १९४ |
| | ५.५.९ | कामाच्या वेळा | १९६ |
| | ५.५.१० | निवासव्यवस्था | १९७ |
| | ५.५.११ | बचत | १९८ |
| | ५.५.१२ | कर्ज | १९९ |
| | ५.५.१३ | जोडव्यवसाय | २०० |
| ५.६ | | शिक्षण | २०१ |
| | ५.६.१ | औद्योगिक प्रशिक्षण | २०१ |
| | ५.६.२ | कंपनी अंतर्गत प्रशिक्षण | २०३ |
| ५.७ | | सामाजिक | २०४ |
| | ५.७.१ | स्त्री पुरूष कामगार | २०४ |
| | ५.७.२ | स्थलांतर | २०५ |
| | ५.७.३ | प्राथमिक आर्थिक आधार | २०७ |
| ५.८ | | सांस्कृतिक | २०९ |
| | ५.८.१ | नोकरीमुळे सामाजिक सन्मानात वाढ | २०९ |
| | ५.८.२ | राहणीमानात बदल | २१० |
| | ५.८.३ | मनोरंजन | २११ |
| | ५.८.४ | स्त्री कामगार शिफ्ट | २१३ |
| ५.९ | | दूग्ध व्यावसायिकांच्या प्रगतीचा अभ्यास | २१५ |
| | ५.९.१ | आर्थिक घटक | २१६ |
| | ५.९.२ | दूग्ध व्यवसाय | २१६ |
| | ५.९.३ | रोजची दूध विक्री | २१८ |
| ५.१० | | शिक्षण | २१९ |
| | ५.१०.१ | दूग्ध व्यावसायिकांचे शिक्षण | २१९ |
| ५.११ | | सामाजिक | २२० |
| | ५.११.१ | दूग्धव्यवसायातील स्त्री पुरूष वर्गीकरण | २२० |
| | ५.११.२ | कुटूंबाचा आधार | २२१ |
| | ५.११.३ | मुख्य व्यवसाय | २२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ५.११.४ | पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता | २२४ |
| | ५.११.५ | पशुविमा संरक्षण | २२६ |
| | ५.११.६ | कर्ज | २२७ |
| | ५.११.७ | दूधदराबाबत समाधानी | २२९ |
| | ५.११.८ | दुग्ध व्यवसायात यंत्राचा वापर | २३० |
| | ५.११.९ | डेअरीकडून सोयी सुविधा | २३१ |
| ५.१२ | | सांस्कृतिक | २३३ |
| | ५.१२.१ | राहणीमानाचा दर्जा | २३३ |
| | ५.१२.२ | इंधनाचा वापर | २३४ |
| ५.१३ | | राजकीय नेतृत्वाच्या योगदानाबाबत | २३९ |
| | ५.१३.१ | प्रस्तावना | २३९ |
| | ५.१३.२ | औद्योगिक स्थान निश्चिती | २४२ |
| | ५.१३.३ | राजकीय स्थैर्य | २४३ |
| | ५.१३.४ | भांडवल निर्मिती | २४४ |
| | ५.१३.५ | वाहतुक सुविधा | २४५ |
| | ५.१३.६ | शैक्षणिक सुविधा | २४५ |
| | ५.१३.७ | पायाभूत सुविधांची गुणवत्ता | २४६ |
| | ५.१३.८ | औद्योगिक कहलाची सोडवणूक | २४७ |
| | ५.१३.९ | सहाय्यक उद्योगांची वाढ | २४७ |
| | | सारांश | २४८ |
| ५.१४ | | पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न | २४९ |
| | ५.१४.१ | पर्यावरण व समाज | २४९ |
| | ५.१४.२ | वनीकरण | २५२ |
| | ५.१४.३ | कमी प्रदूषण करणारी यंत्रे | २५३ |
| | ५.१४.४ | कचरा पुर्नवापर | २५४ |
| | ५.१४.५ | सांडपाण्याचा पुर्नवापर | २५५ |
| | ५.१४.६ | महाराष्ट्र पोल्यूशन बोर्ड | २५८ |
| | ५.१४.७ | ओ.एच.एस.अे.एस १८००१ | २५९ |
| | ५.१४.८ | आय.एस.ओ. १४००१ | २५९ |
| | ५.१४.९ | आरोग्य सुरक्षा व पर्यावरण | २६० |
| | ५.१४.१० | सि.डी.एम. माहिती. | २६२ |
| | | सारांश | २६३ |
| **प्रकरण सहावे: उद्दिष्टे व गृहीतके आणि नव्या संकल्पना** | | | **२६४ ते ३२१** |
| **गृहीतक क्र. १** | | | |
| ६.१ | | दुग्ध व्यवसायापूर्वीच्या परिस्थितीचा आढावा | २६४ |
| | ६.१.२ | सबळ जोडधंदयामुळे दुग्ध व्यवसायामध्ये झालेला बदल | २६७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ६.१.३ | सामाजिक मनोवैज्ञानिक | २६९ |
| | ६.१.४ | दूग्ध व्यवसायाला सबळ जोडधंदा | २७० |
| | ६.१.५ | व्यवसाय प्रकार | २७१ |
| | | सारांश | २७२ |
| गृहीतक क्र. २ | | | |
| ६.२ | ६.२.१ | दूग्ध व्यावसायिक महिलांची आर्थिक सबलीकरणापूर्वीची परिस्थिती | २७४ |
| | ६.२.२ | दूग्ध व्यावसायिक महिलांची आर्थिक सबलीकरणानंतरची परिस्थिती | २७५ |
| | ६.२.३ | दूग्ध व्यावसायिक महिलांचे दूग्धव्यवसायापूर्वीचे सामाजिक स्थान | २७८ |
| | ६.२.४ | मनोवैज्ञानिक फायदे | २८१ |
| | ६.२.५ | मुलांकडून अपेक्षा पूर्ती | २८२ |
| | | सारांश | २८३ |
| गृहीतक क्र. ३ | | | |
| ६.३ | ६.३.१ | सांस्कृतिकीकरण | २८४ |
| | ६.३.२ | स्थलांतर व सांस्कृतिक बदल | २८५ |
| | ६.३.३ | परप्रांतीय कर्मचाऱ्यांची संख्या | २८६ |
| | ६.३.४ | स्थानिक भाषा | २८९ |
| | ६.३.५ | स्थानिक सणसमारंभातील सहभाग | २९३ |
| | ६.३.६ | परंपरा | २९३ |
| | ६.३.७ | मनोरंजनातील बदल | २९४ |
| | | सारांश | २९४ |
| गृहितक क्र. ४ | | | |
| ६.४ | ६.४.१ | प्रत्यक्षवाद | २९५ |
| | ६.४.२ | सकारात्मक सांस्कृतिक बदल | २९८ |
| | ६.४.३ | महानगरीय संस्कृतिक उदय | २९८ |
| | ६.४.४ | औद्योगिक स्थलांतर व नवी संस्कृती यांच्येत सहसंबंध | २९९ |
| | ६.४.५ | सामाजिक लाभ व नुकसान | ३०० |
| | ६.४.६ | सामजिक संम्मोलितपणाची जाणीव | ३०१ |
| | ६.४.७ | जुनी पिढीची संस्कृती | ३०५ |
| | ६.४.८ | नवीन पिढी सांस्कृतिक बदल | ३०८ |
| | | सारांश | ३१० |
| गृहितक क्र. ५ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६.५ | | राजकीय नेतृत्वाचे योगदान | ३१३ |
| | ६.५.१ | सामाजिक राजकीय दृष्टीकोन | ३१३ |
| | ६.५.२ | औद्योगिक कलह | ३१५ |
| | ६.५.३ | स्थानिक राजकीय नेतृत्वाचे योगदान | ३१६ |
| | | सारांश | ३१७ |
| ६.६ | | नव्या संकल्पना | ३१९ |
| **प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी** | | | **३२२ ते ३४०** |
| ७.० | | प्रस्तावना | ३२२ |
| ७.१ | | अध्ययनाचा उद्देश | ३२३ |
| ७.२ | | गृहीतके | ३२४ |
| ७.३ | | अध्ययन क्षेत्र | ३२५ |
| ७.४ | | नमुना निवड | ३२५ |
| ७.५ | | निष्कर्ष | ३२५ |
| ७.६ | | शिफारशी | ३३८ |
| | | **संदर्भ सूची** | **३४१ ते ३४५** |

# तक्ता सूची


| अ.क्र | तक्ता नांव | पृ.क्र |
|---|---|---|
| १.१ | पर्जन्यमान | ३० |
| १.२ | बारामती लोकसंख्या | ३१ |
| १.३ | साक्षरता | ३२ |
| २.१ | दूग्ध व्यावसायिकाची निवड | ६० |
| २.२ | अधिकारी वर्गाची निवड | ६१ |
| २.३ | कामगार वर्गाची निवड | ६२ |
| ४.१ | भारतातील दूध उत्पादन | १२५ |
| ४.२ | महाराष्ट राज्याचे दूध उत्पादन | १२६ |
| ४.३ | पुणे विभाग दूध उत्पादन | १२७ |
| ४.४ | बारामती तालुका दूध उत्पादन | १२९ |
| ४.५ | महाराष्ट्रातील विभागावर दूध उत्पादन | १३८ |
| ४.६ | सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड | १४२ |
| ४.७ | श्रायबर डायनामिक्स डेअरी वर्षवार दूध संकलन | १४६ |
| ४.८ | दूध दर तक्ता | १४९ |
| ५.१ | वेतन वर्गीकरण | १६४ |
| ५.२ | अधिकारी निवास व्यवस्था | १६५ |
| ५.३ | वैद्यकीय सुविधा | १६६ |
| ५.४ | विमा | १६७ |
| ५.५ | वाहतूक व्यवस्था | १६९ |
| ५.६ | बोनस | १७१ |
| ५.७ | अधिकारी वर्गाचा शिक्षणाचा स्तर | १७२ |
| ५.८ | स्वयंप्रशिक्षण | १७३ |

| | | |
|---|---|---|
| ५.९ | मुलांचे शिक्षण | १७४ |
| ५.१० | अधिकारी वर्गाच्या कामाच्या ठिकाणीची परिस्थिती | १७६ |
| ५.११ | स्थलांतरितांचे प्रमाण | १७७ |
| ५.१२ | सामाजिक संम्मीलन | १७९ |
| ५.१३ | परकेपणाची जाणीव | १८१ |
| ५.१४ | सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग | १८२ |
| ५.१५ | कामगार वर्गाचे सहकार्य | १८४ |
| ५.१६ | परप्रांतीयांचा स्थानिकांशी असलेला संपर्क | १८५ |
| ५.१७ | आर्थिक वेतन वर्गीकरण | १८७ |
| ५.१८ | पगाराबाबत समाधान | १८८ |
| ५.१९ | बोनस | १८९ |
| ५.२० | वैद्यकीय सुविधा | १९० |
| ५.२१ | विमा | १९१ |
| ५.२२ | औद्योगिक सुरक्षा | १९२ |
| ५.२३ | वाहतूक सुविधा | १९३ |
| ५.२४ | कामाच्या ठिकाणीची परिस्थिती | १९५ |
| ५.२५ | कामाच्या वेळा | १९६ |
| ५.२६ | निवास सुविधा | १९८ |
| ५.२७ | बचत | १९९ |
| ५.२८ | कर्ज | २०० |
| ५.२९ | जोडव्यवसाय करणाऱ्यांची संख्या | २०१ |
| ५.३० | औद्योगिक प्रशिक्षण | २०२ |
| ५.३१ | कंपनी अंतर्गत प्रशिक्षण | २०३ |

| | | |
|---|---|---|
| ५.३२ | स्त्री पुरूष कामगार | २०४ |
| ५.३३ | स्थलांतर | २०६ |
| ५.३४ | प्राथमिक व आर्थिक आधार | २०७ |
| ५.३५ | नोकरीमुळे सामाजिक सन्मानात वाढ | २०९ |
| ५.३६ | राहणीमानात बदल | २११ |
| ५.३७ | मनोरंजन | २१२ |
| ५.३८ | स्त्री कामगार कामाच्या वेळा | २१४ |
| ५.३९ | व्यवसायाचे प्रकार | २१७ |
| ५.४० | रोजची दूधविक्री | २१८ |
| ५.४१ | शिक्षणाचा स्तर | २१९ |
| ५.४२ | स्त्री पुरूष वर्गीकरण | २२१ |
| ५.४३ | कुटूंबाचा आकार | २२२ |
| ५.४४ | मुख्य व्यवसाय | २२३ |
| ५.४५ | पशुवैद्यकीय उपलब्ध सेवा | २२५ |
| ५.४६ | पशुविमा संरक्षण | २२७ |
| ५.४७ | कर्ज | २२८ |
| ५.४८ | दूर दराबाबत समाधानी | २२९ |
| ५.४९ | यंत्राचा वापर | २३१ |
| ५.५० | डेअरीच्या सोयी सुविधा | २३२ |
| ५.५१ | घराचा प्रकार | २३४ |
| ५.५२ | इंधनाचा वापर | २३५ |
| ५.५३ | राजकीय पाठिंबा | २४२ |
| ६.१ | जोडधंदा पूर्वीचा | २६५ |
| ६.२ | पूरक व्यवसाय | २६५ |

| | | |
|---|---|---|
| ६.३ | दूग्ध व्यावसायिकांचा विविध घटकातील सहभाग | २६७ |
| ६.४ | सबळ जोडधंदा | २७० |
| ६.५ | दूग्ध व्यवसायाचा प्रकार | २७१ |
| ६.६ | सबळीकरणापूर्वीची परिस्थिती | २७५ |
| ६.७ | सबळीकरणानंतरची परिस्थिती | २७५ |
| ६.८ | सबळीकरणापूर्वीचे सामाजिक स्थान | २७८ |
| ६.९ | सबळीकरणानंतरचे सामाजिक स्थान | २७८ |
| ६.१० | खानपानविषयक बदल | २८७ |
| ६.११ | स्थानिक भाषेचा प्रभाव | २८९ |
| ६.१२ | स्थानिक सण समारंभातील सहभाग | २९२ |
| ६.१३ | सामाजिक संम्मीलनता | ३०२ |
| ६.१४ | जुनी पिढी | ३०५ |
| ६.१५ | नवीन पिढी सांस्कृतिक बदल | ३०८ |
| ६.१६ | राजकीय नेतृत्वाचे योगदान | ३१६ |

# नकाशा सूची



| नकाशा क्रमांक | नकाशा नांव | पृ.क्र |
|---|---|---|
| १ | भारत प्राकृतिक | १५ |
| २ | बारामती तालुका भौगोलिक | १६ |
| ३ | बारामती तालुका | ५८ |
| ४ | श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्प स्थळ नकाशा | १३१ |
| ५ | बारामती तालुका | १३१ |
| ६ | महाराष्ट्रातील दूध संकलन जिल्हे | १३७ |

# आकृती सूची


| आकृती क्र | आकृती नांव | पृ.क्र |
|---|---|---|
| १ | शितकरण केंद्रावरील दूध संकलन पद्धत | १४७ |
| २ | श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पापूर्वी | २५६ |
| ३ | श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पानंतर | २५७ |

# फोटो सूची


| फोटो क्र | फोटो नांव | पृ.क्र |
|---|---|---|
| १ | श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्प | १३२ |

# प्रकरण पहिले
# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना

बारामती हा ग्रामीण भाग आहे. शेतीनिष्ठ ग्रामीण जीवन, ग्रामीण जीवनातील उत्पादनक्षमता आणि त्यातून मिळणारे उत्पन्न हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशामध्ये असलेल्या सुमारे एक तृतीयांश अवर्षणप्रवण भागापैकी जो भाग तीव्र अवर्षणप्रवण आहे त्यामध्ये बारामती परिसराचा समावेश होतो. परंतू ही वस्तुस्थिती बाहेरच्या लोकांना पुरेशी माहित नाही. बारामती म्हणजे समृद्ध शेतीचा परिसर असा समज आहे. कल्याणकारी सरकार नसतानाही ब्रिटिश सरकारला १८७६ ते १८७८ या दुष्काळात निरा डाव्या कालव्याचं खोदकाम करायला भाग पाडले. कारण लोकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. १९६८ मध्ये परिसरातील दुष्काळग्रस्त भागातील लोकांना मानवतेच्या भावनेतून गहू, दूध पावडर यांचे मोफत वाटप 'कासा' संस्था (ऑस्ट्रेलियन) करीत होती. या मदतीतून लोकांची तात्पुरती गरज भागत होती परंतू त्यांचं दारिद्रय हटत नव्हतं. हे मा. शरद पवार यांच्या लक्षात आले त्यांनी मोफत मदत कार्याचा विधायक उपयोग करून घेण्याच्या संदर्भात मनाशी खुणगाठ बांधून त्यांनी 'कासा' या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली व त्यांच्यापुढे योजना मांडली.

''धान्याच्या रूपानं लोकांना मोफत मदत करण्याऐवजी दुष्काळ निवारणाच्या कामासाठी त्यांनी केलेल्या श्रमदानाचा मोबदला म्हणून धान्य दिल्यास ते अधिक उपयुक्त होईल. त्यामुळं लोकांना ओढयानाल्याचं पाणी आडविण्यासाठी पाझर तलावाचे काम देवू या, त्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना धान्य दिल्यास ते त्यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीने फायदयाचं ठरेल.''

बारामती मधील तांदुळवाडी येथे प्रायोगिक स्वरूपात (पाझर तलावाच्या कामास मान्यता मिळाली. अपेक्षित खर्चापेक्षा व कमी वेळेत पहिला पाझर तलावाचं काम १९६८ साली पूर्ण झाले पाझर तलाव पावसाळयात तुडुंब भरला. तलावाच्या

लाभक्षेत्रातील विहीरीच्या पाण्याची पातळी वाढली. शेतात पिके डोलू लागली. पाझर तलावामुळे तांदुळवाडीच्या शेतकऱ्यांना झालेल्या लाभामुळे मोफत गहू वाटण्याची वेळ येणार नाही अशी खात्री पटली. या जीवनदायी योजनेमुळे शेतकऱ्यांना फायदा झाला शेतीचे दारिद्रय कमी होण्यास मदत झाली आहे. श्रमाचे महत्त्व लोकांना पटले. पाझर तलावासाठी श्रमदान व श्रमदानाच्या मोबदल्यात धान्य हे तत्त्व कासा संस्थेने मान्य करून तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागात पाझर तलाव उभारणीच्या कार्यास धान्यरूपने मदत करण्याचा निर्णय घेतला तथापि या योजनेच्या नियोजनबद्ध कार्यवाहीसाठी रितसर संस्था स्थापन करण्याचे सुचविले व २२ जून १९७१ रोजी कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती या नावानं संस्थेची रितसर स्थापना करण्यात आली.

दुष्काळग्रस्त भागाच्या विकासासाठी विविध दालनं खुली करण्याची संधी मानून संस्थेची उद्दिष्टे निश्चित करून कृषी विकास प्रतिष्ठानची स्थापना केली आहे. देशविदेशातून धर्मदाय संस्थाकडून फंड गोळा केला व पथदर्शी प्रकल्प कार्यान्वित झाले. मा. शरद पवार यांनी अध्यक्ष व मा.डॉ. आप्पासाहेब पवार यांनी चेअरमन पदाची सुत्रे स्वीकारली. ११० एकर माळरानावर खडकाळ जमिनीवर प्रायोगिक शेतीस प्रारंभ झाला. त्यामध्ये प्रसार प्रात्यक्षिक व प्रशिक्षण यासाठी आदर्श शेती फार्म स्थापन केला व त्यातून २९० पझार तलाव बांधून पूर्ण केले.

सन १९६७ मध्ये बारामतीमधून विधानसभेवर मा. शरद पवार निवडून आले. गृहराज्यमंत्री, शिक्षणमंत्री, कृषीमंत्री, गृहमंत्री व मुख्यमंत्री अशी पदे भुषविली. त्यातूनच कल्याणकारी योजना राबविल्या. मुख्यमंत्री असताना मराठवाडा नामांतराचा प्रश्न योग्य तऱ्हेने हाताळून मार्गी लावला. महिला विकास आयोग स्थापन करून महात्मा फुले, राजर्षी शाहू यांचा वैचारिक वारसा पुढे चालू ठेवला आहे व तो कृतीत आणला आहे. राजकारणाबरोबरच समाज जीवनातील अनेक गोष्टीत त्यांना रस आहे. सांस्कृतिक जीवनात भर घालणाऱ्या संघटना पाठीमागे ते ठामपणे उभे राहिले आहे.

२५ जून १९८८ साली दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मा. शरद पवार यांनी भूषविले आहे. त्यावेळी बारामती तालुक्याच्या विकास कामांना वेग आला. विकासाला चालना मिळाली. बारामती तालुक्याच्या विकास योजनांचा आराखडा तयार करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या विकास योजनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली. त्यातूनच बारामती तालुका व परिसर नव्याने आकार घेऊ लागला बारामती तालुक्याचा विकास म्हणजे शेतकऱ्यांचा विकास हे ध्येय समोर ठेवून शेतीसाठी पाणी याबाबतचे नियोजन करणे गरजेचे असल्याने याबाबत प्राधान्यक्रम देऊन कार्यवाही केली आहे.

बारामती तालुक्यातील शेतीला पाणी पुरवठा करणारा निरा डावा कालवा हा १०० वर्षापूर्वीचा आहे. त्यातील गाळ काढला त्यामुळे पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढली. पाणी क्षेत्रातील दुरूस्तीची कामे प्राधान्याने केली त्यामुळे बागायत भागाचा प्रश्न मिटला जिरायत भागाचा विचार करून नव्या मुठा कालव्यावर जानाई, शिरसाई उपसा जलसिंचन योजना मंजूर करून त्यांची कार्यवाही केली आहे. या योजनेमुळे दुष्काळी भागातील सुमारे ३३२०० एकरास पाणी मिळाले ही योजना आजही दुष्काळी भागाला वरदानच ठरली आहे. तालुक्याच्या कऱ्हा व निरा नदीवर कोल्हापूर पद्धतीची बंधारे बांधली त्यामुळे नदीकाठच्या गावांना शेती व पिण्याच्या पाण्याची सोय झाली. नाझरे प्रकल्पाच्या कालव्याची लांबी वाढविली. त्यामुळे तरडोली, लोणीभापकर या परिसरातील पाझर तलाव भरल्यामुळे या परिसरातील विहीरीच्या पाण्याच्या साठयात वाढ झाली शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. सहकारी तत्त्वावर व सामुदायिक पद्धतीने व उपसा जलसिंचन योजनांना मंजूरी मिळवून दिल्याने मोठया प्रमाणावरील दुष्काळी क्षेत्र ओलिताखाली आले आणि फळबागा विकास कार्यक्रमानां चालना मिळाली. नळपुरवठा योजना कार्यक्रम अंतर्गत जिल्हा विकास निधी, आमदार फंड, मुख्यमंत्री निधी याद्वारे निधीची उपलब्धता मा. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना पूर्ण केली आहे.

यशवंतराव चव्हाण यांचा वारसा घेऊनच मा. शरद पवार कार्य करत आहे. दारिद्रय, बेरोजगारी विषमता, गरीबी कशी कमी होईल या प्रश्नातून देश कसा मुक्त होईल यासाठी आधुनिकतेचा स्वीकार करून जगातील शक्तीशाली राष्ट्र म्हणून भारत कसा निर्माण होईल याचा ध्यास घेतला आहे. एक नवी दिशा यशवंतराव चव्हाण यांनी शरद पवारांना दिली. त्यांनी कृषी, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक व सामाजिक विकास कला व क्रीडा या सर्व क्षेत्रात प्रगती केली ४० वर्षापासून बारामतीचे राजकीय नेतृत्त्व म्हणून शरद पवार यांनी विविध विकास योजना राबविल्या आहेत. समाजकारणातून राजकारणात ते यशस्वी झाले. त्याचाच परिणाम बारामती तालुक्याचे सामाजिक परिवर्तन घडवून आले आहे.

शिक्षण हा समाजाच्या विकासाचा पाया आहे. यादृष्टिकोनातून शैक्षणिक विकास बारामतीत झाला आहे. बारामतीच्या सर्वांगीण विकासासाठी औद्योगिक विकासाला चालना दिली परंतू उदयोगधंदयासाठी ज्या जमिनीची उपलब्धता झाली त्यामुळे विस्थापितांचा प्रश्न निर्माण झाला नाही. कारण ही जमीन माळरान, खडकाळ, उंच सखल भागाची होती ती शेतकऱ्यांनी विना तक्रार पैशाच्या मोबदल्यात उद्योगासाठी दिली म्हणजेच ०% ज्या जमिनीचे उत्पादन होते तेथे काही अंशी उत्पन्न उद्योगधंदयामुळे वाढले आहे हे नक्की.

**विषय:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड.

**समस्या सूत्रण:** बारामती पॅटर्न या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मुळे घडून आलेल्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास.

## १.२ पॅटर्न व्याख्या

1) For an excellent example for others to follow (On line Oxford Dictionary)

२) चांगल्या कृती पूर्ण आवृत्तीमधून एक आदर्शवत घटना (वस्तू) तयार होते त्याला पॅटर्न म्हणतात.

3) **Concept of Pattern Recognition:-**

**Pattern:-** A Pattern is description of an object.

According to the nature of the patterns to be recognized, we may divide our acts of recognition into two major types.

- The recognition of concrete items.
- The recognition of abstract items.

(Basic Pattern Recognition Concept – Xiaojun Qi)

४) ज्या तालुक्याचा एक तृतीयांश भाग दुष्काळी आहे. तरीही या तालुक्यामध्ये तीन सहकारी साखर कारखाने आहेत. येथील द्राक्षे, डाळींब विदेशात जातात. मॅकडोनाल्डचे पिझ्झा हटचे चीज येथेच तयार होते. दूधाचे पदार्थ येथूनच देश—विदेशात निर्यात केले जातात. ''प्रतिकूल परिस्थिती असताना देखील वरील फळे व दूग्धजन्य पदार्थावर प्रक्रिया करण्याचे काम येथेच केले जाते.

या पॅटर्नने मानवी विकास साधला आहे. प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत सर्व सुविधा येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे येथील मुले शिक्षण घेऊ लागली. वेगवेगळया माध्यमांच्या शाळा याठिकाणी उपलब्ध झाल्या आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने शिक्षणाचा विकास झाला. व त्यातूनच मानवी विकासाची नवी दिशा सापडली.

आपल्या देशाचे पंतप्रधान मा. मनमोहनसिंग यांनी बारामती पॅटर्नची ''कृषी विषयक विकासाचा विलक्षण यशस्वी असा बारामती पॅटर्न आहे.'' अशी व्याख्या केली आहे.

आपण उभ्या भारताचा विकास बारामतीच्या धर्तीवर आकारू शकलो तर एक राष्ट्र म्हणून आपण उन्नत मानेने जगभर निश्चितपणे वावरू शकू. विकासाच्या बाबतीत हे रोल मॉडेल आहे.

— (संपादन टिकेकर अरूण व अनुवाद: टिळक अभय स्पर्धा काळाशी २००६, पृ.क्र. ९)

अशा प्रकारे बारामती पॅटर्नच्या संकल्पना विविध तज्ञांनी स्पष्ट केल्या आहेत.

परिवर्तनाबाबतच्या आपल्या कल्पना मग ते परिवर्तन आर्थिक असो वा सामाजिक, सांस्कृतिक वास्तवात उतरविण्यासाठी विकासाच्या बारामती पॅटर्नला महत्त्व प्राप्त झाले आहे.

शरद पवार यांच्या मतानुसार, बारामती पॅटर्न ची व्याख्या: सर्व प्रकारच्या अडथळयांशी सामना करीत प्रतिकूलतेस समोरासमोर भिडणे म्हणजेच बारामती पॅटर्न.

— (संपादन: टिकेकर अरूण व अनुवाद: टिळक अभय स्पर्धा काळाशी २००६, पृ.क्र. १०)

अवघे ८ इंच बारामतीचे वार्षिक पर्जन्यमान आहे. निम्म्याहून अधिक क्षेत्र अवर्षणग्रस्त आहे. तरीही संपूर्ण देशभरात वितरित होणाऱ्या दूग्धजन्य पदार्थाचे उत्पादन बारामतीच होते. सर्व प्रकारच्या अडचणी, प्रतिकूलतांचा सामना करीतच हे सारे साध्य केले आहे. लोकमानस यालाच ‘बारामती पॅटर्न’ म्हणून संबोधतात.

— (संपादन: टिकेकर अरूण व अनुवाद: टिळक अभय स्पर्धा काळाशी २००६, पृ.क्र. १०)

बारामती पॅटर्नचे श्रेय शरद पवारांना दिले जाते ते विकासाचे प्रारूप म्हणजे सामाजिक अभिसरणाचा एक यशस्वी प्रयोग होय. दुष्काळप्रवण आणि दारिद्रयाने वेढलेल्या प्रदेशाचे रूपांतर आधुनिक अशा आर्थिक व कृषी घडामोडींनी गजबजलेल्या केंद्रात घडवून आणण्याचा ‘कृषी बारामती पॅटर्न’ हा एक उपक्रम आहे. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी याचा ‘रोल मॉडेल’ असा उल्लेख केला आहे. म्हणजेच या उपक्रमांचे अनुकरण इतरांनी करून ग्रामीण विकासास चालना देण्याचे काम करावे. यातूनच देशाची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल शक्य आहे.

## १.३ 'बारामती पॅटर्न' म्हणजे काय?

विकासाच्या बारामती पॅटर्नची व्याख्या शरद पवार यांनी केली आहे. ''सर्व प्रकारच्या अडथळयाशी सामना करित प्रतिकूलतेस समोरासमोर भिडणे म्हणजे ''बारामती पॅटर्न'' बारामती परिसर म्हणजे सहकारी साखर कारखानदारी, द्राक्षबागा, ऊस पिकवणारा बागायत शेतीचा भाग असे समजले जाते. या परिसरामध्ये निरा डाव्या कालव्याचे पाणी सन १८८० साली आले. हे या भागातील दुष्काळ निवारण्याच्या पैकी एक काम जे बिटिशांच्या काळात झाले. निरा डाव्या कालव्याचे पाणी फक्त २२ गावांनाच मिळत होते. बाकी ४३ गावे पाण्यापासून वंचित होती. बारामती तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान ८ इंच. तालुक्यातील बाकी ४३ गावे म्हणजे सर्व परिसर उजाड, भकास येथे खात्रीचा पाणीपुरवठा शेतीसाठी नव्हता, कोणत्याही पाण्याची मोठी योजना नव्हती. या परिसरातून कऱ्हानदी वाहते. तिलाही पाणी अपूरे. अशी प्रतिकूल परिस्थितीत तसेच या गावातील अनेक गावे उंचावर असल्याने कोणत्याही प्रकारे पाणी येणे शक्य नव्हते. याच दरम्यान या दुष्काळी भागात ''कासा'' ही आस्ट्रेलियन संस्था दुष्काळग्रस्त लोकांना मोफत गव्हाचा रूपाने मदत करीत होती. या दुष्काळी भागाचे चित्र बदलावयाचे असेल तर पाझर तलाव हेच एकमेव उत्तर होते. हेच शरद पवार यांनी जाणून त्या दृष्टीने कार्य सुरू केले. उत्साही कार्यकर्त्यांच्या मदतीने परिसराचा सखोल अभ्यास करून ''कासाच्या'' पदाधिकाऱ्यांसमोर एक योजना मांडली. ''दुष्काळ ग्रस्तांना मोफत धान्य देण्याऐवजी त्यांना दुष्काळ निवारण्याच्या कार्यासाठी श्रमदान करू द्या. त्या श्रमाचा मोबदला म्हणून गहू द्या.'' ही योजना कासाच्या पदाधिकाऱ्यांना पटली. व १९६८ ला श्रमाचा मोबदल्यात धान्य या तत्त्वावरचा पहिला पाझर तलाव तयार झाला. हा तलाव अपेक्षित खर्चापेक्षा कितीतरी कमी खर्चात व कमी वेळेत तयार झाला होता. पहिल्या पाझर तलावाच्या पूर्वात्वामुळे कासाच्या पदाधीकाऱ्यांना खात्री पटली व पुढील प्रत्येक प्रकल्पाला मंजूरी दिली. १९६७ ते १९८१ या कालावधीत कासाच्या मदतीने २९० पाझर तलाव पूर्ण झाले होते. त्यामुळे परिसरातील विहिरीच्या पाणी

पातळीत वाढ झाली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला होता. तसेच बारामती परिसरातील कृषी क्षेत्र ओलीताखाली आले.

''कासा'' ने सुमारे दोन कोटी रूपये किमतीचा गहू पूरवला. मजुरीच्या रूपाने गहू मिळाल्यामुळे लोकांना कष्टाची किंमत कळाली. व परिसराचा विकास झाला. पाझर तलावांच्या उपक्रमातून एक चळवळ या परिसरात उभी राहिली होती. या विचारातून पुढे कृषी विकास प्रतिष्ठानची स्थापना झाली.

- **कृषी विकास प्रतिष्ठानची स्थापना**

या चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या योजना हाती घेण्यासाठी कृषी विकास प्रतिष्ठानची स्थापन २२ जून १९७१ रोजी करण्यात आली. शरद पवार यांनी अध्यक्षपदाची तर त्यांचे थोरले बंधू आप्पासाहेब पवार यांनी चेअरमन पदाची सुत्रे स्वीकारली.

- **कृषी विकास प्रतिष्ठान संस्थेचा उद्देश**

१. पिकांच्या नवीन जातीच्या प्रात्यक्षिकांद्वारे प्रसार सुधारित बियाणांची चाचणी घेणे व प्रसार करणे.
२. पीक पद्धतीत सुधारणा करणे.
३. शेतीला पुरक धंद्याची साथ देणे.
४. संकरीत गायींचा प्रसार करणे.
५. पाणी पुरवठयाच्या विविध योजना राबविणे.
६. उद्योगधंद्याकरीता कूशल कारागीर व तंत्रज्ञ तयार करणे.
७. ग्रामीण भागात लघुउद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन देणे.
८. शेती विषयक प्रयोगशाळा सुरू करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे. शेती विज्ञान मंडळाच्या माध्यमातून अभ्यास दौरे, परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित करणे.

* **विहीरींचा प्रकल्प**

पाझर तलावामध्ये पाणी साठविल्यामुळे तलावाखली जमीनीची पाणीपातळी वाढली होती. विहीरी खोदण्याशिवाय शेतीला पाणी मिळणार नव्हते. त्यामुळे प्रतिष्ठानने विहीरींचा प्रकल्प हाती घेतला होता. दुष्काळी भागातही शेतकरी कर्जपुरवठादार संस्थाचे थकबाकीदार होते, त्यामुळे शेतीसाठी कर्ज मिळत नव्हते. प्रतिष्ठानने १० लाख जमा करून सेंट्रल बँक ऑफ इंडियात बारामती शाखेत कायमस्वरूपी ठेव म्हणून ठेवले व तारणावर बँकेने प्रतिष्ठानच्या शिफारशीवर विहीर खोदणीसाठी कर्ज उपलब्ध करून दिले. या योजनेतून २६५ पेक्षा अधिक विहिरी पूर्ण केल्या. तलावाखालील विहीरी असल्यामुळे सर्व विहीरांना पाणी लागले. दूष्काळी भागात हिरवीगार शेती होऊ लागली. या योजनेस किलोस्कर ऑईल कंपनीने हातभार म्हणून निम्म्या किंमतीत ६० ऑईल इंजिंन व पंपींग सेट्स शेतकऱ्यांना पूरविले.

* **बोररिंग ब्लास्टिंग युनिट**

पाझर तलावांच्या लाभ क्षेत्रात नविन विहीरी खोदण्याण्याचे काम जलद गतीने होण्यासाठी प्रतिष्ठानने बोअरिंग ब्लास्टिंग युनिट शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर उपलब्ध करून दिली.

* **शेती अवजारे—बि—बियाणे व खते पुरवठा**

विहिरी खोदल्या, ऑईल इंजिन बसवली. त्यापुढचा प्रश्न उभा राहीला, मशागती करण्याचा याही कार्यात संस्थेने दोन ट्रॅक्टर्स व ट्रालीज व नांगर खरेदी केले. आणि गरजू शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर जमीनीच्या मशागतीसाठी उपलब्ध करून दिले. बी—बीयाणांसाठी संस्थेने नॅशनल सीड्स कार्पोरेशन या संस्थेंची एजन्सी घेऊन सुधारीत बि—बियाने संस्था आजही पुरवित आहे.

- **जनावरांचा फिरता दवाखाना**

या तालुक्यात दुग्धव्यवसायाला प्रारंभ झाल्यानंतर दावाखान्याची गरज भासू लागली. ही गरज विचारात घेऊन सेवा उपब्ध करून दिल्या.

१. सर्व प्रकारच्या जनावरांना वैद्यकिय संरक्षण देणे.

२. अधिक दूध देणाऱ्या संकरीत गाई निर्माण करणे.

३. संकरीत गाईंविषयी माहिती व प्रशिक्षण देणे.

अशा प्रकारे दूध व्यवसाय वाढीला लागावा म्हणून प्रयत्न केले.

कृषी विकास प्रतिष्ठानने या कालखंडामध्ये विविध योजना हाती घेतल्या व त्या योजनामध्ये अपेक्षित संशोधन व प्रगती केली. व विकासाचा मार्ग दाखविला. या सर्व योजना आज देखील चालू असून त्यामध्ये वेगवेगळी संशोधन केले जात आहे. शेती विकास व शेतीपूरक व्यवसाय हया दृष्टीने महत्त्वाचा आहे.

- **आदर्श शेती फार्म**

भारताचा विकास होण्यासाठी शेतीचा विकास होणे आवश्यक होते. कारण आजही ७० ते ८०% भारतीयांचे जीवन शेतीवर अवलंबून आहे.शेतीविषयी ओढ शेतकऱ्यांमध्ये निर्माण करावयाची असेल तर शेतीविषयक नविन तंत्रज्ञान शेतकऱ्यासमोर ठेवले पाहिजे. त्यादृष्टीने आदर्श शेती फार्म उभारण्याची योजना पुढे आली. त्यासाठी आप्पासाहेब पवार इस्त्रायलला जावून तेथील तिन ते चार महिने वास्तव्य करून तेथील नविन तंत्रज्ञान आत्मसात करून आले. इस्त्राईल म्हणजे यशस्वी प्रायोगिक शेतींचा एक प्रचंड कारखाना अत्यंत विकसित बागा उत्तम उत्पादन देणाऱ्या गायी, शेळया, मेंढया, कोंबडया इत्यादी निर्सगाची अवकृपा असलेला हा टिचभर देश एवढी प्रगती करू शकतो. तर भारतासारखा का नाही करू शकणार ही जिद्द होऊनच आप्पासाहेब पवार परतले.

शेतीविषयी इस्त्राईलमध्ये पाहिलेले सर्व आधुनिक तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाद्वारे पटवून देण्यासाठी माळेगाव येथे ११० एकर खडकाळ जमीन मिळवली. खडक फोडून माती भरून शेती योग्य जमीन घडविण्यात आली. विविध पिके, फळझाडे

यासाठी आधूनिक बियाने, आधूनिक सिंचन पद्धती वापरण्यात आली.शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील विभाग कार्यरत आहे.

- **जलसिंचनाच्या नव्या योजना**

सिंचन पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी १९८० मध्ये आप्पासाहेब पवार दूसऱ्यांदा इस्त्राईलला जाऊन जलसिंचनाच्या विविध प्रकारचे प्रशिक्षण घेऊन आले. भौगोलिक विविधता व परिसराचा उंचसखलपणा हाही अडथळा ठरत होता. यामुळे अन्न व चाऱ्याच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रतीष्ठानच्या जमिनीवर ठिबक सिंचनाच्या विविध पद्धतीची प्रचार व प्रसार प्रात्यक्षिकाद्वारे दाखविण्याचा ध्यास त्यांनी घेतला. आपल्या देशात शेती सिंचन पद्धतीत झालेल्या व होत असलेल्या प्रसारात त्यांचा वाटा मोठा आहे. ते आपल्या देशातील ठिंबक व फवारा सिंचनाचे ते जनक आहे.

- **शेती विभाग**

शेती विषयक आधूनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी अमलात आणावयाचे झाल्यास त्यांना हे तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाद्वारे उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी;

१. सर्व पिके व फळझाडे यावर विविध प्रयोगाची प्रात्यक्षिके घेणे.
२. सिंचनाच्या विविध आधूनिक पद्धतींची प्रात्यक्षिके घेणे.
३. रोपवाटीकांच्या माध्यमातून उत्तम दर्जाची फळझाडे व फूल झाडांच्या रोपांचा पुरवठा करणे.
४. सुधारीत व प्रक्रिया केलेल्या उस बेण्याचा पुरवठा करणे.
५. रास्त दरात मातीचे पृथ्थकरण करून देण्यासाठी सुसज्ज प्रयोग शाळेची उभारणी करून सेवा पुरविणे.

- **फलोद्यान प्रकल्प**

शेतकऱ्यांना विविध प्रकारची चांगल्या दर्जाची रोपे मिळण्यासाठी त्यांनी वेस्टकोस्ट नारळ, मोसंबी, चिक्कू, सिताफळ, आवळा, बोर, चिंच, फणस, पपई,

जांभूळ, डाळींब इत्यादी फळझाडांचे मातृवृक्ष कृषी विद्यापीठातून आणून खास तंत्रज्ञानाच्या देखरेखीखाली रोपे तयार केली जातात. हा विभाग महाराष्ट्राचे एक महत्त्वाचे संशोधन केंद्र म्हणून ओळखला जातो.

- **जोडधंदे**

जमीनीची ढासळत चाललेली सुपिकता, घटत चाललेले उत्पन्न, शेतीवरील वाढता खर्च याला जोडधंद्याची साथ मिळाली तरच शेतकरी वाचेल, शेती वाचेल. यासाठी प्रतिष्ठानने जोडधंद्याचा विकास करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

- **डेअरी विभाग**

प्रतिष्ठानच्या फिरत्या दवाखान्यामुळे पशुवैद्यकिय सेवा खेडयापाडयात पोहचली होती. संकरीत गाईंच्या संगोपनाचे प्रात्यक्षिक म्हणून प्रतिष्ठानने स्वतंत्र डेअरी विभाग सुरू केला. होस्टन, फिझीअन व जर्सीच्या या प्रकारच्या संकरीत गाईंचे उत्पादन, संगोपन करून त्यापासून पैदा होणाऱ्या संकरीत कालवडी शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या. खेडोपाडी प्रशिक्षण वर्ग भरवून स्वत: आप्पासाहेब पवारांनी १५—२० लिटर दूध देणारी गाय असू शकते. हे शेतकऱ्यांना पटवून दिले.

- **शेळी मेंढी प्रकल्प**

शेळी, मेंढी संगोपनाची माहिती प्रशिक्षणातून देण्यासाठी प्रतिष्ठानने जमुनापरी, सिरोही, अंगोरा व सनिन या शेळयांच्या तर डॉरसेट व मेरीनो या मेंढयांच्या जाती विविध राज्यातून आणून शास्त्रीय संगोपन सुरू केले. व त्यापासून पैदा झालेली नर, करडे शेतकऱ्यांना शेळी—मेंढी पैदाशीसाठी व धंदा सुधारणेसाठी पूरविण्याचे कार्य सुरू केले.

- **कुक्कुटपालन**

कोंबडीच्या लहान पिल्लांचे संगोपन फार कटकटीचे असते. किरकोळ चूकही मोठया नुकसानीस कारणीभूत ठरते. शेतकऱ्यांचे नुकसान टळावे म्हणून संस्था नामांकित हॅचरीजमधुन एक दिवसाची पिल्ले विकत घेऊन त्याचे १६

आठवडयापर्यंत संगोपन करते. या योजनेमार्फत आलेल्या खर्चाच्या किंमतीत तलंगा अंडी देण्याच्या वयात उपलब्ध करून देते. सुरूवातीच्या कालावधीत या व्यवसायासाठी प्रशिक्षण व बँकेचे कर्ज मिळवून देणे इत्यादी साठी प्रतीष्ठानने सहकार्य केले.

- **प्रशिक्षण**

शेतकऱ्यांना बि–बियाणे, पक्षी जनावरे पूरविल्यानंतर शास्त्रीय पद्धतीने संगोपन होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच कृषी विकास प्रतिष्ठानने शेती सलंग्न विषयावरील प्रशिक्षण राबविण्यास सुरूवात केली. प्रत्येक शेतीसंबंधीत विषयातील तज्ज्ञांना पाचारणकरून त्यांच्या बौद्धिक ज्ञानाचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न या उद्बोधनातून केला गेला.

- **शेती विज्ञान मंडळ**

प्रतिष्ठानच्या आर्थिक शेतीविषयक सर्वच आधूनिक तंत्रज्ञान राबविणे शक्य नव्हते. ज्या ज्या ठिकाणी असे आधूनीक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्या त्या ठिकाणी शेतकऱ्यांनी गेले पाहिजे व सतत नविन गोष्टी शिकत राहिले पाहिजे. या उद्देशाने शेतकऱ्यांचे शेती विज्ञान मंडळ स्थापन करण्यात आले. शेतीविषयक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी या मंडळातर्फे वेगवेगळया शैक्षणिक सहली तसेच परिसंवाद चर्चासत्रे व तज्ञ व्यक्तीची व्याख्याने आयोजित केली जातात.

कृषी विकास प्रतीष्ठानने १९६८ पासून १९९० पर्यंत कृषी विषयक विविध संशोधन केले व ते कार्य आजही चालू आहे. संस्थेने शिक्षण, सामाजिक सेवा, सांस्कृतीक प्रगती या दृष्टीने १९९० पासून विविध कार्यक्रम हाती घेतले. त्यातून शारदानगर हा एक गौरवशाली विभाग तयार झाला आहे.

- **नवे संशोधन**

शेतीमध्ये आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शेतकरी सहसा तयार नाही. कारण त्यामध्ये आर्थिक नुकसान झाल्यास ते पचविण्यची कुवत त्याच्याकडे नसते.

१. जास्तीत जास्त उत्पादन काढण्यासाठी ग्रीन हाऊसचे इस्त्राईल तंत्रज्ञान

२. टिश्युकल्चर पद्धतीने ऊसाची लागण.

३. शेतीमध्ये प्लास्टिक मल्चचा वापर.

४. जैविक पद्धतीने किड नियंत्रण.

इत्यादींचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण कृषी विकास प्रतिष्ठानवर दिले जाते.

- **कृषी विज्ञान केंद्र**

केंद्र सरकारतर्फे भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्राची स्थापना जिल्हा पातळीवर होत असते. पण कृषी विकास प्रतिष्ठानने शेती क्षेत्रात केलेले काम पाहून पुणे जिल्हासाठी कृषी विज्ञान केंद्र बारामतीमध्ये कृषी विकास प्रतिष्ठानवर जुलै १९९२ मध्ये स्थापन झाले.

आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या जमिनीत रूजले तरच त्याची प्रगती होईल व वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवता येतील म्हणून स्थानिक गरजानुसार स्थानीक पिके, जमिन अभ्यासून आवश्यक ते प्रशिक्षण वर्ग, शेतकऱ्यांसाठी मोफत सुरू करण्यात आले. शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारावे व मिळकतीत भर पडावी यासाठी प्रात्यक्षिक व संशोधन या स्तरावर हे केंद्र कार्य करीत आहे.

- **कृषी विषयक प्रयोगशाळा**

संस्थेने १९९१ साली कृषी विषयक प्रयोगशाळा स्थापन केली. हवामानाचे अंदाज, वाऱ्याचा वेग, दिवसाचे कमाल व किमान तापमान इत्यादी नोंदी दैनंदिन घेतल्या जात आहेत. त्याआधारे विविध पिकांसाठी उपयुक्त असे मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांसाठी कमी दरात माती, पाणी, खते, पशुखाद्य, बि—बियाणे यांच्या तपासण्या प्रयोग शाळेतून केल्या जातात. व त्यानुसार सल्ला दिला जातो.


## १.४ बारामती

१. **बारामती:** पुणे जिल्हयापासून १०० कि.मी अंतरावर आग्नेय दिशेस असणारे तालुक्याचे ठिकाण. उत्तर अक्षांश १८’ १० व पूर्व रेखांश ७४. ३९’ अशा भौगोलिक स्थळात बारामती हे गाव वसलेले आहे. बारामती तालुक्याला पूर्वी ‘भिमथडी तालुका’ असे सरकार दप्तरी नांव होते. प्रथम

बारामती हे इंदापूर विभागात होते. पूर्व काळापासून कऱ्हेपठार या नावाने ओळखला जाणाऱ्या प्रदेशात बारामतीचा समावेश होता.

— (सहस्त्रबुद्धे, बारामती नगरपालिका शताब्दीपूर्ती, समाचार ग्रंथ १९६७)

**नकाशा क्र. १: भारत प्राकृतिक**



## नकाशा क्र. २: बारामती तालुका भौगोलिक




२. **श्रायबर डेअरी डायनामिक्स लिमिटेड:** गायांचे दूध संकलित करून त्या दूधावर प्रक्रिया करून त्यापासून विविध दूग्धजन्य पदार्थ तयार करणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये तयार होणाऱ्या दूग्धजन्य पदार्थाचे वितरण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करून स्थानिक दूग्धव्यवसायाला चालना देणारा व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देणारा एक प्रकल्प आहे.

## १.५ संकल्पना

विविध प्रकारच्या तथ्यांचे सार स्वरूपातील प्रातिनिधीक विधान म्हणजे संकल्पना होय.

एक वर्णनात्मक गुण किंवा संबंधाकडे संकेत करणारा शब्द प्रयोग म्हणजे संकल्पना होय.

समाज म्हणजे परस्पर संबंधाची एक व्यवस्था असते त्या सामाजिक संबंधाच्या व्यवस्थेलाच समाज म्हणतात. या समाजाचा शास्त्रशुद्ध केलेला अभ्यास म्हणजे समाजशास्त्रीय अभ्यास होय.

## १.६ सामाजिक परिवर्तन

प्राचीन काळापासून मानवाने आपल्या बुद्धीमत्ता व जिज्ञासा, प्रतिभाशक्ती यांच्या जोरावर संस्कृतीचा विकास घडवून आणला आहे. मानवाने आपल्या बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर चिंतन करून सभोवतालचे नैसर्गिक पर्यावरण व समाज याविषयी सतत विचार, चिंतन व मनन केले आहे.

प्राचीन व मध्ययुगीन काळामध्ये चिंतनावर धर्माचा रूढी व परंपराचा प्रभाव असल्याचे दिसून येते. असे असले तरी मानवाला स्वत:चा विकास करण्यासाठी इतर मानवाच्या सहकार्याची गरज होती. त्यामुळे मानव नेहमीच इतरांना सहकार्य करीत आला आहे. आपले जीवन सुखकर करण्यासाठी आपण एकमेकांना सहकार्य करण्याच्या प्रवृत्तीला सामजिकता असे म्हणतात. अशा मानवनिर्मित वातावरणालाच संस्कृती असे म्हणतात. स्वत:च्या सुखसोयीसाठी मानवाने एकत्रित येऊन निर्माण केलेल्या समूह जीवनाला सामाजिक जीवन असे म्हणतात.

### परिवर्तन

सर्व मानवी समाजाचे सामाजिक परिवर्तन एक महत्त्वाचे लक्षण आहे. सुरूवातीच्या साध्या समाजापासून ते आज प्रगत औद्योगिक समाजात सातत्याने परिवर्तने घडून आली आहेत. परिवर्तनाची गती कमी अधिक असते परंतू परिवर्तन

घडून येत असते. मानवी समाजाची सापेक्ष अशी वैशिष्टे म्हणजे स्थैर्य व परिवर्तन होय.

**व्याख्या:**

हॅरी जॉन्सन यांचे मते, ‘‘मुलभूत अर्थाने सामाजिक परितर्वन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल होय.’’

संस्कृतीच्या कोणत्याही घटकात होणारा बदल हा सांस्कृतिक परिवर्तनात मोडतो. यामध्ये भौतिक परिस्थितीत सामाजिक व सांस्कृतिक घटकात बदल, लोकसंख्येत बदल आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वे हे घटक सामाजिक परिवर्तन घडून येण्यास कारणीभूत ठरतात.

**भौगोलिक परिस्थिती:**

नैसर्गिक आणि भौगोलिक घटकामध्ये बदल होत असतो. जमीन, नदया, नाले, हवामान, तापमान आदि या सारख्या घटकांचा यामध्ये समावेश होतो. भौगोलिक परिस्थितीत मोठे बदल घडून येतात. तेव्हा समाज जीवन ते प्रभावित करतात. भौतिक परिस्थितीशी आंतरक्रिया करूनच मानवी समाज आपली संस्कृती निर्माण करतो. त्यातूनच मानवी समाजाची संस्कृती विकसित होत असते. कोणत्याही समाजावर सभोवतालच्या भौतिक, भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडणे अगदी स्वाभाविक आहे.

भौतिक परिस्थितीत बदल घडून आल्यावर त्याचा समाजजीवनावर परिणाम दिसून येतो. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवनात बदल दिसून येतो. मानवाने त्याच्या भौगोलिक परिस्थितीवर मात करून प्रतिकूल परिस्थितीतही जीवन सुसह्य होण्यासाठी काही साधने निर्माण केली आहेत. त्यामध्ये मानव यशस्वी होत आहे. म्हणूनच भौगोलिक, भौतिक घटक, सांस्कृतिक सामाजिक जीवनात परिवर्तन घडून येण्यास जबाबदार असतात.

**सामाजिक सांस्कृतिक घटक:**

यामध्ये समाजरचनेचे आणि सांस्कृतिक संघटनांचे स्वरूप तंत्रज्ञानात्मक घटक, विचार प्रणाली, इत्यादी संस्कृतीचा एक भाग म्हणून महत्त्वाचा आहे. आधुनिक औद्योगिक समाजरचना परिवर्तनाची गती अधिक राहण्यासाठी महत्त्वाची असते. समाजात व्यक्तीची भूमिका, दर्जा, विशेष अधिकार निश्चित होऊन त्याची समाजरचना ताठर बनते. त्यावरच गती कमी अधिक ठरत असते. समाजाची तंत्रज्ञानात्मक व्यवस्था ही संस्कृतीचा एक भाग आहे. तंत्रज्ञानाचा विकास आणि विस्तार झपाट्याने केला तर सामाजिक परिवर्तन अधिक प्रमाणात घडून येते. म्हणूनच सामाजिक परिवर्तनाला जबाबदार घटक म्हणून तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे. म्हणजेच सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरणारे सामाजिक सांस्कृतिक घटक महत्त्वाचे आहे.

आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सांस्कृतिक समृद्धी, संगीत, नाटक, चित्रकला, शिल्पकला आधुनिक मनोरंजनाची साधने विकसित होणे महत्त्वाचे आहे. संस्कृतीचा पाया, तंत्रज्ञानाचा विकास जितका जास्त तितका संस्कृतीचा पाया अधिक रूंद होत असतो. म्हणजेच तंत्रज्ञानात्मक व्यवस्था ही संस्कृतीमध्ये व्यापक व दूरगामी परिवर्तन घडवून आणण्यास कारणीभूत ठरते.

सामाजिक परिवर्तनासाठी तांत्रिक घटक हा जबाबदार असला तरी या घटकामुळे सर्व समाजात सारख्याच प्रमाणात परिवर्तन घडून येते असे नाही. तर हे परिवर्तन सांस्कृतिक मूल्यावर अवलंबून असते. तंत्रज्ञानाच्या स्वीकार करण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते.

**विचार प्रणाली:**

परिवर्तनाला दिशा देणारी विचार प्रणाली हा एक महत्त्वाचा घटक आहे. समाजाच्या अभौतिक संस्कृतीचा तो एक पैलू आहे. परस्पर संबंधित अशा धर्मनिरपेक्ष, श्रद्धामूल्य, नियमने, यांच्या एकत्रीकरणाला विचारप्रणाली असे संबोधले जाते. अशा प्रकारे काही निश्चित अशी साधने वापरून काही निश्चित उद्दिष्टे प्राप्त

करण्यासाठी विचारप्रणाली महत्त्वाची आहे. यामध्ये श्रद्धा, मूल्य आणि नियमने यांचा संच एखादया समाजातील परिवर्तनाची दिशा, गती व व्याप्ती यांचे निर्धारण करणारा एक महत्त्वाचा पैलू आहे. क्रांतीकारक विचारप्रणाली, ही दिशा व प्रेरणा देण्यासाठी समाजाच्या मूलभूत समाजरचनेत अधिक वेगाने परिवर्तन घडून नवीन समाज व्यवस्था निर्माण करते.

**प्रभावी व्यक्तिमत्त्व:**

प्रभावी व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची भूमिका ही सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास व त्यांना दिशा देण्यास महत्त्वाची असते. यामध्ये म. गांधी, थॉमस एडिसन, कार्ल मार्क्स या सारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे कार्य करणारे म. गांधी, महर्षि कर्वे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, राजा राममोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, यासारखी प्रभावी व्यक्तिमत्त्वे भारतीय समाजातील परिवर्तनास दिशा देणारी व्यक्तिमत्त्वे आहेत.

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. भारतीय संस्कृती ही मूलत: लोक संस्कृती असून ती जनसामान्यांची व ग्रामिणांची आहे, यात शंका नाही. कृषी विकास प्रतिष्ठानने ओळखले होते. शेती व इतर जोडव्यवसायाचे प्रसार, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण या त्रिसुत्रीद्वारे दुष्काळी तालुक्याचे एक कृषीप्रधान, उद्योगप्रधान व शिक्षण प्रधान असे सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे. कृषी विकासाबरोबर त्यांनी मानवी विकासही साधला आहे.

उद्योगाच्या निर्मितीवर चर्चा करताना पी. गिसबर्ट म्हणतात की, आपल्या भौतिक हेतूंच्या पूर्ततेसाठी मानवाने विविध साधनांचा वापर करण्यासंबंधी लावलेला नविन शोध व शोधामुळेच मानवाच्या निर्मीतिबरोबर उद्योगाची निर्मिती झाली आहे. म्हणून उद्योग हा पीरवर्तन प्रक्रियेशी निगडीत आहे. माणसाच्या गरजा बदलल्या की, औजारातही परीवर्तन होते. त्यामुळे निर्मिती होते ही क्रिया उद्योगप्रक्रियेत येते

यातूनच विकासाचे टप्पे पाडले गेले आहे. सुरूवातीला संरजामशाही, उत्पादनक्षमता, संघउत्पादन पद्धत, गृहउद्योगपद्धत, इंग्लडमध्ये औद्योगीक क्रांतीचा परीणाम उत्पादन प्रक्रियेत यंत्राचा वापर होण्यास झाला.

(संदर्भ — उद्योगाचे समाजशास्त्र, पी.के. कुलकर्णी, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. ४२,४३)

बारामतीमध्ये प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत, शिक्षणशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, व्यावसायीक शिक्षण इत्यादीसाठी स्वतंत्र महिला विभाग स्थापन केला आहे. ग्रामीण महिलांसाठी विशेष सुविधा देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून त्यांचे सक्षमीकरणावर भर दिला आहे.

प्रख्यात सामाजिक कार्येकर्ते अण्णा हजारे यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये असे नमूद केले की, स्वातंत्रपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, ज्योतीबा फुले अशा अनेक महापुरूषांनी बलशाही भारताचे स्वप्न साकारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये त्यांनी मनुष्याच्या दारिद्रयावर भर दिला होता. मनुष्याचे दारिद्रय दूर झाल्याशिवाय बलशाही भारत उभा राहणार नाही. माणसाचे दारिद्रय दूर करावयाचे असेल तर जमिनीचे दारिद्रय दूर झाल्याशिवाय माणसांचेही दारिद्रय दूर होणार नाही. याचाच विचार करून असे महत्त्वाचे कार्य कृषी विकास प्रतिष्ठान करत आहे. या कार्यातून देशातील अनेक शेतकऱ्यांना नवी दृष्टी मिळाल्याशिवाय राहणार नाही. या कार्याची प्रेरणा घेऊन त्याचा प्रसार आम्ही करणार आहोत.

(संदर्भ— कृषी भगीरथ आप्पासाहेब पवार, शिवाजीराव ठोंबरे, प्रकाशन म.ना.जोशी सन पब्लीकेशन पुणे, एप्रील २००१, पान क्र. १२२)

राळेगणसिद्धी मध्ये १९७५ पासून ग्रामविकास योजनेच्या माध्यमातून विकासाला चालना देण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने नशाबंदी, नसबंदी, कुऱ्हाडबंदी आणि चराईबंदी या चतूसुत्रीच्या आधारे परिवर्तन घडवून आणले आहे. हिवरेबझारमध्ये बांधबंधीस्ती, नालादुरूस्ती, पाणी आडवा, पाणी जिरवा व जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून हिवरेबझारमध्ये परिवर्तन घडवून आणले आहे. ऐकीव गोष्टीपेक्षा प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनावर अधिकाधिक विश्वास बसतो.

शेतीविषयक तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी कृतीत आणण्यासाठी त्यांना ते प्रात्यक्षिकाद्वारे पाहण्यासाठी कृषी विकास प्रतिष्ठानने स्वत:चा आदर्श शेती फार्म निर्माण केला आहे की, ज्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांमध्ये परिवर्तन झाले आहे.

महाराष्ट्रातील समकालीन विकास म्हणजे मानवी समाजातील परिवर्तन ही परिवर्तनाची लाट सर्वत्र आहे. परिवर्तन योग्य दिशेने व्हावे म्हणून सर्वांगीण स्वरूपाचे प्रयत्न केले जातात. व विकास कार्यक्रमातून उद्योगाची निर्मीती केली जाते. अशा प्रकारच्या विकास योजनातून आर्थिक वृद्धी घडून येते. व सुखसमृद्धी निर्माण होते. याचा एक भाग म्हणून अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त असा आंतरराष्ट्रीय दर्जाची विविध प्रकारची (Multi brand & Multi product) दूग्धोत्पाने तयार करणारा व देश विदेशात विक्रीचे जाळे असणारा मुलवर्धीत दूग्धोत्तादने निर्माण करणारा श्रायबर डायनामिक्स डेअरी हा प्रकल्प आहे. अशा विलक्षण पॅटर्नबद्दल मनमोहनसिंग म्हणतात की, शरदरावांनी कृषीविषयक विकासाचा विलक्षण यशस्वी असा बारामती पॅटर्न उर्वरीत देशातही घडवून आणावा. आपण उभ्या भारतीयांचाच विकास बारामतीच्या धर्तीवर साकारू शकलो तर एक राष्ट्र म्हणून आपण उन्नत मानेने जगभर निश्चितपणे वावरू शकू. असा हा बारामती पॅटर्न वेगळा आणि विलक्षण आहे. त्यामुळे संशोधकाचे लक्ष त्याकडे वेधले गेले.

## १.७ अनिलकुमार लखीना पॅटर्न

अनिलकुमार लखीना हे अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांच्या असे लक्षात आले की, अनेक लोक दिवसेंदिवस कार्यालयामध्ये कामासाठी हेलपाटे मारत आहेत. एकाच कामासाठी अनेकवेळा अर्ज करत आहेत. परंतु त्यांची कामे होत नाहीत असे त्यांच्या लक्षात आले कारण कार्यालयीन अधिकारी, लिपिक, सेवक यांचेमध्ये समन्वय नाही. कार्यालयीन दप्तरांची अस्ताव्यस्तता, कार्यालयातील वातावरण चांगले नाही. म्हणून नागरिकांची कामे होत नाहीत. या कार्यपद्धतीमध्ये बदल

करण्याच्या दृष्टीने त्यांनी जिल्ह्याधिकारी कार्यालयातील प्रशासकीय कामकाजामध्ये बदल करण्यासाठी ३ व्यूहरचना करून आरंभ केला.

१. प्रशासकीय अधिकारी, लिपिक, शिपाई व सामान्य नागरिक यांच्या संबंधामध्ये आमुलाग्र बदल घडून आणणे.
२. कार्यालयाच्या कामामध्ये सुसुत्रता आणणे. यासाठी कामाचे वर्गीकरण, शासकीय दस्तऐवज सहज उपलब्ध होतील अशी रचना करणे. नागरिकांचे अर्ज, कर्मचाऱ्यांच्या कामाची विभागणी, इत्यादी मध्ये सुधारणा घडवून आणणे.
३. चांगले काम करण्यासाठी कार्यालयातील वातावरण व परिस्थितीमध्ये बदल करणे. अशा पद्धतीच्या कार्याची आखणी करून त्याची अंमलबजावणी केली व त्यामध्ये त्यांना सकारात्मक बदल झालेला दिसून आला होता.

त्यामुळे हा बदल 'अनिलकुमार लखीना पॅटर्न' या नावाने ओळखला जाऊ लागला.

### १.७.१ लातूर पॅटर्न

राजश्री शाहू कॉलेज, लातूरचे माजी प्राचार्य अनिऋध्द जाधव यांनी पहिल्यांदाच महाविद्यालयात विशेष शैक्षणिक बदल केले. व प्रत्यक्ष राबविण्यास सुरूवात केली. त्यांनी विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करून, उरलेल्या वेळात विद्यार्थ्यांकडून परीक्षेचा सराव करून घेणे व आठवड्याला परीक्षा घेणे, सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार करणे. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर दिसून आला. अपेक्षेपेक्षा जास्त गुण मिळू लागले. त्यामुळे हा पॅटर्न खूप लोकप्रिय झाला.

सुरूवातीला हा पॅटर्न शाहु पॅटर्न या नावाने ओळखला जात होता. पण लातूरच्या प्रत्येक महाविद्यालयात त्याचा वापर होऊ लागला या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळू लागले आणि विद्यार्थी गुणवत्ता यादीत येऊ लागले होते. त्यामुळे 'शाहू पॅटर्न' चे रूपांतरण 'लातूर पॅटर्न' मध्ये झाले हे केवळ अनिरूद्ध जाधव सरांच्यामुळे घडून आले. आज ही हा पॅटर्न राज्यात प्रसिद्ध आहे.

बऱ्याच लोकांनी या लातूर पॅटर्नवर आक्षेप घेतले. ज्यांना लातूर पॅटर्नमुळे गुण मिळतात ते विद्यार्थी पुढे चांगले करिअर करू शकत नाहीत कारण असे विद्यार्थी फक्त परीक्षा केंद्रीत होतात. अशी टिका त्यांच्यावर झाली. पण हे सत्य नाही कारण लातूर पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे दिसते आहे. तसेच नियोजनामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक व शैक्षणिक ताणही कमी झाला व विद्यार्थी नवनवीन आव्हाने स्वीकारण्यास तयार झाले.

## १.८ दूधाचा गुजरात पॅटर्न

'गुजरात मिल्क फेडरेशन' ही संस्था गुजरातमध्ये दूध व्यवसायाचे नियोजन करते. दूध व्यवसायाला चालना देण्याचे काम या संस्थेने केले आहे.

गुजरातमधील शेतकऱ्यांची दूध व्यवसायाने आर्थिक उन्नती झाली आहे. त्यांनी राबवलेल्या धोरणांमुळे हे शक्य झाले आहे. संपूर्ण गुजरातमध्ये एकही तालुका संघ नाही. फक्त जिल्हा संघ आहे. 'एक गाव एक दूध संस्था' हे धोरण संपूर्ण राज्यात राबविले जाते. गुजरातमध्ये दूधाचे दर हे फेडरेशन ठरवते. त्यात राज्यशासन हस्तक्षेप करत नाही.

परिस्थितीनुसार वर्षातून पाच ते सहा वेळा दरात बदल केले जातात. संघाचे दर भौगोलिक परिस्थिती नुसार ठरविले जातात. सर्व राज्यात एकाच ब्रँडखाली (अमूल) दूधाची विक्री होते. व ते सर्व नियोजन 'अमूल' करते. त्यामुळे दूधाच्या प्रतीची योग्य पारख होते शेतकऱ्याला योग्य न्याय मिळतो.

गुजरातमध्ये म्हैस २० ते २२ लिटर दूध देते. तर त्याच जातीची म्हैस महाराष्ट्रात फक्त ८ ते १० लिटर दूध देते.

साबरमती येथील गोशाळेत (एन.डी.डी.बी) च्या सहकार्याने चांगल्या दर्जाचे 'सिमेन डोसेस' बनविले जाते. त्यामुळे चांगल्या दर्जाच्या गाई व म्हशी निर्माण करणे हे तेथील शेतकऱ्यांना सहज शक्य झाले. तेथील प्राथमिक दूध संस्था,

कृत्रिम रेतन फक्त पाच रूपयांत करते. संघाकडून २४ तास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाते.

गुजरातमधील प्रत्येक जिल्हा संघाचे पशुखाद्य कारखाने आहे. ते कारखाने उभारण्यासाठी अमूल ने पुढाकार घेऊन आर्थिक सहकार्य केले आहे. त्यामुळे तेथील पशुखाद्याचे दर प्रति किलो सात रूपये आहे.

गुजरातमधील दूध उत्पादक शेतकरी व त्यांच्या जनावारांचा विमा संघामार्फतच उतरविला आहे. कुठलाही आजार असलेल्या जनावरांवर संघ किंवा फेडरेशन मोफत इलाज करते.दूग्ध व्यवसायाला बळकटी देण्यासाठी दूधाचा गुजरात पॅटर्न महत्त्वाचा आहे.

## १.९ बारामती ऐतिहासिक व भौगोलिक परिचय

### १.९.१ ऐतिहासिक माहिती

बारामती हे गाव महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यात बारामती तालुक्याचे मुख्य केंद्र म्हणून सध्या प्रसिद्ध आहे. या तालुक्याला पूर्वी सरकार दप्तरी भिमथडी असे नाव होते. प्रथम बारामती हे इंदापूर विभागात होते. भिमा व निरा या नद्यांच्या दरम्यानचा प्रदेश म्हणून भिमथडी हे नाव पडले होते.

बारामती गावाचे स्वाभाविक दोन भाग पडले आहेत. कऱ्हानदीने हे दोन भाग पाडले आहेत. ही नदी येथे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. उत्तर अक्षांश १८° ते १०° व पूर्व रेखांश ७४° ते ३९° अशा भौगोलिक स्थळात हे गाव वसलेले आहे. पूण्याहून सरळ आग्नेय दिशेस १०० कि.मी अंतरावर बारामती आहे. बारामती तालुका हा सह्याद्रीच्या पूर्व पश्चिम रांगा संपून त्यांना दक्षिणोत्तर बांध घालणारा जो पूर्वेकडे उतरत जाणारा सपाटीचा प्रदेश लागतो. त्यांच्या सुरूवातीच्या भागात आहे. पूर्व काळापासून कऱ्हेपठार या नावाने ओळखला जाणाऱ्या या प्रदेशात बारामतीचा समावेश आहे.

बारामतीच्या सभोवर उत्तम शेतजमीन विशेषकरून पश्चिम भागात आहे. काळी जमिन पाण्याच्या अभावी बागायत करणे हे खर्चाचे काम असल्यामुळे साधारण शेतकऱ्याच्या आटोक्याबाहरचे होते पण १८८६ मध्ये निरा कालवा झाल्यावर परिस्थिती बदलली. शेतजमिनीला या कालव्याने फायदा झाला. डिसेंबर ते मे पर्यंत सुमारे २.५ इंच जून ते सप्टेंबर १३.५ इंच व ऑक्टोबर ते नोव्हेंबर मध्ये ४ इंच एवढा पाऊस पडतो. पावसाचे सरासरी ३५ ते ४० दिवस पूर्ण वर्षात असतात.

बारामती नगरी पुरातन काळापासून पसिद्ध आहे. त्याची साक्ष आजही तेथील वास्तु व मंदिरे देतात. कऱ्हेच्या पश्चिम तिरावर श्री काशीविश्वेश्वरांचे प्राचीन मंदिर आहे. इ.स. ७०० ते ९०० पर्यंतच्या काळात बांधले असावे असा अंदाज आहे. या देवावलयात राशीचक्रदेखील आहे. याच देवालयात सुमारे ३०० वर्षापूर्वी श्रीधर स्वामींनी 'शिवलीलामृत' हा ग्रंथ लिहीला होता. त्याचा उल्लेख चौदाव्या अध्यायाच्या शेवटच्या १२ व १३ व्या ओव्यात आहे.

इ.स. १६०३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांना अहमदनगरच्या निजामशहाने 'राजे' हा किताब व फौजेच्या खर्चास चाकण, सुपे, पुणे हे परगणे दिले. याप्रमाणे भोसले यांच्या वंशाच्या ताब्यात बारामती आली व पुढे शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्यामध्ये बारामतीचा कारभार दादोजी कोंडदेव यांचेकडे होता. त्यानंतर दिल्लीच्या मोगलांचा अमंल सुरू झाला. चांदशावली दर्ग्याला दिलेल्या इनामतीच्या सनदेवरून आढळून येते. औरंगजेबाच्या मृत्युनंतर बारामती पुन्हा स्वराज्यात सामील झाली. १७४३ मध्ये शाहु महाराजांनी बाबूजी नाईक यांना बारामती महालाची जहागीरी दिली. त्यात सांगवी, गुणवडी, माळवाडी, कटफळ, गोजुबावी, कन्हेरी व सर्व बारामती महालाचा समावेश होता. बाबूजी नाईक हे कवी मोरोपंताचे आश्रयदाते होते. मोरोपंतानी इ.स. १७९० मध्ये 'केकावली' लिहीली.

कऱ्हानदीच्या पूर्व तिरावर बाबूजी नाईकांनी शनिवार वाड्याच्या धर्तीवर वाडा बांधला. बाबूजींनी आपल्या वाड्याच्या दक्षिणेस सिद्धेश्वराचे देवालय बांधले आहे. या मंदिरातील नंदीची मुर्ती भव्य व बैठी आहे. या देवालयाच्या पाठीमागे उजव्या सोंडेच्या गणपतीचे मंदिर आहे. हेच मोरोपंताचे स्फूर्तीस्थान होते. बारामतीत आल्यानंतर सितागीत, सावित्रीगीत ही काव्य नाईकांच्या मुलींना, सूनांना त्यांनी रचून दिली. अत्यंत सोपी, रसाळ अशी काव्य पाहूनच बाबूजींनी त्यांना गणपती मंदिराजवळचा वाडा दान दिला. आजही त्या ठिकाणी मोरोपंताची लेखनकार्याची खोली जतन करून ठेवली आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यांची पुण्यतिथि प्रतिवर्षी मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. मोरोपंताच्या सुमारे पाऊणलाख कविता आहेत. शिवाय त्यांनी लिहिलेल्या आर्या आजही जनसामान्यांमध्ये प्रसिद्ध आहेत.

बारामती येथील मुनीसुव्रत दिगंबर जैन मंदिर हे फार पुरातन आहे. जैनांच्या तिर्थकारांपैकी विसावे तिर्थंकर म्हणजे या मंदिराची मुळ मुर्ती मुनीसुव्रत तिर्थंकराची आहे. १९३२ मध्ये या मंदिराचा जिर्णोद्धार झाला. दिगंबर पंथीयांचे सर्व सुविधांनी युक्त असे महावीर भवन आहे. तसेच श्वेतांबराचे भव्य स्वतंत्र मंदिर आहे. या मंदिराची मुळ मुर्ती मुनिसुव्रत तीर्थकरांची आहे.

येथील चांदशावलीचा उरूस जवळजवळ ३०० वर्षांपासून सुरू आहे. उरूसामध्ये कोणी कोणते काम करावयाचे हे ठरलेले असते. त्यात हिंदू, मुस्लीम असा भेदभाव नाही. एकात्मतेचा पाठ देणारी संस्था म्हणून हे स्थान विलोभनीय आहे. कसब्यातील मशिद व काशिविश्वेराचे मंदिर अगदी शेजारी असून या दोन्ही समाजातील वातावरण सलोख्याचे आहे. थोडक्यात गणेशोत्सव, मोहरम, उरूस यासाठी हिंदू—मुस्लिम भाई—भाई ही गांधीजींची शिकवण जनमानसात पूरेपूर रूजलेली आहे. त्यामुळे एकात्मतेचा केवळ संदेशच प्रसारीत होत नाही तर त्याचे प्रत्यक्षात अवलोकन सुद्धा केले जात आहे. गावात पुरातन श्रीराम मंदिर आहे तसेच पांढरीचा महादेव, उघडा मारूती, माळावरची देवी ही पूरातन मंदिरे आहेत. दाऊदी बोहरी समाज, मस्जीद, ख्रिस्ती उपासना मंदिर आहे.

सुमारे ४० कि.मी अंतरावर अष्टविनायकांपैकी एक मोरगावचा मयुरेश्वर आहे. सोमजाचे करंजे प्रसिद्ध जागृत सोमनाथाचे देवालय आहे. अशी बारामतीची उज्ज्वल परंपरा आहे. या थोर परंपरेबद्दल आपणास अभिमान वाटणे साहजिकच आहे. त्याचा वारसा आज टिकवून आहे. एवढेच नव्हे तर त्यात अजून भर घालत आहेत.

१८६५ साली बारामती नगरपालिकेची स्थापना झाली. १८८० च्या सुमारास बारामतीत प्रचंड दुष्काळ पडला होता. अन्नासाठी बारामतीकरांनी दंगली केल्या. त्या 'फेमीन रायटर्स' म्हणून नोंदविल्या गेल्या आहेत. दुष्काळी कामे सुरू करावे लागले. त्यातूनच ११० मैल लांबीचा निरा डावा कालवा तयार झाला.

सन १९३३ ते १९४७ या काळात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतातील असंख्य व्यक्ती स्वातंत्र्याच्या देशव्यापी आंदोलनात सहभागी झाल्या. त्यात बारामतीकरांनी आपले योगदान दिले आहे. सुत—कताई करणे, वंदे मातरम् घोषणा देणे. तिरंगा घेऊन मिरवणूका काढणे इ. विधायक जागृती घडवून आणली. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात बारामतीने आपला सिंहाचा वाटा उचलला आहे.

१९६२ पासून शरद पवार यांनी राजकीय क्षेत्रात स्थानिक नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारली. १९५८ पासून सुमारे १० वर्षे युवकांच्या चळवळीत सक्रीय भाग घेतला. युवक चळवळीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी परदेश दौरा केला.

१९६७ मध्ये बारामतीमधून विधानसभेवर ते निवडून आले. तेव्हापासून आजतागायत ते सक्रिय राजकारणात सहभागी आहेत. एक राष्ट्रीय नेता म्हणून देशाच्या कृषी खात्याची जबाबदारी ते संभाळत आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात त्यांचा गृहराज्यमंत्री, शिक्षणमंत्री, कृषीमंत्री, गृहमंत्री, मुख्यमंत्री अशा चढत्या क्रमाने त्यांचा उत्कर्ष होत गेला. भारताचे संरक्षणमंत्री म्हणूनही त्यांनी कुशलतेने काम केले आहे व आज भारताचे कृषी मंत्री म्हणून काम संभाळत आहेत.

लातुर आणि उस्मानाबाद जिल्ह्यात भुकंपाचा उद्रेक १९९३ साली झाला होता. त्यावेळी जनतेला आधार देऊन फार थोड्या अवधीत त्यांचे संसार उभे केले. या संकटात त्यांनी केलेली कामगिरी खरोखर अविस्मरणीय आहे. तसेच मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न योग्य तऱ्हेने हाताळून मार्गी लावला. महिला विकास आयोग स्थापन करून महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज यांचा वैचारिक वारसादेखील त्यांनी पुढे चालू ठेवला. एवढेच नाहीतर कृतीत आणला आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनात भर घालणाऱ्या संघटनामागे ते ठामपणे उभे आहेत.

नवीन जबाबदारी स्वत:हून घेणे त्याचा बारकाईने अभ्यास करणे व घेतलेले काम जिद्दीने पुर्ण करणे हे त्यांचे खास वैशिष्टये आहे. स्पष्ट व मार्मिक बोलणारा परखड नेता सामान्यापासून असामान्यापर्यंत झोपडीपासून ते हवेलीपर्यंत, गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत एवढी लोकप्रियता संपादन केलेला नेता म्हणजेच शरद पवार होय.

## १.९.२ भौगोलिक माहिती

तालुक्यात एकूण ११७ गावे आहेत. येथेच एक ११० मैल लांबीचा निरा डावा कालवा आहे. हा कालवा ११० वर्षापूर्वीचा असल्याने त्याचे नुतनीकरण करून पिकांना योग्य तो पाणी पुरवठा करण्याचे महत्त्वाचे काम झाले आहे. पर्यायाने पिकांना योग्य वेळी पाणी मिळू लागल्याने खरीप व रब्बी हंगामामध्ये जादा क्षेत्र ओलिताखाली आले आहे व फळबाग विकास कार्यक्रमांना चालना मिळाली. बारामती तालुक्यामधील पर्जन्यमानाचा तपशील पुढीलप्रमाणे:

**तक्ता क्र. १.१ वार्षिक सरासरी पर्जन्यमान**

| महिना | वर्ष | | | महिना | वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2001 | 2005 | 2009 | | 2001 | 2005 | 2009 |
| जानेवारी | - | - | - | जुलै | 52.00 | 153.7 | 54.00 |
| फेब्रुवारी | - | - | - | ऑगस्ट | 98.00 | 87.02 | 95.00 |
| मार्च | - | - | 19 | सप्टेंबर | 116.00 | 159.7 | 154.00 |
| एप्रिल | - | - | 0.3 | ऑक्टोबर | 173.00 | 113.00 | - |
| मे | 39.00 | - | 3.00 | नोव्हेंबर | 24.00 | - | - |
| जून | 19.00 | 47.04 | 289.00 | डिसेंबर | - | - | - |

आधार: पंचायत समिती, वार्षिक अहवाल, बारामती

### १.९.३ बारामती तालुक्याची लांकसंख्या

बारामती तालुक्याची लोकसंख्या २००१ च्या जणगणनेनुसार ३७२८५२ आहे. त्यामध्ये ग्रामीण भागातील प्रमाण ३,२१,५१८ व शहरी भागात ५१,३३४ आहे. बारामती तालुक्यात महसुली गावांची संख्या ११७ आहे.

१९५१ पासून २००१ पर्यंत बारामती तालुक्याच्या लोकसंख्येत कसा बदल होत गेला याची माहिती पुढील तक्त्याद्वारे दर्शविता येईल.

## तक्ता क्र. १.२: बारामतीची लोकसंख्या

| वर्ष | एकूण व्यक्ती | | | पुरूष | | | स्त्रीया | | | दर चौ. कि.मी लोकसंख्या | दर हजारी पुरूषामागे स्त्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | | |
| २००१ | ३७२८५२ | ३२१५१८ | ५१३३४ | १९२५९७ | १६६०१४ | २६५८३ | १८०२५५ | १५५५०४ | २४७५१ | २७० | ९३६ |
| १९९१ | ३१०४४२ | २६५९२७ | ४४५१५ | १६००३९ | १३६८९१ | १३१४८ | १५०४०३ | १२९०९६ | २१३६७ | २२४ | ९४० |
| १९८१ | २५७५११ | २००३९० | ३७१२१ | १३१५१० | ११२२६६ | १९२४४ | १२६००१ | १०८१२४ | १७८७१ | १८६ | ९५८ |
| १९७१ | २७७७०७ | १९९७९५ | २७९१२ | ११६५१८ | १०२२२२ | १४३३६ | १११४९ | ९७५७३ | १३५७६ | १६५ | ९५४ |
| १९६१ | १७३८१७ | १५२६२९ | २११११८ | ८८२५२ | ७७३७५ | १०८७७ | ८५५६५ | ७५३२४ | १०२२४१ | १२४ | ९७० |
| १९५१ | १३४२७१ | १०४३७७ | २९८९४ | ६७६२५ | ५२५१७ | १५१०८ | ६६६४६ | ५११६० | १४७८६ | ९६ | ९८६ |

आधार: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २००२, पृ.क्र. ४ व ५

वरील प्रमाणे बारामती तालुक्यात १९५१ ते २००१ या ५० वर्षातील कालखंडामध्ये लोकसंख्येत फरक झालेला दिसून येतो. १९९१ मध्ये बारामती तालुक्याची एकूण लोकसंख्या ३१०४४२ वरून २००१ मध्ये ३७२८५२ इतकी झाली.

### १.९.४ बारामतीची साक्षरता:

शैक्षणिकदृष्टया विकसित असलेल्या या तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. २००१ च्या आकडेवारीनुसार बारामती तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण पुढील तक्त्यात स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. १.३ साक्षरता प्रमाण.**

| घटक | ग्रामीण साक्षरता (%) | नागरी साक्षरता (%) | एकूण साक्षरता (%) |
|---|---|---|---|
| पुरूष | ११९५३० (८४.१९) | २०८८४ (९०.७८) | १४०४१४ (८५.८) |
| स्त्री | ८५२७३ (६३.३३) | १६६९९ (७७.२१) | १०१९७२ (६५.२५) |
| एकूण | २०४८०३ (७४.०२) | ३७५८३ (८४.२०) | २४२३८६ (७५.४४) |

आधार: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल २००२, पृ.क्र. ८१

### १.९.५ बारामतीचा शैक्षणिक विकास

पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे हे एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र मानले जाते. आता पुण्याबरोबरच शिक्षणाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्रात पुढे आलेले शैक्षणिक केंद्र म्हणून बारामती ओळखले जाते.

बारामतीमध्ये पहिली शाळा २ फेब्रुवारी १८४६ साली सुरू झाली होती. नगरपालिकेच्या पुढाकारातून १८८३ साली मुलींसाठी शाळा नं. ३ उभारण्यात आली. मुंबई सरकारने १८८४ साली सर्व प्राथमिक शाळा नगरपालिकेकडे वर्ग केल्या.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल ३ मार्च १९११ साली सुरू झाले. १९७० साली कन्या विभाग सुरू झाला.

शिक्षणाची गरज ओळखून कर्मवीर भाऊराव पाटलांनी पाटस रोडला शाहू हायस्कूल चालू केले. तसेच तांत्रिक शिक्षणाची गरज ओळखून आर.एन.आगरवाल टेक्निकल शाळा सुरू केली.

जैन बांधवांनी बारामतीत इ.स. १९६० साली अनेकांत एज्युकेशन सोसायटी स्थापन करून तीनही विद्या शाखासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय स्थापन केले. तसेच आज याच संस्थेने स्वतंत्र व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय सुरू केले आहे.

बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना १९७२ साली झाली. या संस्थेने प्रथम बारामतीमध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली. त्यानंतर विद्या प्रतिष्ठानने एम.आय.डी.सी. बारामती येथे शैक्षणिक संकुल उभे केले. यामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान अशा तीनही शाखा असून सुसज्ज ग्रंथालयासोबत विद्यार्थी, विद्यार्थिनी वसतिगृहाची सोय आहे. या तीन शाखांप्रमाणेच संस्थेचे आज डी.टी.एड्., बी.एड्. महाविद्यालय, मराठी व इंग्रजी माध्यमांचा शाळा, इंजिनिअरिंग, तसेच आय.टी. बायोटेक्नॉलॉजी अशा सर्वच प्रकारच्या शिक्षणाची सोय आहे.

ग्रामीण भागातील तरूणांना इंजिनिअरिंग क्षेत्रात येण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शिवनगर विद्या प्रसारक मंडळातर्फे पदवी व पदविका इजिनिअरिंगचे पहिले महाविद्यालय माळेगाव या ठिकाणी सुरू करण्यात आले. आज या संस्थेचे बी.सी. ए.,बी.बी.ए, बी.फार्मसी, डी.फार्मसी, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा इ. सुरू आहेत. ग्रामीण भागातील कारखान्यातील सभासदस्यांच्या मुलांना इंग्रजी शिक्षणाबरोबर अध्ययावत तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे.

विद्यानगरीतील विद्या प्रतिष्ठानची व्ही.आय.आय.टी. ही ग्रामीण भागातील मुलामुलीना अल्प दरात 'एज्युकेशन थ्रू मोबाईल व्हॅन' द्वारे संगणकाचे प्रशिक्षण देणारी शाखा कार्यरत आहे.

बारामतीपासून ४ कि.मी अंतरावर शारदाबाई पवार शैक्षणिक संकुल आहे. या शैक्षणिक संकुलाची सुरूवात १९८९ साली महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय स्थापना झाली. प्राथमिक शिक्षण, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बी.एड., डी.टी.एड्.,स्वयंरोजगासाठीचे छोटे अभ्यासक्रम, कृषी विषयक अभ्याक्रम, गृहविज्ञान यासारखे अभ्यासक्रम आहे. २००० मुलींचे वसतिगृह, तसेच कृषी पदविका अभ्यासक्रम, कृषी महाविद्यालय इत्यादी अभ्यासक्रम येथे उपलब्ध आहेत.

तालुक्यामध्ये सोमेश्वर येथे मुगुटराव साहेबराव काकडे हे महाविद्यालय आहे. येथेही कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांचे अभ्यासक्रम आहे.

बारामतीमध्ये समाजकल्याण विभागाचे मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. तसेच शासकीय बालनिरीक्षणगृह (रिमांड होम) डॉ.बाबासाहेब आंबेडकर या नावाने मागासवर्गीय मुलांसाठी शासकीय वसतिगृह आहे.

### १.९.६ बारामतीचा वैद्यकीय सुविधा

दिवसेंदिवस मानवाला मिळत चाललेल्या सोयी सुविधामुळे आर्युमान वाढले आहे. विविध कारणांनी आपल्याला गरज असते ती रूग्णालयांची जेथे आपणाला जीवनदान मिळेल अशा आरोग्य सुविधांची सोयी सुविधा न मिळाल्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागतो. यासर्व परिस्थितीचा विचार करून बारामती सारख्या तालुक्याचे ठिकाण आरोग्य सुविधांच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. जिल्हयाच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व सोयी सुविधा बारामतीमध्ये उपलब्ध आहेत. सर्व सामान्य नागरिकांना आरोग्याच्या मोफत सोयी सुविधा मिळणारे रूग्णालय म्हणजे शासकीय रूग्णालय, बारामतीत असून या रूग्णालयात मोफत सोयी सुविधा बरोबर योग्य व तात्काळ सेवा मिळतात. बारामतीच्या आरोग्य सेवेला स्वातंत्र्यपूर्व इतिहास आहे. बारामतीतील सिल्व्हर ज्युबिली रूग्णालय १९३५ पासून कार्यरत आहे.आरोग्याशी संबंधित प्रत्येक संकटाशी लढण्यास बारामती तालुका सज्ज झाला आहे. शासनाच्या सोयी सुविधामुळे सार्वजनिक आरोग्यात आपण ६० ते ६५ वर्षात बरीच प्रगती केली आहे.

आज बारामतीत ३ ग्रामीण रूग्णालय व ९ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संस्थामधून आरोग्य सुविधा पुरविण्यात येत. शासकीय आरोग्य योजनेमध्ये, मलेरिया नियंत्रण व किटकजन्य रोगांच्या नियंत्रणाची योजना, क्षयरोग नियंत्रण विभाग, कुष्ठरोग नियंत्रण विभाग,एड्स नियंत्रण विभाग (ए.आर.टी), जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम,राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण विभाग, साथीचे रोग नियंत्रण विभाग, माता बाल संगोपन विभाग, कुटुंब कल्याण कार्यक्रम. या सर्व योजनेअंतर्गत आरोग्यकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रूग्णालये काम करत आहेत.

### १.९.७ बारामतीचा औद्योगिक विकास

बारामती शहरापासून ६ कि.मी अंतरावरील माळरानावर आता औद्योगिक वसाहतीचे क्षेत्र वाढत आहे. सुरूवातीला २००० एकरावर असलेली वसाहत आता तिचे क्षेत्र वाढविण्यात आले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना १९९० मध्ये झाली. या औद्योगिक वसाहतीमुळे स्थानिकांना रोजगार, उद्योजकांना कामाची संधी प्राप्त झाली आहे. मोठमोठ्या उद्योजकांनी बारामतीत उद्योग विकसित केले आहेत. यामध्ये कल्याणी स्टील, बारामती सॉलेट, एस.टी. कार्यशाळा, पियाजो, स्पेन्टेक्स, सोमा टेक्सटाईल्स, श्रायबर डायनामिक्स डेअरी, कल्याणी स्टील, आय.एस.एम.टी. ईमसोफर, टेक्सटाईलपार्क इ. उद्योगधंदे चालु आहेत. मोठ्या उद्योजकाबरोबर स्थानिक तरूणांनाही छोटे उद्योग सुरू सुरू केले आहेत. तसेच तालुक्यामध्ये सहकाराच्या माध्यमातून माळेगाव सहकारी साखर कारखाना, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना व छत्रपती सहकारी साखर कारखाना, ग्रेप इंडस्ट्रीज, पशुखाद्य कारखाना इ. मुळे परिसरातील नागरिकांना त्याचा लाभ मिळू लागला आहे.

### १.९.८ क्रीडा विकास:

राष्ट्रीय पातळीवरील खो—खो स्पर्धा, कबड्डी स्पर्धा या सारख्या खेळांचे आयोजन केले जाते. ३४ वी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा, कुस्ती स्पर्धा यांचे आयोजन केले होते. डिसेंबर १९९६ मध्ये महाराष्ट्रातील सर्व अधिक्षण गृहातील मुलामुलींच्या खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. बारामतीतील क्रीडा संघानी यात मोठे यश मिळविले. बारामती क्रीडा विकास प्रतिष्ठान व युथ फौंडेशन या संस्थांना सहकार्य व मार्गदर्शन केले जाते. यातून बारामतीचा नावलौकिक वाढविण्यासाठी खेळाडू प्रयत्न करित आहेत.

### १.९.९ सांस्कृतिक विकास

सांस्कृतिक विकास कार्यक्रमांतर्गत बारामतीध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विविध कला महोत्सव, उच्चस्तरीय नाट्यप्रशिक्षण शिबीर, नृत्यकला

महोत्सव, सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले गेलेले आहे व अजूनही ती परंपरा चालू आहे. १९९५ मध्ये अखिल भारतीय नाटय परिषदेच्या अमृत महोत्सवी नाट्यसंम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यात नटराज नाटय मंडळ व नाट्यसाधना या संस्थांनी सहभागी होऊन सहकार्य केले आहे.

## १.१० सहकारी संस्था

तालुक्यामध्ये सहकाराच्या माध्यमातून विकास गतिमान होत आहे. विविध माध्यमातून यशस्वी घोडदौड चालू आहे. उपपदार्थांच्या निर्मितीतून शेतकऱ्यांच्या उसाला सर्वाधिक भाव मिळवून दिला आहे. विविध कार्यकारी सोयायट्या व पतसंस्था मोठ्या प्रमाणावर आहेत. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून बारामती तालुक्यातील शेती विषयक विकास कामांना विविध कार्यकारी सेवा सोसायट्या माध्यमांतून आर्थिक मदत केली जात आहे. तसेच बारामती सहकारी बँकेच्या माध्यमातून छोट्या–मोठ्या अनेक व्यावसायिकांना अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. अशा संस्थाच्या माध्यमातून बारामती तालुक्यातील शेतीचा व व्यावसायिकांचा विकास साधला गेला आहे.

### १.१०.१ शेती विकास

बारामती तालुक्यामध्ये १९७१ साली कृषी विकास प्रतिष्ठान ची स्थापना झाली. बारामती तालुक्यातील विशेषत: अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली. आधुनिक शेती, पाझर तलाव, वनसंवर्धन व वनविस्तार, फळबाग विभाग, आदर्श नर्सरी, कुक्कुटपालन, युवकांना शेती प्रशिक्षण, रेशीम पैदास, फिरता दवाखाना, माती परिक्षण व शेती विज्ञान , विज्ञान मंडळ इ. अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. शेतीसाठी तुषार व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करून काटकसरीने पाण्याचा वापर केला आहे. कमी पाण्यावर ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करून ऊस, डाळिंब, द्राक्षे, इ. फळबागा विकास कार्यक्रमांना चालना दिली आहे. या

क्षेत्रातील उत्तुंग कार्याबद्दल आप्पासाहेब पवार यांना 'पद्मश्री' हा बहुमानाचा किताब भारत सरकारकडून दिला गेला आहे. तसेच त्यांना 'कृषीरत्न' व 'डी.लिट' ही पदवी देऊन गौरविण्यात आले आहे. भारतातीलच नव्हे तर परदेशातील अनेक तज्ज्ञ हे बारामतीचा कृषी विकास पाहण्यासाठी व कृषी तंत्रज्ञानाच्या अभ्यासासाठी व बारामतीची माहिती जाणून घेण्यासाठी येत आहेत.

**१.१०.२ कृषी उत्पन्न बाजार समिती**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १९३५ साली झालेली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाग मिळविण्यासाठी व त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची ठरलेली आहे.

**१.१०.३ खरेदी विक्री संघ**

बारामती तालुका खरेदी विक्री संघाची स्थापना करून शेतकऱ्यांना माफक दरात गुणात्मक दर्जा असलेली बी—बियाणे, औषधे उपलब्ध करून देण्यात येतात.

तसेच बारामती तालुका खरेदी विक्री संघाचे वैद्यकीय औषधांचे दुकान आहे. ग्राहकांना येथे योग्य दरात औषध मिळतात. तसेच इंधनातील भेसळीमुळे पर्यावरणावर परिणाम होत असल्यामुळे बारामती खरेदी विक्री संघाने भेसळमुक्त इंधनासाठी पेट्रोलपंप चालू केले आहेत.

**१.१०.४ फलोत्पादन संघ**

१९८९ मध्ये बारामती फलोत्पादन सहकारी संस्थेची स्थापना झाली. त्यामुळे फळबागांच्या लागवडीखालील क्षेत्र वाढले. त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली. पिंपळी येथे अद्ययावत अशा शितगृहाची सोय केली. तसेच द्राक्ष व डाळिंबे निर्यात केंद्रही चालु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालास चांगला भाव मिळवून देण्यासाठी ही संस्था कार्य करीत आहे.

'कृषीभूषण' आप्पासाहेब पवार यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन श्री. शरदराव पवार यांचे नेतृत्व बारामतीला लाभले आहे. पारंपारिक दूग्ध व्यवसायाची पद्धत मागे पडून नवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून बारामतीतील आर्थिकदृष्टया दुर्बल

असलेल्या दूध उत्पादकासाठी महत्त्वाचे व गरजेचे आहे हे ओळखून १ डिसेंबर १९७७ रोजी सहकारी तत्त्वाने 'बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना केली आहे.

## १.११ गोधन

'गोधन' हे वैदीक आर्यांच्या संपत्तीचा एक मार्ग होता. गाय, बैल व वासरे या सर्वांचा 'गोधन' शब्दात समावेश होतो. ऋग्वेदातील दान स्तुतीत गुरांच्या मोठया कळपांचा उल्लेख आहे. 'गोधन' वाढावे म्हणून देवतांच्या केलेल्या प्रार्थना ही ऋग्वेदात आढळतात. त्या काळी सर्व वस्तूंची किंमत गाईवरून ठरविली जात होती. 'गोत्र' हा शब्द गाय आणि गोठा यांच्यावरून व्युत्पदिला जातो. वैदिक आर्यांच्या गृह, यंज्ञ इ. संस्थांशी गोधनाचा घनिष्ठ संबंध आहे. पूर्वीच्या लोकांचा संसार गुरांच्या गोठ्यातच होता. त्याकाळी कथांची चर्चा तेथेच होत असे म्हणून त्यांना गोष्ठी हे नाव मिळाले. वैदिक आर्यांना 'गोपालन' व 'गोवर्धन' हे श्रेष्ठ कर्तव्य वाटे. त्यामुळे गोपूजा आर्यांमध्ये रूढ झाली व ती आजतागायत टिकून राहिली आहे. आजही दिपावलीच्या सणामध्ये गायीची पूजा केली जाते.

यज्ञातील सामान्य दक्षिणा म्हणजे 'गाय'. चार वर्षाची गर्भीणी गाय दक्षिणेसाठी महत्त्वाची मानली जात असे. लग्नात वराला हुंडा म्हणून गाय देत असे. जनक राजा रामचंद्राला विवाह प्रसंगी १०,००० गाई मिळाल्याचे वर्णन आहे. गोधनावरूनच संपत्तीची मोजदाद केली जात होती. १ गोकुळ १००० गायी हे असे कोष्टक असे. ज्याच्याजवळ अधिक गोकुळ तो अधिक श्रीमंत मानला जाई. जनावरांना चरण्यासाठी सार्वजनिक कुरणात सोडले जात असे. पाणी पिण्यासाठी गावाजवळ तळे असत. या गोधनासाठी दानशूर, तळी, गोठवी इ. सोयी करून देत असे. गोवंशात सुप्रजा निर्माण व्हावी म्हणून वृषीत्सर्गत बैल सोडला जाई तो कोठेही चरून वळू बने व प्रजननासाठी उपयोगी पडे.

— भारतीय संस्कृती कोश

### १.११.१ दूधाचे महत्त्व

भगवान श्रीकृष्णाच्या काळापासून सुरू असलेला दूध व्यवसाय आज मुख्य व्यवसाय ठरत आहे. शेतकरी, दूध उत्पादक संस्था, बचत गट, मोठ्या प्रमाणावर हा व्यवसाय करत असून त्यावरच ग्रामीण भागातील बाजारपेठ फुलत आहे.

गरीब ग्रामीण निराश्रीत लोकांना अर्थाजनाचे साधन दूध व्यवसायामुळे उपलब्ध झाले आहे. परंतु अजूनही ग्रामीण भागात शेतकरी दूधापासून दूग्धजन्य पदार्थ तयार करत नाहीत. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून समजला जातो.

सर्वांनाच दूधाची गरज आहे. म्हणूनच दूग्ध व्यवसायाचे महत्त्व वाढले आहे. वैद्यकीय शास्त्रात औषधासाठी दूधाचा वापर केला जातो. औषधी व पौष्टीक आहार म्हणून दूध, ताक, दही, लोणी, तूप, मलई विरहीत दूध इ. वापर केला जात आहे.

मुख्य म्हणजे आयुर्वेदिक म्हणून गाईच्या तुपास मानाचे स्थान आहे. शरीर वाढीस लागणारे सर्व घटक दूधामध्ये आहे. स्निग्ध पदार्थ, खनिज पदार्थ, प्रथिने, शर्करा व जीवनसत्त्वे असतात. त्यामुळे दूधाला दैनंदिन जीवनामध्ये फार महत्त्व आहे.

## १.१२ भारतीय डेअरीचा आढावा

भारताचा दूध उत्पादनाच्या बाबतीत जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातील दूध उत्पादन १९५०—५१ मधील १७ दशलक्ष टनाहून १९९७ मध्ये ७४.४ दशलक्ष टन दूध उत्पादन करून भारत जगातील सर्वात जास्त दूध उत्पादन करणारा देश ठरला आहे. २००९ — १० मध्ये ११२.५ टनापर्यंत वाढले आहे.

भारतातील दूग्ध उत्पादनापैकी सुमारे ८० टक्के उत्पादन असंघटित क्षेत्रात होते. तर उर्वरीत २० टक्क्यापैकी निम्मे उत्पादन सहकारी दूध उत्पादक संघ व निम्मे खाजगी दूध उत्पादक संघ मध्ये होत आहे.

**दूधाचा महापूर:** दूधाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टिने भारत सरकारने दूधाचा महापूर ही योजना राबविली. ही योजना तीन टप्प्यामध्ये राबविली गेली आहे.

१) पहिला टप्पा: १९७० — ७१ ते १९८० — ८१

२) दुसरा टप्पा: १९८१ — ८२ ते १९८५ — ८६

३) तिसरा टप्पा: १९८६ — ८७ ते १९९३ — ९४

या तीन टप्प्यामध्ये ही योजना राबविली. महाराष्ट्रामध्ये नागरिकांना पाश्चराईज्ड व होमिजीनाईज्ड दूध मिळावे यासाठी १९५२ मध्ये अशिया खंडातील पहिली दूध डेअरी 'आरे' (दूग्धशाळा, गोरेगांव मुंबई) येथे स्थापन करण्यात आली. १९६० पासून ग्रामीण भागातील दूध जमा करून शहरी भागात विकण्यास सुरूवात झाली. १९६३ मध्ये बृहन्मुंबई दूध योजना वरळी डेअरीची स्थापना करण्यात आली. ही दूधावर प्रक्रिया करणारी डेअरी आहे.

१९७५ मध्ये बृहन्मुंबई दूध योजना कुर्ला डेअरीची स्थापना करण्यात आली. ९ जून १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी दूध संघ मर्यादित ची स्थापना झाली. महासंघ हा दूध उत्पादक व ग्राहक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा आहे. या महासंघामार्फत महानंद डेअरी चालविली जात आहे.

## १.१३ बारामती तालुका सहकारी दूध संघ

बारामती तालुका सहकारी दूध संघ मर्या. ची स्थापना १ डिसेंबर १९७७ ला झाली. इस्त्रायलसारख्या देशाच्या प्रगतीच्या मुलभूत बाबींचा अभ्यास करून आधुनिक दूग्ध विकासाचा पाया सांघिक रूपाने घालण्याची मुहर्तमेढ रोवली व ग्रामीण भागातील गरीब, अल्पभूधारक, भूमीहीन, शेतमजूर, मागासवर्गीय, दुर्बल घटक, इ. दूध उत्पादकांची सहकारी दूध संस्था गठीत करणे. प्राथमिक दूध संस्थेच्या माध्यमातून दूध उत्पादकांच्या संपूर्ण दूधाला उत्पादन होण्याच्या ठिकाणी योग्य भावात विक्रीची सोय करणे. स्थानिक दूध संस्था स्तरावरील संकलित दूध मुख्य डेअरी प्लांट किंवा सेंटरपर्यंत लवकरात लवकर पोहचविण्याच्या दृष्टीने वाहतुकीची

व्यवस्था करणे. दूध वाहतूक करताना खराब होऊ नये व त्याची गुणवत्ता चांगली राहावी म्हणून दूध थंड करण्यासाठी बर्फ पुरविणे. पशुवैद्यकीय सेवा व कृत्रिम रेतन सेवा यांची सोय करणे. दूधाळ पशुसाठी सकल संतुलित पशुखाद्य उत्पादन इत्यादींची सोय करणे. प्राथमिक दूध संस्थांच्या व्यवस्थापनात सहकार्य करणे व तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे.

दूग्ध व्यवसायासाठी पूरक बाबी उदा. पशुखाद्य, औषधे, डेअरी साहित्य इत्यादींचा वाजवी दरात पुरवठा करणे. दूध संकलनातील अडीअडचणींना तोंड देऊन व्यावसायिक प्रगतीसाठी आर्थिक मदत करणे. हा महत्त्वाचा उद्देश होता. आज संघरूपी बिजाचे वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. बारामती तालुका हा दूधाचा तालुका म्हणून महाराष्ट्रासमोर उदयास आला आहे. ३१ मार्च २००६ अखेर तालुक्यातील २८६ प्राथमिक दूघ संघामार्फत दूध संकलनाचे कार्य चालू केले आहे. या संघाकडे (माळेगाव) बारामती येथे प्लांटमध्ये दूध पॅकींग सयंत्र बसविण्यात आलेले आहे. त्यामध्ये अत्याधुनिक व जागतिक दर्जाची यंत्रसामग्री आहे.

प्लॅंटमध्ये पॅकींग मशीन, प्लेट चिलर, होमीजिनायझर इत्यादी. यंत्रसामग्री बसविण्यात आली आहे. त्यामुळे डेअरी प्लांट परिपूर्ण झाला आहे. विविध प्राथमिक दूध उत्पादक संघाच्या माध्यमातून दूधाचे संकलन केले जाते. डेअरीत पॅकिंग केलेल्या दूधाचे वाटप माळेगाव (बारामती) येथून सुरू केले आहे. बारामती येथे 'नंदन' या ब्रॅन्ड नावाने गायीच्या दूधाची विक्री केली जाते. महानंद डेअरी (पुणे व मुंबई) व श्रायबर डायनामिक्स डेअरी यांना टॅंकरमधून दूध पूरवले आहे.

बारामती तालुका सहकारी दूध संघाने २००७ व २००८ साली महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ यांना दोन वर्षात उत्कृष्ट दूध पुरविले होते. त्याबद्दल बारामती तालुका संघास पुरस्कार देऊन गौरविले होते. पशुधनाचे आरोग्य चांगले राहावे ते शक्यतो आजारी पडू नयेत यासाठी लसीकरण, कृत्रीम रेतन इ. सुविधा नाममात्र दरात उपलब्ध करून दिल्या आहे.

डायनामिक्स डेअरीने सुरूवातीला बारामती परिसरामध्ये ७५ बल्क कुलर बसविले होते. ( दर ३ ते ४ कि.मी परिसरामध्ये १ बल्क कुलर बसविला आहे) बल्क कुलरमुळे दूध उत्पादकाचे दूध खराब होत नव्हते. दूध घातल्यानंतर लागलेच दूध उत्पादकाला संगणकाच्या आधारे चिठ्ठी मिळत होती. त्यावर फॅट, एस.एन. एफ, डिग्री एकूण दूध व त्याची किंमत अशा प्रकारची रिशीट मिळत होती. तसेच उत्पादित सर्व दूधाची स्वीकृतीची हमी मिळत होती.

बारामती व बारामती परिसरातील तसेच महाराष्ट्रातील दूध उत्पादन दूध प्रक्रिया उद्योग खाजगी उद्योगासाठी खुला केल्यापासून उत्पादित सर्व दूधाची स्वीकृती झाली नाही. असा एकही दिवस आला नाही. त्यामुळे महाराष्ट्रात दूध व्यवसाय वाढीस लागला आहे.

### १.१३.१ पशुखाद्य उत्पादन विभाग

जनावरांना दिला जाणारा आहार, पाणी, पशुखाद्य, आजारावरील उपचार यांचा परिणाम जनावरांच्या प्रजनन क्षमतेवर होत असतो. खनिजांचा अभाव राहू नये यासाठी संघाने उत्पादित केलेले मिनरल मिक्चर वापरले जाते. संघाच्या पशुखाद्य कारखान्यात उत्पादित केलेल्या नंदन पशुखाद्यास सोलापूर, पुणे, सातारा, उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये चांगली मागणी आहे. या खाद्यामुळे दूध उत्पादनामध्ये वाढ झाली आहे. अशी गौरवास्पद प्रतिक्रिया दूध उत्पादकांकडून केली जात आहे. पशुखाद्य नंदन सुप्रीम व नंदन गोल्ड या दोन प्रकारात उपलब्ध आहे.

### १.१३.२. पशुचिकित्सा व कृत्रीम रेतन विभाग

पशुवैद्यकीय व कृत्रीम रेतन सेवा नाममात्र दरात उत्पादकापर्यंत पोहचविण्याचा विकासात्मक कार्यक्रम सुरू केला होता. त्यामध्ये इंडिया जेन हैद्राबाद या कंपनीचे सहाय्य घेतले होते. रोग प्रतिबंधात्मक लस कृत्रीम रेतन, घटसर्प, जंतनिर्मुलन इत्यादीचा सेवामध्ये समावेश होता. या सेवामुळे जनावरांचे आजारी पडण्याचे प्रमाण निश्चित कमी झाले आहे. दूग्ध उत्पादकांचा औषधावरील खर्च कमी झाला आहे. दूध उत्पादन वाढले आहे. बारामती तालुका दूध उत्पादक

संघाने दूध उत्पादन व्यवसायाविषयी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम राबवून तेथील कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञान व व्यवस्थापन यांचे प्रशिक्षण दिले आहे. पशुवैद्यकीय सल्ल्यासाठी तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती देखील संघाने केली आहे.

### १.१३.३ डेअरी साहित्य विभाग

दूध काढण्याचे यंत्र, चारा कापणी मशिन, किटली, कॅन हे दूध उत्पादकांना तर रसायने, कॅन्स, काचेचे साहित्य, तपासणी यंत्र इ साहित्य प्राथमिक दूध संस्थांना माफक दरात दिले जात आहे.

डेअरी प्रक्रियेमध्ये बॉयलर व लाईट यांचा वापर आवश्यक आहे. वर्तमान स्थितीमध्ये लाईटचे दर वाढत असल्याने त्यामध्ये काटकसर व्हावी या दृष्टीने डेअरी विभागात दूध प्रक्रियेकरिता अत्याधुनिक सोलर यंत्रणा उभी केली आहे. त्यामुळे डेअरी विभागात इतर दूग्धजन्य पदार्थ बनविण्याच्या दृष्टीने ही यंत्रणा महत्त्वाची ठरली आहे.

## १.१४ दूध उत्पादन वाढीसाठी प्रयत्न

१९७० च्या अगोदर भारत देश हा मोठ्या प्रमाणावर दूधाचे पदार्थ आयात करणारा देश होता. आयात केलेले ४०% उत्पादने ही दूधावर प्रक्रिया केलेली असत. दूधाच्या बाबतीत भारत स्वावलंबी नव्हता. सन १९६३—६४ मध्ये व्यावसायिक कारणासाठी आयात केलेली दूध पावडर ५३ हजार मेट्रीक टन एवढी होती. हा एक उच्चांक होता. बराचसा पैसा परदेशात जात होता. दूध आणि दूध प्रक्रियेचे धोरण ठरविणाऱ्यांनी असा निर्णय घेतला की (भारताला) आपणच आपल्यासाठी लागणारी दूग्धजन्य उत्पादने तयार करावयाची. यासाठी देशामध्ये १९७० मध्ये राष्ट्रीय दूध विकास मंडळाची (National Dairy Development Board N.D.D.B) ची स्थापना झाली. राष्ट्रीय दूध विकास मंडळाने जगामधील सर्वात मोठे आणि यशस्वी असा दूग्ध विकास कार्यक्रम हाती घेतला आणि या अभियानाचे फायदे लगेचच दिसू लागले.

**या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट होते,**

१. शेतकऱ्यांना सहकारातून संघटित करून त्यांची शहरी ग्राहकाबरोबर सांगड घालणे.

Operation Flood मुळे १९८९ मध्ये दूध व्यवसायाचे आधुनिकीकरण झाले होते. तसेच दूध संकलन केंद्रे, प्रक्रिया उद्योग, वितरण व्यवस्था यांचे जाळे सहकाराच्या माध्यमातून निर्माण केले होते.

Operation Flood हा उपक्रम चालु असतानाच दूध व्यवसायामध्ये आधुनिकीकरण गरजेचे आहे हे सरकारच्या लक्षात आल्यामुळे सरकारने Technology Mission on Dairy Development (T.M.D.D) या यांत्रिकीकरणाची घोषणा केली. याचा दूध व्यवसायाच्या वाढीसाठी उपयोग झाला. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळेल व लोक आर्थिकदृष्टया स्वतंत्र होतील. या व अशा दूध उत्पादन वाढीसाठी केलेल्या प्रयत्नामुळे भारतात धवल क्रांती झाली आहे असे म्हणणे देखील योग्य आहे.

## १.१५ अतिरिक्त दूध उत्पादन

राज्य सरकार व केंद्र सरकारने गेल्या तीस वर्षामध्ये दूध उत्पादनवाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले होते. त्याचे परिणाम १९९० नंतरच दिसू लागले आहे.

सातत्याच्या प्रयत्नामुळे मागील ३० वर्षामध्ये महाराष्ट्रातील दूध उत्पादन मोठया प्रमाणावर वाढले आहे. अतिरिक्त दूधाची विल्हेवाट लावण्यासाठी दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती व त्याची बाजारपेठ शोधणे महत्त्वाचे होते.

१९९१ — ९२ मध्ये महाराष्ट्रातील दूध उत्पादन शासकीय व सहकारी संघाच्या एकूण दूध प्रक्रिया क्षमतेहून जास्त झाले होते. उपलब्ध प्रक्रिया क्षमतेतील कमतरतेमुळे उत्पादकांनी पूरविलेले दूध स्विकृतच होत नव्हते. त्यामुळे दूध उत्पादकाचे आर्थिक नुकसान होत होते.

## १.१६ खाजगी उत्पादकासाठी दूध प्रक्रिया उद्योग खुला

१९९१ मध्ये गॅट करारामुळे जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली होती. व केंद्र शासनाने दूध प्रक्रिया उद्योग खाजगी उद्योजकासाठी खुला केला होता. या अनुषंगाने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्रातील दूध उत्पादन अधिक प्रमाणात वाढले पाहिजे व उत्पादीत होणाऱ्या सर्व दूधास भारतीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळाली पाहिजे हा दृष्टिकोन समोर ठेवून अति क्षमता असणाऱ्या उद्योजकांना महाराष्ट्रात प्लांटस उभारण्याकरिता प्रोत्साहित केले होते. महाराष्ट्रात बरेचसे प्लांट या कालावधीत उभारले गेले आहेत.

- **उत्पादन केंद्रीकरण फायदयाचे आहे?**

    १. आंतरराष्ट्रीय दर्जा टिकविला जातो.

    २. उत्पादनांची गुणवत्ता टिकविली जाते.

    ३. नफा हा बोनसच्या रूपात वाटला जातो. दूध उत्पादकांचे मेळावे, प्रशिक्षण, शिबीरांचे आयोजन, गुणवत्तेनुसार दूधाला दर, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कमी श्रमात जास्त उत्पादन, खर्चामध्ये बचत, उत्पादनामध्ये वाढ होते.

    ४. दूध स्वीकृतीची हमी, दूध उत्पादनामध्ये वाढ.

    ५. शेतकऱ्यांसाठी एक सबळ जोडधंदा मिळाला.

    इ. उत्पादन केंद्रीकरणाचे फायदे आहेत.

## १.१७ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाला परवानगी

महाराष्ट्रातील सदन अशा पश्चिम महाराष्ट्रामध्ये दूध उत्पादन अधिक वाढले होते. दूध व दूधावर प्रक्रिया करणारे बरेच प्लांट सुरू झाले होते. परंतु आपल्या दूध उत्पादकांनी प्रगत देशाच्या स्पर्धेत टिकून राहण्यापेक्षा पुढे जाण्याचे प्रयत्न केले पाहिजे. या सर्व करण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहचतील अशा दूग्ध

पदार्थाचे उत्पादन केले पाहिजे पण त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर आवश्यक असणारी गुणवत्ता आणि तेथील प्रचलित विक्री मुल्ये यांची सांगड घालण्याची आवश्यकता होती पण ती आधुनिक तंत्रज्ञानी सुसज्ज अशा मोठया क्षमतेच्या डेअरी प्लांटची. महाराष्ट्रात उपलब्ध असणाऱ्या अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करण्याची सुविधा शासनाकडे नसल्यामुळे १९९२ ते १९९४ या काळात दूध उत्पादकांच्या दूधाची आठवड्यातून एक किंवा दोन वेळा स्विकृती करता येत नव्हती. त्यामुळे दूध उत्पादकांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

वरील सर्व गोष्टीची पूर्तता करण्यासाठी अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाला महाराष्ट्रामध्ये प्रकल्प उभारणीसाठी १९९२ मध्ये परवानगी दिली. महाराष्ट्रामध्ये बारामती हे ठिकाण प्रकल्पासाठी निश्चित झाले व प्रकल्पाला १९९३ मध्ये परवाना मिळला. प्रत्यक्ष प्रकल्पाच्या बांधकामाला एप्रिल १९९४ मध्ये सुरूवात झाली. प्रकल्पाची चाचणी ऑक्टोबर १९९५ मध्ये घेतली. प्रत्यक्ष उत्पादनाला जानेवारी १९९६ ला सुरूवात झाली. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाची दूध हाताळण्याची रोजची क्षमता १५ लाख लिटर्स आहे.

**श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्प स्थापनेनंतरची दूध संकलनाची स्थिती:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर या प्रकल्पाला सुरूवातीस ३ लाख लिटर दूधावर प्रक्रिया करण्यासाठी परवानगी दिली. ऑगस्ट १९९६ मध्ये ५ लाख लिटर्स प्रतिदिन एवढी क्षमता वाढविली. त्यानंतर जुलै १९९९ मध्ये ८ लाख लिटर्स एवढी वाढविली. परत मार्च २००२ मध्ये १५ लाख लिटर्स प्रतिदिन एवढी क्षमता वाढविली.

१९९१—९२ च्या तुलनेत आज महाराष्ट्रात ५० लाख लिटर्स प्रतिदिन दूध उत्पादन वाढले असून सुद्धा दूधावर प्रक्रिया करण्याची योजना अपुरी होतेच आणि दूध स्विकृतीच होत नाही. अशी परिस्थिती एक ही दिवस आली नाही.

**श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाची वैशिष्टये:**

१) स्वत:च्या दूध शितकरण केंद्राच्या माध्यमातून चांगल्या व दर्जेदार दूधाचे योग्य किमतीमध्ये संकलन करणे.

२) कमीत कमी खर्चामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी प्रवृत्त करणे.

- शितगृहातील दर्जेदार सिमन वापरणे.
- व्यावहारिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्ग दाखविणे.
- व्यवस्थापनातील सेवामध्ये सुधारणा करणे व उत्पादनातील तुट थांबविणे.

**३) रोगमुक्त प्राणी:**

- रोगापासून संरक्षण देणे व वेळच्या वेळी औषधोपचार करणे.
- वेळापत्रकाप्रमाणे आरोग्य तपासणी करणे.
- वेळेवर रोगाचे निदान करणे.

**४) स्वच्छ आणि सुरक्षित दूध:**

- दूध शितकरण केंद्रामध्ये स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करणे. संकलित दूध त्वरीत प्रकल्पामध्ये पाठविणे.
- दूधातील Aflatoxion बाबत जागरूकता
- शिल्लक राहिलेली औषधे, कीटकनाशके, वापराबाबत जागरूकता.

या सर्व गोष्टी योजना व सेवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या जातात.

- **Dynamix चा नफा Distribut कसा केला जातो.**

  १. बोनसच्या रूपाने कामगारांना वाटप.

  २. शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन. उत्पादन वाढीसाठी मेळावे.

  ३. उच्च दर्जाचे पशुखाद्याचे वाजवी दरात वाटप.

  ४. पर्यावरण जनजागृतीसाठी मेळावे, रॅली, व्याख्याने इत्यादीचे आयोजन कामगारांसाठी उत्तम दर्जाच्या सुविधा इ. मध्ये वाटप केला जातो.

— १९९१ साली खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर आधुनिक तंत्रज्ञान भारतात येऊ लागले. भारतीय उत्पादनासाठी परदेशी बाजारपेठा खुल्या झाल्या. विशेषत: दूध प्रक्रिया उदयोग खाजगी उत्पादकासाठी खुला केल्यामुळे अनेक दूध प्रक्रिया उद्योग उभे राहिले. त्यातून दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती होऊ लागली. त्यामुळे प्रति माणसी दूधाचा वापर वाढला.

बारामतीमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर दूग्धजन्य पदार्थाचे वितरण करणारा श्रायबर डायनामिक्स डेअरी हा प्रकल्प स्थापित झाला. दूध प्रक्रिया उद्योग खाजगी उदयोजकांसाठी खुला करण्याअगोदर त्यावर शासनाचे नियंत्रण होते. १९९१—९२ च्या वेळेस श्वेतक्रांतीमुळे दूध उत्पादनामध्ये खुप वाढ झाली होती. त्यामुळे शासकीय दूध संस्था सर्व दूध स्वीकारू शकत नव्हत्या. दूध व्यवसाय मोडकळीस येतो की काय असे वाटत असतानाच गॅट करारामुळे खाजगी दूधप्रक्रिया उद्योगासाठी खुला केला. यामुळे दूध उत्पादकांना दूध स्वीकृतीची हमी मिळाली. त्यामुळे या व्यवसायाला उर्जितावस्था प्राप्त झाली. अनेक लोकांना व्यवसाय उपलब्ध झाला. दूध स्वीकृतीची हमी मिळाली. दर्जानुसार दूधाला दर मिळाला. शासकीय नियंत्रण नसल्यामुळे निर्णयाची अंमलबजावणी त्वरित होऊ लागली. लोकांमध्ये कंपनीविषयी आत्मविश्वास निर्माण झाला. बारामतीमध्ये कृषी विकास प्रतिष्ठान या खाजगी संस्थेने लोकसहभागातून कृषी क्रांती घडवून आणलेली आहे. त्यामुळे संशोधक खाजगी संस्थांना महत्त्व देतो.

### १.१८ सारांश

भारत हा कृषी प्रदान देश आहे. देशातील ७०% लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. कृषी उत्पादनामध्ये वाढ होण्यासाठी शासन विविध स्तरावर प्रयत्न करीत आहे. यामध्ये शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात सवलती देऊन कृषी उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. विविध शासनांच्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना होत नाही. आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही. पोहचले तरी त्याच्या वापराविषयी माहिती नसते. त्यासाठी कृषी विकास साध्य करावयाचा असेल तर तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यत पोहचले पाहिजे.

यासाठी बारामती येथील कृषी विकास प्रतिष्ठानने केलेल्या अथक प्रयत्नामुळे एका दुष्काळ प्रवण तालुक्याचे कृषी प्रदान भागामध्ये रूपांतर केले आहे. कृषी विकास प्रतिष्ठानने शेतीसंबंधीत अनेक पूरक व्यवसायांचे प्रसार, प्रशिक्षण, प्रात्यक्षिक या त्रीसुत्रीच्या माध्यमातून पूरक व्यवसाय उभे केले आहेत. यामुळे बारामती परिसराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेला प्रयत्न म्हणजे कृषी विकासाचा बारामती पॅटर्न असे म्हटले जाते. 'पॅटर्न' संदर्भात माहिती घेताना लातूर पॅटर्न, अनीलकुमार लखीना पॅटर्न, दूधाचा गुजरात पॅटर्न यांचा अभ्यास केला आहे. तसेच बारामती पॅटर्नमध्ये बारामतीचे भौगोलिक स्थान, पर्जन्यमान, ऐतिहासिक, पार्श्वभूमी, लोकसंख्या, शैक्षणिक विकास, औद्योगिक विकास, शेती विकास, सहकारी संस्था, दूध संस्था, दूग्धव्यवसाय यांचा आढावा घेतला आहे. तसेच महिला सबलीकरणाचा कृषी विकास प्रतिष्ठान करत असलेले प्रयत्न याचीही माहिती देण्यात आलेली आहे.

✪✪✪

## संदर्भ

१. ठोंबरे शिवाजीराव, कृषी भगीरथ आप्पासाहेब पवार, प्रकाशक सन पब्लिकेशन, पुणे. ३०. २००१.

२. टिकेकर अरूण, संपादनः अभय टिळक अनुवाद, स्पर्धा काळाशी...वेध भारतातील आर्थिक व सामाजिक संक्रमणाचा, शरद पवार भाषणे व मुक्त संवाद, रोहन प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती डिसेंबर २००८,

३. कुलकर्णी पी.के, 'उद्योगाचे समाजशास्त्र', मंगेश प्रकाशन, नागपूर, १९५७.

४. सोनवणे मनोहर आणि खेतमर प्रदिप, आठवणीतला चंद्र, गोल्डन पेज पब्लिकेशन, पुणे.

५. सहस्त्रबुद्धे श्री. म., बारामती नगरपालिका, शताब्दीपूर्ती समाचार ग्रंथ, (१८६५ ते १९६५) प्रकाशकः अध्यक्ष बारामती नगरपालिका १९६७, प्रकाशन, मे १९६७.

६. जोशी पंडित महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, खंड तिसरा. भारतीय संस्कृती कोश मंडळ, ४१३, शनिवार पेठ पुणे २. प्रथम आवृत्ती शके १८८७. (इ.स. १९६५).

**Website**

1. www.google.com_Basic pattern Recognition concept_(Xiaojun Qi)
2. Online Oxford Dictionary Pattern.

✪✪✪

# प्रकरण दुसरे
# अध्ययन पद्धती

## विभाग — अ

### २.१ प्रस्तावना

समस्या कोणतीही असली तरी, शास्त्रशुद्ध व सखोल अभ्यास केला, तरच संशोधनाचा मूळ गाभा लक्षात येतो. संशोधनामध्ये त्या समस्येची व त्यातील घटनांचे वैज्ञानिक पद्धतीनेच अध्ययन केले जाते. वैज्ञानिक पद्धतीच्या आधारावर नियमांचा शोध, जुन्या ज्ञानात भर टाकणारे नवीन ज्ञान, नवीन कल्पना, नवीन विचार मांडले जातात. कोणत्याही समस्येच्या बाबतीत सत्याचा शोध हा कल्पनेच्या आधारावर आपण मांडू शकत नाही. त्यासाठी संशोधन पद्धतीची आवश्यकता असते. संशोधन पद्धतीत पूर्व ग्रह असू नयेत. तसेच समस्येची गृहीतके व समस्येचा उद्दिष्टावर संशोधकर्ता ठाम पाहिजे. संशोधन पद्धती शास्त्रशुद्ध असेल तर संशोधन व्यवस्थित होते.

वैज्ञानिक पद्धतीद्वारे सामाजिक घटनांच्या संदर्भात संशोधन करण्यात येते. जे संशोधन सामाजिक घटनाबाबत केले जाते अशा संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात. — (आगलावे प्रदिप, संशोधन पद्धती व तंत्रे, पान नं. १५)

सामाजिक शास्त्रात सामाजिक घटनांच्या संदर्भात अध्ययन केले जाते. म्हणून सामाजिक शास्त्रामध्ये वस्तुनिष्ठता राखणे कठीण असते. परंतू वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून सामाजिक घटनांचे देखील शास्त्रीयदृष्टया अध्ययन केले जाते. वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे सामाजिक घटनांच्या संबंधात नवीन ज्ञान प्राप्त करणे आणि जुन्या ज्ञानाचे परीक्षण करणे यास सामाजिक संशोधन असे म्हणतात.

## २.२ संशोधन विषय

**'''बारामती पॅटर्न'या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमुळे घडून आलेल्या सामाजिक परितर्वनाचा अभ्यास करणे.''**

१) **बारामती:** पुणे जिल्हयापासून आग्नेय दिशेस १०० कि.मी अंतरावर असणारे तालुक्याचे ठिकाण.

२) **ऐतिहासिक नांव:** भिमथडी.

३) **आताचे नांव:** बारामती.

— (सहस्त्रबुद्धे, बारामती नगरपालिका शताब्दीपूर्ती, समाचार ग्रंथ १९६७)

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड: दूधावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देणारा हा एक प्रकल्प आहे.

४) **'पॅटर्न** म्हणजे आकृतीबंध', (प्रतिमान) उत्तम उदाहरण (नमुनेदार) नमुना होय.

**संकल्पना:** गुड आणि हॅट यांचे मते, ''सर्व संकल्पना या अमूर्त असतात आणि तो वास्तविकतेच्या काही विशिष्ट पैलूचे प्रतिनिधीत्त्व करतात.''

५) **सामाजिक परिवर्तन:** मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल होय. — हॅरी जॉन्सन.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमुळे विविध घटकांमध्ये आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बदल घडून आला आहे यांचा अभ्यास करण्यासाठी प्रथम निरीक्षण करत असताना डेअरीमुळे सकारात्मक बदल दिसले. म्हणून आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी विषयाची निवड केली. त्यामध्ये अनेक प्रश्न, उपप्रश्नांचा समस्येमध्ये आढावा घेतला आहे व विविध घटकांचा अभ्यास केला आहे.

कृषी विकास प्रतिष्ठानमुळे शेतीत झालेले बदल, बारामतीतील शैक्षणिक संस्था, रस्ते, स्वच्छता, दूग्ध व्यवसाय, श्रायबर डायनामिक्स डेअरी या घटकामध्ये बदल दिसून आला.

तसेच संशोधक बारामतीचा स्थानिक आहे. त्याला बारामती तालुका व इतर तालुक्यामध्ये फरक जाणवला. साहित्य परिक्षण, मान्यवरांचे निष्कर्षामुळे संशोधन विषय निवडण्यास प्रेरणा मिळाली.

डायनामिक्स डेअरीची निवड केली कारण;

- डायनामिक्स डेअरीचा परिसरातील अनेक शेतकरी कुटूंबाशी निगडित आहे.
- डायनामिक्स डेअरीमुळे बेरोजगारी कमी होण्यास फार मोठी मदत झाली आहे.
- डायनामिक्स डेअरीमुळे अनेक लघुउदयोगाची निर्मिती झाली आहे.
- उदा. दूध वाहतुकीसाठी कॅन्सची निर्मिती, टँकर उत्पादन करणारे वर्कशॉप, पशुखाद्य निर्मिती उदयोग इ.उदयोगांची निर्मिती झाल्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला आहे.
- डायनामिक्स डेअरीमुळे दूध व्यवसायात वाढ झाली आहे
- दूध स्विकृतीची हमी मिळाल्यामुळे दूध उत्पादन वाढले आहे.
- जोडव्यवसायाचे रूपांतर मुख्य व्यवसायामध्ये झाले आहे.
- दूध व्यावसायिक म्हणून महिला आढळून आल्या.
- दूधावर प्रक्रिया करून त्यापासून वेगवेगळे पदार्थ बनवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वितरणाचे जाळे असणारा प्रकल्प.
- औद्योगिक जगतामध्ये बारामतीसारख्या तालुक्याचे स्थान निश्चित करणारा प्रकल्प म्हणून डायनामिक्स डेअरीच घेतली.

## २.३ विषय निवडीचे कारण

१९५८ मध्ये डेअरी क्षेत्राचा विकास व्हावा म्हणून सरकारने दूग्ध व्यवसाय विकास विभागाची स्थापना केली आहे. १९६० पासून ग्रामीण भागातील दूध जमा करून शहरी भागात विकण्यास सुरूवात झाली. या दूधावर प्रक्रिया करण्यासाठी १९६३ मध्ये वरळी डेअरी व १९७५ मध्ये कुर्ला डेअरी स्थापन करण्यात आली.

बारामती तालुक्यामध्ये बारामती तालुका सहकारी दूध संघाची स्थापना १९७७ साली केली होती. भारतामध्ये श्वेतक्रांती झाली होती. अतिरिक्त दूधाचा प्रश्न निर्माण झाला. १९९१ मध्ये गॅट करार संमत होऊन खाजगी दूध व्यावसायिकांना परवानगी देण्यात आली. त्याच वेळेस अतिरिक्त दूधाचा प्रश्न निर्माण झाला होता. अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी दूधावर प्रक्रिया करून विविध पदार्थ बनवून त्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वितरण करणारा प्रकल्प म्हणून श्रायबर डायनामिक्स डेअरी मर्यादित या प्रकल्पाची निर्मिती झाली.

श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पाने स्थापनेपासून ते आजतागायत दूधावर प्रक्रिया करणे व त्यापासून दूग्धजन्य पदार्थाचे उत्पादन करून ते वितरित करणे यामध्ये खंड पडू दिला नाही. दूध व दूग्धजन्य पदार्थाची गुणवत्ता व दर्जा टिकवून ठेवला आहे. त्यामुळे श्रायबरच्या दूधासाठी व दूग्धजन्य पदार्थासाठी ग्राहक वाढले. खप वाढला. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी दूध संकलन चालू केले. दूध उत्पादकांना दूधाच्या दर्जानुसार पैसे दिले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळू लागले. पश्चिम महाराष्ट्रातला अतिरिक्त दूधाचा प्रश्न श्रायबर डायनामिक्स डेअरीने सोडवला होता. श्रायबर डायनामिक्स डेअरीची दूध हाताळणीची रोजची क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे. त्यामुळे या प्रकल्पाने स्वत:ची क्षमता सिद्ध केली आहे व या प्रकल्पाने अतिरिक्त दूधाचा प्रश्न कायमचा सोडवून दूग्धव्यवसाय वाढीसाठी प्रयत्न केले. अशा प्रकल्पाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून त्याची माहिती सामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी बारामती पॅटर्न

(आकृतीबंध) या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी विषयाची निवड केली आहे.

## २.४ संशोधनाची उद्दिष्टे

१. 'बारामती पॅटर्न' ही संकल्पना स्पष्ट करणे.
२. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाची कार्यप्रणाली अभ्यासणे.
३. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पात कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कामगार वर्गाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास करणे.
४. बारामती तालुक्यातील दूग्ध व्यवसायिकांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीचा अभ्यास करणे.
५. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाच्या विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास करणे.
६. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाने पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

'बारामती पॅटर्न' ही संकल्पना स्पष्ट करत असताना त्यामध्ये

कृषी व औद्योगिक विकास, जोड व्यवसाय म्हणून दूग्ध व्यवसायाचे महत्त्व, व्यवसायामध्ये डेअरीचे महत्त्व, कृषी विकास व त्यासाठी निर्माण केलेल्या पायाभूत सुविधा, तसेच एज्युकेशन हब, स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठीचा बारामती पॅटर्न, करिअर मार्गदर्शनाचा बारामती पॅटर्न, स्वच्छतेचा बारामती पॅटर्न, एक्झीबिशन हब, विज्ञानाचा बारामती पॅटर्न, जैव ग्राम संकल्पना, महिला सबलीकरणासाठी केलेले प्रयत्न, व तालुक्यातील वैद्यकीय सुविधां, कृषी माल प्रक्रिया उद्योगाची माहिती इत्यादीचा आढावा घेतला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी कार्यप्रणालीचा आढावा घेताना:

डेअरीची स्थापना, प्रकल्प स्थापना व कार्यान्वित झालेली तारीख तसेच भाग भांडवलाविषयी माहिती घेतली. औद्योगिक स्थाननिश्चिती, प्रकल्पाचे स्वयं उत्पादन, दूध संकलन पद्धती, दूध वाहतूक, दूध प्रक्रिया व प्रकल्पाची विविध उत्पादने व त्यांची विक्री या विषयीचा अभ्यास केलेला आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कामगार व अधिकारी वर्ग व परप्रांतीय कर्मचारी वर्गाच्या कुटुंबाचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांमध्ये वर्गीकरण करून त्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

बारामती तालुक्यातील दूग्ध व्यावसायिकांच्या प्रगतीचा आढावा घेताना स्त्री—पुरूष वर्गीकरण, कुटूंबाचा आकार, शिक्षण, तसेच दूग्ध व्यवसायाविषयी माहिती घेतली आहे. विशेषत: महिला दूग्धव्यावसायिकांची सविस्तर माहिती घेतली आहे.

बारामती तालुक्यातील श्रायबर डायनमिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाला मिळालेल्या राजकीय योगदानाचा अभ्यास करत असताना औद्योगिक स्थाननिश्चिती, भांडवल निर्मिती, पायाभूत सुविधा, औद्योगिक कलह, याविषयी स्थानिक नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास केलेला आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाने पर्यावरण रक्षणासाठी केलेले वनीकरण कमी प्रदूषण करणारी यंत्रे, कचऱ्याचा व पाण्याचा पूनर्वापर याविषयी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतलेला आहे.

## २.५ गृहीतकृत्य

१. श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे दूग्ध व्यावसायिकांना एक सबळ जोडधंदा प्राप्त झालेला आहे.

२. श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे बारामती तालुक्यातील दूग्ध व्यावसायिकांचे विशेषतः महिलांचे आर्थिक सबलीकरण झाले आहे व त्यांचा सामाजिक स्तर उंचावला आहे.

३. श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे प्रकल्पातील अधिकारी व कामगारांच्या सामाजिक जीवनामध्ये समस्तरीय व उर्ध्वगामी गतिशीलतेच्या प्रक्रियेस वेग प्राप्त झाला आहे.

४. स्थानिक व स्थलांतरीत यांच्यात होणाऱ्या आदान—प्रदानाचे स्थलांतरितामध्ये विशेषतः स्थलांतरितांच्या पुढच्या पिढीमध्ये स्थानिक संस्कृतीची जवळीकता निर्माण झाली आहे.


५. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान लाभले आहे.

## २.६ अध्ययनाचे क्षेत्र

बारामती तालुका हे अध्ययन क्षेत्र निवडले आहे. बारामती तालुका हा पुणे जिल्ह्यातील एक विकसनशील तालुका आहे. तालुक्यामध्ये एकूण ८ महसूल सर्कल आहे व ११७ गावे आहे आणि १०० ग्रामपंचायती आहे. शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक कृषी आणि राजकीयदृष्टया या तालुक्याला फार महत्त्व आहे. तालुक्याच्या विकासास योगदान देणारा व आंतरराष्ट्रीय पातळीवर दूध उत्पादने वितरित करणारा प्रकल्प बारामतीत आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करून ती उत्पादने आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादनांची विक्री करणारा देशातील एकमेव प्रकल्प बारामतीचा आहे.

**नकाशा क्र. ३:** बारामती तालुका भौगोलिक नकाशा




डायनामिक्स प्रकल्प बारामतीमध्ये असल्यामुळे बारामती पॅटर्न या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी मर्यादित हा विषय निवडला व तो बारामतीत आहे. त्या दृष्टीने अध्ययन क्षेत्र बारामती निवडले आहे.

## २.७ नमुना निवड

वर्णनात्मक आराखडा प्रकाराचा उपयोग केला आहे. कारण संशोधन हे अस्तीत्वात असलेल्या ज्ञानावर आधारित आहे. शिवाय संशोधनाशी संबंधित पूर्वीचे साहित्य अभ्यासले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत हे अध्ययन अन्वेषणात्मक ठरू शकत नाही. तसेच गृहितकृत्ये मांडली असल्याने हे संशोधन अन्वेषणात्मक होऊ शकत नाही. म्हणून या संशोधनाचे अध्ययन वर्णनात्मक आहे.

प्रस्तुत अध्ययनात खालील घटकांचे वर्णन केले आहे. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे:

संशोधकाने बारामती पॅटर्न या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे घडून आलेला सामाजिक परिवर्तन हा विषय घेतला आहे. त्या अनुषंगाने खालील संशोधन प्रश्न अभ्यासले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या सिद्धांतावर आधारित पुढील संशोधन अभ्यासले आहे.

- बारामती पॅटर्न व त्यातील घटकामुळे सामाजिक परिवर्तन घडून आले का?
- श्रायबर डायनामिक्स डेअरी हा प्रकल्प सामाजिक परिवर्तन घडवून येण्यास महत्त्वाचा ठरला का?
- बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरीला दूध घालणारे दूध व्यावसायिक विशेषत: महिला दूध व्यावसायिक, प्रकल्पातील अधिकारी व कामगार त्यांचे कुटूंब, राजकीय नेतृत्त्व हे सर्व घटक सामाजिक परिवर्तनास जबाबदार तर नाहीत ना. अशा संशोधन प्रश्नांचा अनेक पैलूंचा अभ्यास करण्यासाठी संशोधन प्रश्नांची मांडणी संशोधिकेनी केली आहे.

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील कामगार व अधिकारी वर्ग या घटकांची निवड करण्यासाठी संभाव्यता नमुना निवडीतील स्तरित यादृच्छिक नमुना प्रकाराचा अवलंब केला आहे. नियमित अंकन पद्धतीने नमुन्याची निवड केलेली आहे.

### २.७.१ दूग्ध व्यावसायिकांची निवड

नमुना निवडीच्या प्रकारातील गैरसंभावता नमुना निवड पद्धतीतील (स्नो बॉल) नमुना निवडचा उपयोग केला आहे. संशोधकाला उत्तरदाते कोठे सापडतील ते माहित नव्हते. फक्त १ ते २ दूध व्यावसायिक उत्तरदात्यांची माहिती होती. त्यामुळे नमुना निवड करताना स्नो बॉल नमुन्याचा उपयोग केला. सुरूवातीला अध्ययन क्षेत्र निश्चित करणे कठीण होते. त्यासाठी अध्ययन क्षेत्र अगोदर निश्चित केले व माहित असलेल्या एक दोन दूधव्यवसायिकांशी संपर्क साधला व माहिती घेतली. त्यांच्याकडूनच इतर दूध व्यावसायिक उत्तरदात्यांचे पत्ते घेतले त्यांची भेट घेतली व माहिती घेतली. पुन्हा त्यांना माहित असलेल्या इतर दूध व्यावसायिकांचे पत्ते घेत माहिती मिळविली. अशा प्रकारे नमुन्याचा आकार पूर्ण होईपर्यंत संपर्क साधला.

तक्ता क्र. २.१ दूग्धव्यावसायिकांची निवड

| अ. क्र | बारामती तालुक्याचे केलेले चार विभाग | विभागावर ग्रमापंचायत (गांव) संख्या | निवडलेली गावे | दूग्ध व्यावसायिक संख्या (प्रत्येकी १०) | दूग्ध व्यावसायिक महिला |
|---|---|---|---|---|---|
| १ | बारामती व मोरगांव | २५ | ०५ | ५० | ११ |
| २ | पणदरे व वडगांव | २५ | ०५ | ५० | १७ |
| ३ | मोरगांव लोणीभापकर | २५ | ०५ | ५० | १६ |
| ४ | सुपा व शिर्सुफळ | २५ | ०५ | ५० | १८ |
| | एकूण ४ विभाग | १०० | २० | २०० | ६२ |

आधार: बारामती महसूल विभाग व तालुक्यातील ग्रामपंचायत संख्येवर आधारित विभाग व खेडी

दूग्धव्यावसायिकांच्या निवडीचे समग्र क्षेत्र हे बारामती तालुक्यापुरतेच मर्यादित होते म्हणून नमूना निवडीसाठी सर्व प्रथम बारामती तालुक्याचे आठ महसूल आहेत. या आठ महसूल विभागांचे चार विभाग केले. त्याचा पहिला स्तर

ठरला. या स्तराच्या प्रत्येक विभागात २५ गावे येतात. त्या प्रत्येक गावामध्ये साधारणपणे ४० ते ५० दूग्धव्यावसायिक आहेत. असे निरीक्षणावरून आढळून आले. त्यामुळे प्रत्येक विभागातील २५ खेडयांचे (२०%) नमुना क्षेत्र म्हणून निवड केली त्या प्रत्येक खेडयाचे वाडया वस्त्यामध्ये विभाजन केले व त्या एका खेडयातून १० दूग्धव्यावसायिकांची स्नोबॉल नमुना निवड पद्धतीने निवड केली.

अशा प्रकारे चार विभागातून २० खेडी व या २० खेडयामधून प्रत्येकी १० म्हणजेच २०० दूग्धव्यावसायिकांची नमुना निवड केली आहे.

### २.७.२ अधिकारी वर्ग निवड

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या कंपनीमध्ये १०० अधिकारी आहेत. यापैकी नमुना निवड म्हणून ५० अधिकाऱ्यांची नमुना निवड केली आहे. निवडलेल्या ५० अधिकाऱ्यांपैकी अधिकारांचे परप्रांतीय व स्थानिक असे स्तर केले. यामध्ये १२ परप्रांतीयांची नमुन्यात निवड झाली. या परप्रांतीय अधिकाऱ्यांच्या प्रश्नावलीमध्ये त्यांच्या कुटूंबातील वृद्ध व पौगंडावस्थेतील मुलांसाठी उपप्रश्नावल्या भरून घेतल्या आहे. १२ परप्रांतीयांच्या कुटूंबाच्या नमुन्यात ११ वृद्ध व १२ पौगंडावस्थेतील मुलांच्या उपप्रश्नावल्या भरून घेतल्या आहे.

तक्ता क्र २.२ अधिकारी वर्ग निवड

| अ.नं | एकूण अधिकारी | नमुना निवड | नमुन्यापैकी परप्रांतीय | परप्रांतीयांपैकी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वृद्ध | मुले |
| १ | १०० | ५० (५०%) | १२ (२४%) | ११ | १२ |

### २.७.३ कामगार निवड

श्रायबर डायनामिक्स डेअरी या कंपनीमध्ये सर्वसामान्यपणे ४०० पूर्णवेळ कामगार आहेत. यापैकी नमुना निवड म्हणून २०० कामगारांची (५०%) नमुन्याची

निवड केली आहे. या कामगारांच्या नमुन्यास जास्त प्रतिनिधीच देण्याचे कारण की या नमुन्यातून अधिकाधिक परप्रांतीय कामगारांच्या नमुन्याची उपलब्धता व्हावी परप्रांतीय व स्थानिक असे स्तर केले. यामध्ये ५१ परप्रांतीयांची नमुन्यात निवड (१२.५०%) या परप्रांतीय कामगारांच्या प्रश्नावलीमध्ये त्यांच्या कुटूंबातील वृद्ध व पौगंडावस्थेतील मुलांसाठी उपप्रश्नावल्या भरून घेतल्या. या ५१ परप्रांतीयांच्या कुटूंबाच्या नमुन्यातून ३१ वृद्ध व २८ पौगंडावस्थेतील मुलांच्या उपप्रश्नावल्या भरून घेतल्या.

तक्ता क्र. २.३ कामगार वर्ग निवड

| **अ.नं** | **एकूण कामगार** | **नमुना निवड** | **नमुन्यापैकी परप्रांतीय** | **परप्रांतीयांपैकी** | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वृद्ध | मुले |
| १ | ४०० | २००(५०%) | ५१ (१२.५%) | ३१ | २८ |

**२.७.४ कालावधी**

- बारामती पॅटर्नचा १९६८ ते २००८ पर्यंतचा कालावधी निश्चित केला.
- श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाचा अभ्यास कालावधी २००१ ते २००८ असा कालावधी घेतला आहे. प्राथमिक व द्वितीय स्त्रोत यांचा वापर करून तथ्य संकलित केले आहे.
- डिसेंबर २००७ ला प्रश्नावल्या दिल्या व जानेवारी २००८ मध्ये प्रश्नावल्या भरून घेतल्या.
- २००८ नंतर बारामतीमध्ये काही नवीन पथदर्शी प्रकल्प निर्माण झाले होते. संशोधन अहवालाचे लिखाण २०१३ मध्ये पूर्ण झाले. नवीन पथदर्शी प्रकल्पांची माहिती व्हावी म्हणून त्यांची माहिती दिली आहे.

## २.८ तथ्य प्रक्रियन

संशोधन विषयामध्ये तथ्यांचे संकलन करून त्याचे विश्लेषण व निर्वचन केले आहे. हस्त सारणीकरणाचा उपयोग केला आहे. उपयुक्त व विश्वसनीय तंत्राद्वारे तथ्य संकलित केले आहे. विश्लेषणामुळे तथ्यांचा अर्थ स्पष्ट झाला. तथ्यांचे विश्लेषण करून व्यवस्थित क्रमात मांडून त्यांचे विश्लेषण व निर्वचन केले आहे. त्यामुळे तथ्यांना अर्थ प्राप्त झाला आहे. सामाजिक संशोधनाच्या दृष्टिने हे महत्त्वाचे वाटले. तथ्यांच्या विश्लेषणातच तथ्यांना विश्लेषण योग्य बनविणे व त्या तथ्यांच्या आधारे गृहीतकृत्यांची पडताळणी करून तथ्यांच्या आधारे निष्कर्ष मांडले आहेत. टेबल, शेकडेवारी, आलेख, सारणीकरण, सांख्यिकी, माहिती इ. घटकांना अनुसरून विश्लेषण केले. संख्यात्मक वर्गीकरणानुसार सारणीचे वर्गीकरण केले आहे.

## २.९ साहित्य परिक्षण व संशोधनाचे महत्त्व

संशोधन पद्धतीतील हा मुद्दा अत्याधिक महत्त्वपूर्ण आहे. पूर्वी होऊन गेलेल्या संशोधनाचे विषय आणि प्रस्तुत संशोधन विषय यांच्यातील संबंध जोडणे अत्यंत आवश्यक आहे. कारण प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी दिशा मिळाली, संशोधनाला गती मिळाली या दृष्टिकोनातून वैज्ञानिक साहित्यावर भर दिला आहे. त्यामधील प्रस्तुत संशोधनासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या संशोधन जर्नल्स, प्रकाशित, अप्रकाशित होणारी मासिके, पुस्तके, वार्षिक अहवाल, व संशोधन प्रबंधाची निवड केली व त्यांचा आढावा घेतला आहे. त्यामधील निष्कर्ष व प्रस्तुत संशोधन विषय यातील फरक दाखवून प्रस्तुत संशोधन विषय कसा वेगळा आहे हे स्पष्ट केले आहे.

अशोक देवीकर (१९९८)[१], शामराव घाडगे (२००९)[२], मुलाणी एम.यू (२००७)[३] अमित देशमुख (१९८७)[४], जयश्री जाधव (२०१२)[५], मनिषा राणे(२००३)[६], दिपक भामरे (१९९६)[७], या संशोधन प्रबंधामध्ये शेतीपूरक

व्यवसाय, घरगुती दूध प्रक्रिया, दूध शीतकरण केंद्र या घटकांचा अभ्यास केला आहे व त्यासंदर्भातील घटकांचीही चर्चा केली आहे.

प्रस्तुत अध्ययनामध्ये दूध व्यवसाय हा मुख्य व्यवसाय कसा बनला व स्वयं रोजगाराची निर्मिती व शेती व्यवसायासाठी फायदेशीर याविषयी प्रस्तुत संशोधनामध्ये चर्चा केली आहे व दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती निर्मिती करणारा श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्प कसा वेगळा आहे याचा अभ्यास केला आहे.

## २.१० प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व

ग्रामीण समाजशास्त्र या विषयाच्या ज्ञानात भर पडेल. स्वयंरोजगाराची निर्मिती, दूग्धव्यावसायिकांना दूध उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन मिळेल. स्वत:च्या व्यवसायामध्ये वाढ करण्यासाठी, पुरक व्यवसायासाठी उपयोगी. दूग्धव्यावसायिकांना मुख्य व्यवसाय म्हणून निवड करण्यासाठी उपयुक्त व महिलांचे आर्थिक सबलीकरणासाठी प्रोत्साहन मिळेल.

प्रस्तुत संशोधन घटकावर सखोल स्वरूपात ज्ञान प्राप्त केल्याने ज्ञानवृद्धीसाठी या संशोधनाला महत्त्व आहे. संशोधनाच्या निष्कर्षांचा व सूचनांचा उपयोग प्रात्यक्षिकासाठी सुद्धा विविध संशोधकांना करून घेता येईल. नवीन संकल्पनांचा शोध या प्रस्तुत संशोधनाने घेतला आहे.

## २.११ संशोधनाच्या मर्यादा

१. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा खाजगी प्रकल्प असल्याने प्रकल्पातील विषयाला आवश्यक असणारी माहिती प्रकल्पाकडून उपलब्ध होऊ शकली नाही.

२. श्रायबर डायनामिक्स डेअरी मर्यादित प्रकल्पाच्या अभ्यास करताना प्रकल्पाची कार्यप्रणाली अभ्यासताना काही विभाग प्रमुखांच्या मुलाखती घेणे आवश्यक होते. परंतू प्रकल्पाच्या व्यवस्थापनाच्या बंधनामुळे ते अधिकारी/

विभागप्रमुख मुलाखत देऊ शकले नाहीत. त्यामुळे प्रश्नावली पद्धतीचा वापर करून संशोधन केले आहे.

३. उत्पादित मालाची विक्री, कच्चा मालाची खरेदी, प्रकल्पाचा नफातोटा या पैलूवर प्रकाश टाकू शकले नाही. कारण हा प्रकल्प परदेशी श्रायबर कुटुंबीय व भारतीय गोयंका कुटबियांचा एकत्रित प्रकल्प आहे. त्यामुळे आर्थिक बाबीविषयी माहिती घेता आली नाही.

४. नमुना निवडीविषयी मर्यादा: भौगोलिक क्षेत्र विखुरलेले होते. वेळेची मर्यादा, दूग्ध व्यवसायिकांच्या वेळेअभावी प्रश्नावली पद्धतीचा वापर केला व निरीक्षण केले. संशोधनाचा आराखडा वर्णनात्मक घेण्याचे कारण गृहितकृत्य पडताळण्यासाठी वर्णनात्मक पद्धत महत्त्वाची वाटली.

## २.१२ प्रकरणीकरण

| | | |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | — | प्रस्तावना |
| प्रकरण दुसरे | — | अध्ययन पद्धती व साहित्य परिक्षण |
| प्रकरण तिसरे | — | बारामती पॅटर्न व परिसर |
| प्रकरण चौथे | — | श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडची कार्यप्रणाली. |
| प्रकरण पाचवे | — | तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन |
| प्रकरण सहावे | — | उद्दिष्टे व गृहीतके, नवीन संकल्पना. |
| प्रकरण सातवे | — | निष्कर्ष व शिफारशी आणि मर्यादा. |

✪✪✪

## संदर्भ सूची


१. बारामती नगरपालिका शताब्दीपूर्ती गौरव ग्रंथ, १९६७, श्री. म. सहस्त्रबुद्धे, प्रकाशक: अध्यक्ष, बारामती नगरपालिका, १९६७.

२. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साई प्रकाशन, नागपूर, सुधारित आवृत्ती. २००७.

३. मेश्राम सुरेश, प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, मे. कृष्णाचंद एजन्सी, नागपूर.

४. भांडारकर पु. ल. सामाजिक संशोधन पद्धती.

५. A dictionary of Sociology ( Duncon Mitchell)

६. Methods of Social Research ( Kenneth D. Bailey)

७. रानडे, सामाजिक संशोधन पद्धती. पुणे.

८. Journal of Rural Development (1978 on Words)

९. Writing Your Thesis: Paul Dliver (2nd Edition) Sage South Asia Edition 2009.


✪✪✪

## विभाग ब
# साहित्याचा आढावा / साहित्य परीक्षण.

### २.२.१ प्रस्तावना

संशोधनाला दिशा मिळण्यासाठी पूर्वी होऊन गेलेल्या संशोधनाचे विषय आणि प्रस्तुत संशोधन विषय यांच्यात संबंध जोडणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे संशोधनाचे स्पष्टीकरण व संशोधनास गती मिळाली. साहित्य परिक्षण म्हणून महत्त्वाचे आहे. तसेच मापनाची योग्य साधने, मापने वापरली त्याचे महत्त्व आणि त्यातील त्रुटी यांचे ज्ञान प्राप्त झाले.

त्यातील महत्त्वाचे संशोधन प्रबंध, जर्नल्स, प्रकाशित, अप्रकाशित पुस्तके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रे इत्यादीचा या विषयाशी संबंधित संशोधक, लेखकांनी त्यांच्या लिखणात घेतलेले महत्त्वाचे घटक यांचा आढावा घेतला आहे. व त्यापेक्षा प्रस्तुत संशोधन विषय कसा वेगळा आहे त्यांनी कोणते पैलू अभ्यासले नाही याचा प्रस्तुत संशोधन विषयात अभ्यास केला आहे.

### २.२.२ संबंधित संशोधनाचा आढावा

**१) देशमुख अमित यांनी १९८७ मध्ये सादर केलेला प्रबंध;** An Empirical Study of Costs and Prices of Cow Milk in Maharashtra: या विषयामध्ये महाराष्ट्रामध्ये एखादया सामान्य खेडयातील डेअरीचा विकास कसा होतो याचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील दूधाचे अर्थकरणातील दूध उत्पादक वितरक व ग्राहक यांचे परिक्षण करून अभ्यास केला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाचा अभ्यास करून दूग्ध व्यवसायिकांना दूधाच्या गुणवत्तेनुसार दूधाची किंमत दिली जाते याचा अभ्यास संशोधनामध्ये केला आहे.

**२) देवीकर अशोक, यांनी १९९८ मध्ये सादर केलेला प्रबंध;** A geographical study of dairy activity in Baramati Tahsil. Dist. Pune (Maharashtra) यांनी डेअऱ्यांच्या कार्यपद्धतीचा भौगोलिक अभ्यास करताना वेगवेगळया डेअऱ्यांची वेगवेगळी कार्यपद्धती अभ्यासली आहे. व त्यांचा अभ्यास करून दूग्धव्यवसायांचे वर्णन अभ्यासले आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये दूग्ध व्यावसायिकांच्या महिला सबलीकरणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. दूग्ध व्यवसाय हा शेतीपूरक म्हणून कसा महत्त्वाचा आहे हा अभ्यास संशोधन विषयात केला आहे.

**३) भामरे दिपक यांनी १९९६ मध्ये सादर केलेला प्रबंध;** महाराष्ट्रातील सहकारी डेअऱ्यांची प्रगती आणि धुळे जिल्हयातील प्राप्तीकरणाचा अभ्यास' या विषयामध्ये डेअरी व्यवसायामध्ये स्त्रीयांच्या सहभागाचा अभ्यास केला आहे.

या संशोधनामध्ये त्यांनी त्यानी डेअरी व्यावसायिक महिला या आर्थिक कामकाजात हिरारीने सहभागी होतात असे नमूद केले आहे. परंतू महिलांना निर्णय प्रक्रियेतील स्वातंत्र्याविषयी तसेच महिलांचा राजकीय क्षेत्रामधील सहभाग याविषयी अभ्यास केलेला नाही.

प्रस्तुत संशोधनामध्ये दूग्धव्यवसायामुळे महिलांचे आर्थिक सबलीकरण झालेले आहे. निर्णय प्रक्रियेत स्वत: भाग घेऊ लागल्या आहेत. तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यासारख्या निवणूकामध्ये सहभागी होत आहेत याचे अध्ययन करण्यात आले आहे.

**४) मुलाणी एम. यू: ऑक्टोबर २००७ चा प्रबंध :** आर्थिक सबलीकरण प्रक्रियेत महिला स्वयंसहाय्यता बचत गट चळवळीचे योगदान विशेष अभ्यास: पुणे जिल्हा. यांनी प्रबंधामध्ये स्वयंसहाय्यता गटामार्फत स्थापन झालेल्या लघुउद्योगांचा अभ्यास केलेला आहे. यातून रोजगार संधीची निर्मिती आणि लघुउद्योगामध्ये येणाऱ्या अडचणी अभ्यासल्या आहेत. त्यातून त्यांच्या स्पष्टीकरणात ग्रामीण भागातील महिलांच्या उन्नतीमध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाचे हे महत्त्वपूर्ण साधन यंत्रणा होय.

तसेच स्वयंसहाय्यता बचत गटाची परिणामकारकता ही त्यांच्या बचत संगठन, व्यवस्थापन या घटकाशी निगडित आहे असे स्पष्ट केले आहे.

वरील संशोधनामध्ये महिला सबलीकरण करण्यात स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व विशद केले आहे. परंतू महिलांचे नेतृत्वगुण, कार्यक्षमता, निर्णयक्षमता, राजकीय दर्जा इत्यादी घटकांचा विचार केला नाही. म्हणून संशोधिकेने या घटकांचा अभ्यास प्रस्तुत संशोधन विषयात केला आहे.

**५) घाडगे शामराव यांनी २००९ मध्ये सादर केलेला प्रबंध: 'दि.गो.पवार** : जीवन आणि कार्य' या विषयामध्ये शेतीपूरक व्यवसाय आणि प्रक्रिया उद्योग, दूग्ध उत्पादन वाढीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, दूग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी उपक्रम, दूग्ध व्यवसायाची भरभराट व त्यातून बारामतीमध्ये धवलक्रांती झाली. दूधाला हमीभाव देण्यासाठी बारामती तालुका सहकारी दूध संघाची स्थापना केली याचा अभ्यास केला आहे.

या संशोधनामध्ये धवल क्रांतीमुळे दूध उत्पादनामध्ये मोठी वाढ झाली आहे याचे अध्ययन केले आहे. परंतू वाढलेल्या दूधाची विल्हेवाट लावण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास केला नाही.

प्रस्तुत संशोधनामध्ये धवलक्रांतीमुळे महाराष्ट्रात अतिरिक्त दूध उत्पादन होत होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत होते. त्यासाठी अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करून, दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विक्री करणाऱ्या प्रकल्पाचा अभ्यास केलेला आहे.

**६) जाधव जयश्री पंढरीनाथ, यांनी २०१२ मध्ये सादर केलेला प्रबंध:** ''दूध उत्पादन आणि सहकारी दूग्ध संस्थाचा अभ्यास.'' या विषयामध्ये दूध सोसायट्यांच्या उद्योगात असणाऱ्या स्त्रियांचा सहभाग आणि त्यामुळे कुटूंबाचे उत्पन्न वाढून सामाजिक, आर्थिक प्रगती होते याचा अभ्यास केलेला आहे. या संशोधनामध्ये सहकारी दूध सोसायटयांच्या महिला सभासदांची दूध व्यवसायात

मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. असे नमूद केले आहे. परंतू महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग, बचत गट सहभाग याविषयी अभ्यास केलेला नाही.

प्रस्तुत संशोधनामध्ये स्त्रियांचा दूग्ध व्यवसायातील सहभाग, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, स्वयंनिर्णय यामुळे दूग्ध व्यवसायातील महिलांच्या सबलीकरणास वेग आला आहे. याचा सविस्तर अभ्यास केला आहे.

**६) राणे मनिषा यांनी २००३ मध्ये सादर केलेला प्रबंध:** ''स्वातंत्र्योत्तर काळातील नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा व त्यांच्यातील परिवर्तनाचा अभ्यास केला आहे.

या संशोधनामध्ये सफाई कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून आर्थिक सुबत्तेमुळे व्यक्तीचे राहणीमान आणि जीवनशैली बदलते व पुरूष प्रधान समाजव्यवस्थेत कुटूंबातील निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा प्रभाव कमी असतो. हे निष्कर्ष काढले आहेत. प्रस्तुत संशोधनामध्ये स्त्रीयांचे सबलीकरण झाल्यामुळे कुटूंबातील निर्णय महिला घेऊ लागल्या आहेत. आर्थिक स्वतंत्र मिळाले आहे. याचा अभ्यास केला आहे.

### २.२.३ संदर्भ पुस्तके

**१) द ना धनागरे (२००५)** प्रकाशित पुस्तक: संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव — विकास प्रक्रियेतील आंर्तर्विरोध आणि त्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहे. खुल्या अर्थव्यवस्थेत स्पर्धा करण्याची क्षमता नसलेल्या दूर्बल घटकापर्यंत आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाचे लाभ अशा योजनाद्वारे पोहचविले जातात. त्यामागे समता व सामाजिक न्यायाचे तत्व साकार करण्याचा उद्देश असतो.

महिला सबलीकरण, दूग्ध व्यवसायासाठी भक्कम दूध देणाऱ्या जर्सी जातीच्या गायी दिल्या जातात. या योजनांचा काहींना लाभ मिळाला असेल हे निश्चित. मात्र या योजनेसाठी लाभार्थी कोण असावेत असे ठरविणे अपेक्षित होते.

आणि प्रत्यक्षात त्याचा लाभ कोणी घेतला यासंबंधीचे चांगले संशोधन आज उपलब्ध नाही असे मत मांडले आहे.

प्रस्तुत संशोधनात महिलांच्या सबलीकरणामध्ये तिच्या निर्णय क्षमतेचा, नेतृत्वाचा व सामाजिक स्तराचा अभ्यास केलेला आहे.

**२) शिवाजी ठोंबरे (२००९) भगीरथ आप्पासाहेब पवार प्रकाशित पुस्तक, शेतीपूरक जोडधंदे.**

यांनी कृषी विकास प्रतिष्ठानच्या स्थापनेचे उद्दिष्ट स्पष्ट करताना शेती पूरक जोडधंदे व दूग्ध उत्पादन या संबंधित विविध योजना व प्रकल्प या उपक्रमामुळे सामान्य माणसापर्यंत प्रतिष्ठान पोहचले आहे. त्यांच्या मनात अढळ विश्वास प्रतिष्ठानने निर्माण केला आहे. अल्पभूधारक शेती असणारा व मोल मजूरी करणाऱ्या सामान्य माणसांनी एक — दोन गायी खरेदी करून दूग्ध व्यवसायाला सुरूवात केली आहे. शेतमजूर व शिक्षित बेरोजगारही या दूग्ध व्यवसायाकडे आकर्षित झाले आहेत.

सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणाऱ्या दूग्ध उत्पादनाच्या बाबतीत बारामती तालुका आघाडीवर आहे. त्यांच्या या निष्कर्षातून बारामती तालुक्यात दूध उत्पादन जास्त आहे हे स्पष्ट होते.

प्रस्तुत संशोधनात बारामती तालुक्यात दूध उत्पादन जास्त झाल्याने अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करणारी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाचा अभ्यास केला आहे व त्यातून अतिरिक्त दूधाचा प्रश्न कसा सोडविला आहे हे स्पष्ट केले आहे.

**३) प्र. न. जोशी,** यांनी जागतिक शब्दकोशात 'पॉझिटिव्ह' सिद्धांताचा निर्मात 'ऑगस्त कान्त' असा उल्लेख केला आहे. त्याच्या तीन अवस्थांचा नियम या सिद्धांतात मानवी प्रगतीचा नियम कसा असतो हा संदर्भ सिद्धांत स्पष्ट केला आहे. वैज्ञानिक अवस्था ही प्रत्यक्ष निरीक्षण करून त्याचे कारण शोधते तेव्हा तो अंतिम

स्वरूपाच्या वैज्ञानिक (प्रत्यक्ष) अवस्थेत पोहचत असतो. असे ऑगस्त कान्त या समाजशास्त्रीय विचारवंताने सांगितले आहे.

प्रस्तुत संशोधनात ऑगस्त कॉन्त यांच्या प्रत्यक्षवाद सिद्धांताचा आधार घेऊन संशोधन विषयाचा अभ्यास केलेला आहे.

४) **राहूल भगत, डिसेंबर २००७,** समाजशास्त्र संशोधन पत्रिका, यामध्ये स्थलांतरित बांग्लादेशीय लोकांच्या सांस्कृतिक प्रतिमानातील परिवर्तनाचे अध्ययन यामध्ये बांग्लादेशीय निर्वासितांच्या सांस्कृतिक प्रतिमानात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे याचा अभ्यास करताना त्यांच्या मते दोन भिन्न भाषा बोलणाऱ्या मानवी समूहाची भाषा सहज शिकता येते असे सांगितले आहे. प्रस्तुत संशोधनाचा आधार घेऊन परप्रांतीय कर्मचारी वर्गाच्या सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करण्यासाठी संशोधन विषयाची मांडणी केली आहे व त्यादृष्टीने अभ्यास केला आहे.

**५) अरूण टिकेकर, स्पर्धा काळाशी: वेध भारतातील आर्थिक व सामाजिक संक्रमणाचा वर्ष २००८, शरद पवार भाषणे व मुक्त संवाद, पान नं. ९.**

— मनमोहन सिंग पंतप्रधान, भारत सरकार.

ज्या आत्मीयतेने आणि निष्ठेने बारामतीचा विकास शरदरावांनी घडविला आहे. त्याचा माझ्या मनावर खास ठसा उमटलेला आहे. अन्न व कृषी खात्याचे केंद्रीय मंत्री या नात्याने त्यांचा आमच्या मंत्रिमंडळात जेव्हा अंतर्भाव झाला त्यावेळी माझी त्यांना एकच विनंती होती कृषी विषयक विकासाचा विलक्षण असा बारामती पॅटर्न त्यांनी उर्वरित देशातही घडवून आणावा. आपण उभ्या भारताचा विकास बारामतीच्या धर्तीवर साकारू शकलो तर एक राष्ट्र म्हणून आपण उन्नत मानाने जगभर निश्िंचतपणे वावरू शकू असे पंतप्रधानांनी यांनी म्हटले आहे. वकासाच्या बाबतीत बारामती हे रोल मॉडेल होय. वरील लेखामधून भारत सरकारचे प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांनी मांडलेला बारामती पॅटर्न याचाच आधार घेऊन प्रस्तुत संशोधन विषयामध्ये बारामती पॅटर्नच्या वेगवेगळया संकल्पना अभ्यासल्या आहेत.

**६) एम.एस.स्वामीनाथन यांनी चैतन्याचं चांदण' या प्रकाशित पुस्तकातील लेख २००२,फुलशेती क्रांतीचे शिल्पकार.**

या प्रकरणात आपल्या देशातील फुलशेतीतील (उद्यान विज्ञानातील) क्रांतीच्या शिल्पकारातही शरद पवार हे प्रमुख आहेत. द्राक्षे, ऊस व इतर पिकांसाठी त्यांनी संशोधन शिक्षण संस्था स्थापन केल्या. या खेरीज परंपरागत शेतीत आणि दूग्ध उत्पादन व्यवसायातही आघाडीचे तंत्रज्ञान आणण्यात शरद पवार हे अग्रेसर होते. सतत प्रयत्न केल्याने स्वप्न साकार होतात आपल्या पुढील प्रश्न सोडविण्यासाठी पद्धतशीर व सर्वंकश दृष्टी असल्याने ते यशस्वी झाले आहेत. अभिनय कल्पना प्रत्यक्षात उतरवता आल्या तरच त्या योग्य ठरतील असे ते म्हणतात. त्यांच्या दृष्टीने शरद पवार हे आदर्श आहेत.

प्रस्तुत संशोधन विषयात वरील लेखाचा आधार घेतला आहे. व इतर बारामती पॅटर्न संकल्पना स्पष्ट केल्या आहेत व राजकीय नेतृत्वाचे योगदान अभ्यासले आहे.

**७) लता मंगेशकर, गानसम्राज्ञी प्रकाशित.**

समाजकारणातही अग्रेसर या लेखात त्यांच्या मते पवार साहेब हे राजकारणाबरोबर समाजकारणातही अग्रेसर नेता आहे.ते खूप कमी बोलणारे पण महत्त्वाचे सांगणारे असे नेते शास्त्रीय संगीताचा आवड असणारा नेता म्हणजे शरद पवार.

प्रस्तुत संशोधन विषयात वरील लेखाचा आधार घेतला आहे. व इतर बारामती पॅटर्न संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

**८) डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी चैतन्याचे चांदणे** या प्रकाशित २००२, पुस्तकात बारामती माहिती तंत्रज्ञान विभाग हा अगदी जागतिक दर्जाचा आहे. अशा उच्च दर्जाबद्दल सतत विचार करत राहिले म्हणजे तो विचार प्रत्यक्षात उतरतो. याची खात्री मला जागतिक दर्जाचे जैवतंत्रज्ञान विद्यालय पाहिल्यावर आहे. कपाशीबद्दलच्या गुंतागुंतीच्या जैवतंत्रज्ञानावर त्यांनी केलेले विवरण अनेक

वैज्ञानिकांच्या विवेचनापेक्षा त्यांचे विचार त्यांची भाषणे प्रत्यक्ष कृती यात माहिती व तंत्रज्ञान जैवतंत्रज्ञान यावरील त्यांच्या वचनबद्दतेचे प्रतिबिंब दिसते. त्यामुळे वैज्ञानिकांना प्रेरणा मिळते व उत्साह वाढतो. प्रस्तुत संशोधन विषयामध्ये वरील लेखाचा आधार घेऊन संशोधन विषय स्पष्ट केला आहे.

**९) वसंत गोवारीकर, चैतन्याचे चांदणे, प्रकाशित पुस्तक २००२,**

मित्रत्वाच्या नात्यातून या लेखात असे म्हणतात की, थोडी व्यक्तिमत्त्व आहेत की ज्यांना फक्त येणाऱ्या काळाची चाहूल लागू शकते. सर्वच लोकांनी राजकारणात व सत्ता केंद्रात जाण्यापेक्षा काहींनी उद्योगधंदयात झोकून दयावे. जीवशास्त्र व माहिती तंत्रज्ञान तातडीने आत्मसात करण्यात या देशाच्या उज्जवल भवितव्याचे बीज आहे. त्यांचा ध्यास आणि त्यासाठी चाललेला अव्याहत प्रयत्न याकडे पक्षातीत नजरेने बघणाऱ्या कोणालाही त्यांच्या दुरदृष्टीचे दर्शन घडते. असे भविष्यवेध ते जेव्हा करतात तेव्हा त्यांचे निवेदन कोणीतरी लिहून दिलेल्या भाषणाचे निर्जीव वाचन नसते. तर सातत्याने केलेल्या अभ्यासाचे मननाचे संवादाचे, जागतिक पातळीवर केलेल्या निरीक्षणाचे फलित असते. शरद पवार यांच्या बोलण्यात गुणवान प्राध्यापकाची विद्‌वत्ता ओसांडताना दिसते.

प्रस्तुत संशोधनात वरील विषयाचा आधार घेऊन मोठमोठया उद्योगधंदयामध्ये राजकीय नेतृत्वाचे व मित्रत्वाच्या नात्याने कसे योगदान लाभले आहे याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१०) ॲथनी गिडन्स यांच्या भाषणाचा अनुवादः**

**विषय**: The National State in the Global Age.

**अनुवादक:** अनुराधा भोईटे. समाजशास्त्र संशोधन पत्रिका, डिसेंबर २००७.

जागतिकीकरण म्हणजे अमेरिकेचे इतर देशावर वर्चस्व म्हणून पाहिले जाते. पण वास्तवात तसे नाही दळणवळण तंत्रज्ञान आणि माहिती प्रसारण माध्यमे यांच्यामुळे खरेतर अमेरिका व पाश्चमात्य देशांनी इतर देशासाठी आपल्या बाजारपेठा खुल्या केल्या. माहिती व तंत्रज्ञान शास्त्राचे तंत्रज्ञान जगाला दिले. इतर

देश अगदी अलीकडेपर्यंत आपल्या बाजारपेठा इतरांना खुल्या करण्यास तयार नव्हते. विकसित देशांनी लादलेली ही बाब नाही. याउलट अविकसित देशांना आपली प्रगती करून घेण्यासाठी ही संधी आहे. भारत व चीन यांची विकासाकडील घोडदौड हेच दाखवून देते. कौशल्य व स्पर्धा यांना देशाची बंधने राहिली नाहीत. आपल्याच देशात राहून दुसऱ्या देशाची कामे करून आपण कमाई करू शकतो.

प्रस्तुत संशोधनामध्ये वरील लेखाचा आधार घेऊन डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाने अमेरिका या देशातील श्रायबरशी सहसंबंध प्रस्थापित करून दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करणारा आधुनिक तंत्रज्ञानायुक्त असा दूग्ध व्यवसायाला चालना देणाऱ्या प्रकल्पाचा अभ्यास संशोधन विषय म्हणून अभ्यासला आहे.
हे संशोधन जागतिकीकरणावर आधारित नाही.

अविकसित असलेल्या प्रदेशात जर विकास घडवून आणावयाचा असेल तर आधुनिक पाश्चिमात्य तंत्र स्विकारले पाहिजे. श्रायबर ही मुळ संकल्पना अमेरिकेचीच आहे. ॲथनी गिडन्सचा The Natioanl State in the Global Age या लिखानाचा अर्थ विकासाची प्रगती या अर्थाने संशोधिकेने घेतला आहे. भारत व चीन यांचा विकास प्रतिकृती कौशल्य, स्पर्धा यांना बंधने राहिली नाही. (त्यांची द्वैताची संकल्पना) Agency & Agent या बाबींचा विचार केला गेला. गिडन्स म्हणतात की, Age, विश्वसनीयतेची अनिश्चितता असते. Age आधुनिकतेमधून निर्माण होते व संस्थात्मक संरचनेत स्थिरतेची जागा प्राप्त करतो. कारण पारंपारिक समाज वेळोवळी बदलाची जागा दर्शवितो. त्यामुळे समाजशास्त्राचा अभ्यास करताना ज्ञानमीमांसाच्या संकल्पनेचा वापर करता येत नाही तर वैयक्तिक तथ्याला आपण महत्त्व देतो की जेणेकरून आपण समस्या सोडवू शकू.

**११) ना. धो. महानोर यांचे १९९१ चे प्रकाशित पुस्तक. शेतीसाठी पाणीः पाणी वापराच्या नव्या पद्धती, ठिबक सिंचन.**

संपूर्ण शेती व्यवहार अत्यंत अडचणीचा व हालाखीचा आहे. या अडचणीतून व संकटातून उपलब्ध असलेल्या कमीत कमी पाण्यामुळे उत्पादन वाढून आर्थिक लाभाचा ताळमेळ बसविता येईल. पाण्याचा, साधनसामुग्रीचा वापर व पाणी व्यवस्थापनाचा नवा विचार महाराष्ट्रात नव्याने सुरू झाला आहे तो म्हणजे ठिबक सिंचन. प्रचंड प्रमाणात वाढणारी लोकसख्या, वाढणाऱ्या गरजा, यंत्रसामग्री, उद्योगधंदे आणि रासायनिक खते या साऱ्यांसाठी पाण्याचा व्यवहार्य व समतोल विचार न करता अवाढव्य व प्रचंड प्रमाणात उपसा केला जातो. अतिरिक्त पाणी उपसण्यामुळे व पाणी अडवण्याच्या अद्यायावत योजना कमी असल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. व उत्पादन खर्च वाढला आहे. त्यासाठी ठिबक सिंचन हे शेतीसाठी फारच फायदेशीर आहे. असे मत व्यक्त केले आहे.

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये ठिबक सिंचन हा पथदर्शी प्रकल्प कृषी विकास प्रतिष्ठानने इस्त्रायल पद्धतीने कसा कार्यान्वित केला आहे व तो शेतकऱ्यांना कसा फलदायी ठरला आहे याचा अभ्यास संशोधनामध्ये केला आहे.

**१२) आण्णसाहेब शिंदेः १९९३ प्रकाशित पुस्तक, शेती व पाणी, नियोजन व धोरणासंबंधी काही प्रश्न.**

या पुस्तकात दूधाचा महापूर या लेखात दूधाचा महापूर ही योजना पश्चिम युरोपातील सामायिक बाजारपेठातील राष्ट्राकडून देणगीच्या स्वरूपात मिळणाऱ्या दूधाची भुकटी आयातीवर आधारलेली आहे. जागतिक अन्न संघटनेमार्फत या योजनेबाबतचे करार भारत सरकारबरोबर करण्यात आले होते. आणि राष्ट्रीय दूध विकास महासंघ व भारतीय दूध महामंडळ या संस्थाच्याद्वारे दूधाचा महापूर या योजनेची अंमलबजावणी होत आहे. या दोन्ही संस्थाचे अध्यक्ष कुरियन होते. नंतर सहकारी चळवळीचे दूधाच्या क्षेत्रातील महत्त्व वाढले. युरोप व अमेरिकासारख्या प्रगत राष्ट्रात दूधाचे संकलन व प्रक्रिया व वितरण यात दूध उत्पादकाचे सहकारी

संघ फार मोलाची कामगिरी बजावत आहेत. भारतासारख्या खंडतुल्य देशात तर दूध उत्पादकात सहकारी चळवळीचे विशेष महत्त्व आहे.

प्रस्तुत संशोधनात दूधाच्या क्षेत्रातील महत्त्व लक्षात घेऊन अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी श्रायबर डायनाममिक्स डेअरी लिमिटेड च्या कार्यप्रणालीचा अभ्यास केला आहे.

**१३) शितल तांबे, विना विश्वनाथ** यांनी आपल्या शोध निबंधामध्ये (२०००) हवेली तालुका (पुणे जिल्हा) दूग्धशेतीच्या प्रमुख प्रकारांचे व्यय लाभ विश्लेषण. या विषयात पारंपारिक दूग्ध व्यवसाय, शासकीय दूध शेती आणि लष्करी दूध शेती या प्रकारांचे व्यय लाभ विश्लेषण केलेले आहे. यामध्ये संकरित जातींच्या जनावरांचा वापर करून दूध व्यवसाय जास्त किफायतशीर करता येईल असे मत मांडले आहे. या व्यवसायातील जनावारांच्या जातीनुसार पशुखाद्य प्रमाण योग्य ठेवल्यास दूधाच्या उत्पादनात व व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होईल. असे विश्लेषण केले आहे.

प्रस्तुत संशोधनात वरील शोधनिबंधाचा आधार घेऊन कमी खर्चात जास्त उत्पादन कसे वाढविता येईल व शेतीपूरक दूग्ध व्यवसाय हा मुख्य व्यवसाय कसा करता येईल यासंबंधी अभ्यास केला आहे.

**१४) प्रदिप आगलावे यांच्या अभिजात समाजशास्त्रीय विचार** या प्रकाशित २००६ पुस्तकात त्यांनी वैज्ञानिक पद्धतीच्या आधारावरील प्राप्त ज्ञान हाच प्रत्यक्ष वाद होय. निरीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणाचीही एक व्यवस्थित कार्यप्रणाली म्हणजे विज्ञान होय. निरीक्षण, परिक्षण प्रयोग व वर्गीकरणावर आधारित वैज्ञानिक पद्धतीद्वारे सर्व काही समजणे आणि त्यापासून ज्ञान प्राप्त करणे म्हणजे प्रत्यक्ष वाद होय.

मानवी किंवा सामाजिक घटना यादेखील आकस्मित नसून त्या सामाजिक विषयाच्या अंतर्गत घडत असतात. त्यामुळे सामाजिक घटना कशा प्रकारे घडून येतात किंवा त्यांचा कोणता क्रम व गती आहे याचे अध्ययन यथार्थपणे करणे

शक्य आहे हाच कॉम्तचा प्रत्यक्षवादाचा आधारभूत सिद्धांत आहे. या सिद्धांताचा आधार घेऊनच प्रस्तुत संशोधनात संशोधन विषय स्पष्ट केला आहे.

**१५) रविंद्र काटोले: प्रथम आवृत्ती २००८, प्रकाशित पुस्तक, छोटा दूध प्रक्रिया प्रकल्प: व्यवसाय नव्हे संधी,** या पुस्तकात गुजरात राज्यातील आनंद प्रणाली ज्या सहकाराची बीजे खोलवर रूजली गेली तो हिंदुस्थानचा स्वतंत्र दिन होय. या संशोधन विषयामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाची निर्मिती केली. याचा अभ्यास केला आहे.

**१६) महादेव चौगुले १९९०** चे प्रकाशित पुस्तक, आपली शेती नवी दृष्टी, यात शेतीपूरक जोडधंदे, शेती व्यवसायातील अपुरे उत्पादन, शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या आणि त्यांच्या कामाचे स्वरूप विचारात घेतल्यास शेतीव्यवसाय प्रधान मानून इतर कमी महत्त्वाचे थोडेफार मागेपुढे करता येण्यासारखे व उत्पादनाची शाश्वती असणारे शेती व्यवसायाला पूरक म्हणून जोडधंदे करता येण्यासारखे असून त्यापासून निश्चित स्वरूपाचे उत्पादन मिळून त्यांच्या चरितार्थाचे योग्य साधन होय.

दुभती जनावरे, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधमाशीपालन असे अनेक जोडधंदे करून शेतकऱ्याला शाश्वत उत्पादन घेता येण्यासारखे आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये वरील लेखाच्या आधारे दूग्ध व्यवसाय एक सबल जोडधंदा मिळाला आहे या विषयाचा संशोधन विषयामध्ये अभ्यास केलेला आहे.

### २.२.४ वृत्तपत्रे:

०२/०९/२००२: **सकाळ वृत्तपत्र,**

**स्वच्छतेचा बारामती पॅटर्न**

जनजागृतीचे काम फक्त आज युवकच करू शकतो. राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत चार महाविद्यालयातील ७०० विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एवढया मोठया प्रमाणावरील स्वच्छतेचा हा पहिलाच प्रयोग केला आहे. सलग चार वर्षात स्वच्छतेचे महत्त्व, नागरिकांना पटविण्यात या विद्यार्थ्यांना यश आले आहे. ही

मोहिम फक्त स्वच्छतेपुरती मर्यादित नव्हती. तर समाजाची मानसिकता बदलवणारी होती. मन, मनगट, मेंदू यांची सांगड घालून समाजाची स्पंदने जाणून सर्वांनाच स्वच्छतेचे महत्त्व पटवून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविका हातात झाडू घेऊन स्वच्छता करत होते. त्यांचा उत्साह पाहून नागरिकांनीही उत्स्फुर्तपणे हातात झाडू या अभियानात सहभाग घेतला हा स्वच्छतेचा पॅटर्न इतरांनी राबविण्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे.

**२) ०२/०२/२०१२: दैनिक: सकाळ: विज्ञान प्रदर्शनाचा बारामती पॅटर्न.**

बारामतीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनास पाच दिवसांच्या कालावधीत जवळपास ३ लाख विद्यार्थी, नागरिक व शिक्षकांनी भेट दिली. राज्य विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्या प्रतिष्ठान व एन्व्हार्यमेंटल फोरम ऑफ इंडियाने बारामती पॅटर्न निर्माण केला आहे.

**३) २२/०९/२०१२: लोकमत, पुणे जिल्हा. (डॉ. कुलकर्णी)**

**स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न.**

स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती शहर आणि तालुक्यात बारामती पॅटर्न राबविला जात आहे. त्यानुसार आरोग्य अधिकारी आरोग्य सेविका मार्फत गर्भवती महिलांवर नजर ठेवण्यात येत आहे. गर्भवती महिलांची नोंदणी, आरोग्यसेविकांकडून करण्यात येत आहे. अपत्य जन्मापर्यंत संबंधित महिलेची माहिती ठेवण्याच्या सूचना आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. उपजिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती पॅटर्नची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नोंदणी करण्यात आलेल्या संबंधित महिलांची प्रसुती होईपर्यंत माहिती ठेवण्याच्या सूचना संबंधित आरोग्यसेविकांना देण्यात आलेल्या आहेत. आरोग्य अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ही माहिती संकलित करण्यात येत आहे. याशिवाय गर्भपात केंद्रावर आरोग्य प्रशासनाची नजर आहे. हा स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न सर्वत्र राबविला जात आहे.

**४) २६/०९/२०१२: दैनिक: सकाळ: करिअर मार्गदर्शनाचा बारामती पॅटर्न.**

राजकारणासोबत समाजकारण करून त्यामाध्यमातून समाज व तरूणाईला दिशा देण्याचे काम बारामतीत केले जात आहे. करिअर मार्गदर्शनाच्या माध्यमातून राष्ट्रीय नेत्याच्या मूळ संकल्पनेतून सुरू झालेल्या या करिअर मार्गदर्शनाखालील अकॅडमीचे कार्य चालू आहे. तरूणाईला त्याचे करिअर करताना ज्या गोष्टींची गरज आहे ती विनामुल्य पुरविण्याची जबाबदारी या अकॅडमीने घेतली असून अनेक युवक या अकॅडमीच्या माध्यमातून अधिकारी बनण्याची तयारी करत आहेत.

✪✪✪

# संदर्भ


१. देशमुख अमीत : Ph.D Thesis_1987 ; Sub_An Emprical Study of Costs and Prices of Milk.

२. देवीकर अशोक: Ph.D Thesis_1998 ; Sub_A Gerographical Study of Dairy Activitiy In Baramati Tahsil, Dist: Pune. (Maharashtra)

३. भामरे दिपक : Ph.D. Thesis_1996.

विषय: महाराष्ट्रातील सहकारी डेअऱ्यांची प्रगती आणि धुळे जिल्हयातील प्राप्तीकरणाचा अभ्यास.

४. मुलाणी एम.यू. : Ph.D. Thesis_2007.

विषय: आर्थिक सबलीकरण प्रक्रियेत महिला स्वयंसहाय्यता बचतगट चळवळीचे योगदान, विशेष अभ्यास: पुणे जिल्हा.

५. घाडगे शामराव: : Ph.D. Thesis_2009.

**विषय:** दि. गो. पवार: जीवन आणि कार्य.

६. जाधव जयश्री प.: : Ph.D. Thesis_2009.

**विषय:** दूध उत्पादन आणि सहकारी दूध संस्थांचा अभ्यास विशेष संदर्भ: नाशिक जिल्हा. (२००१ ते २०१०)

७. राणे मनिषा : Ph.D. Thesis_1996.

**विषय:** स्वातंत्र्योत्तर काळातील नाशिक महानगर पालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा व त्यांच्यातील परिवर्तनाचा अभ्यास.

८. तांबे शितल विश्वनाथ विना, शोधनिबंध २०००.

**विषय:** हवेली तालुका (पुणे जिल्हा) दूग्ध शेतीच्या प्रमुख प्रकारांचे व्यय — लाभ, विश्लेषण पान नं. १६९.

९. धनागरे द. ना. डिसेंबर २००५, प्रकाशित पुस्तक: संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव.

१०. ठोंबरे शिवाजी, भगीरथ आप्पासाहेब पवार, २००१, प्रकाशित पुस्तक, शेतीपूरक जोडधंदे.
११. जोशी प्र. ना., जागतिक शब्दकोश, सिंद्धांताचा निर्माता, ऑगस्त कॉन्त,
१२. टिकेकर अरूण: स्पर्धा काळाशी, वेध भारतातील आर्थिक व सामाजिक संक्रमणाचा, २००८.
१३. स्वामीनाथन एम.एस, चैतन्याच चांदण २००२, पृ.क्र. २३. फलशेती क्रांतीचे शिल्पकार.
१४. मंगेशकर लता, चैतन्याच चांदण, २००२, पृ.क्र. ९३, समाजकारणातही अग्रेसर.
१५. माशेलकर रघुनाथ, चैतन्याच चांदण, २००२, पृ.क्र ५१, जैवतंत्रज्ञानावर दृढ विश्वास,
१६. गोवारीकर वसंत, चैतन्याच चांदण, २००२.
१७. गिडन्स ॲथनी, अनुवाद: अनुराधा भोईटे, The National State In the Global Age.
१८. महानोर ना. धो, १९९१ प्रकाशित पुस्तक, शेतीसाठी पाणी.
१९. शिंदे आण्णासाहेब, १९९३, प्रकाशित पुस्तक, शेती व पाणी नियोजन व धोरणासंबंधीचे काही प्रश्न.
२०. आगलावे प्रदिप, प्रकाशित २००६, अभिजात समाजशास्त्रीय विचार.
२१. काटोले रविंद्र, प्रकाशित पुस्तक २००८, छोटा दूध प्रक्रिया प्रकल्प.
२२. चौगुले महादेव प्रकाशित पुस्तक १९९०, आपली शेती नवी दृष्टी.
२३. सकाळ वृत्तपत्र, ०२/०९/२००२, संगई मिलिंद, स्वच्छतेचा बारामती पॅटर्न.
२४. सकाळ, वृत्तपत्र, ०२/०२/२०१२, संगई मिलिंद, विज्ञान प्रदर्शनाचा बारामती पॅटर्न.

२५. सकाळ, वृत्तपत्र, २६/०९/२०१२, संगई मिलिंद, करिअर मार्गदर्शनाचा बारामती पॅटर्न.

२६. लोकमत, २२/०९/२०१२, डॉ. कुलकर्णी, स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न.

२७. लोकमत, १६/०३/२०११, बारामतीत अत्याधुनिक मत्स्यबाजार. पथदर्शी प्रकल्प.

✪✪✪

# प्रकरण तिसरे
# बारामती पॅटर्न

## ३.० बारामती पॅटर्न

बारामती पॅटर्न ही संकल्पना स्पष्ट केल्यानंतर कृषी विकासाचा बारामती पॅटर्न ची माहिती घेताना ‘‘कृषी विकास प्रतिष्ठान माळेगाव, ता. बारामती, जि. पुणे या नावाने प्रतीष्ठानची स्थापना २२ जुन १९७१ रोजी झाली. तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाच्या विकासासाठी व उपलब्ध पाण्याचे संवर्धन (साठवण) व व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्रतिष्ठान करत होते. त्यामध्ये पाझरतलावांच्या पाणलोट क्षेत्रात वनीकरण व संवर्धन करणे, शेती व शेतीला पुरक अशा जोडधंद्याचा विकास करणे. त्यासाठी प्रसार, प्रशिक्षण व प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी आदर्श प्रात्यक्षिक शेती फार्म १९७४ मध्ये स्थापन केला आहे. १९७४ मध्ये आप्पसाहेब पवार यांनी इस्त्राईल दौरा केला होता. त्या दौऱ्यामध्ये त्यांना दुष्काळग्रस्त परिसराच्या विकासाचा मार्ग सापडला. पाण्याची टंचाई असलेल्या प्रदेशातील शेतीच्या तंत्रज्ञानाची संजीवनी घेऊन ते परतले व त्यांनी कृषी तंत्रज्ञान व कृषीपूरक जोडधंद्याचे तंत्रज्ञान शेती फार्ममार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोहचविले. तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे व शेतीला पूरक अशा जोडधंद्यांना चालना देणाऱ्या संस्था उभारण्यासाठी पुढाकार घेतला. आदर्श शेतीयोग्य जमीन तयार केली. व त्यावर इस्त्रायलच्या धर्तीवर शेती व शेतीपूरक अशा जोडधंद्यांचे विभाग सुरू केले.

बारामतीध्ये एम.आय.डी.सी.ची स्थापना १९९० रोजी झाली. रस्ते, पाणी, वीज या पायाभूत सुविधा चांगल्या दर्जाच्या निर्माण केल्या आहेत. कच्चा माल, कुशल मनुष्यबळ, उत्पादित मालास बाजारपेठ या सोयी उपलब्ध आहेत. कृषी विकास प्रतिष्ठानने बारामती व परिसरामध्ये क्रांती घडून आली आहे. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण केल्या आहेत. शेतकऱ्यांचा उत्पादित माल देश विदेशातील

बाजारपेठेत पाठविण्यासाठी पक्के रस्ते, रेल्वे वाहतूक, हवाई वाहतूक या सोयी उपलब्ध आहेत.

बारामतीमधून द्राक्षे, डाळिंब ही फळे निर्यात केली जात आहेत. त्यामुळे फळबाग शेतकऱ्यांना चागली अर्थप्राप्ती झाली आहे. महाराष्ट्रातील फळबाग शेतकऱ्यांबरोबरच महाराष्ट्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचे दर चांगले मिळावेत दूध उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने हा श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्प बारामती येथे कार्यन्वित करण्यात आला. श्रायबर डायनामिक्स डेअरीने प्रत्यक्ष उत्पादनास १९९६ मध्ये सुरूवात केली. पायाभूत सुविधा उत्तम दर्जाच्या असल्यामुळे प्रकल्पास दूध संकलन करण्यासाठी अडथळे येत नाहीत. तसेच बारामती व परिसरातील शेतकऱ्यांच्या देखील दूध स्वीकृतीस अडचण येत नाही. श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातून उत्पादित होणारी उत्पादने बाजारपेठेत पाठविण्यासाठी चांगल्या दर्जाचे रस्ते, ब्राडगेज रेल्वे सेवा, हवाई वाहतूक उपलब्ध असल्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरीची उत्पादने ग्राहकांपर्यंत त्वरित पोहचतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प मल्टिब्रॅंड मल्टिप्रोडक्ट पदार्थांचे उत्पादन करतो. अनेक मल्टिनॅशनल कंपन्यांना उत्पादने तयार करून दिली जात आहेत. त्यामुळे या प्रकल्पाच्या उत्पादनांना मागणी वाढली आहे. प्रकल्पाने उत्पादन वाढ करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील ८ जिल्हयातून दूध संकलन सुरू केले. त्यामुळे अतिरिक्त दूधाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचा फायदा झाला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी हा कृषी उत्पादनाशी निगडित प्रकल्प असल्यामुळे बारामती व परिसरातील शेतकऱ्यांना या प्रकल्पाने दूध उत्पादन हा एक सबळ जोडधंदा प्राप्त करून दिला आहे. हे केवळ कृषी विकास प्रतिष्ठानने केलेल्या अथक परिश्रमाचे फळ आहे. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरी हा प्रकल्प 'बारामती पॅटर्न' चा भाग आहे.

## ३.१ कृषी विकास प्रतिष्ठान

### ३.१.१ शेती विभाग

शेती विभाग सुरू केल्यानंतर शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी कृतीत आणण्यासाठी त्यांना ते प्रात्यक्षिकाद्वारे उपलब्ध करून दिले आहे. प्रतिष्ठानच्या शेती विभागात खालील कार्ये केली जात आहे.

उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर कसा करावा यासंबंधी आधुनिक सिंचन पद्धतीची प्रात्यक्षिके दिली जात आहे. रोपवाटिकेतील उत्तम दर्जाची फळझाडे व फुलझाडांच्या रोपांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला जात आहे. सुधारित उसाचे प्रक्रिया केलेले बेने पूरविणे, माती, पाणी, खते, पशुखाद्य रास्त दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे. विविध शेती अवजारांचा वापर करून किमान मजुरांच्या साहाय्याने शेती कशी करावी याचे प्रात्यक्षिक देतात. जमीनीची ढासळती सुपिकता वाढविण्यासाठी विविध प्रात्यक्षिके, हिरवळीची खते, मातीपरिक्षण, एकात्मिक खत व्यवस्थापन सेंद्रीय शेती, पिकांची फेरपालट याविषयी मार्गदर्शन केले जात आहे.

### ३.१.२ फलोद्यान प्रकल्प

सुधारीत जातीच्या फळझाडांची रोपे उपलब्ध करून दिली जातात. त्यामध्ये सुधारित जातीच्या द्राक्षांचे कटिंग्ज उपलब्ध करून दिले जात आहे. मातृवृक्ष कृषीविद्यापिठातून आणून तंज्ञांच्या खास देखरेखी खाली रोपे तयार केली जात आहेत.

### ३.१.३ शेती विज्ञान मंडळ

कृषी तंत्रज्ञान अतिशय वेगाने बदलत आहे. नवनवीन प्रयोग, नविन शेती तंत्रज्ञान, शिवारफेरी हे शेतीविज्ञान मंडळ स्थापन करण्यात आले आहे. शेतीविषयक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी शेती विज्ञान मंडळातर्फे शैक्षणिक सहली, परिसंवाद, चर्चासत्रे व कृषी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जात आहेत.

त्याचबरोबर परिवर्तनव्याख्यानमाला अंतर्गत दर महिन्याला व्याख्याने आयोजित केले जात आहे.

**३.१.४ प्रशिक्षण**

शेतकरी, शेतकरी महीला, सुशिक्षित बेरोजगार यांनी शेती व शेतीपूरक व्यवसाय शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी प्रतीष्ठानतर्फे प्रशिक्षण वर्ग चालविण्यात येतात.

**१) पशुधन पर्यवेक्षण प्रशिक्षण**

एक वर्ष कालावधीचा राहूरी कृषी विद्यापिठाचा प्रमाणपत्र प्रशिक्षण अभ्यासक्रम चालविण्यात येतो.

**२) शेळीपालन प्रशिक्षण**

शेळीपालन व्यवसायात महिलांचा सहभाग अधिक आहे. कमी खर्चात रोगराई टाळून शेळयांचे संगोपन कसे करावे, साध्या रोगावर घरगुती पद्धतीने औषधोपचार कसे करावेत ग्रामीण भागातील महिलांना हे सर्व शक्य व्हावे यासाठी अल्पकालावधीचे प्रशिक्षण दिले जाते.

**३) कुक्कुटपालन प्रशिक्षण**

हे प्रशिक्षण एक महिना कालावधीचे असून त्यास महात्मा फुले कृषी विद्यापिठाची मान्यता आहे.

**४) माळी प्रशिक्षण**

सर्व प्रकारची फुलझाडे, फळझाडे व भाजीपाला लागवड खते, औषधे, कलमे करण्याच्या पद्धती याची प्रशिक्षण कार्यक्रमात माहिती दिली जाते. हा प्रशिक्षण वर्ग एक वर्ष कालावधीचा असून त्याला महात्मा फुले कृषी विद्यापीठाची मान्यता आहे.

## ३.२ जलसिचनाच्या आधुनिक पद्धती

इस्त्राईल हा पाण्याची तीव्र टंचाई असलेला देश आहे. त्यामुळे शेतीसाठी निर्णायक घटक असलेला पाण्याचा अत्यंत काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय नव्हता. या तत्त्वावर त्यांनी पिकाला गरजेइतके पाणी पुरवून जास्तीत जास्त उत्पादन मिळवून देणारे सिंचनाचे नविन तंत्रज्ञान विकसित केले. हे तंत्रज्ञान ठिबक व फवारा सिंचन या नावाने ओळखले जात आहे.

आप्पासाहेब पवार यांनी १९८०मध्ये इस्त्राईलला चार महीने राहून आधुनिक सिंचन पद्धतीचा सखोल अभ्यास केला. व परत आल्यावर ठिबक, फवारा सिंचन पद्धतीचा प्रचार व प्रसार प्रात्यक्षिकाद्वारे करण्याचा ध्यास त्यांनी घेतला होता. आपल्या देशात या सिंचन पद्धतीचा झालेला व होत असलेल्या प्रसारात त्यांचा फार मोठा वाटा आहे. आपल्या देशातील ठिबक व फवारा सिंचनाचे ते जनक आहेत.

कृषी विकास प्रतिष्ठानने अनेक उद्योग, जोडधंदे, कृषीप्रक्रिया उद्योग यांची अशा पद्धतीने निर्मीती केली आहे. की ते रोल मॉडेल आहेत.

## ३.३ कृषी व औद्योगिक विकास

बारामती कृषी उत्पादनाचा विचार केला तर मोठया प्रमाणावर ऊसाचे उत्पादन घेतले जात आहे. तसेच द्राक्षे, डाळींब, केळी यासारखी फळबागांचे उत्पादनही मोठया प्रमाणावर घेतले जाते. शेतमालापैकी अनेक उत्पादने नाशवंत असल्यामुळे त्यावर प्रक्रिया केल्यास ती अधीककाळ टिकू शकतात. तसेच ती उत्पादने दूरच्या बाजारपेठेत पाठविणे शक्य होते. त्यामुळे अधीक भाव मिळू शकतो. शेतमालावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था झाल्यास मालाची किंमत शेतकरी ठरवतील व त्याच्या मालाला रास्त भाव मिळू शकेल. शेतमालावर प्रक्रिया करणारे

उद्योग उभे राहील्यास अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होईल. विज, पाणी यांचे प्रश्न सुटतील. उद्योगामुळे अनेक उद्योगांना चालना मिळेल.

शेती व उद्योग ही अर्थव्यवस्थेची साधने आहेत. शेतीविना उद्योगाची वाढ होत नाही. तर उद्योगाविना शेतीचा विकास खुंटतो. या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. बारामती तालुक्यात कृषीवर आधारीत उद्योग धंद्याची उभारणी केली आहे.

### ३.३.१ साखर उद्योग

बारामती तालुक्यात मुख्य व्यवसाय म्हणून ऊसाची शेती केली जाते. या तालुक्यामध्ये जास्तीत जास्त बागायती क्षेत्रामध्ये ऊसाचे पिक घेतले जाते. कारण पिकासाठी उत्पादन खर्च इतर पिकांच्या तुलनेत कमी आहे. बारामती तालुक्यामध्ये तीन साखर कारखाने आहेत. या कारखान्यांमुळे आजुबाजूच्या परिसराचा विकास झाला आहे. यापैकी दोन कारखाने सहकारी तत्त्वावर चालतात. तर एक कारखाना खाजगी स्वरूपाचा आहे. या कारखान्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

महाराष्ट्रातील पहीला सहकारी साखर कारखाना १९५० साली अहमदनगर जिल्हयातील लोणी या गावी उभारला. महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखान्यांना सुरूवातीला अडअडचणींना तोंड द्यावे लागले. कारखान्यांच्या क्षमतेपेक्षा ऊस कमी या संकटाशी अनेक कारखान्यांना तोंड द्यावे लागत होते. तशा अवस्थेतही सहकारी साखर कारखाने संघटित करण्याची प्रेरणा मिळाली आहे. त्यामुळे आज महाराष्ट्रात १०५ कारखाने सहकारी तत्त्वावरील आहेत. सभासदांचा ऊस एकत्रित करणे, त्यापासून साखरेची निर्मिती करणे. ती बाजारात विकणे व प्रक्रियेचा आणि विक्रीचा खर्च वजा करून राहीलेल्या उत्पन्नाचे सभासदांना वाटप करणे हे सहकारी साखर कारखान्यांचे उद्दिष्ट आहे.

बारामती तालुक्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांच्या निर्मितीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. साखर कारखान्यामुळे अनेक छोटे—मोठे उद्योगधंदे उभे राहिले आहेत.

### ३.३.२ द्राक्षे प्रक्रिया उद्योग

बारामती तालुकयामध्ये ऊस शेतीबरोबरच द्राक्ष शेतीही केली जाते. हलक्या, मुरमाड जमीनीमध्ये कोणतेही पिक येत नाही. परंतु अशा जमीनीत ठिबक सिंचनाद्वारे कमी पाण्यात द्राक्षाचे पिक उत्तम येते. हे प्रतिष्ठानने सिद्ध करून दाखविल्यामुळे बारामतीमध्ये द्राक्ष उत्पादन वाढले. द्राक्ष पिक नाशवंत असल्यामुळे बाजारपेठेत जो भाव मिळेल त्या भावाने विकणे शेतकऱ्याला भाग पडत होते. या परिस्थितीचा फायदा बाजारपेठेतील दलाल घेत होते.

बाजारपेठेतील दलालाकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी द्राक्षावर प्रक्रिया करून पक्का माल म्हणून मद्यार्क निर्मिती व विक्री व्यवस्था करणाऱ्या ‘बारामती ग्रेप इंडस्ट्रीज लि. पिंपळी’ या कारखान्याची उभारणी १९८० साली प्रतिष्ठानच्या पुढाकाराने झाली आहे.

आज बारामतीमध्ये तीन द्राक्षप्रक्रिया प्रकल्प चालू आहेत. या प्रकल्पाकडून त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या द्राक्षांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन दिले जाते. द्राक्ष प्रक्रिया उद्योगामुळे अनेक युवकांना रोजगार प्राप्त झाला आहे. तसेच शेतकऱ्यांनाही फार मोठा आर्थिक फायदा या प्रकल्पामुळे होत आहे.

### ३.३.३ फलोत्पादन

प्रतिष्ठानच्या अथक प्रयत्नांमुळे शेतकरी फलोत्पादनाकडे वळले आहेत. फळेदेखील नाशवंत असल्यामुळे व हंगामात एकाच वेळी प्रचंड माल बाजारपेठेत येत असल्याने शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे या परिस्थीतीतून मार्ग काढण्यासाठी व व्यवसायाला स्थैर्य मिळवून देण्यासाठी प्रतिष्ठानच्या पुढाकाराने ‘बारामती तालुका सहकारी फलोत्पादन संघ’ स्थापन केला आहे. या संघाने लाखो रूपये खर्च करून फळे अधिक काळ टिकविण्यासाठी प्रिकुलिंग व कोल्ड स्टोअरेज

यांची उभारणी केली आहे. फलोत्पादन संघाच्या माध्यमातून फळांची निर्यातही करण्यात येते. त्यामुळे बारामती तालुक्यामध्ये 'डाळींब' बागेचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढत आहे.

### ३.३.४ रेशीम सूत व कापड निर्मिती उद्योग

रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध करून देण्याची क्षमता असलेला हा शेतीपुरक व्यवसाय आहे. शेती उत्पादनावर आधारीत रेशीम व रेशीम धाग्यापासून कापड तयार करणे. अलीकडच्या काळात प्रामुख्याने युरोपिय देशामध्ये कृत्रिम धाग्याच्या कापडापेक्षा कापूस व रेशीम यासारख्या नैसर्गिक धाग्यांच्या कपडयांचे आकर्षण वाढू लागले आहे.

माळेगाव ता. बारामती येथे कृषी विकास प्रतीष्ठानच्या शेती फार्मवर जिल्हा रेशीम कार्यालयाअंतर्गत रेशीम सुत व कापड निर्मिती केंद्र आहे. तूती रेशीमची पूर्ण प्रक्रिया, तूती धागा रंगविणे, कापड निर्मिती व विक्री या सर्व प्रक्रिया एकाच ठिकाणी होत आहेत.

बारामती तालुक्यामध्ये रेशीम उद्योगाला चांगला वाव असल्याने व परिसरातील शेतकऱ्यांचा फायदा होण्यासाठी राज्य शासनाने १९९० मध्ये रेशीम सुत व कापड निर्मिती केंद्राची स्थापना करून शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे रेशीम उद्योगापासून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. शेतमालाच्या बाबतीत प्रतिष्ठानच्या पुढाकारातून प्रक्रिया उद्योग उभे राहीले आहेत. त्यामध्ये अनेक तरूणांना ज्यांच्या त्यांच्या पात्रतेप्रमाणे नोकऱ्या मिळालेल्या आहेत.

### ३.३.५ शेतीपूरक जोडधंदे

शेतीला पूरक अशा जोडधंद्याचा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी अवलंब करावा यासाठी प्रतिष्ठानने केलेल्या वातावरणनिर्मीतीतून बारामती तालुक्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसाय उभा राहीला आहे. अनेक शेतकऱ्यांनी पोल्ट्री फार्म उभारले आहेत. यामधून निर्माण होणाऱ्या मालाला बाजारपेठ व रास्त भाव मिळण्याची

गरज होती. अंडयांना बाजारपेठ व रास्त भाव मिळवून देण्यासाठी 'बारामती तालुका कुक्कुटपालन संघ' स्थापन केला आहे. एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत सुरूवातीला अंगणवाडीच्या माध्यमातून लहान मुलांना 'सुकडी' वाटपाची शासन पुरस्कृत योजना कार्यन्वित होती. सुकडी ऐवजी उकडलेली अंडी पुरविण्याच्या क्रांतीकारी योजनेचे महत्त्व आणि उपयुक्तता शासनाला पटवून देऊन कृषी विकास प्रतिष्ठानने शासनाची मान्यता मिळविली.

अंगणवाडीमधील लहान मुले व स्तनदा माता यांना कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून दररोज ५० ते ६० हजार उकडलेली पुरविण्यात येऊ लागली. पुढे अंडीपुरविण्याच्या या योजनेचा देशभर प्रसार झाला व तिचा 'बारामती पॅटर्न' म्हणून नामनिर्देश केला जाऊ लागला.

कुक्कुटपालन व्यवसायाच्या विकासामुळे फार मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली आहे. कोंबडयांच्या खाद्यासाठी लागणाऱ्या मका उत्पादनाचे क्षेत्र वाढले व त्यास स्थानिक बाजारपेठ उपलब्ध झाली. तसेच शेतजमीनीच्या सुपीकतेत वाढ करणाऱ्या कोंबडी खताची उपलब्धता स्थानिक पातळीवर होऊ लागली. तसेच कोंबडीपालन व्यवसायात 'सोन्याच अंड' निर्माण करण्याची क्षमता आहे. याची प्रचिती या व्यवसायाने बारामतीकरांना दिली आहे.

### ३.३.६ दूग्धोत्पादन व शेतीपूरक जोडधंदा

कृषी विकास प्रतिष्ठानने राबविलेल्या अनेक योजना उपक्रम यामुळे प्रतिष्ठान सामान्य माणसांपर्यंत पोहचले आहे. प्रतिष्ठानने दाखविलेल्या मार्गांनी जाण्यासाठी तुटपुंजी शेती असलेल्या व मोलमजुरी करणाऱ्या सामान्य माणसांनी ही एक अथवा दोन गायी घेतल्या आहेत. संकरित गायींच्या संगोपनाचे प्रात्यक्षिक म्हणून प्रतिष्ठानने फार्मवर स्वतंत्र डेअरी विभाग सुरू केला आहे. या विभागामध्ये विविध चारा पिकांचा अभ्यास अपारंपारीक खाद्यघटक जसे गव्हाच्या काडीवर मळी व युरियाची प्रक्रिया करून पशुखाद्य बनविणे. परदेशी सिद्ध वळूच्या वीर्याचा वापर करून संकरीत गायींमध्ये वंश सुधारणा करणे. दुग्धोत्पादन हा मजुरावर अवलंबून

असणारा असा धंदा असल्याने मजुर टंचाईवर उपाय म्हणून जेथे शक्य आहे तेथे यांत्रिकीकरणाचा अवलंब करणे. प्रतिष्ठानच्या या कार्यामुळे दूग्धोत्पादन व्यवसाय विकासास चालना मिळाली आहे.

### ३.३.७ डेअरीचे औद्योगिक महत्त्व व जोड व्यवसाय म्हणून ग्रामीण भागातील महत्त्व

बारामती तालुक्यामध्ये दूध उत्पादन हा व्यवसाय म्हणून ३० Nov. १९७० ला सुरू केला. त्याकाळात प्रारंभी ७० लिटर दूध मोठया शहरात पाठविले होते. त्यानंतर या दूध धंद्याने पाठीमागे वळून पाहीलेच नाही. दूध उत्पादनामध्ये सतत वाढ होत गेली. या वाढलेल्या दूध उत्पादनाच्या विक्रीसाठी 'बारामती तालुका सहकारी दूध संघाची स्थापना १९७७ साली करण्यात आली. या दूध संघामार्फत दूध शहरात पाठविण्यात येऊ लागले. यामध्ये वाहतुकीमधील अडथळे, वातावरण इत्यादींचा परिणाम होऊन दूध खाराब होत होते. हे सर्व टाळण्यासाठी बारामती सहकारी दूध संघाने उच्च दर्जाचे दूध संकलीत करण्यासाठी बल्ककूलर बसविले. यामुळे दूध टिकण्याचा कालावधी वाढला. त्यामुळे उच्च दर्जाचे दूध संकलीत होत आहे.

दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाला चांगला भाव मिळण्यासाठी बारामती तालुका सहकारी दूध संघाने 'नंदन' या नावाने पॅकींग दूध उत्पादनाला सुरूवात केली. तसेच आम्रखंड, श्रीखंड, पनीर, दही, लस्सी इत्यादी पदार्थांचे उत्पादन सुरू केले आहे. छोटया व्यवसायाचे रूपांतर मोठया औद्योगिक व्यवसायात केले आहे.

१९९१–१९९२ या कालावधीत महाराष्ट्रातील दूध उत्पादन शासकीय व सहकारी संस्थांच्या एकूण दूध प्रक्रिया क्षमतेहून जास्त झाले होते. त्याच कालावधीत गॅट करारान्वये जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली होती. व केंद्र शासनाने दूध प्रक्रिया उद्योग खाजगी उद्योगासाठी खुला केला. याच कालावधीमध्ये अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी बारामतीमध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पास १९९२ मध्ये मान्यता दिली.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पाची दूध हाताळणी रोजची क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे. या प्रकल्पाच्या अगोदर दूध महापूर योजनेच्या यशाने दूध उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झाली होती. दूध उत्पादकांच्या दूधाची स्विकृती होत नव्हती. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत होते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाच्या स्थापनेनंतर अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करणेची सुविधा तयार झाल्यामुळे उत्पादकांना त्यांच्या दूधाची वर्षभर स्विकृती होण्याची खात्री झाली आहे. त्यामुळे दूध उत्पादकांचा फार मोठया प्रमाणावर फायदा होत आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी मार्फत पशुवैद्यकिय सेवा, स्वच्छ दूध उत्पादन, पशुंचे व्यवस्थापन इत्यादी बाबतीत प्रशिक्षण सुविधा पुरविल्या जात आहेत. दूध उत्पादक या व्यवसायाकडे पारंपारिक दृष्टीकोनातून न बघता व्यावसायिक दृष्टीकोनातून बघत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाकरिता दूग्धव्यवसाय पूरक व्यवसाय निर्माण झाला आहे.

या पूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास झाला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगारांच्या दृष्टीने डेअरीचे फार महत्त्व आहे. त्यामुळे कामगारांचा सामाजिक, आर्थिक विकास झाला आहे.

**आर्थिक विकास:**

कुशल — अकुशल कामगारांना काम मिळाले. शेतीवर आधारित जोडधंदे चांगले चालू आहे. कारखान्यांच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल तसेच पक्का माल बाजारपेठेत पाठविणे. या सर्व प्रक्रियेमध्ये येणाऱ्या व्यक्ती, नोकर, शेतकरी, मजूर, संस्था यांची आर्थिक प्रगती झाली आहे.

**राहणीमान:**

रोजगार निर्मिती व आर्थिक विकास झाल्यामुळे लोकांच्या राहणीमानात अमुलाग्र बदल झाला आहे. उत्तम दर्जाचे उत्पादन झालेमुळे चांगले कपडे परिधान करू लागले. तसेच उत्तम प्रतीच्या भौतिक सुविधा निर्माण झाल्या. त्यामुळे आरोग्यविषयक जागरूकता आली. उत्तम रस्त्यामुळे इतर शहरांशी संपर्क वाढला

त्यामुळे अनुकरणातून लोक आत्मपरिक्षण करू लागले. त्यातून लोकांचे राहणीमान सुधारले.

**शैक्षणिक:**

औद्योगिक क्षेत्र स्थापन झाल्यामुळे कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांची मुले, यांचेसाठी बारामतीत चांगले शिक्षण सुविधा निर्माण केली. इंग्रजी माध्यम शाळा, अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, बी. एड्. कायदेविषयक शिक्षण, माहिती तंत्रज्ञान या सारख्या शाखामधून शिक्षण उपलब्ध केले. लोकांचा आर्थिक विकास झाल्यामुळे चांगल्या शाळेत मुलांना शिक्षण देऊ लागले. पर्यायाने शैक्षणिक प्रगती चांगली झाली.

**सामाजिक:**

समाजातील प्रत्येक नागरिकास चांगल्या प्रकारच्या सर्व सुविधा मिळत आहेत. सर्व नागरिकांना काम मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक प्रगती झाली आहे.

त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना आधुनिक शेती अवजारे मिळू लागली. त्यामुळे शेतीची मशागत वेळेत चांगल्या प्रकारे करणे शक्य झाले आहे. शेतातील मालाचे उत्पादन वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात आर्थिक शैक्षणिक बाबतीत सुधारणा झाली आहे. त्यांचा सामाजिक स्तर उंचावला आहे इत्यादी घटकांमधून डेअरी उद्योगाचे महत्त्व स्पष्ट होते.

### ३.३.८ डेअरी—जोडव्यवसाय म्हणून ग्रामीण भागाकरिता महत्त्व

अल्पभूधारक, मोलमजूरी करणारे कामगार व इतर सामान्य माणसे आपली उपजिविका करत असताना नोकरीबरोबरच उत्पन्नाचा दुसरा मार्ग म्हणजे जोडव्यवसाय करत असतात. कारण अतिरिक्त श्रमाचा वापर त्यांच्या श्रमाला मुल्य प्राप्त करून देत असतात. कामगार आपली डयूटी संपवून राहिलेल्या रिकाम्या वेळेत आपल्या कुटूंबाबरोबर एखादा व्यवसाय करत असतो. त्यातून तो कुटूंबाचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करतो. आर्थिक फायदा मिळविण्यासाठी सर्वांना काम मिळण्यासाठी कुटूंबातील सर्व मिळून जोडव्यवसाय करतात.

जोड व्यवसायाचे शेतीवर आधारित बरेच जोड व्यवसाय आहेत. त्यामध्ये १) शेळीपालन २) कुक्कुटपालन ३) इमू पालन ४) रेशीम उद्योग ५) मधुमक्षिका पालन ६) रोपवाटिका ७) पशुपालन इत्यादी व्यवसाय करतात. यामध्ये प्रमुख व्यवसाय शेती हा आहे.

प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये कुक्कुटपालन, पशुपालन हा जोडधंदा म्हणून केला जातो. ग्रामीण भागामध्ये शेतकरी कुटूंबाचे जास्त प्रमाण आहे. परंतु शेती उत्पादन हे अनियमित आहे. तसे शेती उत्पादन वर्षातून एकदा किंवा दोनदाच येत असते. त्यामुळे दैनंदिन खर्चासाठी दूध व्यवसाय हा जोडधंदा म्हणून करत आहे. प्रत्येक कुटूंब त्याच्या कुवतीनुसार गाया सांभाळत आहे. पशुपालनासाठी मुख्य प्रश्न चाऱ्याचा असतो. तो शेती असल्यामुळे सुटतो. घरातील पुरूष लोक शेतातून चारा सकाळी आणून देतात. गोठयाची स्वच्छता, दूध काढणे या गोष्टी पुरूष करतात. दिवसभराचे ही काम या घरातील स्त्रियाच करत असतात. यामध्ये दिवसभर चारा टाकणे, पाणी पाजणे, यासारखी हलकी कामे करत असतात. जोडधंदयामध्ये स्त्रीयांचे योगदान फार मोठे आहे. यामध्ये दूधाचे पैसे हे दर पंधरा दिवसांनी मिळतात. त्यामुळे दैनंदिन खर्च, मुलांचे शिक्षण या पैशावरच होते. ग्रामीण भागामध्ये दूध व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय म्हणून उदयास आला आहे. दूध व्यवसायापासून घरचे दूध, दही, तूप हे पदार्थासाठी पैसे खर्च करावे लागत नाहीत. तसेच गायापासून सेंद्रिय खत तयार होते. ते शेतीसाठी उपयोगी आहे. शेतीला लागणाऱ्या खतासाठी रासायनिक खतावर खर्च कमी होतो. गाईपासून ज्या लहान कालवडी मिळतात त्या मोठया झाल्यावर त्यांच्यापासून चांगले पैसे मिळतात. हया दूध व्यवसायामध्ये दिवसेंदिवस आधुनिकीकरण होत आहे. चारा कापणी यंत्र, दूध काढण्याचे यंत्र, शेण गोळा करण्याचे यंत्र इत्यादी साधने उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे मजूरीवर होणारा खर्च बराचसा कमी झाला आहे. तसेच गाईसाठी 'मुक्त गोठा पद्धती' अवलंबली जात आहे. यामुळे सोडणे, बांधणे, पाणी देणे, या सारखी कामे करावी लागत नाहीत. चाराही एकदाच ठेवला जातो. भूक

लागल्यानंतर गाई येऊन चारा खातात. पाणी पितात त्यामुळे मजूरीवरचा खर्च बराच कमी झालेला आहे. हळूहळू या जोडव्यवसायाचे रूपांतर मुख्य व्यवसायात होत आहे.

बारामती तालुका कृषी प्रधान असल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तसेच व्यवसायास अनुकूल असे वातावरण आहे. दूध विक्रीचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच दूध वाहतूक व पशुवैद्यकीय सेवा, पशुखाद्य या सारख्या सेवा तात्काळ उपलब्ध होतात. त्यामुळे दूध व्यवसायाने बारामती तालुक्यातील ग्रामीण भागाचे अर्थकारण बदलून गेले आहे.

बारामती तालुका दूध उत्पादक संघ ही सहकारी तत्त्वातील दूध संकलन व दूग्धजन्य पदार्थ तयार करणारा डेअरी प्लांट आहे. तसेच खाजगी क्षेत्रातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा दूध प्रक्रिया व दूग्धजन्य पदार्थ निर्मिती व वितरण करणारा आंतरराष्ट्रीय स्तरावरील डेअरी प्रकल्प आहे. त्यामुळे बारामती व परिसरातील दूध उत्पादकांना दूध विक्रीचा प्रश्न येत नाही. त्यामुळे जोडधंदा म्हणून असणारा हा व्यवसाय आता मुख्य व्यवसाय म्हणून करीत आहेत.

## ३.४ कृषी व उद्योग पायाभूत सुविधा

बारामती तालुका हा कृषी प्रधान तालुका आहे. तालुक्यामध्ये असणारी शेती व त्यावर अवलंबून असणारे उद्योग यांच्यासाठी असणाऱ्या पायाभूत सुविधांचा आढावा घेत असताना

बारामती तालुक्यामध्ये पाझर तलावांच्या नियोजनबद्ध कार्यवाहीकरिता पाझर तलावासाठी श्रमदान व श्रमदानाच्या मोबदल्यात हे तत्त्व 'कासा' संस्थेने मान्य करून तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागात पाझर तलाव उभारणीच्या कार्यास धान्य रूपान मदत करण्याचा निर्णय घेतला व या संस्थेच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागामध्ये २८९ पाझर तलावांचे काम पूर्ण केले होते. त्यामुळे तलावांच्या लाभ क्षेत्रातील सिंचनाखालील वाढ झाली आहे.

शेतीसाठी आवश्यक असणारे घटक म्हणजे हवामान, पाणी, खते, किटकनाशके आणि भांडवल पाझर तलाव झाले होते. त्यामध्ये पाणी साठल्याने तलावांच्या लाभक्षेत्रातील भुगर्भामध्ये पाण्याची पातळी वाढली होती. परंतू त्याचा वापर शेतीसाठी कसा करावयाचा याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यासाठी शेतकऱ्यांना विहीर खोदाईसाठी सेंट्रल बँकेकडून कर्ज उपलब्ध करून दिले होते. तसेच ऑईल इंजिन्सही दिली होती. प्रतिष्ठानच्या या योजनेला हातभार लावण्यासाठी किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीने ६० ऑईल इंजिन्स मोफत दिली होती. बारामती तालुक्यातील २२ गावांना निरा डाव्या कालव्याचे पाणी मिळत होते. त्या भागात शेतकरी ऊस हे पिक घेत होते.

**साखर कारखाने**: सिंचनाच्या व्यवस्था चांगल्या असल्यामुळे ऊस उत्पादन जास्त प्रमाणावर घेतले जाते. त्यासाठी बारामती तालुक्यामध्ये २ सहकारी व १ खाजगी साखर कारखान्याची निर्मिती केली आहे.

**फळबागासाठी**: कोल्ड स्टोअरेज प्रिकुलिंग यासारख्या सुविधा निर्माण केल्या आहेत. तसेच फळे निर्यात केंद्रे ही स्थापन केले आहे.

द्राक्षासाठी द्राक्ष प्रक्रिया उद्योगांची निर्मिती केली आहे. बारामती ग्रेप इंडस्ट्रीज सेंच्यूरी वाईन्स, युनायटेड ब्रिव्हरीज यासारख्या द्राक्ष प्रक्रिया प्रकल्प बारामतीमध्ये कार्यान्वित आहेत. कुक्कुटपालन व्यवसायासाठी बारामती तालुका कुक्कूटपालन संघाची निर्मिती केली आहे.

दूध व्यवसायासाठी बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाची निर्मिती केली आहे. या दूधसंघामार्फत शेतकऱ्यांना मोफत मार्गदर्शन दिले जाते.

**पशुखाद्य**: बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाने नंदन या नावाने पशुखाद्य तयार केले आहे. हे पशुखाद्य प्राथमिक दूध उत्पादक संस्थामार्फत दूग्धव्यावसायिकांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले जाते.

**रेशीम उद्योग**: रोजगाराची संधी मोठया प्रमाणात उपलब्ध करून देण्याची क्षमता असलेल्या व्यवसायासाठी कृषी विकास प्रतिष्ठान सर्वोत्तोपरी सहकार्य करीत आहे.

**दूग्धव्यवसाय:** बारामती तालुक्यामध्ये सबळ असा हा जोडधंदा आहे. दूग्ध व्यवसायासाठी आवश्यक असणारी दूध शितकरण केंद्रे व दूध प्रक्रिया उद्योगांची निर्मिती केली आहे.

बारामती तालुक्यामध्ये उद्योगांना पायाभूत सुविधा निर्माण करून दिल्या आहेत. ज्या ठिकाणी प्रकल्पाची निर्मिती होते त्या ठिकाणी तेथील ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, एम.आय.डी.सी. या उद्योगांना पायाभूत सुविधा निर्माण करून देतात. या पायाभूत सुविधांमध्ये प्रामुख्याने रस्ते, पाणी, वीज, दळणवळणाची साधने, मनुष्यबळ, प्रकल्पासाठी आवश्यक जागा, कच्चा मालाची उपलब्धता इत्यादी गरजांची पूर्तता केलेली आहे.

कामगारांच्या मुलांसाठी शाळा, कामगार वसाहती, दवाखाने, बँका, पोस्ट ऑफिस, बाजारपेठ इत्यादी दैनंदिन गरजांची पूर्तता करून देणाऱ्या सोयी निर्माण केल्या आहेत.

बारामतीमध्ये कृषी विकासासाठी पायाभूत सुविधा चांगल्या असल्यामुळे कृषी विकास चांगला झाला आहे. तसेच कृषीवर आधारीत जे उद्योगधंदे आहेत त्यांनाही चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

## ३.५ महिला सबलीकरण

ग्रामीण भागात तळागाळाच्या पातळीवर व्यवसाय संघटन, त्यांना सबला करण्याच्या दृष्टीने किंवा उद्देशाने स्वयंसहायत्ता बचत गटाची संकल्पना उदयास आली. स्वयंसहाय्यता बचत गट हे महिलांचे संघटन करण्यात, स्त्रीयांना जागृत करण्यात, स्वत:चे हक्क, कर्तव्य याविषयी जागरूकता निर्माण करण्यात, स्त्रीयांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनविण्यात हे एक प्रभावी माध्यम आहे.

देशाच्या ग्रामीण भागातील महिला आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक यापैकी कोणत्या स्तरावर स्थिर नव्हत्या.

महिलांच्या आर्थिक स्थानाबाबत विचार केला असता तिला आर्थिक व्यवहाराबाबत सतत दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागत होते. तिच्या नावावर कोणतीही मालमत्ता नव्हती. कोणताही आर्थिक निर्णय तिच्या सल्ल्यानुसार होत नव्हता. अशा गोष्टी आर्थिक स्थानाबाबत होत्या.

सामाजिक स्थानाच्या बाबतीत ही महिलांचे समाजातील स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. समस्या सोडविण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असून देखील त्यांना कोठे ही संधी दिली जात नव्हती. समाजात व कुटूंबात नेहमीच दुय्यम दर्जाची वागणूक मिळत होती. त्यामुळे त्यांना स्वतःचे अस्तित्त्व निर्माण करण्यात अडथळे येत होते.

राजकीयदृष्टया महिलांचे स्थान नावापुरतेच होते. पंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३% राखीव जागा असल्यामुळे त्या ठिकाणी नेतृत्व करताना दिसतात. परंतु बरेचसे निर्णय पुरूषाकडून घेतले जात होते. प्रशासकीय क्षेत्रात व राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग नगण्यच होता.

शिक्षणाच्या बाबतीत मुलींच्या शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने मोफत शिक्षण योजना, सावित्रीबाई फुले दत्तक योजना, महिलांसाठी स्वतंत्र महाविद्यालये, बसभाडयात सवलत, शैक्षणिक शुल्कात सवलत अशा योजना राबविल्या इत्यादी. अनेक उपक्रम महिला सबलीकरणासाठी केले.

महिला स्वयंसहाय्यता बचत गट ही संकल्पना प्रथमतः बांग्लादेशात सुरू झाली. चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे अध्यापक डॉ. युनूस महमंद यांनी १९७६ साली ढाका शहरात महिलांचे बचत गट सुरू केले.

भारतामध्ये १९८० मध्ये आय.आर.डी पी. योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्यात आले.

१९८७—८८ मध्ये ग्रामीण महिला व बालविकास योजनेअंतर्गत आंध्रप्रदेशात बचत गट सुरू झाले.

भारतामध्ये १९९२ साली बचत गटाची मूर्हतमेढ रोवली. १९९६ मध्ये बारामती तालुक्यामध्ये पहिला बचत गट सुरू केला. बचत गटांची संख्या वाढली. काही बचत गटांनी बँकेकडून कर्ज घेऊन व्यवसाय सुरू केला. पण बचत गटामुळे प्रशिक्षण, मार्केटिंग असे प्रश्न निर्माण झाल्यामुळे अनेक बचत गट बंद पडू लागले.

यावर उपाय शोधण्यासाठी २००६ मध्ये शारदा महिला संघाची स्थापना झाली. या संघामार्फत बँक क्षेत्रातील कार्यक्रम व उदयोजकता विकास शिबीरे, कार्यशाळा यांच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचा प्रयत्न केला आहे आणि आजतागायत चालू आहे.

महिला बचत गटांच्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून २००६ साली 'भिमथडी जत्रा' भरवली. या जत्रेला महिला बचत व ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या भिमथडी जत्रेने महिलामधील विक्री कौशल्य व आत्मविश्वास वाढविण्याचे काम केले. तसेच 'भिमथडी जत्रा' प्रतिवर्षी भरते. भिमथडी जत्रेने महिला बचत गट, उदयोजक व ग्राहक यांच्यामध्ये समन्वय साधून विश्वासाने काम करत आहे.

१ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत बचत गट सुरू आहेत.

सन २००३ मार्च अखेर भारतात ५,१५,४७७ बचत गट स्थापन झाले आहेत.

महाराष्ट्रामध्ये १९९३ साली महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा योजनअंतर्गत बचत गट स्थापन. मार्च २००३ अखेर २८०६५ बचत गट. पुणे जिल्हयामध्ये जानेवारी २००४ अखेर १०२०२ बचत गट स्थापन झाले होते. ३०/१/२००४ अखेर बारामती तालुक्यामध्ये ९२५ बचत गट होते.

महिला सबलीकरणासाठी अनेक शासकीय योजना राबविल्या जात आहेत. बारामतीध्ये शारदाबाई पवार महिला महाविद्यालयाची स्थापना १९८६—८७ साली झाली. त्यानंतर या संस्थेने महिलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा, स्त्री आर्थिकदृष्टया

सक्षम व्हावी तिचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा या हेतूने कृषी विकास प्रतिष्ठानने शारदाबाई पवार शैक्षणिक संकुलामध्ये विद्यार्थिनींसाठी, महिला घटस्फोटित, परित्यक्त्या यांच्यासाठी व्यक्तिमत्त्व विकास योजनेअंतर्गत ५ दिवस ते ६महिने मुदतीपर्यंतचे ३० अभ्यासक्रम सुरू केले होते. यामध्ये अनेक स्त्रीयांनी प्रशिक्षण घेऊन स्वयंपूर्ण झाल्या अहेत व महिला पोलिस प्रशिक्षण सुरू केले आहे. तसेच बारामती येथे एस.आय.टी.पी योजनेअंतर्गत बारामती हाय—टेक टेक्सटाईल पार्क २००८ पासून सुरू झाला आहे. सदर पार्कमध्ये जास्तीत जास्त महिलांना सामावून घेतले जाणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण ६० युनिट असून प्रत्येक २० युनिटचे उत्पादन सुरू केले आहे. या पार्कसाठी एकूण ७००० हजार कामगारांची आवश्यकता आहे. यामध्ये कुशल ३५०० व अकुशल ३५०० यामध्ये ८०% स्त्रीया कामगार आहेत. स्त्री कामगारांसाठी गारमेंट व्यवसायातील शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे याकरिता एक कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र टेक्सटाईल पार्क बारामती येथे सुरू झालेले आहे. सध्या टेक्सटाईल पार्कमध्ये २५०० ते ३००० महिला कामगार काम करीत आहेत.

बारामती कृषी विकास प्रतिष्ठानतर्फे महिला सबलीकरणासाठी २००१ पासून भिमथडी यात्रेचे आयोजन केले जाते. यामध्ये नोंदणीकृत बचत गटांना प्रवेश दिला जातो. भिमथडी जत्रेमध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील स्त्रीयांनी (बचत गटाच्या) लोणचे, पापड, शेवया, कुरडया, काही वस्तू, विविध प्रकारच्या चटण्या, इ अनेक तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून भिमथडी जत्रेचे आयोजन केले जाते

ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना चांगली मागणी यावी यासाठी या मालाचे पॅकिंग, मांडणी, सजावट, विक्री पद्धत, संभाषण या गोष्टीचे प्रशिक्षण दिले जाते. या भिमथडी जत्रेमुळे ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या उत्पादनास कायमस्वरूपी हक्काची बाजारपेठ मिळवून दिली आहे. समाजात वावरताना अडखळणारी ग्रामीण स्त्री न संकोचता समाजात वावरत आहे. तिला आर्थिक

स्वातंत्र्य मिळाले आहे. स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ लागली आहे. आत्मविश्वासाने स्वत:च्या मालाची विक्री करत बाजारपेठेचे व्यावहारिक ज्ञान मिळविले आहे. मोठमोठया ऑर्डर घेणे, माल पाठविणे, कच्चा माल खरेदी करणे, मालाचा दर्जा राखणे या सर्व गोष्टी ग्रामीण स्त्री करत आहे. भिमथडी यात्रेमुळे तिला तिच्या क्षमतेची जाणीव झाली आहे. खऱ्या अर्थाने स्त्री सक्षम झाली आहे.

## ३.६ शैक्षणिक विकास

छोटया गावाचे रूपांतर मोठया शहरात होऊन आता बारामती तालुक्याला जिल्हयाचे रूप प्राप्त झाले आहे. शिक्षणाच्या बाबतीत बारामती अग्रेसर असून राज्यातील परिपूर्ण शैक्षणिक केंद्र म्हणून बारामतीची ओळख झालेली आहे.

ग्रामीण भागातील मुलांना/मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी 'पुणे' येथेच जावे लागत. त्यामुळे गरीब कुटूंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नव्हते.

उच्च शिक्षणासाठी प्रथमत: बारामती येथे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची स्थापना झाली. या महविद्यालयामध्ये,

१. उच्च माध्यमिक स्तरावर कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून शिक्षण मिळते.
२. + २ स्तरावरील व्यवसायिक अभ्यासक्रम.
३. पदवीमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखा.
४. पदव्युत्तर पदवीमध्ये, इंग्रजी, मराठी, अर्थशास्त्र, हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र हे विषय आहेत. वाणिज्य शाखेमध्ये एम.कॉम आहे.
५. विज्ञान शाखेमध्ये,रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, गणित हे पदव्युत्तर पदवीसाठी शिक्षणाची सोय आहे.
६. तसेच बी.सी.एस ही शाखा आहे.
७. महाविद्यालयाने नवीन व्यवस्थापनशास्त्राचे स्वतंत्र महाविद्यालय चालु केले आहे. इत्यादी अनेक विषयांचे उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध केली आहे.

- **शारदाबाई पवार शैक्षणिक संकुल**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. ग्रामीण भागातील युवा पिढीला विशेषत: मुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी १९८९–१९९० या शैक्षणिक वर्षी शारदाबाई पवार शैक्षणिक संकुल सुरू करण्यात आले.

- **शारदाबाई पवार शैक्षणिक संकुलातील विविध शैक्षणिक विभाग**

१. शारदाबाई पवार विद्यामंदीर (प्राथमिक व माध्यमिक)

२. शारदाबाई पवार विद्यानिकेतन

३. शारदाबाई पवार कनिष्ठ महाविद्यालय

४. शारदाबाई पवार महिला महाविद्यालय

५. शारदाबाई पवार महिला अध्यापक महाविद्यालय

६. शारदाबाई पवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था

७. शारदाबाई पवार तंत्रनिकेतन

८. शारदाबाई पवार मुलींचे वसतिगृह

९. शारदाबाई पवार कलानिकेतन

इत्यादी विभाग आहेत.

याचबरोबर बारामतीने साध्य केलेला मानव विकासही स्तुत्यच आहे. बारामतीचा हा विकासविषयक अनुभव ध्यानी घेऊन त्यामध्ये काही बदल करून त्याची पुनरावृत्ती देशभरात करता आली तर दारिद्रयाचे उच्चाटन, शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा, तरूणांसाठी रोजगार संधीची उपलब्धता करता येईल.

(स्पर्धा काळाशी, शरद पावर–भाषणे व मुक्तसंवाद, संपादन अरूण टिकेकर – अनुवाद अभय टिळक पृष्ठ क्र. १०)

बारामती पॅटर्नचे जे श्रेय शरद पवार यांना दिले जाते ते विकासाचे प्रारूप म्हणजे सामाजिक अभिसरणाचा एक यशस्वी प्रयोग होय. दुष्काळ प्रवण आणि दारिद्रयाने वेढलेल्या प्रदेशाचे रूपांतर आधूनिक अशा आर्थिक व कृषी घडामोडींनी

गजबजलेल्या केंद्रात घडवून आणण्याचा 'बारामती पॅटर्न' हा एक उपक्रम आहे. मनमोहन सिंग यांनीही या प्रकल्पाची प्रशंसा 'रोल मॉडेल' अशी केली आहे.

अशा प्रकारे आपल्या परिसरात विशेषत: अवर्षनप्रवण ४३ गावात सातत्याने पडत असलेल्या दुष्काळाने त्रस्त झालेल्या कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसलेल्या खेडयापाडयात सामान्य माणसांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रतिष्ठानने अहोरात्र अथक परिश्रम केले. त्याचे फलीत म्हणजेच बारामती परिसरचा झालेला विकास, दुष्काळग्रस्त भागात झालेली विकासाची कामे, विविध संस्थाची व उद्योगधंद्याची झालेली उभारणी, शेती व औद्योगीक, शिक्षण क्षेत्रात केलेली प्रगती, कृषी क्षेत्रात व शैक्षणिक क्षेत्रात काळानुरूप होणाऱ्या बदलांचा तंत्रज्ञानाचा स्वीकार करून परिसराचा विकास करण्यासाठी कृषी विकास प्रतिष्ठान कार्यरत आहे.

अशा या सेवाभावी संस्थेस अनेक संस्था, उद्योग, मान्यवर यांनी देणगी दिली आहे. त्या संस्थांची नावे पुढीलप्रमाणे.

१. कमिन्स डिसेल इंडिया फाऊंडेशन
२. मे. निलीन फाऊंडेशन ट्रस्ट
३. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडीकेट लि.
४. टेरे डेस होम्स, पश्चिम जर्मनी
५. एफ.ए.सी. फंड इटली.
६. मेहदु रोजगार योजना
७. डी.ए. (ट्रायसेम) योजना, महाराष्ट्र शासन
८. शॉ. वॅलिस ॲण्ड क. लि.
९. गरवारे वॉलरॉप्स लि.
१०. फिनोलेक्स केरळ लि.
११. चर्चेस ऑक्झिलरी फॉर सोशल ॲक्शन (कपार्ट)
१२. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.

१३. एस.एम. डायकेन लि.

१४. नौरोसजी वाडीया ॲण्ड सन्स प्रा. लि.

१५. के. एम. गोएंका.

१६. चर्चेस ऑक्झिलरी फॉर सोशल ॲक्शन (का.सा)

१७. गरवारे पेंटस

१८. हिंन्दूजा फाऊंडेशन

१९. हेल्पेज इंडिया, नवी दिल्ली

२०. पीपल्स ॲक्शन फॉर डेव्हलपमेंट

२१. डॉ. बेक ॲण्ड कंपनी इंडीया लिमीटेड

२२. एम.एस. अजमेरा ट्रस्ट

२३. दि. इंडियन सिमलेस मेटल टयूबस लि.

इत्यादी संस्थांनी कृषी विकास प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेस मदत केली आहे. या संस्थेचे विश्वस्त मंडळ हे मानद असून प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून आजवर सर्व विश्वस्तांनी प्रसंगी स्वत: खर्च करून संस्थेचे कार्य करीत आहेत. संस्थेच्या कोणत्याही सभेसाठी सुविधा व मानधन विश्वस्त मंडळाने घेतले नाही. ही संस्था स्वयंसेवी संस्था आहे.

ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्यासाठी शेतीपुरक जोडधंदे, शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, आणि औद्योगिक लघुउद्योग उभे राहावेत या दृष्टीने प्रतिष्ठान कार्यरत होते. रोजगारची निर्मिती खेडयातच व्हावी यासाठी गावोगावी व्याख्यानाद्वारे जनजागृती केली. या प्रयत्नांना यश येऊन बारामतीमध्ये संस्था उभ्या राहिल्या. संस्था व उद्योगधंदे यांची उभारणी होऊन त्या नावारूपाला येईपर्यंत संस्थापक, अध्यक्ष आप्पासाहेब पवार कार्यरत असत. संस्था नावारूपाला आली की लगेचच ते तरून पिढीवर संस्थेची जबाबदारी सोपवत त्यापैकीच काही संस्था खालील प्रकारे

उदा.

१. बारामती तालुका सहकारी फलोत्पादन संघ

२. बारामती तालुका कुक्कुट पालन संघ

३. बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ

- **बारामतीचा शैक्षणिक विकास**

कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कृषी विकास झाला आहे. शेतीपुरक जोडधंदे, शेतमाल प्रक्रिया उद्योग, टेक्सटाईल पार्क, दूधप्रक्रिया उद्योग, वाहन उद्योग इत्यादी सारख्या उद्योगधंदे सुरू झाले. या सर्व उद्योगासाठी कुशल मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी या शैक्षणिक संस्थानी मोलाचे सहकार्य केले आहे.

- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती, स्थापना १९६२
- कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बारामती तसेच व्यवस्थापन शास्त्र अभ्यासक्रम इत्यादी चालविले जातात.
- विद्या प्रतिष्ठान, बारामती या संस्थेची स्थापना १९७२.
- कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विद्यानगरी.
- विधी महाविद्यालय, विद्यानगरी
- अभियांत्रिकी महाविद्यालय, जैवतंत्रज्ञान व संशोधन केंद्र, विद्यानगरी
- माहिती तंत्रज्ञान, विद्यानगरी.
- व्यवस्थापन शास्त्र, विद्यानगरी
- शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विद्यानगरी.
- मराठी माध्यमिक शाळा, विद्यानगरी.
- C.B.S.E स्कूल, विद्यानगरी.
- S.S.C स्कूल, विद्यानगरी.

- प्राथमिक शाळा — इंग्रजी व मराठी माध्यम
- इत्यादी अभ्यासक्रम आहेत.
- **शिवनगर विद्या प्रसारक मंडळ**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे या हेतूने केली. ग्रामीण भागातील मुलांना स्थानिक पातळीवर तांत्रिक शिक्षण मिळावे यासाठी माळेगाव येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. या संस्थेचे कामकाज माळेगाव सहकारी साखर कारखान्यामार्फत चालते.

या शैक्षणिक संस्थांनी बारामतीच्या शैक्षणिक परिवर्तनास मदत केली आहे. म्हणून या शैक्षणिक संस्था बारामती पॅटर्नचा भाग आहेत. कविवर्य मोरोपंतांच्या नगरीमध्ये राजकिय, आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच सहकार क्षेत्रातही भरारी घेणारी बारामती सांस्कृतीक आणि क्रिडा क्षेत्रातही कार्यरत आहे.

- **नटराज्य नाटय मंडळ आणि नाटयसाधना**

१९५२ साली बारामती रंगभूमीची स्थापना बबनराव गुजर यांनी केली. त्यानंतर पुढे १९६९ साली ''नाटयसाधना'' या नावाने एक नाटयसंस्था स्थापना केली. नाटयसाधनेनंतर बऱ्याच नाटय संस्था बारामतीमध्ये कार्यरत होत्या. १९७९ साली स्थापना झाली. 'नटराज' ही नाटय संस्था आजही चालू आहे. या नाटयसंस्थेने बारामतीकरांसाठी स्वस्त नाटक योजना चालू केली आहे. अमृतमहोत्सवी ७५ वे आखिल भारतीय मराठी नाटयसंम्मेलन १९९५ साली बारामतीत याच संस्थेच्या मार्फत यशस्वीपणे संपन्न करण्यात आले.

बारामतीमधील अनेक खेळाडू आज राष्ट्रीय व आंरराष्ट्रीय पातळीवर चमकत असून बारामतीमध्ये आज राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा होत आहेत. बारामतीमध्ये १९७२ मध्ये अखील भारतीय स्तरावरील कबड्डी स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये युथ फाऊंडेशन बारामतीचा सहभागी झाला होता.

१९७२ पासून युथ फाऊंडेशन या क्लबने अनेक खेळाडू तयार केले. १९८८ साली खो—खो, २००० साली नॅशनल कबड्डी खो—खो स्पर्धाचे नियोजन

क्रीडा विकास प्रतीष्ठानच्या माध्यमातून केले. बारामतीमध्ये क्रीडा प्रेमींसाठी आंबेडकर स्टेडियम, वीर सावरकर जलतरण तलाव तसेच विविध शैक्षणिक संकुलातील क्रीडा संकूले उपलब्ध आहेत.

## ३.७ आरोग्य सुविधा

समाजाशिवाय व्यक्तीच्या जीवनात अर्थ नाही. व्यक्ती समाजातच जन्मते, समाजातच जीवन जगते व तिचा अंतही समाजतही होतो. समाजशास्त्र प्रामुख्याने प्रामुख्याने व्यक्तीच्या सामाजिक विविध पैलूंचे अध्ययन करते. व्यक्तीचे समाजातील जीवन आरोग्य संपन्न असावे. व त्याला आरोग्यपूर्ण जीवन जगता येण्याच्या दृष्टीने असे म्हणता येईल की, ज्याला आरोग्य लाभले तो आशा करू शकतो की, त्याच्याकडे सर्व काही आहे. ज्याच्याकडे आरोग्य नाही त्याच्याकडे काही नाही. निकोप प्रकृती ही कर्तव्यपूर्तीची पहिली गरज म्हणून आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून सुस्थितीत अशी ही आवस्था. बारामतीतील आरोग्य सेवेला स्वातंत्रपूर्व इतीहास आहे. बारामतीमध्ये सिल्हर ज्युबली हॉस्पीटल हे १९३५ पासून कार्यरत आहे. रूग्णालयामध्ये १९७५ पर्यंत २० कॉटची सुविधा होती. नंतर बारामतीच्या परिवर्तनाबरोबरच हॉस्पीटलचे ही परिवर्तन झाले. आकर्षक इमारत, सुसज्ज लॅब, आवश्यक स्टाप, रूग्णांसाठी १०० बेडची सोय तसेच २००६—२००७ पासून ग्रामीण रूग्णालय बारामती हे I.P.H.S खाली काम पाहत आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातही I.P.H.S अंतर्गत सुविधा मिळवून दिलेल्या आहेत. बारामती व परिसरातील सर्वांना सुपरस्पेशालीटी सुविधा कै. राजाराम तुकाराम भोईटे, आरोग्य प्रतिष्ठानचे गिरीराज हॉस्पिटल येथे उपलब्ध आहेत. वर उल्लेख केलेल्या सर्व शासकीय, सहकारी, खाजगी संस्थानी बारामतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी मोलाची साथ दिली. त्यामुळे या संस्थांचा बारामती पॅटर्नमध्ये समावेश केला आहे.

## ३.८ स्वच्छतेचा बारामती पॅटर्न

विकासाच्या बाबतीत बारामती हा एक पॅटर्न आहे. याच बारामतीत जनजागृतीचे काम फक्त आज युवकच करू शकतात याचा प्रत्यय बारामती शहरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी घडवून आणला आहे. बारामतीमधील चार महाविद्यालयामधील सातशे स्वयंसेवकांनी एकत्र येऊन बारामती शहराची स्वच्छतेसाठी जनजागृती करण्याचा एवढया मोठया प्रमाणावरील हा पहिलाच प्रयोग आहे. गेल्या चार वर्षात स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटविण्यात या राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना यश आले आहे. विद्यार्थ्यांनी उत्स्र्फुतपणे राबविलेला स्वच्छतेचा हा बारामती पॅटर्न आता इतर  शहरामध्ये सुरू करण्यात आला आहे. या युवकांनी सार्वजनिक स्वच्छता व जनजागृती अभियानाचे निमित्त साधून मन, मनगट व मेंदू यांची सांगड घालून समाजमनाची स्पंदने जाणून सर्वानाच स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आहे. समाजाची मानसिकता बदलण्याचा हा प्रयत्न होता. एखादे विधायक कार्य युवकशक्तीच चांगल्याप्रकारे करू शकते हे या अभियानात दिसून आले. बारामतीतील नागरिकांनी देखील उत्सर्फुतपणे या अभियानात सहभाग नोंदविला. बसस्थानक, भाजी मार्केट, रस्ते, स्मशानभूमी, आदि ठिकाणी स्वयंसेवकांनी हातात झाडू घेऊन स्वत: स्वच्छता केली व झाडे लावली. म्हणूनच स्वच्छतेच्या बारामती पॅटर्नची दखल पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेने घेऊन स्वयंसेकांचे कौतुक केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्या प्रतिष्ठान संस्थेतील इंग्लिश मिडियम शाळेला राष्ट्रीय स्वच्छता पुरस्कार प्राप्त झाला आहे.

केंद्र सरकारचे मनुष्यबळ विकास मंत्रालय दिल्ली, सी.बी.एस.ई यांच्या वतीने घेतलेल्या ‘शालेय स्वच्छता स्पर्धेमध्ये देशभरातून ९०५ शाळा सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेमध्ये बारामतीच्या सी.बी.एस.सी. या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने पाच श्रेणीपैकी द्वितीय क्रमांकाची श्रेणी प्राप्त केली आहे.

शाळेमध्ये वैयक्तिक, सार्वजनिक, आरोग्यविषयक सुविधा या बाबतच्या चांगल्या स्पर्धांचे उपक्रम, त्यातील सातत्य, नवीन तंत्र व संकल्पना यांचा उपयोग

असे निकष होते. पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहे, मुलींसाठीची स्वच्छतागृहे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, मुलांच्या आरोग्यविषयीच्या सवयी, नैसर्गिक उर्जास्त्रोत यांचे जतन शाळेतील हेल्थ क्लब, ग्रीन फलक, यामार्फत घेतले जाणारे पुरक असे उपक्रम त्यातील सातत्य व नाविन्य अशा अनेक बाबींची दखल घेऊन हे पारितोषिक दिले गेले या पारितोषिकामुळे पुढील वाटचालीसाठी शाळेला प्रोत्साहन मिळाले आहे.

बारामतीचा विकास हा एक पॅटर्न आहे. याची प्रचिती काटेवाडी गावच्या स्वच्छतेबद्दलच्या लघुपटास नाशिक येथील राष्ट्रीय फिल्म फेस्टीवलमध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. काटेवाडीचा लघुपट देशभर प्रदर्शित झाला. काटेवाडी ता. बारामती मधील सामाजिक बदल हा केवळ लघुपटाचा विषय नसून तो देशातील सामाजिक मानसिकतेच्या बदलाची दिशा आहे. गावातील हा बदल सामाजिक अंगाने बघण्यासारखा आहे.

एखादया फिल्म फेस्टिवलमध्ये ग्रामस्थांनी एकत्र येऊन केलेल्या स्वच्छतेच्या कार्याच्या लघुपटास प्रथम क्रमांक मिळणे हाही एक वेगळा विक्रम या लघुपटाने केला आहे. त्यामुळे लघुपटात दिसणारी काटेवाडी प्रत्यक्षात तशीच आहे हे नक्की. दिल्ली, हैद्राबाद, बंगळूर, चेन्नई या शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही हा लघुपट प्रदर्शित केला आहे हाही ‘एक स्वच्छतेचा पॅटर्न’ आहे.

## ३.९ शारदा कृषी वाहिनी

बारामतीच्या कृषी विकास प्रतिष्ठानने १९७० ते २००० या तीन दशकामध्ये कृषी विकासामध्ये अनेक आकृतीबंध घालून दिलेले आहेत. त्यामध्ये अजून एका पॅटर्नचा समावेश होतो. तो म्हणजे बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून ‘शारदा कृषी वाहिनी’ हा नव्याने सुरू झालेला उपक्रम शेतकऱ्यांच्या दृष्टीने निश्चित महत्त्वपूर्ण ठरला आहे.

हवामानातील बदलाचे प्रतिकूल परिणाम पिकावर होत आहे. त्यासाठी बदलत्या वातावरणात पिके टिकूकन राहण्याच्या दृष्टीने बी. बियांणांची निर्मिती होणे काळाची गरज बनली आहे. त्याच अनुषंगाने राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था कार्यन्वित झाली आहे. कृषी वाहिनीमुळे शेतकऱ्यांच्या बांधावर विविध पिकांना उपयोगी पडणारे आधुनिक तंत्रज्ञान पोहचले आहे. त्याचा फायदा शेतकरी वर्ग घेत आहे. बारामती कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून आजवर शिवारफेरी, मोबाईल या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. आजपर्यंत जवळजवळ पाच लाख शेतकऱ्यांनी लाभ घेतल्याची नोंद आहे. शेती, आरोग्य, व मनोजरंजनावर कार्यक्रम शारदा वाहिनीच्या माध्यमातून जवळपास २० कि.मी अंतरावरील असंख्य लोकांना ऐकायला मिळत आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पिकाविषयी जनजागृती निर्माण झाली आहे. शिवाय मोफत एस.एम.एस व शेतीशी सबंधित प्रश्नाला उत्तरे दिली जात आहे. कृषी वाहिनीची सुरूवात १८/०१/२०११ ला झाली आहे. तिला पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## ३.१० एक्झीबीशन हब

बारामती बनली आहे एक्झीबीशन हब. शिक्षण, आरोग्य व उद्योगातील पायाभूत सुविधामुळे झपाटयाने विकसित होत चाललेल्या बारामतीची नवीन ओळख निर्माण झाली आहे. राज्यभरात बारामती हे एक एक्झीबीशन हब म्हणून लौकीकास पात्र ठरत आहे. लाखोंच्यावर गर्दी हे तर बारामतीचे नित्याचे समीकरण बनले आहे. विविध प्रदर्शने भरवून बारामतीने राज्यात नावलौकिक मिळवला आहे. गेल्या दशकात बारामतीमध्ये अत्यंत वेगाने विकासाची कामे झाली आहेत. याच जोडीला शैक्षणिक, वैद्यकीय, औद्योगक क्षेत्रातील सुविधा येथे उपलब्ध झाल्याने धनिकांचा व बेरोजगारांचाही ओढा बारामतीकडे वाढला आहे.

रेल्वेची सुविधा असलेले पुण्याला जवळ असलेले एक प्रगत शहर आहे. गेल्या दीड वर्षात बारामतीने आपल्या नावाला साजेसे असे अनेक उपक्रम राबवून राज्यातील शेतकरी, व्यावसायिक, व्यापारी, शालेय विद्यार्थी व नोकरदारांची मने जिंकलेली आहेत.

आजपर्यंत राज्यात जेवढी कृषी प्रदर्शने झाली त्यातील सर्वात मोठे, भव्यदिव्य, नेटके संयोजन असलेले, पाच लाच शेतकऱ्यांनी भेट दिलेले सर्वात मोठे प्रदर्शन ठरले. संयोजनातील सुसंवाद, निटनीटकेपणा, समन्वय इत्यादी गोष्टींनीही शेतकऱ्यांना आकर्षित केले.

यानंतर विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर झालेला 'सहयाद्री ॲग्रो' चा दूध उत्पादक मेळावा ही अर्ध्या राज्यातील शेतकऱ्यांचा कुतूहलाचा विषय ठरला. तसेच बारामती कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने घेतलेली हळद उत्पादकांची कार्यशाळा यालाही चांगला प्रतिसाद मिळाला.

एन्व्हार्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या पुढाकाराने व जिल्हा परिषद व विद्या प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमानाने येथे राज्यातील सर्वात सरस जिल्हा कृषी प्रदर्शन भरविण्यात आले. जिल्हयासह आसपासच्या जिल्हयातून सुमारे अडीच लाखावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट दिली. केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांना भव्य दिव्य काहीतरी वेगळे भरीव ज्ञान देण्याच्या ध्येयाने अनेकांनी यामध्ये पुढाकार घेतला. त्यात व्यापारी, उद्योजक, सामाजिक कार्याकर्त्यांनी या प्रदर्शनास मोठे योगदान दिले. तसेच येथे नुकतेच राज्यस्तरीय मधमाशीपालन चर्चासत्र पार पडले. त्यासाठी राज्यातील व देशाच्या कानाकोपऱ्यातून मधमाशीपालन व संशोधकांनी हजेरी लावली या निमित्ताने मधमाशीपालनातील 'ॲपी एक्सो' प्रदर्शनही भरविण्यात आले आहे. बारामतीतील फोरम ऑफ इंडिया या ग्रुपने सामाजिक बांधिलकीतून विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले. राज्य स्तरीय 'खादी' कापडाचे प्रदर्शनही भरले होते. तसेच पुस्तक, प्रदर्शन, विविध वस्तूंची

प्रदर्शने, वस्त्रांची प्रदर्शने सुरू असतात. राज्यातीलच नव्हे तर देशभरातून येथे विविध संस्था येऊन प्रदर्शन आयोजित करत आहेत.

केवळ प्रदर्शन आयोजित होतात असे नाही तर त्याचा तसा भरीव फायदाही संस्थांना होत असतो. त्यातून एका अर्थाने केवळ आर्थिकदृष्टया संपन्न असलेल्या शहरातच दररोज दिसणारी प्रदर्शनांची स्थिती आता बारामतीत नित्याचीच बनली आहे. त्यामुळे बारामती हे आता राज्यातील व्यावसायिकांच्या व नामवंत संस्थांच्या नकाशावर 'एक्झीबीशन हब' म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

## ३.११ बारामतीत अत्याधुनिक मत्स्य बाजार: राज्यात पथदर्शी प्रकल्प

बारामती शहरात लवकरच केंद्रीय मत्स्य विकास महामंडळला मार्फत अत्याधुनिक मत्स्यबाजार प्रकल्प राबविला जाणार आहे. राज्यातील पथदर्शी प्रकल्प म्हणून बारामतीत राबविण्यात येणारा हा प्रकल्प लवकरच पुर्णत्वाला येत आहे.

ओल्या व सुक्या मांशांची विभागणी या नव्या प्रकल्पात केली जाणार आहे. त्याचबरोबर सध्याच्या मासळी बाजारात असलेल्या मटन मार्केटचेदेखील आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. समुद्राच्या आणि नदीच्या मासळीच्या साठवणुकीसाठी वातानुकूलीत यंत्रणा, कामगारांना आणि मासळी विक्रेत्यांना आरामगृह, मासळीच्या टाकाऊ भागाचा तसेच रक्तमिश्रीत पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी (इं.टी.पी) रक्त शुद्धीकरण यंत्रणा कार्यन्वित करण्यात येणार आहे. राज्यात नगरपालिका स्तरावर बारामती हा मत्स्य बाजार प्रकल्प राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाने यासाठी ९०% अनुदान व १०% नगरपालिकेने हिस्सा भरून हा प्रकल्प कार्यान्वि्त होत आहे.

त्यामुळे नगरपालिका स्तरावर बारामतीचा प्रकल्प पथदर्शी ठरणार आहे. यानंतर या धर्तीवर पुणे, मुंबई, नागपूर सह अन्य ठिकाणी या प्रकल्पाची निर्मिती होणार आहे.

## ३.१२ स्त्री – भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न

बारामती शहर आणि तालुक्यात स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न राबविला जात आहे. त्यानुसार आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविकांमार्फत गर्भवती महिलांवर नजर ठेवण्यात येत आहे. गर्भवती महिलांची नोंदणी आरोग्य सेविकांकडून करण्यात येत आहे. अपत्य जन्मापर्यंत संबधित महिलेची माहिती ठेवण्याच्या सूचना आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

बारामती विभागाचे डेप्युटी कलेक्टर यांच्या मार्गदर्शनाखाली 'बारामती पॅटर्न' ची अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्यानुसार गर्भवती महिलांची नोंदणी करण्यात येत आहे. नोंदणी करण्यात आलेल्या संबंधित महिलांची प्रसुती होईपर्यंत महिती ठेवण्याच्या सूचना आरोग्य सेविकांना देण्यात आल्या आहेत. संबंधित महिलेच्या अपत्याच्या संख्येपासून कौटूंबिक माहिती यात समाविष्ट केली आहे. आरोग्य अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ही माहिती संकलित केली जात आहे. याशिवाय गर्भपात करणाऱ्या अशा केंद्रावर ही आरोग्य प्रशासनाची नजर आहे.
गर्भपात व्यंग असणे, कुमारी माता गर्भवती महिलेच्या जीवाला धोका आहे. हदयविकार असणे आदि आरोग्य पाहणी करून गर्भपातास परवानगी देणेत येते. मात्र त्यासाठी दोन रेडिओलॉजिस्टचा अहवाल मागविला जातो. यामुळे स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठीचा हा पॅटर्न इतर ठिकाणासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

## ३.१३ करिअर मार्गदर्शनाचा बारामती पॅटर्न

समाजााला दिशा देण्याचे काम करिअर मार्गदर्शनद्वारे केले जाते. तरूणांना करिअर करताना ज्या गोष्टींची गरज आहे ती विनामुल्य पुरविण्याची जबाबदारी या ॲकाडमीने घेतली असून अनेक युवक युवती या ॲकडमीच्या माध्यमातून अधिकारी, बनण्याची तयारी करत आहेत. यामध्ये तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जात आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात कमालीच्या जीवघेण्या स्पर्धेला तोंड देत आपले करिअर करू पाहणाऱ्या युवक युवतींना दिशा देण्याच्या उद्देशाने

करिअर करू पाहणाऱ्या युवक युवतींना दिशा देण्याच्या उद्देशाने करिअर मार्गदर्शन सुरू करण्यात आले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग यांच्या परीक्षांची तयारी या मार्गदर्शनासाठी ही अकॅडमी सुरू करण्यात आली आहे. बारामतीमधील या करिअर मार्गदर्शनामध्ये कोणत्याही विद्यार्थ्यांनी यावे, नांव नोंदणी करावी, गरज वाटेल तेव्हा इंटरनेटचा वापर करून करिअरच्या संधीची माहिती घ्यावी. संदर्भ पाहावेत, स्पर्धा परीक्षकांसाठी असलेली पुस्तके वाचावीत. सांघिक चर्चा करावी, इ. अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. गरज ही शोधाची जननी असते. त्याप्रमाणे गरजू विद्यार्थी या करिअर मार्गंदर्शनाचा शोध घेत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली न्यूनगंडाची भावना दूर करून विना मोबदला या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले जाते. समाजमनाची नाडी ओळखून त्यांना दिशा दाखविण्याचे काम महत्त्वाचे ठरते. म्हणूनच 'करिअर मार्गदर्शनाचा बारामती पॅटर्न' हा वेगळा उपक्रम आहे. त्यामुळे युवा वर्गाला एक वेगळी दिशा मिळाली आहे.

## ३.१४ विज्ञान प्रदर्शनाचा बारामती पॅटर्न

राज्य विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्या प्रतिष्ठान व एन्व्हार्यमेंटल फोरम ऑफ इंडियाने बारामती पॅटर्न निर्माण केला आहे.

बारामतीमध्ये आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनास जवळपास तीन लाख विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी भेट दिली.

**विज्ञान प्रदर्शनाचा उद्देश:**

१. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयीची गोडी वाढावी.

२. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधून शास्त्रज्ञ तयार व्हावेत.

३. विद्यार्थ्यांमधील कल्पकतेला संधी मिळावी या उद्देशाने....

२८ जानेवारी २०१२ ते १ फेब्रुवारी २०१२ या पाच दिवसाच्या कालावधीत ३७ व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन व विज्ञान जत्रा २०१२ या

उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातून ३५४ पुरस्कारप्राप्त प्रयोग या प्रदर्शनादरम्यान सादर केले.

पर्यावरण, निसर्ग, विज्ञान घरगुती उपकरणे, रस्ते, गाडी व इतर बाबतीमुळे विद्यार्थ्यांनी तयार केलेले हे प्रयोग भारतीय विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेची साक्ष देणारेचे होते. विशेष म्हणजे सर्व विद्यार्थी राज्याच्या ग्रामीण भागातूनच आलेले होते. विद्यार्थ्यांमधील कल्पकतेला वाव देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी नेचर ऑफ फिल्म शो, पपेट शो, अंधश्रद्धतेमागील विज्ञान, छायाचित्र प्रदर्शन, एरो मॉडेलिंग, लेझर शो, जादूगाराच्या प्रयोगामागील विज्ञान, खाऊगल्ली ही अवांतर आकर्षणे होती. उत्तम नियोजनाने विद्यार्थी सुखावले होते.

३६ जिल्हयातून आलेले पुरस्कार प्राप्त विज्ञानाचे प्रयोग चांगलेच विचार करायला लावणारे होते. आत्मविश्वासाने सादरीकरण, विश्लेषण व नेटकेपणाने त्यांची कल्पनाशक्ती विचार करण्याची प्रचंड ताकद व त्यांनी प्रत्यक्षात निर्माण केलेली विज्ञानाची कृती यामुळे उपस्थितही अचंबित होत होते.

विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्तीला प्रदर्शनाच्या निमित्ताने वाव मिळाला. भारत विज्ञानाच्या क्षेत्रात निश्चितपणे अग्रेसर राहिल असा विश्वास वाटला आहे.

मुलांपर्यंत हे विज्ञान व प्रयोग पोहचविण्यासाठी बारामतीकरांनी जी धडपड केली होती ती पाच दिवसाच्या प्रदर्शनामुळे सफल झाली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या विज्ञान प्रदर्शनाला भेट व मार्गदर्शन डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. अशोक कोळस्कर, मा. कुलगुरू पुणे विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरूण निगवेकर, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. किसन लंवाडे, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यामुळे विद्यार्थी प्रभावित झाले आहे.

विज्ञानाच्या या ज्ञानयज्ञाला राजकीय इच्छाशक्तीचे पाठबळ लाभत असल्यामुळे बारामती पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्जवल राहणार यात शंका नाही.

बारामती पॅटर्न मध्ये मुख्यत्त्वे ग्रामीण भागाचा शहरी भागाप्रमाणेच विकास करणे, रोजगार प्राप्त करणे, आर्थिक स्तर उंचावणे हया दृष्टिकोनातून विचार केला आहे. एकंदरित बारामती तालुक्यातील लोकांचा सामाजिक स्तर उंचावला आहे. शेतीला पूरक व्यवसाय लोकांच्या हाताला काम, फावल्या वेळेचा सदुपयोग करून दूग्ध व्यवसाय भरभराटीस आणला आहे. लोकांना रोजगार प्राप्त झाला. शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला. शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक बदल घडून आला. अतिक्ति दूधाचा प्रश्न या प्रकल्पामुळे मिटला. शेतीला पूरक व्यवसाय मिळाला. परंतू दूधावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दूग्ध उत्पादने वितरित करणारा हा देशातला पहिलाच प्रयत्न आहे.

## ३.१५ सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये बारामती पॅटर्न व परिसराचा अभ्यास करताना बारामती परिसरातील शेतमाल प्रक्रिया उद्योग, जलसिंचनाच्या आधुनिक पद्धती, शेतीपूरक जोडधंदे, डेअरी जोडव्यवसाय, महिला सबलीकरण, फलोत्पादन, शेती विज्ञान मंडळ, तसेच स्वच्छतेचा बारामती पॅटर्न, एक्झीबीशन हब, स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी बारामती पॅटर्न, विज्ञान प्रदर्शनाचा बारामती पॅटर्न, करिअर मार्गदर्शनाचा बारामतीचा पॅटर्न, इत्यादी पॅटर्न बाबतीत सविस्तर माहिती घेतली आहे. या पॅटर्नमुळे बारामती तालुक्यात सामाजिक परिवर्तन घडून आले आहे.

✪✪✪

## संदर्भ

१. कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती जिल्हा पुणे. तीन दशकातील ग्रामीण विकास कार्याची वाटचाल (१९६० ते १९९८)

२. ठोंबरे शिवाजीराव, कृषी भगीरथ, आप्पासाहेब पवार, प्रकाशक: सन पब्लिकेशन, पुणे. ३०. २००१.

३. टिकेकर अरूण संपादन, अभय टिळक अनुवाद, स्पर्धा काळाशी..... वेध भारतातील आर्थिक व सामाजिक संक्रमणाचा....शरद पवार भाषणे: मुक्त संवाद.

४. निर्गुण नयना, कुंटे योगेश, बडे गजेंद्र संपादन, 'सकाळ' पुणे जिल्हा, विकास वाटा' फेब्रुवारी २०१०.

५. जाशी बी. आर. समाजशास्त्र (मानवशास्त्र) डायमंड पब्लिकेशन, १९९१, सदाशिव पेठ, पुणे.

६. Dictionary of Rajana Subberwal, 'A Sociology' Tata McGraw Hill Pulishing company Limited, New Delhi. (P8)

७. Google Web Jameshthornton.com The Pattern of Concept.

✪✪✪

# प्रकरण चौथे
# श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडची कार्यप्रणाली.

## ४.१ प्रास्ताविक

भारतीय शेतीतील पशुपालन हा एक प्रमुख जोडव्यवसाय आहे. प्राचीन काळापासून भारतामध्ये पशुंना संपत्ती मानले जाते. भारतामध्ये पूर्वीच्या काळी लग्नात वराला दयायचा हुंडा ही गाईंच्या रूपाने देत असत. संपत्तीची मोजदाद गोधनावरून केली जात असे. १ गोकूळ = १००० गायी असे कोष्टक होते. ज्यांच्याजवळ अधिक गोकूळ असे तो अधिक श्रीमंत मानला जाई. श्रीमंत माणसाला गोपती म्हणत. भारतामध्ये पहिली पशुगणना १९१९—२० मध्ये घेतली गेली होती. त्यानंतर दर पाच वर्षांनी पशुगणना केली जात असे. भारत पशुधनाबाबत एक समृद्ध देश आहे. जगातील सर्वाधिक पशुधन भारतात आढळते.

१९९१—९२ च्या कालावधीमध्ये महाराष्ट्रात शासकीय व सहकारी दूध उत्पादक संघाच्या दूध प्रक्रिया क्षमतेहून दूध उत्पादन जास्त झाले होते. अतिरिक्त दूधाचा प्रश्न निर्माण झाला होता. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध स्विकृतीची हमी पाहिजे होती. हा प्रश्न तत्कालीन स्वरूपाचा नसल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी यावर दिर्घकालीन उपाययोजना म्हणून दोन विभाग केले.

१) उत्पादित सर्व दूधावर प्रक्रिया होणे व त्याचे वाटप

२) अतिरिक्त दूधापासून दूध पदार्थ बनवून आर्थिक नुकसान न होता त्यांची विक्री करणे हा होता.

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली होती दूध प्रक्रिया व्यवसाय खाजगी उद्योजकांसाठी खुला केला होता.

१९९१—९२ मध्ये शासनाने दूध प्रक्रिया व्यवसाय खाजगी उद्योगासाठी खुला केल्यानंतर महाराष्ट्रामध्ये अनेक खाजगी उद्योजकांना प्रोत्साहित केले. एक लाख ते पाच लाख लिटर क्षमतेचे बरेचसे प्लांट या कालावधीत उभारले. यामध्ये श्रायबर

डायनामिक्स डेअरी हा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज व दैनंदिन १५ लाख लिटर दूध हाताळणी क्षमता असणारा, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध उत्पादने पोहचतील अशा दूध पदार्थाचे उत्पादन व आंतरराष्ट्रीय दूध पदार्थांची विक्री करणारा हा प्रकल्प आहे. आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असलेला, डायनामिक्स डेअरी प्लांट हा आधुनिक डेअरी व्यवस्थापनाचे एक प्रतीक आहे. म्हणून शरद पवार यांनी या प्रकल्पाला प्रोत्साहन दिले. कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून बारामती मध्ये परिवर्तन झाले आहे. यामध्ये कृषी क्षेत्र, उद्योगधंदे तसेच शैक्षणिक संस्थाचेही परिवर्तन झाले आहेत. डायनामिक्स डेअरी हा खाजगी प्रकल्प आहे तो प्रकल्प कृषी क्षेत्राशी निगडित आहे. कृषी क्षेत्रात बारामतीमध्ये कृषी विकास प्रतिष्ठानमुळे प्रगती झाली आहे. साखर उद्योग, द्राक्ष उद्योग, फलोत्पादन, दुग्धोत्पादन हे शेतीवर आधारित उदयोग बारामतीत आहे. या उद्योगधंदयांना लागणाऱ्या सर्व पायाभूत सुविधा चांगल्या प्रकारच्या आहे त्यामुळे बारामतीमधून साखर, द्राक्षे, डाळींब, यांची निर्यात होते. बारामती व परिसरामध्ये दूध उत्पादन भरपूर होते. त्यामुळे दूधावर प्रक्रिया करून त्याचे वितरण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर करून शेतकऱ्यांना दूध स्वीकृतीची हमी मिळाली व दूध व्यवसाय वाढीस लागला. या हेतूने शरद पवार यांनी क्षेत्रीय विकास साधण्याच्या त्यांच्या आत्मीयतेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी हा प्रकल्प बारामतीत चालू करण्यासाठी प्रोत्साहित केले.

श्रायबर डेअरी डायनामिक्स हा बारामती पॅटर्नचा भाग आहे हे शरद पवार यांनी केलेल्या व्याख्येवरून लक्षात येते. ''सर्व प्रकारच्या अडथळयांशी सामना करित प्रतिकूलतेस समोरासमोर भिडणे म्हणजे बारामती पॅटर्न'' बारामतीचे वार्षिक पर्जन्यमान अवघे ८ इंचच्या जवळपास आहे. ७०% हून अधिक क्षेत्र अवर्षणग्रस्त आहे. असे असूनही या परिसरात आज ३ साखर कारखाने उभे आहेत. इथे तयार होणाऱ्या द्राक्षांची नित्य निर्यात होते. ''ट्रॉपिकाना ज्यूस'' ची निर्मिती येथेच होते. पिझ्सा हट, मॅकडोनल्ड यासारख्या 'फास्टफूड' विक्री दुकानांच्या साखळीद्वारे विक्री केले जाणारे चीज बारामतीमध्येच तयार होते. संपूर्ण देशभरात वितरित होणाऱ्या

दूग्धजन्य पदार्थांचे उत्पादन बारामतीतच होते. सर्व प्रकारच्या अडचणी, प्रतिकूलतांचा सामना करितच हे सारे साध्य केले गेले आहे. लोकामनस यालाच कौतुकाने ''बारामती पॅटर्न'' म्हणने संबोधते.

(स्पर्धा काळाशी, शरद पवार, मुक्त संवाद, संपादन:अरूण टिकेकर, अनुवाद: अमित टिळक, पान नं. ८)

वर उल्लेखलेली दूग्धजन्य पदार्थाची उत्पादने ही श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पातच तयार होतात. त्यामुळे डायनामिक्स हा बारामती पॅटर्नचा भाग आहे.

- बारामतीमध्ये १९६७ पासून शरद पवार राजकीय नेतृत्त्व करीत आहेत. त्यांनी सहकाराला नेहमी प्रोत्साहन दिले आहे. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी शेती क्षेत्राचा विकास घडवून आणला आहे. असे असतानासुद्धा त्यांनी बारामतीमध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी चा खाजगी प्रकल्पाला प्रोत्साहन दिले आहे कारण;

याविषयीची शरद पवार मत जाणून घेताना त्यांनी म्हटले आहे एकविसाव्या शतकात आपण आहोत. विसावं शतक गेलं. विसाव्या शतकात शेवटचे दशक हे तंत्रज्ञानातील बदल विचार सारणीतील परिवर्तन यामुळे मानवजातीसाठी महत्त्वाचे ठरले. खाजगीकरण हा परवलीचा शब्द बनला होता. बाजारपेठा, स्पर्धा यांच महत्त्व वाढलं होते. लोकांना हे सर्व पटले व त्यातून खाजगी क्षेत्रातील उपक्रमशीलतेला वाव मिळाला. अर्थकारण गतीमान बनले व अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता, उत्पादकता सुधारली, आज सर्व थरातील रोजगार निर्मितीची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने उद्योगांच्या तसेच शेतीसारख्या वस्तूनिर्माण क्षेत्रांच्या उत्पादन व उत्पादकता वाढीस चालना देण्याचे अगत्याचे आहे.

(संदर्भ: स्पर्धा काळाशी, शरद पवार, मुक्तसंवाद, संपादन अरूण टिकेकर अनुवाद: अभय टिळक, पृ.क्र. ९,१०,१२)

त्याचासाठी दूधव्यवसाय वाढीस लागावा आणि आपल्या उत्पादकांनी प्रगत देशांच्या स्पर्धेत टिकून राहण्यापेक्षा त्यातही यशस्वी वाटचाल करीत पुढे जावे हे साधण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहचतील अशा दूध पदार्थाचे उत्पादन करणे, या उत्पादनांची आतरराष्ट्रीय स्तरावर आवश्यक असणारी गुणवत्ता आणि

तेथील प्रचलित विक्री  मूल्ये यांची सांगड घालणे आवश्यक असणाऱ्या व जागतिक स्तरावर गुणवत्ता असलेल्या दूध उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा डायनामिक्स डेअरी प्लांटला बारामतीमध्ये प्रोत्साहित केले.

१९९२—९४ मध्ये अतिरिक्त दूधाचा प्रश्न निर्माण झाला होता. १९९१ ला नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यामुळे जगातील बाजारपेठे खुली झाल्यामुळे भारत सरकारने दूध प्रक्रिया उद्योग खाजगी दूग्धव्यावसायिकासाठी खुले होते. १९९२ ते १९९४ या कालावधीत अतिरक्ति दूध उत्पादन झाले होते. या कालावधीत छोटया क्षमतेचे अनेक दूधप्रक्रिया उद्योग कार्यान्वीत झाल्यामुळे अतिरिक्त दूधाचा प्रश्न संपला होतो पण दूध उत्पादनामध्ये सातत्याने वाढ होत असल्यामुळे  शासकीय व सहकारी दूध प्रक्रिया उद्योगांच्या क्षमतेपेक्षा जास्त होत होते. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरीने १९९६ ला प्रकल्प कार्यान्वित केला. १९९४ ला अतिरिक्त दूधाचा प्रश्न संपलेला नव्हता तर अतिरक्ति दूध खाजगी दूधप्रक्रिया उद्योग स्वीकारत होते. १९९६ ला डायनामिक्स डेअरी सुरू झाली. त्यावेळेस ही दूध उत्पादन जास्त होत होते. १९९१ पासून दूध उत्पादनामध्ये प्रतिवर्षी वाढच होत आहे. हे उपलब्ध माहितीवरून लक्षात येते. १९९१ ते २००१ या कालावधीत महाराष्ट्रामध्ये दूध उत्पादनामध्ये सातत्याने वाढ होत आहे.

| Year | Thousands of Metric Tons |
|---|---|
| 1991-92 | 3955 |
| 1992-93 | 4102 |
| 1993-94 | 4250 |
| 1994-95 | 4812 |
| 1995-96 | 4991 |
| 1996-97 | 5127 |
| 1997-98 | 5193 |
| 1998-99 | 5609 |
| 1999-2000 | 5810 |
| 2000-2001 | 5850 |
| 2001-2002 | 6024 |

(Source: NSSO – 2001)

यावरून असे निदर्शनास येते की, १९९१—९२ महाराष्ट्रातील वर्षवार दूध उत्पादनामध्ये सातत्याने वाढ होत हाती. त्यामुळे श्रयाबर डायनामिक्स डेअरी प्लांट कार्यान्वित झाला. महाराष्ट्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादित सर्व दूध स्वीकृतीची हमी खाजगी दूध प्रक्रिया उद्योगामुळे मिळाल्यामुळे दूध उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे.

१९७० च्या अगोदर भारतामध्ये दूध उत्पादन हा व्यवसाय नव्हता: भारताला दूग्धजन्य पदार्थ आयात करावे लागत होते. दूध प्रक्रिया उद्योगासाठी पुरेसे दूध उत्पादन होत नव्हते. या सर्वावर उपाय म्हणून दूध महापूर योजना राबविण्यात आली. या योजनेला यश येऊन भारतात मोठया प्रमाणात दूध उत्पादन होऊ लागले. १९९१ च्या अगोदर दूध प्रक्रिया उद्योग हा शासकीय व सहकारी संस्थामधून चालत होते. १९६० च्या दशकामध्ये आपण दूग्धजन्य पदार्थ आयात करत होते. तेच दूग्धजन्य पदार्थ आपण आज निर्यात करत आहोत. १९९१ नंतर अनेक खाजगी दूधप्रक्रिया उदयोग सुरू झाले आहेत. खाजगी दूध प्रक्रिया उद्योग सुरू झाल्यामुळे दूध उत्पादनामध्ये वाढ होऊ लागली. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध स्विकृतीची हमी मिळाली. शेतकऱ्यांना वेळेवर पैसा उपलब्ध होऊ लागला. दूध उत्पादन वाढीसाठी नवनवीन तंत्रज्ञान येऊ लागले. त्याचा स्वीकार करून दूध उत्पादनामध्ये वाढ होत आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये (५१%) नफा बाहेर जात आहे. ज्यावेळेस महाराष्ट्रामध्ये अतिरिक्त दूधाचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळेस शेतकऱ्यांचे नुकसान होत होते श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही. उत्पादित मालाची स्वीकृतीची हमी, वेळेवर पैसे यामुळे दूध उत्पादनामध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांना आर्थिक नफा मिळू लागला आहे.

### ४.१.१ भारतातील दूग्धव्यवसाय

भारताचा दूग्ध उत्पादनाच्या बाबतीत जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातील दूग्ध उत्पादनापैकी सुमारे ८०% उत्पादन असंघटित क्षेत्रात होते. तर उर्वरित २०% पेक्षा निम्मे उत्पादन सहकारी डेअऱ्यामध्ये व खाजगी डेअरऱ्यामध्ये

होते. दूग्ध व्यवसायाचा विकास होण्यासाठी १९५८ मध्ये दूग्धविकास विभागाची स्थापना करण्यात आली. १९६० पासून ग्रामीण भागातील दूध जमा करून शहरी भागात विकण्यास सुरूवात झाली. या दूधावर प्रक्रिया करण्यासाठी १९९३ मध्ये बृहन्मुंबई दूध योजना वरळी डेअरी व १९७५ मध्ये बृहन्ममुंबई दूध योजना कुर्ला या दूग्धशाळांची स्थापना करण्यात आली.

दूधाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने (Operation Flood) दूध महापूर योजना १९७० साली सुरू केली. या अगोदर १९५०–५१ मध्ये भारताचे दूध उत्पादन हे १७.० दशलक्ष टन एवढे होते. व प्रती व्यक्ती दूधाची उपलब्धता १२४ ग्रॅम प्रतिदिन एवढी होती.

**दूध महापूर योजना**

१) १९७० – ७१ ते १९८०–८१

२) १९८१–८२ ते ८५ – ८६

३) १९८६ – ८७ ते १९९३–९४.

या तीन टप्प्यामध्ये राबविण्यात आली. या दूध महापूर योजनेनंतर दूध उत्पादनामध्ये कमालीची वाढ झाली आहे व ती आजही होत आहे. भारतातील दूध उत्पादन खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. ४.१ भारतातील दूध उत्पादन

| अ.क्र | भारतातील दूध उत्पादन व प्रतिव्यक्ती उत्पादकता | | |
|---|---|---|---|
| | वर्ष | उत्पादन (दशलक्ष टन) | प्रति व्यक्ती उपलब्धता (ग्रॅम/दिन) |
| १ | १९५० –१९५१ | १७.० | १२४ ग्रॅम / दिन |
| २ | १९९०–१९९१ | ५३.९ | १७६ ग्रॅम / दिन |
| ३ | १९९६ – १९९७ | ७४.७ | जगातील सर्वात जास्त दूध उत्पादन करणारा देश बनला होता. |
| ४ | २००९–२०१० | ११२.५ | २६८ ग्रॅम / दिन |

आधार: National Dairy Development Bord (2010) National Statistics

अशा पद्धतीने भारताच्या दूध उत्पादन वाढीमध्ये वाढ झालेली दिसून येते.

### ४.१.२ महाराष्ट्रातील दूध व्यवसाय

महाराष्ट्रामध्ये जनावरांचे गोठे हे अतिशय अस्वच्छ होते. त्यामुळे त्या गोठयांच्या परिसरात अस्वच्छता व आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झालेले होते. हे गोठे शास्त्रीय दृष्टीने पूनर्वसन करण्याच्या दृष्टीने १९५२ मध्ये आरे दूग्ध शाळा गोरेगांव मुंबई ची स्थापना करण्यात आले. त्या डेअरीमध्ये ३२ गोठे स्थापन केले. व त्यामध्ये १६,००० म्हशी स्थानांतरित करण्यात आल्या. नागरिकांना पाश्चराईज्ड दूध मिळावे यासाठी आशिया खंडातील पहिली डेअरी आरे येथे स्थापन करण्यात आली. २००९—२०१० मध्ये महाराष्ट्राचे दूग्ध उत्पादन ७७ लाख टन इतके झाले आहे. दूध उत्पादनामध्ये महाराष्ट्राचा देशात ६ वा क्रमांक आहे. महाराष्ट्र राज्याचे २००१—०२ ते २००९— १०या कालावधीतील दूग्ध उत्पादन खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. ४.२ महाराष्ट्र राज्याचे दूध उत्पादन

| अ.क्र | दूध उत्पादनाचे वर्ष | एकूण दूध उत्पादन लाख कि.ग्रॅम मध्ये |
|---|---|---|
| १ | २००१—२००२ | ६०९३१.०६ |
| २ | २००२—२००३ | ६२५१३.६२ |
| ३ | २००३—२००४ | ६३७७१.४८ |
| ४ | २००४—२००५ | ६५६६९.९३ |
| ५ | २००५—२००६ | ६७६९२.३३ |
| ६ | २००६—२००७ | ६७७७६.५६ |
| ७ | २००७—२००८ | ७२०९७.४८ |
| ८ | २००८—२००९ | ७३०१६.०९ |
| ९ | २००९—२०१० | ७६७८२.१३ |

**आधार:** महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन व सांख्यिकी विभाग, पुणे विभाग, गोखलेनगर पुणे.

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते महाराष्ट्रातील दूध उत्पादनामध्ये २००१ ते २०१० पर्यंत सातत्याने वाढ झालेली आहे.

### ४.१.३ पुणे विभाग दूध उत्पादन

महाराष्ट्रामधील पुणे विभागाचे दूध उत्पादन सन २००१ ते २००२ मध्ये २११४८.४४ लाख कि.ग्रॅ एवढे होते. व २००८—०९ मध्ये २७२९२.४५ लाख किलो ग्रॅम एवढे आहे. यावरून असे दिसून येते की, पुणे विभागाचे दूध उत्पादनामध्ये सतत वाढ होत आहे.

तक्ता क्र: ४.३ पुणे विभाग दूध उत्पादन

| वर्ष | दूध उत्पादन (लाख कि.ग्रॅ.मध्ये) |
|---|---|
| २००१—०२ | २११४८.४४ |
| २००२—०३ | २१६९५.९० |
| २००३—०४ | २२१२२.६३ |
| २००४—०५ | २३३७२.६१ |
| २००५—०६ | २४११२.६७ |
| २००६—०७ | २५१७५.७१ |
| २००७—०८ | २५७९७.६३ |
| २००८—०९ | २७२९२.४५ |
| २००९—१० | २७९६७.१७ |

आधार: महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन व सांख्यिकी विभाग पुणे विभाग गोखलेनगर पुणे.

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, महाराष्ट्रातील इतर विभागापेक्षा पुणे विभागामध्ये दूध उत्पादन जास्त होत आहे. त्यामुळे या विभागामध्ये दूधावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करणारा प्रकल्प सुरू केला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध संघ मर्यादित हा जिल्हा व तालुका स्तरावरील दूध संघाचा सर्वोच्च संघ आहे. याची स्थापना ९ जून १९६७ रोजी झाली आहे.

**उद्दिष्ट:**

जिल्हा व तालुका स्तरावरील सदस्य संघाकडून रास्त भावात दूध संकलित करून ग्राहकांना योग्य भावात उपलब्ध करून देते. अशा रितीने हा महासंघ

दूधउत्पादक आणि ग्राहक यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतो. त्या दृष्टीने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी कार्य करतो. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध संघाचे एकूण ८६ सदस्य संघ आहेत. त्यामध्ये २५ जिल्हास्तरीय, ४९ तालुकास्तरीय असून ११ मल्टी स्टेट संघ आहेत. या महासंघामार्फत महानंद ही डेअरी चालविली जाते.

**४.१.४ बारामती तालुक्यातील दूग्ध व्यवसाय:**

कृषी विकास प्रतिष्ठानने केलेल्या प्रयत्नामुळे तुटपूंजी शेती असलेल्या व मोलमजूरी करणाऱ्या सामान्य माणसांनी घेतलेल्या एक दोन गायींचे दूध तो गावातल्या डेअरीवर घालत होता. दर दहा — पंधरा वीस दिवसांनी त्याच्या हाता दूधाचे पैसे येऊ लागले. केवळ लहान शेतकरी व शेतमजूरच दूध संस्थाचा विकास होऊ लागल्याने तालुक्यातील दूध उत्पादनाला रास्त भाव मिळण्यासाठी बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ १९७७ साली स्थापन करण्यात आला.

बारामती तालुक्यात दूध उत्पादन 'व्यवसाय' म्हणून ३० नोव्हेंबर १९७० रोजी सुरू झाला. या संघाने प्रारंभीच्या दिवशी बाजारात ७० लिटर दूध पाठविले होते. त्या दूधाला ९० पैसे प्रतीलिटर असा दर मिळाला होता. तालुक्यातील दूधाचा व्यवसाय हा मोठया बागायती शेती असणाऱ्या शेतकऱ्यांच्या हातात नसून खेडयातील सामान्य माणसांच्या हातात आहे. दूग्धोत्पादन व्यवसायामुळे शेतीला सेंद्रीय खत व दूधाचे पैसे असा दुहेरी फायदा होत आहे. संकरित गाईला कालवडच व्हावी अशी प्रत्येक शेतकऱ्यांची इच्छा होती. दूग्ध व्यवसायाने बारामती तालुक्यातील लोकांच्या जीवनामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिवर्तन घडवून आणले आहे. दूध उत्पादनाचे बाबतीत बारामती तालुका आघाडीवर आहे.

बारामती तालुक्यातील दूग्धोत्पादन व्यवसायाची २००१—०२ ते २०१०—११ या कालखंडातील दूग्ध उत्पादनाविषयी माहिती खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. ४.४ बारामती तालुक्यातील वर्षवार दूध उत्पादन

| वर्ष | वर्षाचे सरासरी दूध उत्पादन लिटर्समध्ये |
|---|---|
| २००१—२००२ | ७१६३९२७९ |
| २००२—२००३ | ७००७०४४१ |
| २००३—२००४ | ६६५७४३१०४ |
| २००४—२००५ | ६४७५६९७५ |
| २००५—२००६ | ६४१३४३२० |
| २००६—२००७ | ५७२८८३०० |
| २००७—२००८ | ५३७९३८१८ |
| २००८—२००९ | ५०८२४७९१ |
| २००९—२०१० | ४८९५९८०५ |

आधार: बारामती तालुका सहकारी दूध संघ, वार्षिक अहवाल २००१ ते २०१०

बारामती तालुका सहकारी दूध संघ २६५ प्राथमिक दूध उत्पादक संघाच्या माध्यमातून दूध संकलन करीत आहे. दैनंदिन संकलनामधून दूध संघ, महानंद डेअरी (पुणे व मुंबई) व श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड बारामती यांना दूध पुरवठा करीत आहे.

- २००१ पासून बारामती तालुक्यामध्ये दूध संकलन कमी झाल्याचे दिसून येते.

१. अवर्षणाचा परिणाम

२. खाजगी दूध प्रक्रिया उदयोगामध्ये वाढ होऊन दूग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीसाठी दूधाचा वापर वाढला.

३. खाजगी दूध प्रक्रिया उद्योग आणि सहकारी/शासकीय यांच्यामध्ये दूध दर स्पर्धा वाढली यामुळे बारामती तालुक्यातील दूध उत्पादनावर परिणाम झाला आहे.

बारामती तालुक्यातील दूध उत्पादनवाढीवर परिणाम झाला असला तरी या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्याचे दूध उत्पादन वाढले आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी ही पश्चिम महाराष्ट्रातील ७ जिल्हयांमधून दूधाचे संकलन करते. त्यामुळे कंपनीला वेळोवेळी क्षमता वाढवावी लागली.

## ४.२ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड


### ४.२.१ सुरूवात:

केंद्र सरकार, राज्यसरकार व पशुसंवर्धन विभागाच्या दूध उत्पादनवाढीसाठी केलेल्या सततच्या प्रयत्नामुळे मागील ३० वर्षापासून महाराष्ट्रातील दूध उत्पादन सतत वाढत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील पुणे विभागाच्या दूध उत्पादनात सातत्याने वाढत आहे. हे वरील तक्त्यावरून दिसून येते. द्रवरूप दूधाची गरज भागवून अतिरिक्त दूधाची विल्हेवाट लावण्यासाठी दूगधजन्य पदार्थाची निर्मिती व त्याची बाजारपेठ शोधणे ही गरज ओळखून १९९२—९३ ला महाराष्ट्रात श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाची सुरूवात बारामती येथे केली.

**४.२.२ प्रकल्पाचे नांव:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड.

**स्थळ:** ता. बारामती (शहरापासून ६ कि.मी) अंतरावर एम.आय.डी.सी. मध्ये. समुद्र सपाटीपासून ६५ मीटर उंचीवर


नकाशा क्र. ४: श्रायबर डेअरी प्रकल्प स्थाननिश्चिती




नकाशा: क्र. ५ बारामती तालुका नकाशा.



फोटो क्र: १: श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्प, एम.आय.डी.सी.बारामती.



**प्रदेशाची स्वभाविक रचना:**

अ) उन्हाळयातील तापमान: ३६ ते ४०° सेल्सिअस

ब) थंडीतील कमीत कमी तापमान – ८ ते १०° सेल्सिअस

क) आर्द्रता: कमी

ड) पावसाचे प्रमाण : माफक

**जोडण्याचे मार्ग:**

१) रोड २) रेल्वे ३) हवाई

**प्रकल्पाचा विस्तार:** २५ हेक्टर जमिनीवर विस्तारलेला आहे.

**प्रकल्पाची घोषणा:** १९९२ ला करण्यात आली.

**एमएमपीओ परवाना** – १९९३ मध्ये मिळाला. mmpo

**परवाना क्रमांक:** 55/R mmpo/93.

**प्रकल्पाच्या बांधकामाला सुरूवात:** एप्रिल १९९४ मध्ये करण्यात आली.

**प्रकल्पाची चाचणी:** ऑक्टोबर १९९५ मध्ये घेण्यात आली.

**मुख्य प्रकल्प चालू झाला:** जानेवारी १९९६ मध्ये.

**यु.एच.टी. प्लाट** – १९९८ चालू झाला.

- कंपनीमध्ये मुळ गुंतवणूक २६२.०० करोड.
- कंपनीची उत्पादन क्षमता ८,००,००० लिटर प्रति दिवस.
- दररोज संकलित होणाऱ्या दूधावर प्रक्रिया करून दुग्धजन्य पदार्थ बनविणे.
- कंपनीची वेगवेगळे पदार्थ उत्पादन तयार क्षमता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | विभाग | क्षमता |
|---|---|---|
| १ | केसीन (Casein) | १० मेट्रीक टन/ प्रति दिवस |
| २ | लॅक्टोज (Lactose) | १२ मेट्रीक टन/ प्रति दिवस |
| ३ | यु.एफ. प्लॅट (U.F.Plant) | २८ K.L |
| ४ | चीज (Cheese) | ३० मेट्रीक टन/प्रति दिवस |

| | | |
|---|---|---|
| ५ | स्प्रे – ड्रायर | ३० मेट्रीक टन/प्रति दिवस |
| ६ | स्प्रे – ड्रायर | ३० मेट्रीक टन/प्रति दिवस |
| ७ | पायलट ड्रायर | १. मेट्रीक टन / प्रति दिवस |
| ८ | यु.एच.टी | १५० मेट्रीक टन/ प्रति दिवस |

**कंपनीचा पत्ता:**

**फॅक्टरी:**

E – 94, M.I.D.C, Bhigwan Road

Baramati. Dist- Pune (MH, India)

**रजिस्टर्ड ऑफिस:**

A 306/307 Dynasty Business Park.

58, Andheri – Kurla Road, Andheri (E)

Mumbai 400 059 Maharashtra – India.

**प्रमाणित:**

1) HACCP – Hazard Analysis and Critical Control Point – चे प्रमाणपत्र जानेवारी २००२ मध्ये मिळाले.
2) ISO: International Organization for Standardization.
3) FSSAI – Food Safety Standard Authority of India.
4) Obtained Export Approval in March – 2001.
5) AIB – American Institute Of Bakers
6) FSSC – 22000:2010 Food Safety System Certification.

इ. विभागाकडून कंपनीला प्रमाणीकरण पत्रे मिळाली आहेत.

**श्रायबरची ध्येय:**

१. बाजारातील तक्रारी कमी करणे.

२. पदार्थ आणि सहकारी यांच्या सुरक्षिततेसाठी वचनबद्ध

३. उत्पादनक्षमता वाढविणे.

४. कच्चा मालातील गळतीचे प्रमाण कमी करणे.

### ४.२.३ औद्योगिक स्थान निश्चिती

महाराष्ट्रात उपलब्ध असणाऱ्या अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करण्याची सुविधा शासनाकडे असल्यामुळे १९९२ ते १९९४ काळात दूध उत्पादकांच्या दूधाची आठवडयातून एक किंवा दोन वेळा स्विकृती करता येत नव्हती. त्यामुळे दूध उत्पादकांचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले होते. त्याच कालावधीत गॅट करारान्वये जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली होती. व केंद्र शासनाने दूध प्रक्रिया व्यवसाय खाजगी उद्योजकांसाठी खुला केला होता. या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्रातील दूध उत्पादन अधिक प्रमाणात वाढले पाहिजे व उत्पादित होणाऱ्या सर्व दूधास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवली पाहिजे हा दृष्टिकोन ठेवून अशी क्षमता असणाऱ्या उद्योजकांना महाराष्ट्रात डेअरी प्लान्टस उभारण्याकरिता प्रोत्साहित केले. एक लाख ते पाच लाख लिटर्स क्षमतेचे बरेचसे प्लांन्ट या कालावधीत उभारले गेले. सद्य परिस्थितीत दूध व्यवसाय वाढीला चालना आणि आपल्या उत्पादकांनी प्रगत देशांच्या स्पर्धेत नुसते टिकूनच रहावे. असे नव्हे तर त्यातही यशाची वाटचाल करीत पुढे जावे असे शरद पवार यांना वाटत होते. हे सर्व साध्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहचतील अशा दूध पदार्थांचे उत्पादन त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर असणारी गुणवत्ता आणि तेथील प्रचलित विक्री या कसोटीमध्ये पास होण्याकरिता आवश्यकता होती आधुनिक तंत्रज्ञानानी सुसज्ज अशा मोठया क्षमतेच्या डेअरीची शरद पवारामधील नेतृत्वशक्ती व दीर्घदृष्टीने श्रायबर डायनामिक्स डेअरी व्यवस्थापनाला प्रभावित करून बारामती येथे १५ लाख लिटर्स दैनंदिन दूध हाताळणी क्षमतेचा आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असा श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प उभारला आहे. यामागे राजकीय नेतृत्वाची क्षेत्रीय विकास साधण्यामागील आत्मियता दिसून येते.

### ४.२.४ मध्यवर्ती ठिकाण

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पात दररोज १५ लाख लिटर्स दूधाची आवश्यकता आहे. या दूधाची गरज भागविण्यासाठी प्रकल्प पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर या पश्चिम महाराष्ट्रातील व बीड या मराठवाडयातील जिल्हयातून दूधसंकलन करीत आहे. या सर्व जिल्हयाच्या मध्यवर्ती ठिकाणी बारामती हे आहे. दूध संकलन केंद्रापासून स्वच्छ व ताजे दूध प्रक्रिया उद्योगापर्यंत ३ ते ४ तासात पोहचेल असे बारामती हे मध्यवर्ती ठिकाण आहे. दूग्धप्रक्रिया प्रकल्पातून उत्पादित होणारे पदार्थ देशभरात पाठविण्यासाठीची वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे. तसेच उत्पादित माल विदेशात पाठविण्यासाठी आवश्यक असणारी विमान वाहतूक सेवा उपलब्ध होत आहे. मुंबई बंदर जवळ आहे. श्रायबरचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. प्रशासकीय दृष्टिकोनातून बारामती हे योग्य ठिकाण असल्यामुळे प्रकल्प बारामतीमध्ये सुरू केला आहे.

### ४.२.५ कच्चा मालाची उपलब्धता

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाची स्थापना पश्चिम महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्याच्या हेतूने केली आहे. महाराष्ट्रातील इतर विभागापेक्षा पश्चिम महाराष्ट्रातील पुणे विभागाचे दूध उत्पादन जास्त आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीची रोजची दूध हाताळणी क्षमता १५ लाख लिटर्स इतकी आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी ची रोजची कच्चा दूधाची गरज विभागातून व काही प्रमाणात बीड जिल्हयातील दूध संकलन करून पूर्ण केली जाते.

नकाशा क्र. ६: महाराष्ट्रातील दूध संकलन जिल्हे




महाराष्ट्रातील विभागवार व वार्षिक दूध उत्पादनांचा आढावा खालील टेबलावरून घेता येईल.

तक्ता क्र. ४.५ महाराष्ट्रातील विभागावर दूध उत्पादन २००१ ते २०१०

| अ. क्र | वर्ष | प्रत्येक विभागाचे वर्षवार दूध उत्पादन लाख कि.ग्रॅम मध्ये | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | लातूर |
| १ | २००१—०२ | ५३५९.३६ | १५५६२.२२ | २११४८.४४ | ५२३५.६५ | ४२५४.३२ | ३७५७.०८ | ५६१३.९९ |
| २ | २००२—०३ | ५४९१.५० | १५९४६.७३ | २१६९५.९० | ५३७२.०२ | ४३७७.६१ | ३८७५.१८ | ५७६४.६८ |
| ३ | २००३—०४ | ५६०४.९८ | १६२२६.६५ | २२१२२.६३ | ५४७०.१७ | ४४८७.५० | ४००३.१९ | ५८५६.३६ |
| ४ | २००४—०५ | ५५५६.९६ | १६८६९.४० | २३३७२.६१ | ५५७४.९१ | ४४०१.४८ | ४०१०.९५ | ५८८३.६२ |
| ५ | २००५—०६ | ५७०५.१८ | १७४४३.१२ | २४११२.६७ | ५७४७.८१ | ४५२१.११ | ४१२५.९९ | ६०३६.४५ |
| ६ | २००६—०७ | ५७३६.४१ | १८५३३.८२ | २५१७५.७१ | ५८३२.८२ | ४५११.५४ | ४१०८.८५ | ५८७८.१६ |
| ७ | २००७—०८ | ५८००.७१ | १९०४५.५४ | २५७९७.६३ | ६२९१.१८ | ४४७०.०१ | ४१७३.७३ | ६५४८.८८ |
| ८ | २००८—०९ | ५८३९.२७ | १९९४५.६९ | २७२९२.४५ | ६४२३.४५ | ४५७६.६४ | २०२.६८ | ६६६६.६६ |
| ९ | २००९—१० | ५९४६.६७ | १९९५८.९४ | २७९६७.१७ | ६७०६.८९ | ४६४३.१८ | ४४७८.२१ | ७०८१.०२ |

**आधार:** महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन व सांख्यिकी विभाग पुणे विभाग गोखलेनगर पुणे.

वरील टेबलवरून असे लक्षात येते की, महाराष्ट्रामध्ये पुणे विभागाचे दूध उत्पादन सर्वात जास्त आहे. तसेच दूध उत्पादनामध्ये सातत्याने वाढ होतना दिसत आहे. त्यामुळे बारामतीमधील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाला कच्च्या दूधाचा पुरवठा सातत्याने होत आहे.

### ४.२.६ मनुष्य बळ

बारामती तालुका हा पुणे जिल्हयातील विकसित तालुका आहे. तालुक्याचा शेतीविकास, शैक्षणिक विकास व औद्योगिक विकास चांगल्या प्रकारे झाला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीसाठी आवश्यक असणारा अधिकारी वर्ग, कामगार वर्ग, यांची भरती कंपनीच्या सेवा — शर्ती, नियम यांच्या आधारे केलेली आहे. कंपनी नोकर भरतीमध्ये स्थानिकांना प्राधान्य दिले होते. बारामती तालुका हा पूर्वीपासूनच शिक्षणाचे बाबतीत अग्रेसर आहे. तसेच पुणे हे विदयेचे माहेरघर जवळ असल्यामुळे उच्च शिक्षणासाठी पुण्याला पसंती दिली जात आहे. अभियांत्रिकी, कृषी या क्षेत्रातील अनेक पदवीधारकांना श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये नोकरी मिळाली आहे. शैक्षणिक दृष्टया बारामती तालुका प्रगत असल्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरीला प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे.

### ४.२.७ रस्ते, पाणी, वीज

बारामती तालुका हा ब्रॉडगेज रेल्वे ने जोडले आहे. बारामतीमधील साखर ही रेल्वेनेच बाहेर बाजारपेठेसाठी पाठविली जाते. तसेच बारामती शहराला अनेक राज्य महामार्गांनी जोडलेले आहे. राष्ट्रीय महामार्गही जवळच आहे. रस्ते वाहतूक चांगल्या दर्जाची आहे.

बारामती हे हवाई वाहतुकीनेही जोडलेले आहे. बारामती एम.आय.डी.सी मध्ये विमातळ उभारले आहे. बारामती एम.आय.डी.सी. साठी उजनी जलाशयावरून स्वतंत्र पाणी पुरवठा योजना राबविलेली आहे.

विजेच्या उपलब्धतेसाठी स्वतंत्रपणे वीजवितरण कंपनीचा विभाग सुरू केला आहे. तसेच श्रायबर डायनामिक्स डेअरी हा प्रक्रिया प्रकल्प असलेमुळे आपत्कालीन वीज पुरवठयाची सोय केली आहे.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने बारामतीमध्ये औद्योगिक कामगारांना राहण्यासाठी वसाहत निर्माण केली आहे. तसेच मुलांचे शिक्षणासाठीही चांगली सोय आहे. दवाखाने, बँका, पोस्ट ऑफिस, मनोरंजन केंद्रे, इ सोयी उपलब्ध करून दिलेली आहे.

कंपनी स्थापनेसाठी ज्या ज्या मुलभूत गोष्टींची गरज असते त्या सर्व पायाभूत सुविधा अतिशय चांगल्या दर्जाच्या असल्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड ने बारामती येथे प्रकल्प उभा केला आहे.

## ४.३ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड ची कार्यप्रणाली

### ४.३.१ प्रकल्पाचा हेतू:

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प बारामतीमध्ये स्थापन केला. त्याचा हेतू असा आहे की, रोज सर्वसाधारणपणे १० लाख लिटर दूधावर प्रक्रिया करून त्यापासून दर्जेदार पदार्थ तयार करून त्याचे वितरण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर करणे.

१९९२ ते १९९४ या दूध उत्पादन शासकीय सहकारी संघाच्या दूध प्रक्रिया क्षमतेहून जास्त झाले होते. महाराष्ट्रात उपलब्ध असणाऱ्या अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करण्याची सुविधा शासनाकडे नसल्यामुळे दूध उत्पादकांच्या दूधाची आठवडयातून एक किंवा दोन वेळा स्वीकृती करता येत नव्हती त्यामुळे दूध उत्पादकांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते. श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करणेची सुविधा तयार झाल्यामुळे उत्पादकांना त्यांच्या दूधाची वर्षभर स्विकृती होण्याची खात्री झाली होती. त्यामुळे दूध उत्पादकांचा फायदाच झाला होता. अतिरिक्त दूधाचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त होते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये बारामती हे मध्यवर्ती ठिकाण आहे. तसेच पायाभूत सुविधा चांगल्या होत्या. तसेच येथील राजकीय नेतृत्व शरद पवार यांची दूरदृष्टी व सक्षम उद्योजकांना प्रोत्साहित करून क्षेत्रीय विकास साधण्यातील त्यांची आत्मियता यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प बारामतीत स्थापन झाला.

**श्रायबर डायनामिक्स डेअरीची दूसऱ्या डेअरीबरोबर तुलना केली नाही. कारण;**

— अतिरिक्त दूधाचे संकलन करून त्यापासून खात्रीशीर स्वरूपाचा मोबदला देणारा मूल्यवर्धित पदार्थ बनवून (Multi Brand, Multi Product) त्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वितरण करणारा प्रकल्प आहे. त्यामुळे अशा प्रकल्पाचा अभ्यास करत असल्यामुळे दुसऱ्या प्रकल्पाशी तुलना केली नाही.

**iv)** १९९१—९२ या वर्षामध्ये महाराष्ट्रातील दूध उत्पादन शासकीय व सहकारी संघाच्या एकूण प्रक्रिया क्षमतेहून जास्त झाले होते. त्याचवेळेस दूध प्रक्रिया उद्योग खाजगी उद्योगांसाठी खुला केला. त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवार यांनी अनेक खाजगी दूधप्रक्रिया उद्योगांना महाराष्ट्रामध्ये दूध प्रक्रिया उद्योगासाठी आमंत्रित केले होते. त्यानुसार अनेक खाजगी प्लान्ट महाराष्ट्रात चालू झाले. श्रायबर डायनामिक्स डेअरी हा त्यातलाच एक प्लान्ट बारामतीत सुरू झाला.

डायनामिक्स डेअरीच्या क्षमतेएवढे दूध संकलन करण्याची यंत्रणा कार्यन्वित आहे. परंतू तेवढे दूध उपलब्ध होत नाही. कारण अनेक खाजगी दूधप्रक्रिया उद्योग दूध संकलन करित आहेत. खाजगीकरणामुळे दूधप्रक्रिया उद्योगांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे.

- **सहयाद्री अॅग्रो अॅण्ड डेअरी लिमिटेड या कंपनीचा बारामतीमध्ये कोणताही दूध प्रक्रिया उद्योग नाही.**

अनेक दूध प्रक्रिया उद्योग निर्माण झाल्यामुळे दूध कमी पडते. अशा परिस्थितीमध्ये प्रक्रिया उद्योगासाठी खात्रीशीर दूध उत्पादनाचा स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने सहयाद्री अॅग्रोची निर्मिती झाली आहे. सहयाद्री अॅग्रो स्वत: १४००० लिटर दूध उत्पादित करते व दूध संकलन केंद्रामधून ४,००,००० लिटर दूध संकलित करून डायनामिक्स डेअरीला पुरवठा करते. यामध्ये सहयाद्री अॅग्रोचा हेतु हा आहे की, जास्तीत जास्त दूध डायनामिक्स डेअरीला पुरविणे. दूध संकलनाच्या या स्पर्धेत डायनामिक्सला खात्रीशीर विश्वासाने दूध पुरवठा व्हावा या हेतूने सहयाद्री अॅग्रो लिमिटेड काम करीत आहे.

**४.३.२ स्वयं उत्पादन**

१९९५ मध्ये अनेक तालुका सहकारी दूध संस्था व खाजगी दूध संस्थानी दूग्धजन्य पदार्थ निर्मितीस सुरूवात केली. त्यामुळे अनेक डेअरीमध्ये दूध संकलनाची स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरीजचे प्रमोटर्स गोयंका ग्रुपने दूधाबाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी सहयाद्री अॅग्रो अॅण्ड डेअरी लिमिटेड या प्रकल्पाची उभारणी बारामती येथे केली. बारामती येथे ''काऊ प्रकल्प'' चालू केला. या प्रकल्पामध्ये सध्या २२०० गाई आहेत. या प्रकल्पाने दूध उत्पादन वाढीसाठी

१) हवेशीर गोठा २) गाभण गाईंची निगा ३) आरोग्याची काळजी ४) सकस आहर ५) संकरीत गाईंची पैदास इत्यादींची काळजी घेतली आहे. त्यामुळे सहयाद्री अॅग्रोचे रोजचे सरासरी दूध उत्पादन १४००० लिटर्स एवढे आहे. तसेच सहयाद्री

ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड ही कंपनी पश्चिम महाराष्ट्रातील १) पूणे २) सोलापूर ३) सातारा ४) उस्मानाबाद ५) बीड ६) अहमदनगर ७) औरंगाबाद. या सात जिल्हयामध्ये दुग्ध उत्पादकांकडून दूध संकलन करते. कंपनीने या जिल्हयामध्ये एकूण ३८० बल्क कुलर्स बसविलेले आहेत. सहयाद्री ॲग्रो ॲण्ड लिमीटेड ने २००५—२००६ पासून दूध उत्पादनास व दूध संकलनास सुरूवात केली. २००५—२००६ पासून सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमीटेडने दूध उत्पादनात केलेली प्रगती खालील सारणीत दाखवलेली आहे.

सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेडने दूध उत्पादनात केलेली प्रगती खालील सारणीत दाखवलेली आहे.

तक्ता क्र. ४.६ सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड वर्षवार सरासरी दूध संकलन

| वर्ष | सरसरी दूध उत्पादन व संकलन | |
|---|---|---|
| | प्रति दिवस (लिटर्समध्ये) | वर्षाचे सरासरी उत्पादन लिटर्समध्ये |
| २००५—०६ | ६०,००० | २,१९,००००० |
| २००६—०७ | १,५०,००० | ५,४०,००,००० |
| २००७—०८ | ३,२०,००० | ११,५२,००,००० |
| २००८—०९ | ३,७०,००० | १३,५०,५०,००० |
| २००९—१० | ३,७०,००० | १३,३२,००,००० |

आधार: सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड, कार्यालयीन माहितीवरून उपलब्ध

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, श्रायबर डायनामिक्स डेअरीने सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमीटेडच्या माध्यमातून स्वत: दूध उत्पादनामध्ये वाढ करत आहे. तसेच दूध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन, पशुवैद्यकीय सुविधा, पशु आजाराविषयी मार्गदर्शन, विनाखंड दूध संकलन, दूधाचा दर्जा व गुणवत्तेप्रमाणे पेमेंट यामुळे सहयाद्री ॲग्रो व डेअरी लिमिटेडचे उत्पादन वाढत आहे. या दूध उत्पादन वाढीमुळे दूध उत्पादक शेतकरी, बल्क कुलरचे कर्मचारी,

वाहतूक व्यवस्थेमधील कर्मचारी, टँकर मालक, सहयाद्री ॲग्रोचे फार्मवरील कामगार, गायांना चारा पुरविणारे ठेकेदार, प्रत्यक्षात उत्पादन घेणारे शेतकरी यांना शाश्वत अर्थार्जनाचे साधन उपलब्ध झाले आहे. त्यामुळे कुटुंबाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास झालेला दिसून येतो.

## ४.४ दूध संकलन

श्रायबर डायनामिक्स डेअरी लि. या प्रकल्पाचे दूध संकलनासाठी स्वत:चे असे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

''प्रकल्पाच्या मागणीप्रमाणे विविध स्त्रोतांकडून कच्चे दूध संकलित करून त्यापासून खात्रीशीर स्वरूपाचा मोबदला देणारे मुल्यवर्धित पदार्थ उत्पादित करणे.''

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प महाराष्ट्रातील सात जिल्हयामधून दूध संकलन करतो. दूध संकलनासाठी स्वत:ची यंत्रणा श्रायबर डायनामिक्स डेअरीज ने स्थापित केलेली आहे.

**दूध संकलनाचे स्त्रोत पुढीलप्रमाणे**

१. दूध शितकरण केंद्राचे जाळे.
२. सहकारी दूध संघ विभाग
३. खाजगी दूध उत्पादक संस्था (डेअरी)
४. स्वत:चे उत्पादन.

वरील स्त्रोतांद्वारे श्रायबर डायनामिक्स डेअरी दूध संकलन करते.

**१) दूध शितकरण केंद्र**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लि. या प्रकल्पाने बारामती व इतर जिल्हयामध्ये एकूण ७०० बल्क कुलर्स बसविले आहेत. एका बल्क कुलरची दूध थंड करण्याची व दूध साठविण्याची क्षमता ५०० लिटर्स ते २००० लिटर्स पर्यंत असते. तसेच विविध ठिकाणी ९ शितकरण केंद्रे स्थापन केलेली आहेत. बल्क कुलर्स ३ चौ.मी. ला एक अशा पद्धतीने तेथील दूध संकलनावर आधारित

क्षमतेचे बसविले आहेत. बारामती तालुक्यामध्ये ५५ गावामध्ये ७५ बल्क कुलर्स होते. त्याच्या माध्यमातून ७५००० लिटर्स दूध संकलीत होत होते.

**१) बल्क कुलर्सचे संकलन**

श्रायबर डायनामिक्स डेअरी एकूण ७ जिल्हयामधून दूध संकलन करते. या सात जिल्हयातील एकूण ६५०० खेडी व १ लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांना सामावून घेतले आहे. एकूण ७० मार्गावरून दूध वाहतूक केली जाते.

**२) सहकारी दूध संघ**

श्रायबर डायनामिक्स डेअरीला दूध पुरवठा करणारे महत्त्वाचे पुरवठादार महाराष्ट्र राज्य दुग्ध विकास विभाग हे आहेत. तसेच जिल्हा सहकारी दूध संघ व तालुका सहकारी दूध संघ हे श्रायबर डायनामिक्स डेअरीला दूध पुरवठा करतात.

**३) खाजगी दूध संघ**

राज्यामध्ये अनेक खाजगी दूध डेअरीज आहेत. ज्या दूध डेअरीज दूध प्रक्रिया करून दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन करीत नाहीत. अशा डेअरीज श्रायबर डायनामिक्स डेअरीला दूध पुरवठा करतात.

**४) स्वंय उत्पादन**

श्रायबर डायनामिक्स डेअरीजचे स्वत:चे दूध उत्पादन सुरू केले आहे. सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड ही कंपनी सुरू केली आहे. या फार्मच्या स्वत:च्या गाई आहेत. तसेच ही कंपनी पश्चिम महाराष्ट्रात सात जिल्हयामधून रोज सरासरी ४,००,००० लि. दूध संकलीत करून डायनामिक्सला पुरवठा करत आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेडे ने २००१—२००८ या कालावधीलत दूग्ध प्रक्रियेसाठी संकलित केलेले दूध (वर्षवार) पुढील प्रमाणे आहे.

तक्ता क्र ४.७ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडचे २००१ ते २००८ पर्यंतचे वार्षिक दूध संकलन

| अ.क्र | वर्ष | वार्षिक दूध संकलन (कोटी लिटर्समध्ये) |
|---|---|---|
| १ | २००१—०२ | २०,४०,००,००० |
| २ | २००२—०३ | २२,८६,००,००० |
| ३ | २००३—०४ | २३,४०,००,००० |
| ४ | २००४—०५ | २५,१५,००,००० |
| ५ | २००५—०६ | २६,००,००,००० |
| ६ | २००६—०७ | २३,००,००,००० |
| ७ | २००७—०८ | २६,००,००,००० |
| ८ | २००८—०९ | ३०,००,००,००० |

आधार: श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड कढून उपलब्ध माहितीनुसार

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, श्रायबर डायनामिक्स डेअरीने

१) बल्क कुलरचे माध्यमातून २) सहकारी दूध संस्था ३) खाजगी दूध संस्था

१) स्वंय उत्पादनाच्या माध्यमातून वरील दूध संकलन करून त्यावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जात आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये वरील पद्धतीने दूध संकलन करून त्यावर प्रक्रिया केली जाते.

**कंपनीची दूध साठवणूक क्षमता ही १५ लाख लिटर्स इतकी आहे. रोज ८ लाख लिटर्स क्षमतेने प्रकल्प चालत आहे.** श्रायबर डायनामिक्स डेअरीची स्थापना "Procure surplus cow milk to produce value added dairy product through superior technology process."

- (श्रायबर डायनामिक्स डेअरी कार्यालयीन दस्तऐवज)

श्रायबर डेअरी डायनामिक्स डेअरी विशेषता पश्चिम महाराष्ट्रातील ७ जिल्हयातून अतिरिक्त दूधाचे संकलन करते. जास्तीत जास्त दूध संकलित करण्याचा प्रकल्पाचा प्रयत्न करत आहे. १९९१ नंतर अनेक खाजगी प्रकल्प महाराष्ट्रात उभा राहिले आहे. त्यामुळे दूध संकलनासाठी वाढलेली स्पर्धा यामुळे प्रकल्पाला रोज १५ लाख लिटर्स दूध संकति होत नाही. जेवढे दूध संकलित होते तेवढेच दूधावर प्रकल्प सध्या सध्या कार्यरत आहे.

अतिरिक्त दूध संकलन असल्यामुळे कधी जास्त संकलन होते तर कधी कमी संकलन दूध संकलनातील या चढउतारामुळे प्रकल्पाने क्षमता वाढवून घेतली आहे. सध्या रोज ८ लाख लिटर्स क्षमतेने प्रकल्प चालतो.

## आकृती क्र. १: शितकरण केंद्रावरील दूध संकलन पद्धत

दूध उत्पादक किटली किंवा कॅनमधून दूध आणतात.
Milk Producer Brings Milk in pails. /Cans

↓

(संवेदन परीक्षण (चव, विशिष्ठचा दुर्गंधी व रंग)
Sensory evaluation (Taste, Flavour, Odour a colour

↓

दूधाची घनता व स्निग्धता, भेसळ तपासणीसाठी सॅपल घेतले जाते.
Sample with drawn fat%, a SNF% a Adultteration test

↓

असमानधानकार दूध नाकारले जाते.
Unsatisfactor Reject

समाधानकारक

↓

दूध वजन करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वजन काटयावरील कॅनमध्ये गाळून ओतले जाते.
weighing in can via electronic balance

↓

कंप्युटरवर तारखेची नोंद केली जाते.
Date entry inprocessor

↓

दूग्ध व्यवसायाकाला पावती दिली जाते.
Receipt to milk producer

↓

बल्क कुलरमध्ये दूध ओतले जाते.
Dump into bulk cooler

↓

४ अंश सेल्सिअस तापमानापर्यंत दूध थंड केले जाते.
Chilling of milk to $4^{o}$ c

↓

दूध टॅकरमध्ये भरले जाते.
Loading of milk into tanker

↓

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाकडे

**४.४.१ श्रायबर डायनामिक्स डेअरीची रोजची दूध हाताळणी क्षमता**

१) सुरूवातीस परवना — ३०००० लिटर्स प्रतीदिवस

२) ऑगस्ट १९९६ क्षमता वाढविली — ५००००० लिटर्स प्रतीदिन

३) जुलै १९९९ परत क्षमता वाढ — ८००००० लिटर्स प्रतीदिन

४) मार्च २००२ क्षमता वाढ केली — १.५ Million लिटर्स प्रतीदिन.

अशा पद्धतीने श्रायबर डायनामिक्स डेअरीने वारंवार दूध हाताळाणी क्षमतेमध्ये वाढ केलेली आहे.

**दूध उत्पादन प्रक्रिया कार्यक्रम**

**उद्दिष्टे**

१. बल्क कुलरच्या माध्यमातून स्वच्छ, ताजे, निर्जंतुक दूध योग्य किंमत देऊन संकलित करणे.

२. कमीत कमी खर्चामध्ये गोठयामधील दूध उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देणे.

अ) चांगल्या दर्जेदार कंपनीचे सिमेन वापरणे.

ब) वैज्ञानिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून दूध उत्पान वाढीवणे.

क) दूध उत्पादन वाढीसाठी होणारा जादा खर्च कमी करणे.

ड) व्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे.

**३. रोगमुक्त प्राणी**

अ) वेळच्या वेळी रोग प्रतिबंधात्मक लसी देणे. ब) वेळच्या वेळी रोग निदान करणे क) वेळच्या वेळी शेणाची तपासणी व साधन.

**४) स्वच्छ आणि सुरक्षित दूध**

अ) उत्पादित दूधाचे त्वरीत संकलन व शितकरणे केंद्राची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करणे. ब) दूधातील Aflatoxin ची जागृती करणे. क) वापरलेली उर्वरीत औषधे, किटनाशके इत्यादी नष्ट करण्याविषयी जागृती करणे.

## ४.५ दूध दर

महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे. शासनाच्या दुग्ध विकास खात्यामार्फत दूधाची खरेदी/विक्री केली जाते. उत्पादकांचा दूध खरेदी दर शासनामार्फत ठरविला जातो. महाराष्ट्र जवळजवळ सर्व प्राथमिक संकलन हे संघ अथवा खाजगी दूध उत्पादक संस्था मार्फत होते.

महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेले दूध दर हे फॅट टक्के व एस.एन.एस टक्केवर आधारीत असतात. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या दूध दरापेक्षा श्रायबर डायनामिक्स डेअरीने २४ पैसे प्रतीलिटर जादा दर दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिला आहे. मागील ३ वर्षामध्ये शासनाने दिलेला दूध खरेदी दर व श्रायबर डायनामिक्स डेअरीने दिलेला दर दूध दराचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ४.८ दूध दर तक्ता

| अ. क्र | वर्ष | फॅट (%) | एस.एन.एफ (%) | शासकीय दूध दर (रूपये) | श्रायबर डायनामिक्स डेअरी दूध दर (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००६ | ३.५ | ८.५ | ८.०० | ८.२५ |
| २ | २००७ | ३.५ | ८.५ | ९.०० | ९.२५ |
| ३ | २००८ | ३.५ | ८.५ | १०.५० | १०.७५ |

आधार: श्रायबर डायनामिक्से डेअरी लिमिटेड उपलब्ध माहितीवरून

वरील प्रमाणे श्रायबर डायनामिक्स डेअरीने शासकीय दरापेक्षा २५ पैसे जादा दिलेला आहे. असे दिसून येते. प्रकल्पाला दर्जेदार स्वच्छ व ताजे दूधाचे संकलन होण्यासाठी दूध उत्पादकांना दूधाच्या दर्जानुसार दूध दर दिला जातो.

सद्य:स्थितीमध्ये हा दूध दर दूध उत्पादकांना परवडणारा नाही. परंतु यावर उपाय म्हणून या दूधधंद्याकडे दूध उत्पादकांनी पारंपारिक दृष्टिकोनातून न बघता व्यावसायिक दृष्टीकोनातून पहावे व दूधाचे दर वाढवून मागण्यापेक्षा सद्याच्या दूध

उत्पादनाचा खर्च कमी करून दूध उत्पादन कसे वाढवता येईल व अधीकाधिक फायदा कसा होईल ते पहावे.

## ४.६ दूध वाहतूक

दूध संकलन प्रक्रियेमध्ये दूध वाहतुकिस अत्यंत मोलाचे स्थान आहे. दूधाची टिकाऊ क्षमता कमी कालावधीची असल्याने दूध संकलन केंद्रापासून दूध प्रक्रिया प्रकल्पापर्यंत जलद वाहतुक व्यवस्था ही मुलभूत गरज आहे. दूधाची प्रत चांगली राहण्यासाठी संकलन केंद्रापासून शितकरण केंद्रापर्यंत दूधाची वाहतुक जलद गतीने होणे आवश्यक आहे.

श्रायबर डेअरी डायनामिक्सकडे दूध वाहतुकीसाठी असलेले टँकर हे स्टेनलेस स्टीलचे बनवून घेतले आहेत. त्यामध्ये तीन कंपाटमेंट असतात. असे टँकरच दूध वाहतुकीसाठी वापरतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी एकूण ०७ जिल्हयामधून दूध संकलन करते. सात जिल्हयामध्ये एकुण ७०० बल्क कुलर्स आहेत. या बल्क कुलर्सचे दूध वाहतुकीसाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडकडे एकूण ९७ टँकर्स आहेत. ९७ टँकर्सना ७०० बल्क कुलर्सचे दूध संकलन करण्यासाठी ७० मार्ग करून दिले आहेत. एका मार्गावरील बल्क कुलर्सची संख्या व तेथे संकलित होणारे दूध यावर (साधारणपणे ७ ते ८ बल्क कुलर) तो मार्ग अवलंबुन असतो.

कोणत्या मार्गावरून कोणत्या टँकरने दूध संकलन करून आणायचे याचे नियोजन अगोदरच टँकर चालकाला दिलेले असते. त्यामुळे कमीत कमी वेळेत दूध प्रकल्पामध्ये पोहचते.

## ४.७ दूध प्रक्रिया व विविध उत्पादने

दूध प्रक्रिया उद्योगामध्ये दूधावरील प्रक्रीयेचे तंत्रज्ञान हे अतिशय महत्त्वाचे आहे. दूधाच्या नियमित विक्रीबरोबर दुग्धजन्य पदार्थ तयार करून ते विकले तर

त्यापासून चांगला नफा मिळतो. दूधापेक्षा दुग्धजन्य पदार्थास चांगली मागणी आहे. दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती प्रामुख्याने खालील गोष्टींवर अवलंबुन असते.

१) दूधाची उपलब्धता २) लोकांच्या सवयी ३) ग्राहकांची मागणी

४) स्थानिक परिस्थिती ५) ग्राहकांची आर्थिक स्थीती ६) उपलब्ध बाजारपेठ

या गोष्टींवर दूध प्रक्रिया उद्योग अवलंबून असतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लि. बारामती हा प्रकल्प दूधावर प्रक्रिया करून विविध प्रकारची दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती करतो. या प्रकल्पाची दूधावर प्रक्रिया करण्याची रोजची क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे.

**दूध प्रक्रिया**

दूध संकलनानंतर महत्त्वाचा भाग म्हणजे संकलीत दूधावर प्रक्रिया करणे यामध्ये

१. पाश्चरायझेशन
२. होमोजिनायझेशन
३. क्लॅरीफिकेशन
४. सेपरेशन

या प्रक्रिया केल्या जातात.

**१) पाश्चरायझेशन**: पाश्चरायझेशन प्रक्रियेमध्ये दूध व त्यातील सर्व घटक कमीत–कमी ७२ Degree अंश सेंटीग्रेड तापमानाला १५ सेकंद किंवा ६३ डिग्री अंश तापमानाला ३० मिनिटापर्यंत तापविले की ज्यामुळे हानीकारक जिवाणुंचा नाश होऊ शकतो. त्यानंतर ते दूध पाश्चरायझेशन म्हणतात.

**२) होमोजनायझेशन**: या पद्धतीमध्ये दूधावर उच्च दाब देऊन त्यातील फॅटचे एकजिवीकरणे केले जाते. त्यामुळे दूधावर मलाई येत नाही. दूधाला घट्टपणा येतो.

दूधातील स्निग्ध पदार्थांचे अत्यंत लहान रेणूमध्ये परिवर्तन करते. म्हणजेच होमोजनायझेशन.

**३) क्लॅरीफिकेशन:** या प्रक्रियेमध्ये दूधामधील अतिसूक्ष्म बाहयकण यांत्रिक पद्धतीने गाळून वेगळे केले जातात. यामध्ये कचरा, माती इत्यादी बाहेर काढले जाते. त्यामुळे दूध जास्त काळ टिकते. दूधाला जैवीकदृष्टया अत्यंत गुणवत्तेचे केले जाते.

**४) सेपरेशन:** या प्रक्रियेमध्ये दूधातील मलई सेट्रीफ्यूगळ दाबाचा वापर करून काढून घेतली जाते. यासाठी क्रिम सेपरेटचा वापर केला जातो. या प्राथमिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विविध विभागांमध्ये वेगवेगळे पदार्थ उत्पादित केले जातात.

**विविध उत्पादने:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये खालील पदार्थ उत्पादित होतात.
१) नॅचरल चिज २) प्रोसेसड् चिज ३) मोझरेल चिज ४) फ्रोझन पिझ्झाा टोपींग
५) मिक्स पावडर ६) डेअरी व्हाईटनर ७) व्हे. प्रोटीन पावडर ८) केसीन
९) दही (Dhai) १०) योगार्ट ११) बटर अॅण्ड घी १२) U.H.T

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड बारामती या प्रकल्पामध्ये प्रत्येक विभागाची उत्पादने तयार करण्याची क्षमता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | विभाग | क्षमता |
|---|---|---|
| १ | केसीन (Casein) | १० मेट्रीक टन/ प्रति दिवस |
| २ | लॅक्टोज (Lactose) | १२ मेट्रीक टन/ प्रति दिवस |
| ३ | यु.एफ. प्लॅट (U.F.Plant) | २८ K.L |
| ४ | चीज (Cheese) | ३० मेट्रीक टन/प्रति दिवस |
| ५ | स्प्रे — ड्रायर | ३० मेट्रीक टन/प्रति दिवस |
| ६ | स्प्रे — ड्रायर | ३० मेट्रीक टन/प्रति दिवस |
| ७ | पायलट ड्रायर | १. मेट्रीक टन / प्रति दिवस |
| ८ | यु.एच.टी | १५० मेट्रीक टन/ प्रति दिवस |

आधार: श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड उपलब्ध माहितीवरून

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड हा प्रकल्प Multibrand – Multi Product पदार्थांचे उत्पादन करतो. अनेक मल्टी नॅशनल कंपन्यांना उत्पादने तयार करून दिली जातात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड बारामती येथे तयार होणारी उत्पादने खालील प्रमाणे

१) ब्रिटानीया कंपनीचे – मिल्क मॅन ब्रँड २) ट्रापिकन ज्युसेस

३) नेस्ले – दूध आणि दही ४) मॅकडोनाल्ड – चीज

५) पेप्सी – मँगो स्लाईस इन टेट्रा पॅक

२) ब्रिटानिया या कंपनीसाठी मिल्क बँडचे नावाने १) बटर २) प्रोसेसड् चिज ३) टेट्रापॅक फ्लेवर्ड मिल्क ४) घी ५) डेअरी व्हाईटनर इत्यादी उत्पादने तयार होतात.

१. नेस्ले कंपनीसाठी १) योगार्ट (दही) २) **U.H.T** प्लेन–कम फ्लेवर्ड मिल्क.

२. हिंदूस्थान लिवरसाठी – लिप्टन चहाचे पॅकेजिंग येथेच होते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीची स्वत:ची उत्पादने खालील प्रमाणे

१. चिज २) बटर ३) घी ४) डेअरी व्हाईनर ५) नॉन डेअरी क्रिमर ६) स्किड् मिल्क पावडर ७) योगार्ट ८) लॅक्टोज ९) केसीन १०) व्हे प्रोटीन कॉसवट्रेट इत्यादी डायनामिक्स या ब्रॅण्ड नावाने होते.

या पदार्थाचे उत्पादनासाठी पॅकेजींगसाठी लागणारी यंत्रसामग्री अतिशय उच्चदर्जाची आहे. यंत्रसामग्रीसाठी ज्या आंतराष्ट्रीय कंपन्यांनी तांत्रिक सहकार्य केले आहे त्याची माहिती.

| अ.क्र | मशिनरी | सप्लायर |
|---|---|---|
| १ | प्रोसेसिंग ॲण्ड सिस्टम डिझाईन | व्हालीओ इंजि. लिमिटेड, फिनलॅण्ड |
| २ | पी.एल.सी. सिस्टम हार्डवेअर | सिमन्स, जर्मनी आणि इंडिया |
| ३ | पी.एल.सी. सिस्टम सॉफ्टवेअर | तुकेनहॅगन, जर्मनी ॲण्ड यु.एस.ए. |
| ४ | केसीन प्लांट इक्वीपमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी | वेस्ट फेलिया सेपरेटर्स, जर्मनी, बार ॲण्ड मर्फी यु.के |
| ५ | लॅक्टोज इक्वीपमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी | व्हे. सिस्टम, यु.एस.ए. |
| ६ | यु. फिल्ट्रेशन युनिट | मेमब्रेन सिस्टम स्पेशालिस्ट, यु.एस.ए |
| ७ | नॅचरल ॲण्ड प्रोसेड चीज इक्वीपमेंट ॲण्ड प्लांट डिझाईन | डयुरो, यु.एस.ए. ॲण्ड श्रायबर इंटरनॅशनल यु.एस.ए |
| ८ | यु.एच.टी प्लांट ॲण्ड इक्वीपमेंट ॲण्ड प्लांट डिझाईन | टेट्रा पॅक, स्विडन ॲण्ड अल्फा लाव्हल, इंडिया. |

आधार: श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड उपलब्ध माहितीवरून

## ४.८ विक्री व वितरण व्यवस्था

**अ) विक्री:** ज्यावेळी एखाद्या करारानुसार मालाच्या मालकी हक्कांचे हस्तांतर विक्रेत्याकडून खरेदीदाराकडे होते. अशा करारास मालविक्रीचा करार असे म्हणतात. मालविक्री करण्याच्या प्रमुख दोन पद्धती आहेत.

**१. प्रत्यक्ष विक्री**

कोणत्याही मध्यस्थाची मदत न घेता जेव्हा उत्पादक ग्राहकांना वस्तूची विक्री करतो तेव्हा त्या पद्धतीला प्रत्यक्ष विक्री असे म्हणतात.

**२. अप्रत्यक्ष विक्री:**

या प्रकारात उत्पादक मालाची विक्री प्रत्यक्षरित्या न करता ग्राहकांना वस्तू मध्यस्थामार्फत किंवा दलालामार्फत विकत असतो.

**ब) वितरण:**

कारखान्यामध्ये उत्पादित झालेल्या वस्तू बाजारपेठेमध्ये व ग्राहकांपर्यंत पोहचविणे आवश्यक असते. त्यासाठी जे मार्ग अवलंबिले जातात त्या मार्गांना वितरणाचे मार्ग असे म्हणतात.

**व्याख्या:** ''वस्तूंचा मालकी हक्क ग्राहकांपर्यंत किंवा औद्योगिक उपभोक्त्यापर्यंत पोहचविण्यासाठी जे माध्यम उपयोगात आणले जाते त्यालाच वितरण मार्ग असे म्हणतात.

— विल्यम जे स्टॅटन

**क) विपणन**

**व्याख्या:**

१) उत्पादकाकडून उपभोक्त्यापर्यंत वस्तु व सेवांचा प्रवास संचलित करणारी व्यावसायिक कार्ये म्हणजे विपणन होय. — (अमेरिकन मार्केटिंग असोशिएशन.)

२) विपणन ही अशी व्यवस्थापकीय प्रक्रिया आहे की, तिच्याद्वारे उत्पादित वस्तू आणि बाजार यांचा समन्वय साधला जातो. आणि त्याद्वारे ग्राहक वस्तूंचा उपयोग करण्यास किंवा समाधान प्राप्त करण्यास सक्षम बनतो.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड ही देशातील अग्रणी बहुराष्ट्रीय कंपन्यासाठी विविध उत्पादने तयार करून देते.

दूग्धजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या अनेक कंपन्या त्यांची उत्पादने श्रायबर डायनामिक्स डेअरीकडून तयार करून घेतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी ही दूग्धजन्य पदार्थ निर्यात करणारी अशिया खंडातील एक मोठी डेअरी आहे. या कंपनीमध्ये विशेषत: Multi Brand, Multi-Product चे उत्पादन घेतले जाते. श्रायबर डायनामिक्स डेअरी त्यांच्या उत्पादनांचे विपणन व वितरण पूर्ण भारत, ब्राझील, अमेरिका, दुबई या देशामध्ये करते. प्रकल्पामध्ये उत्पादित होणारी विविध उत्पादने व त्यांचे विणपण आणि वितरण करणाऱ्या कंपन्या खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | उत्पादनाचे नांव | विपनन व वितरण करणारी कंपनी |
|---|---|---|
| १ | फ्रुट ज्युसेस | पेप्सीको प्रमोटेड बाय ट्रापीकाना ब्रिव्हेरीज कंपनी |
| २ | लिप्टन टी. (लेमन ॲण्ड पिच फ्लेवर) | हिंदुस्थान लिव्हर लिमिटेड |
| ३ | १) बटर (रिटेल)<br>२) दही (फ्रेश 'एन' नॅचरल फ्लेवर)<br>३) यु.एच.टी मिल्क (टोण्ड ॲण्ड स्लिम) | नेस्ले इंडिया लिमिटेड |
| ४ | १) बटर (रिटेल)<br>२) प्रोसेसड् चिज (आडब्लूएस, चिपलेट, स्प्रेड, सिका पॅक)<br>३) घी.<br>४) डेअरी व्हाईटनर | ब्रिटानिया न्यूझीलंड फ्रुडस प्रा. लिमिटेड.<br>ब्रॅडनेम 'मिल्कमॅन' |
| ५ | बटर | पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ<br>ब्रॅड नेम 'कात्रज' |
| ६ | १) बटर<br>२) यू.एच.टी मिल्क (टोण्ड ॲण्ड डबल टोण्ड)<br>३) प्रोसेसड् चिज | मदर डेअरी फ्रुड प्रोसेसिंग लिमिटेड |
| ७ | १) बटर (टेबल फ्रेश)<br>२) श्रेडेड मोझरेला चिज | देवाश्री फूड्स प्रा. लिमिटेड.<br>ब्रॅड नेम – डी. लेक्टा |
| ८ | १) बटर<br>२) घी | फूड बझार |
| ९ | प्रोसेसड् चीज | कारगील क्वालिटी डेअरीज |
| १० | हेल्थ ड्रिंक | ब्रॅड नेम 'इर्नरझिल' |
| ११ | एस.एम.डब्लू.एम.पी | इरे फूड्स, यु.एस.ए. |
| १२ | लेक्टोज, केसीन, बटर, घी, | श्रायबर डायनामिक्स डेअरीज लिमिटेड. |

आधार: श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड उपलब्ध माहितीवरून

## ४.९ प्रशिक्षण

श्रायबर डायनामिक्स डेअरी लि. या प्रकल्पामध्ये

१. अन्न सुरक्षितता प्रशिक्षण.

२. वैयक्तिक व पर्यावरण सुरक्षितता प्रशिक्षण.

३. वैद्यकीय तपासणी – वर्षातून एकदा

या तीन घटकांचे प्रशिक्षण वर्षात एक वेळसे दिले जाते. या प्रशिक्षणामध्ये

१. अन्न सुरक्षितता म्हणजे काय? याचे सविस्तर प्रशिक्षण दिले जाते. दूध प्रक्रिया उद्योगामध्ये या गोष्टीला फार महत्त्व आहे.

HACCP – Hazard Analysis and Critical Control Point - ही प्रक्रिया अन्न सुरक्षिततची दक्षता घेणारी असल्याने आज दूग्ध व्यवसायामध्ये याची अत्यंत आवश्यकता आहे.

Hazard - हॅझार्ड म्हणजे कोणताही भौतिक रासायनिक व जीवशास्त्रीय घटक ज्यामुळे किंवा ज्यांच्या संपर्कामुळे अन्नामध्ये शरीरास अपायकारक असे रोग उत्पन्न होऊ शकतात. किंवा अन्न प्राशन केल्यास शरीरावरती विपरित परिणाम होऊ शकतात.

C.C.P – म्हणजे उत्पादन प्रक्रियेतील अशी पायरी जिथे आपणास अन्न सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून धोका आढळतो व त्याचा प्रभाव कमी करण्यासाठी किंवा त्यांचा प्रभाव पूर्णपणे नाहीसा करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्याला क्रिटीकल कंट्रोल पॉईंट असे म्हणतात.यामध्ये भौतिक रासायनिक धोके असतात.

**भौतिक धोक्यामध्ये** – सर्व साधारणपणे दूध स्विकृतीच्या वेळी दूधामध्ये आढळणारे, माती, चाऱ्याची पाने, कचरा, शेणाचे कण, इत्यादी चा समावेश होतो.

**रासायनिक धोके:**

दूध संकलन केंद्रावर यंत्र सामग्रीची स्वच्छता करताना कॉस्टीक सोडा, ॲसीड किंवा स्वच्छतेसाठी वापरली जाणारी इतर रसायने यांचा अंश यंत्रसामग्रीमध्ये राहण्याची शक्यता असते. तसेच शेतामध्ये वापरली जाणारी

किटकनाशके, तणनाशके यांचाही अंश जनावरांच्या चाऱ्यावर राहू शकतो. हे दूधामध्ये जाऊ नये याची काळजी घेणे महत्त्वाचे असते.

**जीवशास्त्रीय धोके:**

यामध्ये सर्व सुक्ष्मजीवांचा समावेश होतो. दूध व दूग्धजन्य पदार्थांच्या दृष्टिकोनातून हा फार मोठा धोका असून तो संपूर्णपणे नष्ट करणे हा अन्न सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

उत्पादन प्रक्रियेतील सर्व अधिकारी व कामगार यांना उपरोक्त धोके कसे रोखावयाचे याचे प्रशिक्षण दिले जाते.

**आरोग्य तपासणी:**

दूध प्रक्रिया उद्योगामध्ये अधिकारी व कामगार यांची वैयक्तिक स्वच्छता असणे फार महत्त्वाचे असते. यासाठी प्रकल्पाने काही मर्यादा आखून दिलेल्या आहेत. त्यामध्ये कंपनीने ड्रेसकोड दिलेले आहेत. कंपनीमध्ये ॲप्रन वापरणे बंधनकारक आहे. मोबाईलवर निर्बंध, शूज वापरावर निर्बंध, व्यसनावर निर्बंध आहेत.

प्रत्येक कामगाराची आरोग्य तपासणी बंधनकारक आहे. प्रत्येक कामगारांची नोकरीत आलेपासूनची आरोग्य तपासणीची माहिती संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडे उपलब्ध असते. त्यामुळे त्या कामगाराला नवीन आजाराविषयी माहिती लपविता येत नाही.

संबंधित वैद्यकीय अधिकारी कंपनी व्यवस्थापनाला प्रत्येक कामगाराच्या आरोग्यविषयीचा अहवाल देत असतात, त्यानुसार कंपनी त्या कामगाराला सूचना देऊन सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

## ४.१० श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड ला 'गोल्ड मानांकन'

- **अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ बेकर्स (एआयबी) संस्थेकडून मूल्यांकनः**

बारामती येथील एम.आय.डी.सी तील श्रायबर डायनामिक्स डेअरीला अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ बेकर्स (एआयबी) या संस्थेच्या अन्नपदार्थ सुरक्षा व गुणवत्ता प्रणालीच्या मूल्यांकनामध्ये सर्वोत्कृष्ट समजले जाणारे गोल्ड मानांकन प्राप्त झाले आहे. कंपनीच्या दृष्टीने ही अभिमानस्पद बाब असून सर्वांच्या सामूहिक प्रयत्नामुळेच हे यश कंपनी संपादन करू शकली. अशी माहिती प्रकल्पाचे प्रमुख विनीत शहा यांनी दिली.

जगभरातील अन्नपदार्थ बनविणाऱ्या कंपन्यांचे अन्नपदार्थ व गुणवत्ता प्रणालीचे मूल्यमापन करण्याचे काम (एआयबी) करते. गेल्या चार वर्षापासून पेप्सीको ही नामांकित कंपनी अफ्रिका मध्ये पूर्वेकडील देश व अशियाई देश या आंतरराष्ट्रीय विभागात पेप्सीकोसाठी उत्पादन करणाऱ्या कंपन्यांचे मूल्यांकन करीत आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीचेही मूल्यांकन पेप्सिकोसाठी एआयबी ने केले होते. २०१० ला पूर्वनियोजित नामांकन मिळाले होते. २०११ ला तपासणीची पद्धत बदलून पूर्वसूचनाशिवाय मूल्यांकन करण्याची पद्धत ए.आय.बी ने लागू केली आहे.

या बारामतीच्या प्रकल्पामध्ये कॅनडातील तज्ज्ञ परीक्षकांनी २६ ते ३० नोव्हेंबर २०११ दरम्यान विविध विभागांची कोणतीही पूर्व सूचना न देता तपासणी केली. त्या तपासणीनतर सर्वोत्कृष्ट समजले जाणारे गोल्ड स्वरूपाचे मानांकन या तज्ज्ञांनी कंपनीस बहाल केले आहे. डायनामिक्स ने अवलंबिलेल्या चांगल्या उत्पादन सवयी, गुणवत्तेविषयी कमालीची जागरूकता, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या गरजेनुसार संकलन केला जाणारा कच्चा माल व ग्राहकाला सुरक्षित अन्नपदार्थ मिळण्याची खात्री संपूर्ण कंपनी परिसरात राखण्यात येणारी कमालीची स्वच्छता यामुळे कंपनीला हे यश मिळाल्याचे विनीत शहा यांनी सांगितले.

**श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाची प्रगती.**

१. २०१० ला सिल्व्हर मानांकन (अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ बेकर्स) आंतरराष्ट्रीय पातळीवरील अन्नपदार्थ व सुरक्षा व गुणवत्ता प्रणाली मूल्यमापन.

२. २०११ ला पूर्व सूचनेशिवाय मूल्यांकन करून गोल्ड मानांकन मिळाले. आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट समजले जाणारे मानांकन प्राप्त केले.

१. सामूहिक प्रयत्न.
२. अन्नपदार्थाची सुरक्षा
३. अन्नपदार्थाची गुणवत्ता
४. चांगल्या उत्पादन सवयी
५. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या गरजेनुसार संकलन केला जाणारा कच्चा माल व ग्राहकाला सुरक्षित अन्नपदार्थ मिळण्याची खात्री.
६. संपूर्ण कंपनी परिसरात राबविण्यात येणारी कमालीची स्वच्छता यामुळे प्रकल्पाला यशस्वी वाटचाल करता आली.

- **अल्प कालावधीत डायनामिक्सने बारामतीमध्ये बदल घडवून आणला आहे.**

— डायनामिक्समुळे दूध स्वीकारण्याची हमी मिळाली. दूध उत्पादनात वाढ होऊ लागली. दूग्ध व्यवसाय हा जोड व्यवसाय होतो तो मुख्य व्यवसाय बनला. चारा उत्पादन हा एक व्यवसाय बनला. दूध वाहतुकीसाठी लागणाऱ्या कॅन्सचा व्यवसाय वाढला. दूध वाहतुकीसाठीची वाहने वाढली. पशुखादय पुरविणाऱ्या एजन्सीज आल्या. डायनामिक्समुळे टँकरचे उत्पादन करणारे कारखाने सुरू झाले. हॉटेल व्यवसाय वाढले. असे नवीन व्यवसाय सुरू झाले. हे बदल डायनामिक्स मुळे झाले आहे. बारामतीच्या परिवर्तनास डायनामिक्स डेअरीमुळे मोठया प्रमाणात बदल झाला आहे.

## सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करताना महाराष्ट्रामध्ये १९९१ ते १९९३ या कालावधीमध्ये अतिरिक्त दूध उत्पादन होत होते. अतिरिक्त दूध उत्पादनावर प्रक्रिया कोणतीही यंत्रणा शासकीय दूध डेअऱ्यामध्ये उपलब्ध नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दूधाची स्वीकृती आवठवडयातून एक दोन वेळेला होत नव्हती. पर्यायाने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत होते. त्याच कालावधीमध्ये गॅट करारामुळे दूग्ध व्यवसाय हा खाजगी प्रक्रिया उद्योगासाठी खुला केला. त्यामुळे अनेक दूग्ध प्रक्रिया उद्योग महाराष्ट्रामध्ये सुरू झाले. परंतु स्थानिक राजकीय नेतृत्वाच्या दूरदृष्टीकोनातून बारामती येथे महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थाची निम्रिती करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दूग्धपदार्थाचे वितरण करणारा भारतातील पहिलाच प्रकल्प बारामतीमध्ये कार्यान्वित झाला आहे. या प्रकल्पाची रोजची दूध हातळणी क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न कायमचा सुटला आहे. त्यामुळे दूध उत्पादकांचा दूध स्वीकृतीचा प्रश्न सुटल्यामुळे दूग्ध विकास वाढीस लागला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प बारामतीमध्ये उभा राहिल्यामुळे बारामतीला जागतिक पातळीवर औद्योगिक महत्त्व प्राप्त झाले आहे

✪✪✪

## संदर्भ

1. Chattergi A.K. Dairy of Industry In India, Rekha Publicaiton, Delhi 1987.
2. Eekles C.H. Milk & Milk Products, Tat McGrill Publication, Bombay 1990.

१. गवळी अरूण (२००१) संशोधन पद्धतीशीस्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

२. रसाळे उद्धव, दूग्धव्यवसाय यशाची गुरूकिल्ली, राजेश प्रकाशन, गिरीजा सोसायटी, एम.आय. टी. रोड पुणे.

३. दूग्धजन्य पदार्थ निर्मिती तंत्रज्ञान, लेखन व संपादन: काटोले रविंद्र, गोडवा प्रकाशन, पुणे २००८.

४. कृषी विकास प्रतिष्ठान, बारमती जि. पुणे. तीन दशकातील ग्रामीण विकास कार्याची वाटचाल (१९६८ ते १९९८)

५. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मधील उपलब्ध दस्तऐवज. २००७—०८.

६. बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित बारामती. वार्षिक अहवाल २०००—२००१ ते २००७—०८.

७. सहयाद्री ॲग्रो ॲण्ड डेअरी लिमिटेड, बारामती. कार्यालयीन दस्ताऐवज.

८. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पुणे सांख्यिकी कार्यालय, पुणे.

✪✪✪

# प्रकरण पाचवे
# तथ्य संकलन व विश्लेषण

## ५.१ प्रास्ताविक

बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून सामाजिक परिस्थितीत होणाऱ्या परिवर्तनाचा अभ्यास मानवाचे सामाजिक, संबंध, सामाजिक वर्तन आणि सामाजिक प्रश्न यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**उद्दिष्ट क्र. ३: अधिकारी वर्गाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास**

### ५.१.१ आर्थिक वर्गीकरण

आर्थिक परिस्थितीवर कोणत्याही व्यक्तीचा राहणीमानाचा दर्जा अवलंबून असतो. कुटूंबातील वातावरणाचा व त्यांच्या सवयींचा परिणाम हा व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वावर होत असतो. बदलत्या परिस्थितीत वाढती महागाई ही महागाई सतत चढत्या क्रमानेच होत असते. हे भाववाढीचे सुत्र लक्षात घेऊनच कामगारांचे वेतन निश्चित करणे महत्त्वाचे असते.

जी व्यक्ती श्रम करून मालकाला नफा मिळवून देते. त्याला रास्त वेतन देणे मालकाचे नैतिक कर्तव्य आहे. शासकीय आस्थापनामध्ये काम करणाऱ्यांचे वेतन हे वेतन आयोग ठरवते. वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासन वेतन लागू करते. परंतू खाजगी औद्योगिक कंपन्यामध्ये वेतन करार हे त्या त्या कंपनी व्यवस्थापन व कामगार संघटनामध्ये होत असतात. सदर वेतन करार हे कंपनी व्यवस्थापन व कामगार संघटनांनी ठरविलेल्या कालावधीपर्यंत असतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पातील अधिकारी वर्गाचे वेतन, वर्गीकरण पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ५.१ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी वर्गाच्या वेतनसंबंधी माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | वेतन दरमहा (हजारात) | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | २०,००० ते ३०,०००/— | १२ | २४% |
| २ | ३०,००१ ते ४०,०००/— | ०५ | १०% |
| ३ | ४०,००१ ते ५०,००० | २१ | ४२% |
| ४ | ५०,००१ ते पुढे | १२ | २४% |
| | एकूण | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये;**

१. रू २५०००/— सरासरी वेतन असणारे १२ अधिकारी आहेत. ते असोसिएट पदावर कार्यरत आहेत. त्यांचे प्रामण (२४%) आहे.

२. रू ३७०००/— सरासरी वेतन असणारे ०५ अधिकारी आहेत ते सिनिअर असोसिएट या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे प्रमाण (१०%) आहे.

३. रू ४००००/— सरासरी वेतन असणारे २१ अधिकारी आहेत. ते टिम अॅडव्हायझर या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे प्रमाण (४२%) आहे.

४. रू ७००००/— सरासरी वेतन घेणारे १२ अधिकारी आहेत हे अधिकारी विभाग प्रमुख आहेत त्यांचे प्रमाण (२४%) आहे.

### ५.१.२ निवास

कामगार गृह योजना ही कामगारांची निवासाची गरज भागविण्यासाठी पूर्ण केलेली योजना आहे. औद्योगिक क्रांतीमुळे सरंजामशाही अर्थव्यवस्था बदलत गेली. तिची जागा कारखानदारीने घेतली आहे. सुरूवातीच्या काळात कामगारांची स्थिती खूपच हालाखीची होती, त्यामुळे कामगारांचे दैनंदिन जीवनमान साधारण होते. त्यामुळे कामगारांसाठी औद्योगिक वसाहतीची निर्मिती केली. कामगार वसाहत व

कंपनी अशा एक समूह आहे की, ज्यांची निर्मिती एका विशिष्ट जागेवर केली आहे. जेथे पाण्याची सोय, घरापासूनच जवळ रेल्वे, बस, पोस्ट, दवाखाना, शाळा, मुलांना खेळण्यासाठी जागा अशा किमान सोयी असतात. अशा ठिकाणी कामगार कुटूंबियासोबत एकाच प्रकारच्या घरामध्ये राहतात. काही कर्मचारी स्वत:चे निवासस्थान घेतात. अशा कामगारांसाठी व्यवस्थापनाकडून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यातूनच काही कर्मचारी कायमस्वरूपी निवासव्यवस्था करतात.

कंपनीतील अधिकारी व कामगारांना परस्परांच्या जवळ राहता आले तर त्यांच्यामध्ये एकमेकांबद्दल आपुलकीची भावना निर्माण होते. सर्वांचीच घरे सारखी असल्यामुळे द्वेष भावना निर्माण होत नाही व समानतेची भावना निर्माण होते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाने अधिकाऱ्यांना निवासव्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. या निवास व्यवस्थेचा किती अधिकारी उपयोग करतात ते खालील तक्त्यावरून निदर्शनास येते.

**तक्ता क्र. ५.२ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधी अधिकारी वर्गाचा निवास व्यवस्था दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र | निवास व्यवस्था प्रकार | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कंपनीच्या निवास व्यवस्थेत राहणारे | १२ | २४% |
| २ | स्वत:चे मालकीचे निवासात राहणारे | ३८ | ७६% |
| ३ | भाडेतत्त्वावरील निवासात राहणारे | ०० | ००% |
| | एकूण | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी;**

१. १२ अधिकारी कंपनीचया निवासव्यवस्थेचा लाभ घेतात. डेअरी डायनामिक्स प्रकल्पाने आपल्या अधिकाऱ्यासाठी सुसज्ज अशी निवासस्थाने बांधली आहेत. शाळा, हॉस्पिटल, मार्केट इत्यादीजवळ आहे. त्यामुळे या निवासस्थानामध्ये राहणाऱ्या अधिकाऱ्यांचे शेकडा प्रमाण २४% आहे.

२. ३८ अधिकारी हे स्वत:च्या मालकीच्या निवासस्थानी राहतात. हे अधिकारी बारामती परिसरातील आहेत. त्यामुळे स्वत:चे निवासस्थानी राहतात त्यांचे शेकडा प्रमाण ७६% आहे.

### ५.१.३ वैद्यकीय सुविधा

कामगार कल्याणाचा विचार करता कर्मचाऱ्यांसाठी घरे, आरोग्य, संरक्षण आदींची आवश्यकता असते. कंपनीमध्ये काम करत असताना काही वेळेस अनावधानाने अपघात घडतात. तर काही तांत्रिक बिघाडाने अपघात होतात. अशा वेळेस कंपनीमध्ये तातडीची वैद्यकीय सेवा असणे गरजेचे आहे. त्यासाठी कंपनीमध्ये डॉक्टर व ॲम्ब्युलन्सची सोय केलेली आहे. कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा व उपचार वेळेत मिळणे फार महत्त्वाचे असते. तपासणी शिबीरे, योगा यासारख्या शिबीरांचे आयोजन केले जाते. काही वेळेस कौटुंबिक समस्याही अपघातास कारणीभूत ठरतात. प्रत्येक कंपनी ही आपल्या कर्मचाऱ्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देत असते. सर्वच अधिकारी कंपनीच्या वैद्यकीय सुविधांचा लाभ घेत नाहीत. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी कोणत्या प्रकारच्या वैद्यकीय सुविधेचा उपयोग करतात ते खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र ५.३ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील वैद्यकीय सुविधांचा लाभ घेणाऱ्या अधिकारी वर्गाची माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | वैद्यकीय सुविधा | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कंपनी पुरस्कृत वैद्यकीय सेवा | ४२ | ८४% |
| २ | खाजगी वैद्यकीय सेवा | ०४ | ०८% |
| ३ | सरकारी वैद्यकीय सेवा | ०४ | ०८% |
| | एकूण | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यापैकी;**

१. ४२ अधिकारी हे कंपनी पुरस्कृत वैद्यकीय सेवेंचा लाभ घेतात या अधिकाऱ्यांचा वेळ वाचतो. तसेच आर्थिक बचत ही होते. अशा अधिकाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८४% आहे.

२. ०४ अधिकारी खाजगी वैद्यकीय सेवा घेतात त्यांचे शेकडा प्रमाण ८% आहे.

३. शासकीय वैद्यकीय सेवेचा लाभ घेणारे ०४ अधिकारी आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ८% आहे.

### ५.१.४ विमा

विम्यामधील आर्थिक गुंतवणूक ही दिर्घकालीन गुंतवणूक आहे. विम्यामध्ये अनेक प्रकार आहेत. काही विमा पॉलिसी या दिर्घकालीन चालणाऱ्या आहेत तर काही अल्प काळामध्ये परतावा देणाऱ्या आहेत. व्यक्ती स्वतःच्या कुवतीनुसार विमा संरक्षण घेते. विम्यामधील गुंतवणूक ही आकस्मित प्रसंगी उपयोगी पडते. उतारवयातील तरतूद म्हणूनही विम्याकडे पाहिले जाते. मुलांच्या शिक्षणासाठी विवाहासाठी, घर बांधणी यासाठी विमा उपयोगी पडतो. कामगारांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी विमा फार गरजेचा आहे. कामगारांचे आरोग्य व जीवनमान उंचावण्यासाठी विमा महत्त्वाचा आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील किती अधिकारी वर्गाने विमा घेतला आहे. याचा आढावा घेतला आहे.

**तक्ता.क्र ५.४ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी वर्ग विम्याद्वारे बचत करतात कि नाही याची माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | विमा | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विम्याद्वारे बचत करणारे | ४८ | ९६% |
| २ | विम्याद्वारे बचत न करणारे | ०२ | ०४% |
| | एकूण | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी;**

१. ४८ अधिकाऱ्यांनी विमा पॉलिसी घेतली आहे. विम्यामुळे आर्थिक बचत, आयकरातून सूट, भविष्यासाठी आर्थिक तरतूद इ. अनेक फायदे असल्यामुळे ९६% अधिकाऱ्यांनी पॉलिसी घेतली आहे.

२. २ अधिकाऱ्यांनी विमा पॉलिसी घेतली नाही त्यांचे प्रमाण ४% आहे.

### ५.१.५ वाहतूक

प्रवासाचा परिणाम हा अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर कळत न कळत नक्कीच होत असतो. कोणत्याही कंपनीला आपल्या कर्मचारी वर्गाचा संरक्षणाचा विचार करावा लागतो. कारण कंपनीची उत्पादकता ही अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. अधिकाऱ्यांचा जास्तीत जास्त वेळ हा प्रवासात गेल्यास त्याचा त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम दिसून येत असतो. प्रवासाचा थकवा, कंटाळा येतो. सार्वजनिक वाहने कार्यालयात येण्यास कधी कधी उशिर होतो.

त्यामुळे कंपनीने कर्मचाऱ्यासाठी कंपनीची गाडी उपलब्ध करून दिली आहे. कमी खर्चात वाहतुकव्यवस्था सर्वांसाठी महत्त्वाची आहे. साहजिकच त्यामुळे कामगार व अधिकारी यांनी जर एकत्र प्रवास केल्याने विचारांची देवाण—घेवाण होते. आपुलकी, प्रेम, जिव्हाळा निर्माण होतो. तसेच सार्वजनिक इंधनाची बचत होते. प्रत्येकाचा वेळ वाचतो. वेळेवर कामावर जाता येते. मानसिक ताण निर्माण होत नाही. सहजीवन प्रवास व्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. एकंदरित सार्वजनिक वाहतुकीवर येणारा ताण कमी होतो. घाईगडबडीत वाहन चालविल्याने होणारे संभाव्य अपघात टाळता येतात. वैयक्तिक वाहनांचा वापर कमी झाल्याने प्रदूषण कमी होते. पैशाचीही बचत होते. म्हणूनच कंपनीच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांची वाहतूक व्यवस्था करणे हितावह आहे. डायनामिक्स डेअरी लिमिटेड या कंपनीने अधिकारी वर्गासाठी असणाऱ्या वाहन व्यवस्थेचा कसा फायदा होतो याचे अध्ययन केले आहे.

तक्ता क्र. ५.५ वाहतूक व्यवस्था

| अ.क्र | वाहतुक व्यवस्थेची साधने | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कंपनीची वाहतुक व्यवस्था | ३२ | ६४% |
| २ | स्वत:चे वाहन | १३ | २६% |
| ३ | सार्वजनिक वाहन | ०२ | ०४% |
| ४ | वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र कंपनीचे वाहन | ०३ | ०६% |
| | एकूण | ५० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील ५० अधिकाऱ्यांपैकी ३२ अधिकारी हे कपंनीच्या वाहन व्यवस्थेचा फायदा घेतात. त्यांचे प्रमाण (६४%) आहे. १३ अधिकारी हे कंपनीत जाण्यासाठी स्वत:चे वाहनाचा उपयोग करतात त्यांचे प्रमाण (२६%) आहे. सार्वजनिक वाहनाचा वापर फक्त २ अधिकारी करतात. त्यांचे प्रमाण (०४%) आहे. ०३ अधिकारी हे कंपनीच्या स्वतंत्र वाहनाने कंपनीत येतात त्यांचे प्रमाण (०६%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील ५० अधिकाऱ्यांपैकी ३२ अधिकारी हे कंपनीने सर्वांसाठी केलेल्या वाहतुक सुविधेचा येण्याजाण्यासाठी वापर करतात. वेळेवर कामावर पोहचता यावे घरी वेळेवर जाता यावे. सुरक्षितता व इंधन बचत, पर्यावरण, पैशाची बचत तसेच एकत्रित प्रवासामुळे सहसंबंध प्रस्थापित होतात. चर्चा करता येते. अनुभवांचे आदान—प्रदान होते व इतर कारणासाठी ३२ अधिकारी कंपनीच्या वाहतुक सुविधेचा लाभ घेतात व कमी खर्चात वाहतुक व्यवस्था मिळते.

२) स्वत:चे वाहन वापरणारे १३ अधिकारी आहे. याचे कारण त्यांना कामावर लवकर यावे लागते. तसेच जास्त वेळ थांबावे लागते. त्यांना कपंनीकडून प्रवास भत्ता मिळतो.

३) सार्वजनिक वाहनांचा वापर फक्त २ अधिकारी करतात. कारण हे जिथे राहतात त्या ठिकाणी व त्या बस मार्गावर इतर अधिकारी राहत नाहीत. व सार्वजनिक वाहतुक व्यवस्था वेळेवर उपलब्ध असल्याने २ अधिकारी सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा उपयोग करतात.

४) प्रकल्पामधील ३ अधिकारी हे कंपनीने उपलब्ध करून दिलेल्या स्वतंत्र वाहनाचा उपयोग करतात. कारण हे तीनही अधिकारी वरिष्ठ दर्जाचे आहेत. प्रकल्पासंबंधी सर्व निर्णय या अधिकाऱ्यांना घ्यावे लागतात. कंपनीच्या कामानिमित्त सतत बाहेतर ये जा करावी लागते. जास्त वेळ थांबणे, लवकर येणे, यासाठी कंपनीने स्वतंत्र वाहन उपलब्ध करून दिले आहे. वाहतुक व्यवस्थेचा परिणाम कार्यक्षमतेवर होत असतो. त्यामुळे कंपनीने वाहतुक व्यवस्था चांगल्या दर्जाची पुरविलेले आहे. साहजिक या उत्कृष्ट वाहतुक व्यवस्थेचा परिणाम उत्पादनवाढीसाठी होतो आहे.

**५.१.६ बोनस**

१९६५ साली कंपनी बोनस कायदा संमत करण्यात आला. १९६५ च्या अगोदर कर्मचारी वर्गांना बोनस देणे. कंपनी व्यवस्थापनावर बंधनकारक नव्हते. त्यामुळे काही कंपन्यात बोनस दिला जात तर काही कंपन्यात फारच कमी बोनस देत होते. काही कंपन्यात बोनस दिलाच जात नव्हता. त्यामुळे कर्मचारी वर्गात असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे कर्मचारी संप पुकारत होते.

कंपनीला नफा होत असेल तर त्या नफ्यातील वाटा कर्मचाऱ्यांना मिळाला पाहिजे. कारण त्या नफ्यामध्ये कर्मचारी वर्गाचा वाटा असतो. कामगारांनी प्रामाणिकपणे कंपनीसाठी काम केलेले असते. त्यामुळे कंपनीला नफा मिळतो. त्या नफ्यावरील वाटा कर्मचाऱ्यांना वाटला तर कंपनीबद्दल आदर भावना निर्माण होतात. कंपनीसाठी कामगार एक अविभाज्य भाग बनून काम करतात. त्यामुळे कंपनी

उत्पादनात चांगली वाढ होते. त्यामुळे कंपन्या कर्मचारी वर्गाला बोनस देतात. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकाऱ्यांना बोनस मिळतो की नाही याचा अभ्यास केला आहे.

**तक्ता क्र. ५.६ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील बोनस लाभधारकांची स्थिती**

| अ.क्र | बोनस | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बोनस मिळतो | ५० | १००% |
| २ | बोनस मिळत नाही | ०० | ००% |
| | एकूण | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी;** ५० अधिकाऱ्यांना बोनस मिळतो. कंपनी उत्पादनामध्ये वाढ केल्यामुळे बोनस मिळतो. बोनसमुळे कार्यक्षमतेत वाढ होते. अधिकारी व व्यवस्थापनामध्ये सलोख्याचे संबंध निर्माण होतात. बोनसचा लाभ घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे शेकडा प्रमाण १००% आहे

## ५.२ शिक्षण

प्रत्येक राष्ट्राचे सामर्थ्य हे शिक्षणातच सामावलेले असते. ते समाजविकासाचे एक साधन आहे. त्यात समाजकल्याण सामावलेले आहे. शिक्षणामुळेच देशाची सर्वांगीण प्रगती होते. कोणत्याही क्षेत्रात शिक्षणाने प्रवेश करता येतो. शिक्षणामुळे राजकीय व सामाजिक जागृती येते. विकास साध्य करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. ज्ञानवृद्धीतूनच प्रत्येक व्यक्ती संस्कृती आणि संपत्ती निर्माण करते. प्रत्येक व्यक्तीचे वेगळेपण हे शिक्षणवद्धीतून दिसते. सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. प्रत्येक व्यक्तीचा शिक्षण हा एक मूलभूत व नैसर्गिक अधिकार आहे. स्थानारूप व कालानुरूप व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्याचे एक साधन म्हणजे शिक्षण होय. सुप्तगुणांचा विकास शिक्षणामुळेच

होतो. शिक्षणातूनच शारीरिक, मानसिक, बौद्धीक व सामाजिक विकास होतो. शिक्षणाचे महत्त्व पटले आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकाऱ्याचा शैक्षणिक स्तर अभ्यासला आहे.

**तक्ता क्र. ५.७ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी वर्गांचे शैक्षणिक स्तर**

| अ.क्र | शिक्षणाचा स्तर | अधिकारी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पदवी | ०३ | ०६% |
| २ | पदव्युत्तर | ३८ | ७६% |
| ३ | व्यावसायिक शिक्षण | ०९ | १८% |
| | | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी**

१. ०३ अधिकारी पदवीधर आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ०६% आहे.

२. ३८ अधिकारी पदव्युत्तर आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ७६% इतके आहे.

३. व्यावसायिक शिक्षण घेतलेले ०९ अधिकारी आहेत त्यांचे शेकडा प्रमाण १८% इतके आहे.

### ५.२.१ पुढील शैक्षणिक सुधारण्याचे प्रयत्न

स्वयंशिक्षणाच्या कक्षा दिवसेंदिवस वाढत आहेत. व्यक्तीच्या सुप्त अंतर्गत शक्तीचा विकास करून जे शिक्षण व्यक्तीच्या अंगी मानवता, राष्ट्रीयता आणि विश्व बंधुत्त्वाची भावना निर्माण करते. तेच खरे शिक्षण होय. मनाचा मोठेपणा, एकसंघ राहण्याचे कौशल्य याही गोष्टी शिक्षणात अंतर्भूत होतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी शिक्षणाचा फायदा होतो. ज्ञानात सतत नवनवीन गोष्टींचा समावेश होत आहे. त्या आत्मसात केल्या पाहिजेत. स्पर्धेच्या युगामध्ये टिकण्यासाठी सतत ज्ञान वाढविले पाहिजे. नवनवीन तंत्रज्ञान विज्ञानाचा अभ्यास करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणणे गरजेचे

आहे. त्यासाठी स्वयंप्रेरणेची महत्त्वकांक्षा महत्त्वाची आहे. त्यातूनच व्यक्ती सर्वगुणसंपन्न बनते. नवीन कौशल्य संपादन करणे व ज्ञानाच्या कक्षा सतत रूंदावत राहणे हे चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे लक्षण आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी पुढील शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले किंवा नाही या संदर्भातील तक्ता.

**तक्ता क्र. ५.८ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी वर्गाने शैक्षणिक सुधारणा करणेसाठी प्रयत्न केले किंवा नाही याची माहिती**

| अ.क्र | शिक्षणाचा स्तर | अधिकारी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रयत्न केलेले | ४७ | ९४% |
| २ | प्रयत्न न केलेले | ०३ | ०६% |
| | | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी**

१. ४७ अधिकाऱ्यांची पुढील शैक्षणिक सुधारणेसाठी प्रयत्न केले आहेत. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी, पदोन्नती या उच्च शैक्षणिक पात्रतेचा फायदा होतो. यासाठी प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यांचे शेकडा प्रमाण ९४% आहे.

२. ०३ अधिकाऱ्यांनी शैक्षणिक सुधारणेसाठी प्रयत्न केलेले नाहीत त्यांचे शेकडा प्रमाण ०६% आहे.

### ५.२.२ मुलांचे शिक्षण

मुलांमध्ये अध्ययन करण्याची वृत्ती आवश्यक आहे. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. यामध्ये पारंपारिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, व्यावसायिक शिक्षण या सारख्या विद्या शाखा आहेत. यामध्ये अनेक प्रकारचे शिक्षण मिळते. आज व्यावसायिक शिक्षणाला फार महत्त्व आलेले आहे. शिक्षणाने विकास साध्य करता येतो. व्यक्तीला एक जबाबदार नागरिक बनवण्याचे

सामर्थ्य शिक्षणात आहे. कोणत्या प्रकारचे शिक्षण घ्यावे हे व्यक्तीच्या इच्छा, आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक परिस्थिती यावर अवलंबून असते. ज्या ठिकाणी कंपनी आहे त्याच ठिकाणी शिक्षणाची चांगली सोय असेल तर त्याचा फायदा कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या मुलांना होतो.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या मुलासाठी दहावी पर्यंत कोणत्या माध्यमाच्या शाळेतून शिक्षण दिले आहे त्याचा अभ्यास केला आहे.

**तक्ता क्र. ५.९ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या मुलासाठी दहावी पर्यंत कोणत्या माध्यमातून शिक्षण दिले त्याची माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | शैक्षणिक बोर्ड | माध्यम | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | S.S.C | मराठी | ०२ | ०४% |
| २ | S.S.C | इंग्रजी | ०४ | ०८% |
| ३ | C.B.S.E | इंग्रजी | २६ | ५२% |
| ४ | I.C.S.E | इंग्रजी | १८ | ३६% |
| | एकूण | | ५० | १००% |

**निष्कर्ष: श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी,**

१. ०२ अधिकाऱ्यांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मराठी माध्यमाची निवड केली आहे. त्यांचे प्रमाण ०४% इतके आहे.

२. ०४ अधिकाऱ्यांनी इंग्रजी माध्यमाची निवड केलेली आहे त्यांचे प्रमाण ०८% आहे.

३. २६ अधिकऱ्यांनी त्यांचे मुलासाठी C.B.S.C बोर्डची निवड केलेली आहे त्यांचे प्रमाण ५२% आहे.

४. I.C.S.E या इंग्रजी माध्यमिक बोर्डाची निवड १८ पालकांनी केली. त्यांचे शेकडा प्रमाण ३६% इतके आहे.

## ५.३ सामाजिक

मानवाने प्राचीन काळापासून आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक संस्कृत्यांचा विकास केला आहे. तसेच अवती भोवती असणारे नैसर्गिक वातावरणाचा व समाजात राहत असलेल्या समाजाचा अभ्यास केला. हा विकास साधत असताना त्याला दुसऱ्या व्यक्तीच्या सहकार्याची गरज भासली. त्यामुळे तो एकमेकांना मदत सहकार्य करित आला आहे. म्हणजे मानव हा समाजशील प्राणी आहे असे प्राचीन ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल म्हणतात. त्यातूनच मानव ऐकमेकांना सहाकर्य करीत आपले जीवन चांगले बनविण्याचा प्रयत्न करू लागला. त्याच प्रवृत्तीला सामाजिकता म्हटले जाते. त्यातूनच मानवाने आपली जीवन जगण्याची एक पद्धती निर्माण केली आहे. अशा मानवाच्या वातावरणास आपण संस्कृती म्हणतो. त्यातून एक समूह जीवन तयार होते त्याला सामाजिक जीवन म्हणतात. अशा मानवनिर्मितीत वातावरणाचा त्यांच्या सामाजिक जीवनाचा सामाजिकतेचा अभ्यास करण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकाऱ्यांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे.

### ५.३.१ अधिकारी वर्गाच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती:

कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीचा परिणाम कामावर होत असतो. अधिकाऱ्यांच्या दृष्टीने कामाचे ठिकाण ही एक महत्त्वाची प्रेरणा आहे. अधिकाऱ्याच्या शारीरिक व बौद्धीक कामाचा योग्य मोबदला निश्तिपणे व सातत्याने मिळाल्यास त्यांची कार्यक्षमता निश्चितपणे उंचावते. त्यांच्या नोकरीत स्थिरता व सुरक्षितता कामाच्या स्थितीत सुधारणा इत्यादी गोष्टी मिळाल्यास अधिकारी कार्यक्षमतेने व तळमळीने काम करीत असतो. कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली असणे ही सर्वच कर्मचऱ्यांची इच्छा असते.

कामाच्या व श्रमाच्या मोबदल्यात वेतन मिळत असते. याशिवाय अनेक घटकही महत्त्वाचे आहेत. यामध्ये नियमित काम, चांगले काम, प्रकाशाची व्यवस्था, तापमान नियंत्रण, धुळीपासून संरक्षण, कामात स्वातंत्र्य, मताला वाव व लहान मोठे

यश मिळविण्यास संधी, वरिष्ठांशी चांगले संबंध इत्यादी गोष्टी चांगल्या वातावरणाला पोषक असतात. आपल्या सहकाऱ्याद्वारे व्यक्तिगत व स्नेहपूर्ण असे मोकळेपणाचे संबंध या घटकांनी युक्त असलेली परिस्थिती कामाच्या ठिकाणी असावी अशी कर्मचारी वर्गाची अपेक्षा असते.

**तक्ता क्र. ५.१० श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामाच्या ठिकाणची परिस्थितीची माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | कामाच्या ठिकाणची परिस्थिती | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चांगली आहे | ४६ | ९२% |
| २ | साधारण आहे | ०४ | ०८% |
| ३ | असाधारण आहे. | ०० | ००% |
| | | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी,**

१. ४६ अधिकाऱ्यांच्या मते कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली आहे. कारण या प्रकल्पामध्ये दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती होते. त्यामुळे स्वच्छता, खेळती हवा या गोष्टीकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते. त्यामुळे ९२% अधिकाऱ्यांच्या मते कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली आहे.

२. ०४ अधिकाऱ्यांच्या मते कामाच्या ठिकाणची परिस्थिती साधारण आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ०८% आहे.

**५.३.२ स्थलांतरित**

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे म्हणजेच स्थलांतरण. थोडक्यात नेहमीचे राहण्याचे ठिकाण बदलून सोडून दुसऱ्या गावी प्रदेशात दिर्घकालीन, अल्पकालीन वास्तव्यासाठी जाण्याचा प्रक्रियेला स्थलांतर म्हणतात. अशा प्रकारच्या स्थलांतर करणाऱ्या व्यक्तीला स्थलांतरित असे म्हणतात.

विविध कारणांनी व्यक्तीला स्थलांतर करावे लागते. जे लोक बुद्धिमत्तेच्या बाबतीत हुशार असतात. काम करण्याची क्षमता असते परंतु हवे तसे काम मिळत नाही. त्यामुळे हे लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नोकरीसाठी जात असतात त्यांना विकासाच्या दृष्टीने वाव मिळावा म्हणून ते स्थलांतर करित असतात. अविकसित भागातून विकसित भागात व्यक्ती स्थलांतरित होते. तर आवडीनुसार योग्य नोकरी मिळण्यासाठी व्यक्ती स्थलांतर करतात तर कधी आर्थिक कारणाने व्यक्ती स्थलांतर करते.

औद्योगिकीकरणामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. वाहतूक व दळवळणाच्या सोयी उपलब्ध झाल्याने स्थलांतर करणे सोयीचे झाले आहे. तंत्रज्ञानाने झपाटयाने प्रगती घडून येत आहे दर्जात्मक जीवनपद्धती असावी असे प्रत्येक व्यक्तीला नेहमी वाटते. स्थलांतरामुळे परिवर्तन व विकास घडून येतो. श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये किती अधिकारी स्थलांतरित आहेत याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.११ स्थलांतरण प्रमाण.

| अ.क्र | कामाच्या ठिकाणची परिस्थिती | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलनिवासी | १७ | ३४% |
| २ | आंतरजिल्हा | २१ | ४२% |
| ३ | आंतरराज्यीय | १२ | २४% |
| | एकूण | ५० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** ५० अधिकाऱ्यापैकी १७ अधिकारी हे स्थानिक आहेत. त्यांचे प्रमाण (३४%) २१ अधिकारी हे दुसऱ्या जिल्हयातून आलेले आहेत. त्यांचे प्रमाण ४२% आहे. १२ अधिकारी हे पररराज्यातून आलेले आहेत. त्याचे प्रमाण (२४%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पामध्ये ३८ अधिकारी हे मराठी भाषिक आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की स्थानिक लोकांना नोकरीमध्ये प्राधान्य दिले आहे.

**५.३.३ सामाजिक संम्मीलन:**

दोन भिन्न संस्कृतीचे दोन लोकसमूह एकमेकांच्या संपर्कात आल्यानंतर जी संस्कृतीची देवाण–घेवाण होते त्याला संम्मीलन असे म्हणतात. त्यातून एक नवीन जीवन पद्धती आकाराला येते. संस्कृती ही मानव निर्मित आहे. मानवाने आपली बुद्धिमत्ता व कौशल्याच्या जोरावर संस्कृतीची जडणघडण केली आहे. त्यातून मानवाने आपली प्रगती व विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. अलीकडे पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण केले जात आहे. परिवर्तन होणे हा निसर्गाचा नियम आहे. कालानुसार संस्कृतीमध्ये अनेक घटकात बदल होत असतात. वेगवेगळया प्रादेशिक विभागात संस्कृतीमध्ये भिन्नता दिसून येते. परंतु एकत्रितपणे जीवन जगताना त्यांच्यामध्ये परस्परांच्या संस्कृतीचा प्रभावही पडलेला आपणास जाणवतो कारण वेगवेगळया प्रदेशात राहणाऱ्या व्यक्तींची संस्कृती वेगळी असते.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पामध्ये परप्रांतीय आणि स्थानिक अधिकारी यांच्यामध्ये सामाजिक संम्मीलन कोणकोणत्या कार्यक्रमाद्वारे निर्माण झाली आहे ते अभ्यासले आहे.

**तक्त क्र. ५.१२ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकाऱ्यांमध्ये सामाजिक सम्मीलन कोणकोणत्या कार्यक्रमाद्वारे निर्माण झाले**

| अ.क्र | स्थानिक परंपरा | स्थानिक व परप्रांतीय अधिकारी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सणसमारंभ | ३८ | ७६% |
| २ | उत्सव | ४२ | ८४% |
| ३ | जत्रा व यात्रा | ३४ | ६८% |
| ४ | वाढदिवस | ४३ | ८६% |
| ५ | विवाह | ३२ | ६४% |
| | एकूण | २०० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी**

१. ३८ अधिकारी ऐकमेकांच्या सणसमारंभामध्ये सहभागी होतात त्यांचे शेकडा प्रमाण ७६% आहे.

२. ४२ अधिकारी एकमेकांचे उत्सवात सामील होतात उत्सवापाठीमागील भूमिका समजावून घेतात त्यांचे शेकडा प्रमाण ८४% इतके आहे.

३. २६ अधिकारी स्थानिक जत्रांमध्ये निमंत्रणावरून उपस्थित राहतात त्यांचे प्रमाण ५२% आहे.

४. ४३ अधिकारी वाढदिवसासाख्या कार्यक्रमांना हजेरी लावतात त्यांचे प्रमाण ८६% आहे.

५. विवाहासारख्या कार्यक्रमामध्ये ३२ अधिकारी सहभागी होतात त्यांचे प्रमाण ६४% आहे.

## ५.४ सांस्कृतिक

सर्वांगीण विकास साधत असताना सांस्कृतिक क्षेत्रातही वेगळा ठसा उमटला पाहिजे असे आज विकास करणाऱ्या गावागावातून दिसून येते. या धकाधकीच्या जीवनामध्ये सतत ताणतणाव वाढत आहे. मनाला थोडा विरंगुळा मिळावा यासाठी सांस्कृतिक भूक भागविण्याची गरज आज निर्माण झाली आहे. गावचे गावपण जपत रसिकांची सांस्कृतिक गरजेकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी विविध व्याख्याने,स्पर्धा लावणीमहोत्सव, नाटक, संगीताचे प्रयोग, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा यातून लोकांना सांस्कृतिक मेजवानी दिली पाहिजे. या हेतूने सांस्कृतिक कार्यक्रमाची आखणी होत असते.

सांस्कृतिक, वैचारिक वातावरण निर्माण झाल्यास त्याचा फायदा त्या परिसरातील लोकांना होत असतो. या सर्वांचा विचार करता श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकाऱ्यांच्या सांस्कृतिक अभिरूची विषयीचे सहकारी त्याचे अध्ययन केले आहे.

### ५.४.१ परकेपणा:

प्रत्येक व्यक्तीला आपली अस्मिता जपण्यासाठी स्वत:ची एक ओळख निर्माण करून दयावी लागते. भाषा रूढी, परंपरा या माध्यमातून ती व्यक्त होत असते. भिन्नभिन्न संस्कृती एकमेकांवर प्रभाव पाडते त्यातून संघर्ष निर्माण होत असतो व आपलेपणाची व परकेपणाची भावना निर्माण होत असते. परप्रांतीय लोक दुसऱ्या राज्यात आल्यावर त्यांना परकेपणा जाणवू लागतो. परंतु जसजसा स्थानिक लोकांच्या संस्कृतीचा प्रभाव वाढतो. तसतसा परकेपणा दूर होऊन आपलेपणा निर्माण होत असतो. स्थानिक लोकांचे सहकार्य त्यासाठी आवश्यक असते. परप्रांतीय लोकांमध्ये समायोजनाची क्षमता असते. त्यातून वेगळी कार्यसंस्कृती निर्माण होत असते. कामगार व अधिकारी यांचे सततचे सहकार्य महत्त्वाचे असते. सतत स्थानिक लोकांचा संपर्क सणसमारंभातील सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग यातून परकेपणाची भावना दूर होते.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील अधिकारी वर्गातील एकमेकांबद्दल परकेपणाची जाणीव खालील प्रमाणे दिसून येते.

तक्ता क्र ५.१३ परकेपणाची जाणीव

| अ.क्र | परकेपणाची जाणीव | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होते | ०२ | ०४% |
| २ | नाही | ४८ | ९६% |
| | एकूण | ५० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकारीवर्गापैकी २ अधिकाऱ्यांना परकेपणाची जाणीव होते. त्यांचे शेकडा प्रमाण (४%) इतके आहे.
२) ५० अधिकाऱ्यापैकी ४८ अधिकाऱ्यांना परकेपणाची जाणीव होत नाही त्यांचे शेकडा प्रमाण (९६%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मधील २ अधिकाऱ्यांना परकेपणाची जाणीव होते. कारण यातील हे २ अधिकारी हे वरिष्ठ पातळीवर काम करतात. तसेच त्यांना कर्मचारी वर्गाशी संवाद साधताना भाषेची अडचण येते तसेच वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे कामगारांशी अंतर ठेवूनच वागतात. आत्मसन्मान, आत्मप्रतिष्ठा या भावनेतून ते इतरांशी संपर्क कमी ठेवतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये परकेपणाची भावना आढळून येते. त्यांचे प्रमाण शेकडा ४% आहे.

५० अधिकाऱ्यांपैकी ४८% अधिकाऱ्यांच्या मतानुसार त्यांना परकेपणाची जाणीव होत नाही. कारण यातील अधिकारी हे एकमेकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात. त्यांना संपर्कासाठी भाषेची अडचण येत नाही. स्थानिक अधिकारी इतर अधिकाऱ्यांना समानतेची वागणूक देतात. त्यांच्या वैयक्तिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने समाजाशी व कामगारांशी जवळीकता साधतात. त्यामुळे ८४% अधिकाऱ्यांमध्ये परकेपणाची भावना जाणवत नाही.

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील अधिकारी, कामगार वर्गामध्ये स्थानिक व परप्रांतीयामध्ये कर्मचारी असा परकेपणा राहिला नाही ते आपलेपणाने राहत आहेत. कारण सामाजिक संम्मीलनपणा त्यांच्या वर्तनातून व कार्यातून दिसून आला आहे. परप्रांतीय अधिकाऱ्यांना स्थानिक अधिकारी व कामगार सतत सहकार्य करतात. उदा. त्यांच्या मुलांना शाळेत ॲडमिशनसाठी मदत करणे. स्थानिक व्यवहारात संपर्कासाठी मदत करणे. भाषेची अडचण आल्यास त्यांना हिंदी भाषेतून शंकेचे निरसन करणे किंवा समजावून सांगणे. यातूनच एकमेकांतील परकेपणा दूर झाला आहे.

### ५.४.२ कार्यसंस्कृती:

कार्यसंस्कृती जोपासण्याचा एक भाग म्हणून मनोरंजनाला फार महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तीने फुरसतीच्या वेळेत केलेला योग्य आणि विधायक उपयोग म्हणजेच मनोरंजन होय. कामातून ताणतणावाचे निराकरण करण्यासाठी मनोजरंजनाची अत्यंत आवश्यकता असते. शारीरिक आणि मानसिक वाढीसाठी मनोरंजन हा महत्त्वाचा घटक आहे. विश्रांती घेतल्याने ताणतणाव कमी होतो. शारीरिक थकवा दूर होतो. पुन्हा काम करण्यास उत्साह वाढतो. कार्यक्षमता वाढते. त्यामध्ये संगीत, नाटक, टी.व्ही पाहणे, खेळ खेळणे, विश्रांती घेणे, मनोरंजन करण्याचा प्रयत्न करणे इत्यादी. पुढील प्रमाणे अधिकारी वर्गाच्या संस्कृतीविषयी माहिती घेता येईल.

भारतात विविध राज्य आहे प्रत्येक राज्यातील लोकांच्या परंपरा, धार्मिक सण, उत्सव, वेशभूषा, ललीतकला, लोकसाहित्य, संगीत इत्यादी गोष्टी वेगवेगळया आहेत. भारतामध्ये हिंदू धर्माचे बहुसंख्य लोक आहे परंतू सर्वांची संस्कृती समान नाही. हिंदू धर्माच्या वेगवेगळया प्रांतामधील लोकांमधील परंपरा उत्सव, धार्मिक सण, इत्यादीमध्ये भिन्नता दिसून येते. काही किमान सर्वसाधारण

लक्षणाबाबत विविध संस्कृतीत साधर्म्य आढळून येत असले तरी संस्कृतीच्या विविध गुणांबाबत विविधता आढळून येते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी हे विविध वर्गामधील त्यांचे सणसमारंभ हे वेगवेगळे आहे. विविध राज्यातील हे अधिकारी आहेत परंतू ते स्थानिक सांस्कृतीशी कशा प्रकारे जुळवून घेतात हे पाहू.

तक्ता क्र. ५.१४ सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग.

| अ.क्र | कार्यक्रमातील सहभाग | अधिकारी संख्या | शेकडेवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४२ | ८४% |
| २ | नाही | ०८ | १६% |
| | एकूण | ५० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पामधील ४२ अधिकारी सणसमारंभामध्ये सहभागी होतात त्यांचे प्रमाण ८४% इतके आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील ८ अधिकारी हे सणसमारंभ कार्यक्रमासाठी सहभागी होत नाहीत. त्यांचे प्रमाण १६% इतके आहे.

**निष्कर्ष:** वरील सारणीवरून असे दिसते की, श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील ५० पैकी ४२ अधिकारी हे सण समारंभ, उत्सव यामध्ये सहभागी होत आहेत. या ४२ अधिकाऱ्यांनी एकमेकांशी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून संपर्क वाढवलेला आहे. सहकाऱ्यांच्या निमंत्रणावरून ते त्यांच्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होतात. एकमेकांच्या कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेताना दिसतात. त्यांचे प्रमाण ८४% इतके आहे.

श्रायबर डाायनामिक्स डेअरीमधील फक्त ८ अधिकारी कार्यक्रमामध्ये सामील होत नाहीत. कारण ते एकतर उच्च पदस्थ आहेत. कामाच्या व्यापामुळे सहभागी होत नाही.

### ५.४.३ कामगार वर्गाचे सहकार्य:

प्रत्येक व्यक्तीला स्वत:चा विकास करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची गरज असते. म्हणजेच मानव हा समाजशील प्राणी आहे. त्याला दुसऱ्याच्या सहकार्याची नितांत आवश्यकता आते. तो दुसऱ्याच्या सहकार्याशिवाय स्वत:चा विकास करूच शकत नाही. त्यामुळे एकमेकांना सहकार्याची अत्यंत आवश्यकता असते.
साहजिकच त्यामुळे तो इतरांना सहकार्य करत आला आहे.

प्रत्येक जण एकमेकांना मदत करून आपल्या गरजा पूर्ण करतो व आपले जीवन त्यामुळे सुखकर बनवित असतो. त्यातून सामाजिकता भावना वाढीस लागते. अशाच मानवाने निर्माण केलेल्या वातावरणाला आपण संस्कृती म्हणतो. या सर्व एकत्रित समूह जीवनालाच सामाजिक जीवन म्हणतात. असे सामाजिक जीवन जगत असताना सहकार्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यातून सर्वांचा विकास साध्य होतो. प्रस्तुत अध्ययनात अधिकारी वर्गाला कामगार वर्गाचे सहकार्य कसे मिळते या संबंधी अभ्यास केला आहे.

**तक्ता क्र. ५.१५ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अधिकारी वर्गाला कामगारांचे सहकार्य दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र | अधिकारी वर्गाला कामगारांचे सहकार्य | सहकार्य मिळालेल्या अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कामगारांचे सहकार्य मिळते | ४७ | ३४% |
| २ | कामगारांचे सहकार्य मिळत नाही. | ०३ | ०६% |
| | एकूण | ५० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी;**

१. ४७ अधिकाऱ्यांना कामगारांचे सहकार्य मिळते. या अधिकाऱ्याचे आणि कामगारांचे संबंध सलोख्याचे आहेत अशा अधिकाऱ्यांचे शेकडा प्रमाण ९४% आहे.

२. ०३ अधिकाऱ्यांना कंपनीमधील कामगारांचे सहकार्य मिळत नाही.

**५.४.४ स्थानिकांशी संपर्क:**

सामाजिक संबंधातून समाजाची निर्मिती होते. ज्या समाजात आपण राहतो तेथील सामाजिक वातावरण व तेथील पर्यावरण आपण शिकवून घेत असतो. आणि त्यातूनच समाजाचे सातत्य टिकून राहत असते. प्रत्येक व्यक्तीला आपला विकास साध्य करण्यासाठी दुसऱ्याच्या सहकार्याची गरज असते. व्यक्ती या एकमेकांना सहकार्य करून आपल्या गरजा पूर्ण करत असते. त्यासाठी तिला इतर व्यक्तीशी संपर्क ठेवावा लागतो. यामध्ये विचाराचे आदानप्रदान होते. अशा संपर्कातूनच व्यक्ती संस्कृती आत्मसात करत असते. त्याचा फायदा तिला त्या व्यवहारी जीवनात नक्कीच महत्त्वाचा असतो. एकमेकांच्या संपर्कातूनच प्रत्येक व्यक्ती संस्कृती देवाणघेवाण आत्मसात करीत असते. व त्यातून आपला विकास साध्य करीत असते.

**तक्ता क्र. ५.१६ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील परप्रांतीय अधिकाऱ्यांचे स्थानिकांशी असलेले संबंध.**

| अ.क्र | स्थानिकांशी संपर्क | अधिकाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक लोकांशी संपर्क ठेणारे | १२ | १००% |
| २ | स्थानिक लोकांशी संपर्क न ठेवणारे | ०० | ००% |
| | एकूण | १२ | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी**

१. १२ अधिकारी परप्रांतीय आहेत. हे अधिकारी स्थानिक लोकांशी संपर्क वाढवितात.
२. सहकार्यामुळे स्थानिक लोकांशी संपर्क वाढवितात. सहकार्यामुळे/मदतीमुळे एकमेकांची कामे होतात. सामूहिक सपर्क वाढतो. स्थानिक भाषा ज्ञान वाढते. त्यामुळे हे अधिकारी स्थानिकांशी संपर्कात अशा अधिकऱ्यांचे शेकडा प्रमाण १००% आहे.

अधिकाऱ्यांच्या मुलांच्या शाळेमुळे स्थानिक लोकांशी संपर्क वाढलेला आहे. दैनंदिन व्यवहारात देखील एकमेकांच्या संपर्कातून एकमेकांना मदत करतात. उदा. बँक व्यवहार, मुलांची शाळा इत्यादी, गणेशोत्सव, सण समारंभ, यात्रा, जत्रांमध्ये स्थानिक कार्यक्रमाच्या आमंत्रणातून एकमेकामध्ये जवळीकता निर्माण झाली आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक लोकांशी अधिकारी वर्गाचा संपर्क हा खूपच वाढला आहे.

**५.५ श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगार वर्गाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास करणे.**

**५.५.१ आर्थिक वर्गीकरण**

समाजामध्ये व्यक्ती वावरत असताना त्या व्यक्तीचे समाजातील स्थान, प्रतिष्ठा या गोष्टी त्या व्यक्तीच्या आर्थिक सुबत्तेवर अवलंबून असतात. आर्थिक प्राप्तीवरच व्यक्तीचे जीवनमान व राहणीमान अवलंबून असते. त्यांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता चांगल्या पद्धतीने होणे अत्यंत आवश्यक असते. तसेच आर्थिक सुरक्षिततेची भावना वाढीस लागण्यासाठी आर्थिक सुबत्ता असणे महत्त्वाचे आहे. कामाची संधी, शैक्षणिक पात्रता व कामाच्या अनुभवावर कामाचे वेतन ठरत असते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामधील कामगारांच्या वेतनासंबंधी माहिती घेतली आहे.

तक्ता क्र. ५.१७ वेतन वर्गीकरण

| अ.क्र | कामगारांचे वेतनानुसार गट (रूपयांत) | कामगार संख्या | सरासरी वेतन | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | ५००१ ते १५००० रू | ९८ | ९०००/— | ४९% |
| २ | १५००१ ते २५००० रू | ७६ | १७०००/— | ३८% |
| ३ | २५००१ ते ३५००० रू | २६ | २७०००/— | १३% |
| | एकूण | २०० | | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारांचे वेतन विचारात घेतले आहे. २०० कामगारांमध्ये ९८ कामगारांना सरासरी वेतन रू ९००० रू इतके मिळते. त्यांचे प्रमाण (४९%) आहे. ७६ कामगारांचे सरासरी दरमहा वेतन १७०००/— इतके आहे त्यांचे प्रमाण (३८%) आहे. २६ कामगारांचे सरासरी दरमहा वेतन २७०००/— रू इतके आहे. त्यांचे प्रमाण (१३%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील जास्तीत जास्त कामगारांना (९८) दरमहा सरासरी वेतन ९०००/— इतके मिळते हे कामगार कंपनीमध्ये नवीन आहेत. तसेच इतर कामगारांपेक्षा अनुभव कमी आहे. त्यामुळे या कामगारांचे वेतन सरासरी रू ९००० इतके आहे.

**५.५.२ पगारासंबंधी समाधानी:**

कामगारांच्या आर्थिक सुरक्षिततेसंबंधी कंपनी व्यवस्थापनाने नेहमी सतर्क असले पाहिजे. कारण अल्पवेतन हे कामगारांच्या असंतोषाचे कारण होऊ शकते. त्यावर त्यांची कार्यक्षमता ठरत असते. कामगारांना वेतनाबरोबरच इतर सुविधा पुरविल्यास तो समाधानाने काम करत असतो. त्यामध्ये बोनस, प्रवासखर्च, राहण्याची सोय, अल्पोपहार, जेवण, वैद्यकीय सुविधा इत्यादी कंपनी मालकाने

पुरविल्यास त्याचा खर्च कमी होतो. मिळणारे वेतन कौटुंबिक खर्चासाठी खर्च करता येते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील कामगार पगारासंबंधी समाधानी आहेत का याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.१८पगाराबाबत समाधानी

| अ.क्र | पगाराबाबत समाधानी आहात | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १५२ | ७६.००% |
| २ | नही | ४८ | २४.००% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १५२ कामगार समाधानी आहेत. त्यांचे प्रमाण (७६%) आहे. ४८ कामगार पगारासंबंधी समाधानी नाहीत त्यांचे प्रमाण (२४%) आहे.

**निष्कर्ष:** १५२ उत्तरदात्यांच्या मतानुसार कंपनी इतर सुविधा देते. त्यामध्ये वैद्यकीय सेवा, वाहतुक सेवा, निवास व्यवस्था या सुविधा अल्प दरामध्ये देत आहे. त्यामुळे पगाराबाबत ते समाधानी आहेत.

### ५.५.३ बोनस

औद्योगिकरणामध्ये आधुनिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाल्याने उत्पादनाची गती प्रचंड प्रमाणात वाढून मालक वर्गाला कमालीचा फायदा होत आहे. भांडवल गुंतवणूकीच्या प्रमाणात नफा अधिक मिळत असतो. या नफ्याचा काही हिस्सा बोनसच्या रूपाने कामगारांना दिला पाहिजे.

औद्योगिक क्षेत्रात कामगारांना महागाई भत्ता दिला जातो. परंतु तो सतत बदलता असला पाहिजे. बोनस हा कंपनीच्या नफ्यावर आधारित असतो. त्या त्या वर्षातील कंपनीचे उत्पादन विचारात घेऊन बोनस ठरविला जातो. श्रायबर

डायनामिक्स डेअरी लिमिटेड मधील कामगार बोनस संबंधी समाधानी आहेत काय याचे अध्ययन केले आहे.

तक्ता क्र ५.१९ बोनस

| अ.क्र | बोनस संबंधी समाधानी | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २०० | १००% |
| २ | नही | — | — |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील २०० कामगार बोनसबाबत समाधानी आहेत. त्यांचे प्रमाण (१००%) आहे.

**निष्कर्ष:** कंपनीच्या उत्पादनवाढीमध्ये कामगारांचा प्रत्यक्ष संबंध असतो. कामगारांच्या जास्तीत जास्त कार्यक्षमतेमुळे कंपनीला नफा होत आहे. त्यामुळे कंपनीने कामगारांना चांगला बोनस दिला आहे. त्यामुळे सर्व कामगार समाधानी आहेत.

### ५.५.४ वैद्यकीय सुविधा

व्यक्तीच्या दृष्टीने शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले असणे अत्यंत आवश्यक आहे. दरमहा उत्पन्नातील काही भाग हा आरोग्यावर खर्च होत असतो. आरोग्यावर सतत नैसर्गिक व सामाजिक आघात होत असतात. वाढते औद्योगिकीकरण स्पर्धा, ताणतणाव, यामुळे आरोग्याचे प्रश्न वाढत आहेत. श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पामध्ये कामगार वर्गासाठी शारीरिक श्रमाची कामे करणाऱ्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. कामगारांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी तो शरीराने व मनाने निरोगी असला पाहिजे. या हेतूने या प्रकारच्या वैद्यकीय सुविधा कशा प्रकारे देण्यात येतात याची माहिती घेतली.

तक्ता क्र. ५.२० श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगारांना दिलेल्या वैद्यकीय सेवेचा लाभ घेणारे लाभार्थी.

| अ.क्र | वैद्यकीय सुविधा | लाभधारक कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कंपनी पुरस्कृत वैद्यकीय सेवा | १७० | ८५% |
| २ | खाजगी वैद्यकीय सेवा | ०८ | ०४% |
| ३ | सरकारी वैद्यकीय सेवा | २२ | ११% |
| | एकूण | २०० | १००% |

**श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० अधिकाऱ्यांपैकी**

१. १७० कामगार कंपनी पुरस्कृत वैद्यकीय सेवेचा लाभ घेतात. कारण यामध्ये आजाराविषयीची संकलित केलेली असते. त्यामुळे उपचार योग्य होतात. वेळेची, पैशाची बचत होते. त्यामुळे कंपनी पुरस्कृत वैद्यकीय सेवेचा लाभ ८५% कामगार घेतात.

२. ८ कामगार खाजगी वैद्यकीय सेवा घेतात त्यांचे शेकडा प्रमाण ४% आहे.

३. २२ कामगार सरकारी वैद्यकीय सेवा घेतात त्यांचे शेकडा प्रमाण ११% आहे.

**५.५.५ विमा**

विम्यामधील गुंतवणूक ही दिर्घकालीन गुंतवणूक आहे. विम्यामध्ये अनेक प्रकार आहेत. काही अल्प कालीन विमा योजना आहेत. काही दिर्घकालीन योजना आहेत. व्यक्ती स्वत:च्या कुवतीनुसार विमा संरक्षण घेते. विम्यामधील गुंतवणूक ही आकस्मित प्रसंगी उपयोगी पडते. उतार वयातील तरतूद म्हणूनही विम्याकडे पाहिले जाते. मुलांच्या शिक्षणासाठी, विवाहासाठी, घरबांधणी, यासाठी विमा उपयोगी पडतो. कामगारांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी विमा फार गरजेचा आहे. कामगारांचे

आरोग्य व जीवनमान उंचावण्यासाठी विमा महत्त्वाचा आहे. काही कंपन्यामध्ये विमा घेणे महत्त्वाचे आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील कामगार वर्गाने विमा योजनेचा कशा प्रकारे आधार घेतला आहे ते खालील तक्त्यावरून दिसून येते.

तक्ता क्र ५.२१ विमा

| अ.क्र | विमा पॉलिसी | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६५ | ८२.५% |
| २ | नही | ३५ | १७.५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील १६५ कामगारांनी विमा पॉलिसी घेतलेली आहे. व फक्त ३५ लोकांनी विमा पॉलिसी घेतलेली नाही.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील १६५ कामगारांनी भविष्याची तरतूद म्हणून मुलांचे शिक्षण, यासाठी विमा पॉलिसी घेतलेली आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ३५ कामगारांनी विमा पॉलिसी घेतलेली नाही कारणे यामधील काही कामगारांचे मते विमा पॉलिसी हप्ता दरमहा भरणे शक्य नाही. आर्थिक अडचणीमुळे विमा उतरविला नाही. तसेच भविष्यकाळातील तरतुदीविषयी कोणतीही योजना आखलेली नाही. अशा कामगारांचे प्रमाण १७.५% इतके आहे.

### ५.५.६ औद्योगिक सुरक्षितता:

प्रत्येक व्यक्तीला सुरक्षिततेची नितांत आवश्यकता असते. सुरक्षितता ही एक महत्त्वाची गरज आहे. जीवनात अनेक धोकादायक प्रसंग उद्‌भवतात. म्हणून सुरक्षितता ही व्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उद्योगधंदे अवलंबून आहेत. कामगारांना यंत्राशी जवळीक साधून काम करावे लागते. शारीरिक इजा, मानसिक त्रास, आर्थिक धोके निर्माण होण्याचे प्रसंग उदभवतात.

कामगार व यंत्र यांचा परस्परसंबंध निर्माण होत असल्याने कामगारावर केव्हा कोणता प्रसंग उदभवेल याचा नेम नसतो. म्हणून कामगारांना सुरक्षितता देणे फारच महत्त्वाचे आहे. आर्थिक सुरक्षितता, सामजिक सुरक्षितता, कामगारांना पुरविणे आवश्यक आहे.

कामगार प्रकल्पामध्ये जोखमीचे काम करत असतो. अनावधानाने त्याच्यावर संकट ओढवल्यास त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी कामगारांना औद्योगिक सुरक्षितता मिळाली पाहिजे. औद्योगिक सुरक्षितता ही एक राष्ट्रीय कार्याचा भाग बनली आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगारांची सुरक्षा कशी आहे याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र ५.२२ औद्योगिक सुरक्षितता.

| अ.क्र | सुरक्षिततेचा दर्जा | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चंगला | २०० | १००% |
| २ | मध्यम | — | — |
| ३ | कनिष्ठ | — | — |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील सुरक्षिततेचा दर्जा चांगला आहे. असे सर्वच म्हणजे २०० उत्तरदात्यांनी सांगितले आहे. याचे प्रमाण (१००%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड ही कंपनी आपल्या कामगारांच्या सुरक्षिततेसाठी फारच दक्ष आहे. कंपनीचे 'शुन्य अपघात' हे सुरक्षिततेचे मुख्य

उद्दिष्ट आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो कि कंपनी तिच्या 'शुन्य अपघात' या उद्दिष्टाप्रमाणे कार्य करीत असून कामगारांना उच्च दर्जाची सुरक्षितता देत आहे.

### ५.५.७ वाहतुक

प्रवासाचा परिणाम हा कामगारांच्या कार्यक्षमतेवर नक्कीच होत असतो. कामगाराच्या संरक्षणाचा विचार हा कंपनीला करावा लागतो. कामगारांच्या कार्यक्षमतेवर कंपनीची उत्पादकता अवलंबून असते. कामगारांचा जास्त वेळ प्रवासात गेल्यास त्याचा त्यांच्या कामावर परिणाम दिसून येतो. मुलांच्या शिक्षणासाठी कामगारांना शाळेजवळ रहावे लागते. घरापासून कंपनी दूरवर असेल तर प्रवासाचा थकवा येतो. सार्वजनिक वाहनामुळे कामावार जाण्यास उशीर होतो. म्हणून सर्व विचार करता कंपनीने कामगारासाठी वाहतूक व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याचा फायदा कामगारांबरोबरच उत्पादनवाढीलाही होतो. सर्व कामगार, अधिकारी यांनी एकत्रित प्रवास केल्यामुळे विचारांची देवाण—घेवाण, आपुलकी, प्रेम, जिव्हाळा वाढीस लागतो. कंपनीबद्दल आदर वाटायला लागतो. सहजीवन प्रवास व्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. एकमेकांचे अनुभवांची देवाण—घेवाण करता येते. एकंदरीत सार्वजनिक वाहतुकीचाही प्रश्न कमी होतात. प्रदूषण कमी होते. वैयक्तिक वाहनातून अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे कामगार कंपनीच्या वाहनातूनच प्रवास करतात. कामगारांच्या वाहतुक व्यवस्थेविषयी आपल्याला खालील प्रमाणे माहिती मिळते.

तक्ता क्र. ५.२३ वाहतुक सुविधा

| अ.क्र | वाहतुक व्यवस्थेची साधने | लाभ घेणारे कामगार | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कंपनी वाहन (बस) | १६० | ८०% |
| २ | स्वत:चे वाहन | २८ | १४% |
| ३ | सार्वजनिक वाहन | १२ | ०६% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १६० कामगार प्रवासासाठी कंपनीच्या बसचा वापर करतात. त्यांचे प्रमाण (८०%) आहे. तर २८ कामगार हे स्वत:चे वाहन वापरतात त्यांचे प्रमाण (१४%) आहे तर १२ कामगार हे सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा उपयोग करतात त्यांचे प्रमाण (६%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारापैकी १६० कामगार हे कंपनीच्या बसने प्रवास करतात. या कामगारांना एकत्रित प्रवास करणे सोयीस्कर आहे. या कामगारांना एकत्रित प्रवास करणे महत्त्वाचे वाटते. प्रवासाचा वेळ वाचतो. वैयक्तिक प्रवासाची जोखीम कमी होते. खर्चामध्ये बचत होते. प्रदूषण कमी होते. एकत्रित प्रवासामुळे विचारांची देवाणघेवाण होते. इ. फायदे कंपनीच्या वाहतुक व्यवस्थेमुळे होतात या वाहतुक व्यवस्थेचा उपयोग (८०%) कामगार करतात. २०० कामगारांपैकी २८ कामगार हे स्वत:चे वाहन वापरतात कारण या कामगारांपैकी २८ कामगार हे आपल्या शेताच्या ठिकाणी राहतात तेथे रस्ते खराब आहेत. रस्ते लहान आहेत. म्हणून कामगार स्वत:च्या वाहनाचा उपयोग करतात. त्यांचे प्रमाण (१४%) इतके आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील १२ कामगार हे सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा उपयोग करतात. कारण हे कामगार राहतात त्या ठिकाणाहून त्यांना कंपनीपर्यंत एस.टी सेवा सतत उपलब्ध असते. त्यामुळे १२ कामगार हे सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा वापर करतात. त्यांचे प्रमाण (६%) इतके आहे.

### ५.५.८ कामाच्या ठिकाणची परिस्थिती

कामगारांच्या कार्यक्षमतेवर कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीचा चांगला वाईट परिणाम घडून येत असतो. कामगारांच्या दृष्टीने प्रकल्प हा चांगल्या ठिकाणी असणे व त्यातील व्यवस्था चांगली असणे आवश्यक असते. प्रकल्पातील वातावरण आणि कामाचे स्वरूप चांगले असेल तर कामगारांना काम करण्यास उत्साह येतो.

प्रकल्प जसा उत्पादनाच्या दृष्टीने सुरू केला जातो तसा तो प्रकल्प चांगल्या ठिकाणी असणे आतील व्यवस्था चांगली असणे कामगारांच्या दृष्टीने आवश्यक असते. फक्त वेतन चांगले असावे असे कामगारांचे ध्येय नसते तर जे काम करतो त्या कामासंबंधी त्याच्या इतरही आकांशा असतात. कामात स्वातंत्र्य वरिष्ठांशी चांगले संबंध, सहकाऱ्याबरोबर मैत्रींचे संबंध मोकळेपणोच संबंध असणे फायदेशीर ठरते. प्रकल्पातील कामगारांची कामाच्या ठिकाणची परिस्थिती खालील तक्त्यानुसार अभ्यासली आहे.

तक्ता क्र ५.२४ कामाच्या ठिकाणची परिस्थिती

| अ.क्र | कामाच्या ठिकाणची परिस्थिती | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | चांगली | १८८ | ९४% |
| २ | बरी | १२ | ०६% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १८८ कामगारांनी कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली आहे असे सांगितले आहे. त्यांचे प्रमाण (९४%) आहे. फक्त १२ कामगारांनी कामाच्या ठिकाणची परिस्थिती बरी आहे असे मत नोंदविले आहे त्यांचे प्रमाण (६%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाने प्रकल्पामध्ये कामगारांना आवश्यक त्या सोयी उपलब्ध केल्या आहेत. प्रकल्पातील स्वच्छता, पाणी, स्वच्छतागृहे ही चांगल्या प्रकारची आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त कामगारांनी कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली असे सांगितले. म्हणजेच कामाच्या ठिकाणी कामगार समाधानी आहे.

### ५.५.९ कामाच्या वेळा

कार्यक्षमता वाढविण्यासाठी व नवीन निर्मितीसाठी कामामध्ये सतत नाविन्यपूर्ण बदल अपेक्षित असतो. कंपनीमध्ये कामगारांना सतत मशीनवर काम करावे लागते. तेच ते वातावरणात काम करताना कामगारांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे कंपनीमध्ये कामगारांच्या वेळा सतत बदलत असतात. वेळामध्ये बदल केल्याने सर्वच कामगारांना विश्रांती मिळते. कुटूंबाला वेळ देता येतो. घरची कामे करता येतात. त्यामुळे कामगारांचे मानसिक आरोग्य चांगले राहते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कामाच्या वेळा कशा आहेत याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.२५ कामाच्या वेळा

| अ. क्र | कामगारांचे गट | कामगारांची गटातील संख्या | कामाची वेळ | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | A | ६२ | सकाळी ७:०० | ३१% |
| २ | B | ६० | दुपारी ३:०० | ३०% |
| ३ | C | ६० | रात्री: ११.०० | ३०% |
| ४ | General | १८ | सकाळी: ९:०० | ९% |
| | एकूण | २०० | | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये एकूण कामागरांचे सारखे तीन गट केले आहेत व चौथा गट हा प्रशासनासंबंधी काम करतो. कामगारांचे अ गटाचे कामकाज सकाळी ७:०० वाजता सुरू होते. त्यामध्ये एकूण ६२ लोक काम करतात. त्यांचे प्रमाण (३१%) आहे. ब गटामध्ये ६० लोक काम करतात त्यांचे प्रमाण (३०%) आहे तर क गटामध्ये ६० लोक काम करतात. त्यांचे प्रमाण

(३०%) आहे. तर जनरल शिफ्टमध्ये १८ कामगार काम करतात त्यांचे प्रमाण (९%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील सर्व कामगारांना समान न्याय मिळावा यासाठी ग्रुप करून त्यांच्या वेळा ठरवून दिलेल्या आहेत. प्रत्येक आठवडयाला ग्रुपच्या कामगारांच्या वेळा बदलल्या जातात. (म्हणजेच एका ग्रुपने एक आठवडा त्याच वेळेमध्ये काम करावयाचे) त्यामुळे सर्व कामगारांना समान न्याय मिळतो. यावरून असा निष्कर्ष निघतो की सर्व कामगारांना समान संधी उपलब्ध करून दिली जाते.

### ५.५.१० निवास सुविधा

ज्या ठिकाणी एम.आय.डी.सी स्थापन केली आहे. त्या ठिकाणी एम.आय. डी.सी. ने प्रत्येक कंपन्यांच्या मागणीप्रमाणे कामगारांच्या निवासस्थानासाठी जागा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या जागावर कंपन्या आपल्या वसाहती निर्माण करून कामगारांना निवासाची सोय उपलब्ध करून देतात. कामगारांचा प्रवासातील वेळ वाचतो. प्रवासावरील खर्च कमी होतो. सुरक्षितता वाढते. इत्यादी फायदे होतात. अशा कामगार वसाहतीजवळ, शाळा, दवाखाने, पोस्ट ऑफिस, मार्केट ची सोय असते. कामगार वसाहतीमध्ये सर्वसाधारणपणे एकाच प्रकारची घरे असतात. कारण एकमेकांबद्दल दुजाभाव निर्माण होत नाही. कंपनीबद्दल आपुलकी निर्माण होते. काही कामगार स्वत:चे निवासस्थानी राहतात. कामगारांना बँक कर्ज देतात त्यामुळे अनेक कामगारांनी कर्ज घेऊन घरे बांधली आहेत. कंपनीने उपलब्ध करून दिलेल्या निवासस्थानाचा किती कामगार वापर करतात त्याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र ५.२६ निवास सुविधा

| अ.क्र | निवास व्यवस्था | कामगारांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कंपनीचे निवास | ८६ | ४३% |
| २ | स्वत:चे निवास | १०८ | ५४% |
| ३ | भाडेतत्वावर निवास | ०६ | ०३% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडने दिलेल्या निवास सुविधेचा उपयोग ८६ कामगार करतात. त्यांचे शेकडा प्रमाण (४३%) आहे. १०८ कामगार हे स्वत:च्यां निवासस्थानात राहतात त्यांचे प्रमाण (५४%) आहे. भाडेतत्वावर राहणारे ०३ कामगार असून त्यांचे प्रमाण (३%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पाने कामगारांसाठी केलेल्या निवास सुविधेचा उपयोग कमी कामगार करतात. ५४% कामगार स्वत:च्या निवासस्थानी राहत आहेत. कारण यातील बरेच कामगार स्थानिक आहेत. बँकेकडून कर्ज सुविधा उपलब्ध होत असल्यामुळे अनेक कामगारांनी स्वत:ची घरे बांधली आहेत.

**५.५.११ बचत**

बचतीची सवय ही एक उत्तम सवय आहे. बचतीमधून मोठया वस्तूंची खरेदी करता येते. बचतीचा वापर विकास कार्यासाठी करता येतो. बचतीमधून मोठी रक्कम जमा होते.

बचतीमुळे काटकसरीची सवय लागते. वेगवेगळया बँकामार्फत सर्वांना बचतीचे प्रोत्साहन दिले जाते. भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे काळाची गरज झाली आहे. अचानक पैशाची गरज निर्माण झाल्यास बचत उपयोगी येते. स्पर्धेच्या युगात मुलांच्या उच्च शिक्षणासाठी बचतीचा चांगला उपयोग होतो. उत्पन्नातील काही रक्कम भविष्यकालीन तरतूदीसाठी बाजूला काढणे हे व्यक्तीच्या हिताचे

असते. बचतीचे गुंतवणूकीत रूपांतर केले तर उत्पन्नातही वाढ होते. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील २०० कामगारांपैकी किती कामगार बचत करतात याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.२७ बचत

| अ.क्र | कामगारांचा वर्ग | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बचत करणारे कामगार | १६८ | ८४% |
| २ | बचत न करणारे कामगार | ३२ | १६% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १६८ कामगार बचत करतात. त्यांचे प्रमाण (८४%) आहे तर ३२ कामगार बचत करत नाहीत त्यांचे प्रमाण (१६%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील बचत करणाऱ्या कामगारांची संख्या (८४%) आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, कामगारांनी बचतीचे महत्त्व पटलेले आहे. आर्थिक नियोजन कामगार करू लागले आहेत.

### ५.५.१२ अर्थसहाय्य कर्ज

मानवाच्या गरजा पूर्ण व्हाव्यात असे प्रत्येक व्यक्तीला वाटत असते. तो त्यासाठी सतत प्रयत्न करत असतो. कामगार वर्ग हा तृतीय/ चतुर्थ श्रेणीत मोडत असल्याने त्याचे वेतन इतर वर्गापेक्षा कमी असते. साहजिक त्याला स्वत:चे घर घेण्यासाठी बँकेची मदत घ्यावी लागते. कारण बचतीमधून तो फार मोठी रक्कम उभी करू शकत नाही. त्यासाठी बचतीच्या रक्कमेच्या जोडीला काही कर्ज घ्यावी लागतात. या शिवाय कामगार वर्ग नोकरीबरोबर एखादा जोडधंदाही करत असतो. साहजिकच त्याला अर्थसहाय्याची गरज भासते. बँकेकडून कर्ज मिळाल्यामुळे

विकास कार्यास हातभार लागतो. श्रायबर डायनामिक्स डेअरी मधील कामगारांनी अर्थसहाय्य घेतले आहे किंवा नाही याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र ५.२८ अर्थसहाय्य (कर्ज)

| अ.क्र | अर्थसहाय्य घेतले आहे का | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १०९ | ५४.०५% |
| २ | नाही | ९१ | ४५.५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १०९ कामगारांनी अर्थसहाय्य घेतले आहे. त्यांचे प्रमाण (५४.५%) आहे. ९१ कामगारांनी अर्थसहाय्य घेतले नाही त्यांचे प्रमाण (४५.५%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मधील ५४.५% कामगारांनी कर्ज घेतले आहे. या कर्जाचा उपयोग त्यांनी जोडव्यवसाय व घरबांधणी या कारणाकरिता केलेला आहे. ९१ कामगारांनी कर्ज घेतलेले नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की, मोठया विकास कामासाठी कामगारांनी बँकेचे अर्थसहाय्य घेतले आहे.

### ५.५.१३ जोडव्यवसाय

फावल्या वेळेचा सदुपयोग व्हावा, राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी जोडव्यवसायातून अर्थाजन व्हावे. मुलांना दर्जेदार शिक्षण घेता यावे. म्हणून जोडव्यवसाय केला जातो.

जोडव्यवसाय करत असताना अनुकूल वातावरणाचा विचार केला जातो. आजच्या या धकाधकीच्या युगात घरातील एका व्यक्तीच्या उत्पन्नावर जीवन जगणे अवघड आहे. त्यासाठी घरातील इतर व्यक्तींनीही काहीतरी व्यवसाय नोकरी करावी लागते. नोकरी सहजासहजी उपलब्ध होत नाही. तसेच नोकरीत मर्यादित

उत्पन्न मिळते. त्यामुळे जोडव्यवसाय करणे केव्हाही चांगले असते. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील अनेक कामगार जोडव्यवसाय करीत आहेत. किती कामगार जोडव्यवसाय करीत आहेत याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.२९ जोडव्यवसाय करणाऱ्यांची संख्या

| अ.क्र | जोड व्यवसाय | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | १३७ | ६८.५% |
| २ | नाही | ६३ | ३१.०५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १३७ कामगार जोडव्यवसाय करतात. त्यांचे प्रमाण (६८.५%) आहे. ६३ कामगार जोडव्यवसाय करत नाहीत त्यांचे प्रमाण (३१.५%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगारांना जोडव्यवसायासाठी अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे अनेक कामगार जोडधंदा करीत आहेत.

## ५.६ शिक्षण

### ५.६.१ औद्योगिक प्रशिक्षण

शिक्षण हे ज्ञानवृद्धीसाठी अत्यंत आवश्यक असते. कामगारांचे शिक्षण व प्रशिक्षण, कौशल्ये यांचे ज्ञान उद्योगधंदयामध्ये फार महत्त्वाचे आहे. कामगारांनी त्यांच्यावर सोपविलेले विशिष्ट प्रकारचे काम व्यवस्थितपणे करणे अत्यंत आवश्यक असते. सतत नवनवीन गोष्टी त्याने आत्मसात करणे गरजेचे आहे त्याच्या कार्यक्षमतेवर उद्योगधंदयाची उत्पादन क्षमता अवलंबून असते.

वस्तूंचे उत्पादन वेळेवर व दर्जेदार होण्यासाठी कामगारांच्या कौशल्यात वाढ करण्यासाठी कामगारांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील किती कामगारांनी औद्योगिक प्रशिक्षण घेतले आहे त्याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.३० औद्योगिक प्रशिक्षण

| अ.क्र | प्रशिक्षण घेतले | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | ११० | ५५% |
| २ | नाही | ९० | ४५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील २०० कामगारांपैकी ११० कामगारांनी प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यांचे प्रमाण (५५%) आहे. ९० कामगारांनी प्रशिक्षण घेतलेले नाही. त्यांचे प्रमाण (४५%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५०% पेक्षा अधिक कामगारांनी प्रशिक्षण घेतलेले आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो या कंपनीमध्ये प्रशिक्षित उमेदवारांना नोकरीसाठी प्राधान्य दिले जाते.

शिक्षण म्हणजे सुसंस्कार असा शिक्षणाचा अर्थ आहे. शिक्षण हे सर्वांगीण विकास करण्याचे एक प्रभावी साधन आहे. शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. सामाजिक व राष्ट्रीय प्रगतीचा आधार म्हणजे शिक्षण होय. प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीकोनातून शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणामुळे व्यक्ती ज्ञानसंपन्न व चारित्र्यसंपन्न बनते. शिक्षण हे व्यक्तीमत्त्व विकासाचा एक मूलाधार आहे.

मानवी जीवनात शिक्षणाला फार महत्त्व आहे. शिक्षण म्हणजे ज्ञान होय. बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर मानवाने प्रत्येक क्षेत्रात आपली नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. माणसाला शिक्षणामुळेच श्रेष्ठत्व लाभते. म्हणून श्रायबर डायनामिक्स डेअरी

प्रकल्पातील कामगारांच्या शैक्षणिक घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ५.६.२ कंपनी अंतर्गत प्रशिक्षण

प्रशिक्षण व शिक्षण यामध्ये फरक आहे. कार्यकौशल्य व कार्यातील सुधारणा करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक असते. कर्मचारी काम करत असताना अनावश्यक हालचाली करीत असतो. त्यामुळे त्याच्या हातून अधिक चांगले कार्य होत नाही. या दोन्ही बाबी एकाच वेळी साध्य करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. वस्तूंचे उत्पादन वेळेवर व दर्जेदार होण्यासाठी कर्मचारी कौशल्यात वाढ करण्यासाठी ज्ञान व कौशल्य जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न केला जातो.

कोणताही कर्मचारी कौशल्यपूर्ण असत नाही. त्याच्या अंगी चांगले गुण येण्यासाठी त्याला वेगवेगळे ज्ञान, कौशल्य व शिक्षण दयावे लागते. असे अतिरिक्त कौशल्य वेगवेगळया पद्धतीने दयावे लागते. यामध्ये प्रशिक्षण देणाऱ्या संस्था असतात. अनुभवी कर्मचाऱ्यांकडूनही प्रशिक्षण दिले जाते. काही कंपन्यात पर्यवेक्षकाद्वारे प्रशिक्षण देतात. कधी कधी कार्यातून प्रशिक्षण दिले जाते. उद्देश कर्मचारी कौशल्यात वाढ करणे. त्याची कार्यक्षमता वाढावी जलद गतीने किंवा अधिक गतीने योग्य काम कसे करावे याचे ज्ञान दिले जाते. ते प्रशिक्षण उद्योगात महत्त्वाचे असते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कामगारांना कंपनीद्वारे प्रशिक्षण देऊन त्यांच्या कौशल्य व ज्ञानात वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचा फायदा कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ होते व कमी वेळात दर्जेदार वस्तूंचे उत्पादन होत असते. म्हणून या प्रकल्पातील कामगार वर्गातील प्रशिक्षण किती कर्मचारी वर्गाने घेतले ते खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. ५.३१ कंपनी अंतर्गत प्रशिक्षण.

| अ.क्र | प्रशिक्षण | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | घेतले | २०० | १००% |
| २ | घेतले नाही | — | — |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण | २०० | १००% |

आधारः प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचनः** श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील २०० कामगारांनी वेळोवेळी प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यांचे प्रमाण १००% इतके आहे. व प्रशिक्षण न घेतलेले एकही कामगार कंपनीमध्ये नाही.

**निष्कर्षः** या प्रकल्पामध्ये सर्वच कामगारांना प्रशिक्षण दिले जाते. कारण नवनवीन तंत्रज्ञानाचा सतत वापर कंपनीमध्ये केला जातो. नेहमीच नवनवीन गोष्टी निर्माण होतात. कर्मचाऱ्यांसाठी नवीन गोष्टी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे लागते. हया हेतूने प्रशिक्षण दिले जाते. प्रकल्पामध्ये स्वतंत्रपणे प्रशिक्षण विभाग आहे. प्रशिक्षणामधून कामगार वर्गाची कार्यक्षमता वाढते. नवनवीन कौशल्ये आत्मसात होतात. पर्यायाने याचा फायदा प्रकल्पाला होतो. तसेच कामगारांना ही होतो.

कामगारांच्या कौशल्यात वाढ करण्यासाठी विशेष करून देण्यात येणारे प्रशिक्षण महत्त्वाचे असते. म्हणून प्रशिक्षणाची ही एक पद्धत उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

## ५.७ सामाजिक

### ५.७.१ स्त्री — पुरूष कामगार

कारखानदारीमध्ये पूर्वीच्या काळी महिला कामगार नव्हत्या. असल्या तरी त्या प्रशासकीय कामामध्ये होत्या. त्यांचे प्रमाण अगदी कमी होते. भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्यानंतर अनेक परदेशी कंपन्या भारतामध्ये येऊ लागल्या. विशेषतः आय.टी क्षेत्रामध्ये महिलांना जास्तीत जास्त संधी मिळत गेली. औद्योगिक क्षेत्रामध्येही महिलांनी प्रवेश केला. अजूनही औद्योगिक क्षेत्रामध्ये महिलांचे प्रमाण फारच कमी आहे. कारखान्यामध्ये शिप्ट मध्ये काम चालते. औद्योगिक कारखान्यात जड सामान असते. त्यांची ने आण करणे, उचलणे, ठेवणे यासारखी कामे स्त्रिया करू शकत नाहीत. त्यामुळे महिला कामगारांचे प्रमाण खुपच कमी आहे.

काही कंपन्यामध्ये उदा. बारामती येथील 'इमसोफर' या चॉकलेट तयार करणाऱ्या कंपनीमध्ये ८०% महिला कामगार आहेत. तसेच 'बारामती हायटेक टेक्सटाईल्स पार्क' येथेही सर्व महिला कामगार आहेत. या दोन्ही कंपन्यामध्ये जड वस्तूंशी महिलांचा संबंध येत नाही. तसेच या कंपन्यामध्ये महिला कामगारांसाठी दिवसभरात दोन शिफ्टमध्ये काम चालते. त्यामुळे या कंपन्यामध्ये महिला कामगार जास्त आहेत.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये किती महिला कामगार आहेत याचा आढावा घेतला आहे.

तक्ता क्र. ५.३२ स्त्री – पुरूष वर्गीकरण

| अ.क्र | कामगार | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | १९२ | ९६% |
| २ | स्त्री | ०८ | ०४% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १९२ पुरूष कामगार आहेत. त्याचे प्रमाण (९६%) आहे तर फक्त ०८ महिला कामगार आहेत. त्यांचे प्रमाण (०४%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड कंपनीने महिला कामगारांना नोकरीत अतिशय कमी प्रमाणात प्राधान्य दिलेले आहे. महिलांचे केवळ प्रमाण (०४%) आहे.

### ५.७.२ स्थलांतर

स्थलांतर हा घटक विचारात घेता असे दिसते की व्यक्ती अनेक कारणास्तव स्थलांतर करीत असतात. कोणी आर्थिक कारणासाठी (रोजगारासाठी) स्थलांतर करतो तर कोणी सामाजिक समस्येमुळे तर कोणी नैसर्गिक आपत्तीमुळे स्थलांतर

करीत असतो. काही गावागावांमध्येच काही जिल्हयामध्ये तर काही राज्यांमध्ये स्थलांतर करीत असतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये काही कामगार हे जवळच्या गावातून आलेले आहेत. काही कामगार शेजारील जिल्हयातून आलेले आहेत. काही कामगार परराराज्यातून आलेले आहेत. या सर्वांचा हेतू एकच आहे तो म्हणजे निश्चित स्वरूपाची अर्थप्राप्ती, स्थलांतर या संकल्पनेमध्ये, दोन ठिकाणातील अंतर जाण्याचा हेतू व कालावधी या तीन बाबींना महत्त्व आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील वेगवेगळया स्थलांतरितांचे प्रमाण अभ्यासले आहे.

तक्ता क्र. ५.३३ स्थलांतरीत

| अ.क्र | कामगाराचे स्थान | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक कामगार | ४४ | २२% |
| २ | स्थानिक स्थलांतर | ३७ | १८.५% |
| ३ | राज्यांतर्गत स्थलांतर | ६८ | ३४% |
| ४ | आंतरराज्यीय स्थलांतर | ५१ | २५.५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगारापैकी

- ४४ कामगार हे स्थानिक आहेत त्यांचे प्रमाण (२२%) आहे.
- ३७ कामगार हे स्थानिक स्थलांतरित आहेत. त्यांचे प्रमाण (१८.५%) आहे.
- ६८ कामगार हे राज्यांतर्गत स्थलांतरित आहेत. त्यांचे प्रमाण (३४%) आहे.
- ५१ कामगार हे पर प्रांतीय आहेत. त्यांचे प्रमाण (२५.५%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात आले आहे. स्थानिकाबरोबर इतर तालुक्यातील व इतर जिल्हयातील कामगारांनाही

सामावून घेतले आहे. तसेच पर प्रांतीय कामगारांचेही प्रमाण (२५%) आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो कि, प्रकल्पामध्ये राज्यातील अनेक भागातून कामगार नोकरीसाठी आले आहेत. म्हणजेच या कामगारांची निवड ही शैक्षणिक अर्हता, अनुभव या आधारावर केलेली आहे.

**५.७.३ प्राथमिक आर्थिक आधार**

प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुवतीनुसार काही ना काहीतरी करावेच लागते. तरच त्या व्यक्तीचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागत असतो. अर्थाजनासाठी समाज जीवनात राहूनच तिला काहीतरी करावयाचे असते. काहीजण व्यवसाय करतात तर काहीजण शेती करतात. तर काही नोकरी करतात. नोकरी करणाऱ्यांचे ही व्यवसायानुरूप अनेक प्रकार आहेत. काही डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, शिक्षक, लिपिक तर काहीजण मजूरी करतात. या कामगारांचा प्राथमिक आर्थिक आधार आहे का? हे पाहण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील कामगारांचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र. ५.३४ प्राथमिक आर्थिक आधार

| अ.क्र | प्राथमिक आधार | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १३७ | ६८.५% |
| २ | नाही. | ६३ | ३१.५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १३७ कामगारांना प्राथमिक आर्थिक आधार आहे. त्यांचे प्रमाण (६८.५%) आहे तर ६३ कामगारांना प्राथमिक आर्थिक आधार नाही त्यांचे प्रमाण (३१.५%) आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये बरेचसे कामगार हे स्थानिक आहेत. त्यांचेकडे शेती आहे. तसेच ते इतर व्यवसायही करत आहेत. त्यामुळे (६८.५%) लोकांना प्राथमिक आर्थिक आधार आहे. तर (३१.५%) कामगारांना आर्थिक आधार नाही. कारण यातील (६३) कामगार हे परप्रांतीय आहेत. ते येथे नोकरीला आलेले असल्यामुळे दूसरा कोणताही प्राथमिक आधार नाही.

यावरून असा निष्कर्ष निघतो की जास्तीत जास्त कामगारांचा प्राथमिक आर्थिक आधार हा नोकरी नाही.

**सांस्कृतिक:** व्यक्तीच्या जीवनामध्ये सांस्कृतिक पैलूंना फार महत्त्व आहे. तो जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यक्तींना आनंद व समाधान मिळत आहे. तो त्यासाठी सतत प्रयत्न करत असतो. मानवी समाजात अस्तित्वात असणाऱ्या सांस्कृतिक घटकासंबंधीच्या ज्ञानाला फार महत्त्व आहे. साहित्य, मनोरंजन इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या आहेत. विविध कलागुणांना वाव देणे, साहित्याची ओळख करून घेणे इत्यादी विविध मनोरंजनाच्या साधनांनी व्यक्तीच्या जीवनात नाविन्य प्राप्त होत असून उत्साह वाढतो. मनोरंजनातून फावला वेळ सत्कारणी लागतो.

कामाशिवाय समाजात घडणाऱ्या घटनांशी आपलाही संबंध असावा त्यात आपण सहभागी व्हावे. त्यांच्या आपण उपभोग घ्यावा  असे कर्मचाऱ्याला वाटत असते. मानवी स्वभावाचे ते एक लक्षण असते. कामगार त्याला अपवाद ठरू शकत नाही.

सतत काम केल्यानंतर कामगाराला फुरसतीच्या वेळ हवा असतो. सततच्या कामाने कंटाळा येतो. त्यामुळे कामगाराला विरंगुळा हवा असतो. म्हणून तो आपल्या आर्थिक कुवतीनुसार झेपेल असा मार्ग विरंगुळयासाठी  शोधून जीवनात आनंद निर्माण करीत असतो.

## ५.८ सांस्कृतिक

### ५.८.१ नोकरीमुळे सामाजिक सन्मानात वाढ

आर्थिक सुबत्ता व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त करून देत असते. नोकरीमुळे कामगारांना आर्थिक सुरक्षितता प्राप्त होते. नोकरीमुळे बचत, विमा व सोयीसुविधा प्राप्त होतात. आर्थिक प्राप्तीची हमी असल्यामुळे बचतीचे नियोजन करता येऊ लागले. विमा पॉलिसी घेऊन आरोग्याचे प्रश्नही सुटू लागले. कुटूंबातील सर्व जबाबदाऱ्या वेळेच्या वेळी पार पडू लागल्या. कुटूंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले त्यामुळे व्यक्तीच्या सामाजिक सन्मानात वाढ झालेली दिसून येते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगारांची सामाजिक सन्मानात झालेली वाढ खालील प्रमाणे दाखविता येईल.

तक्ता क्र. ५.३५ सामाजिक सन्मानात वाढ

| अ.क्र | नोकरीमुळे सामाजिक सन्मान | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सन्मानामध्ये वाढ झाली आहे. | १९० | ९५% |
| २ | सन्मानामध्ये वाढ झाली नाही. | १० | ०५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील १९० कामगारांचे मतानुसार नोकरीमुळे सन्मानात वाढ झाली आहे. त्यांचे प्रमाण ९५% आहे. २) नोकरीमुळे सामाजिक सन्मानामध्ये वाढ झाली नाही असे ५% कामगारांना वाटते.

**निष्कर्ष:** १) श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामगारांच्या सामाजिक सन्मानामध्ये वाढ झाली असे १९० कामगारांनी सांगितले आहे. कारण कंपनीतील कामगार हा सर्वसामान्य कुटूंबातील आहेत. घर बांधणीसाठी किंवा वाहन खरेदीसाठी त्यांची आर्थिक परिस्थिती नसतानाही केवळ कंपनीच्या पाठिंब्यामुळे त्यांना बँकांनी अर्थसहाय्य केले आहे. कामगारांच्या विकासामध्ये कंपनीचा फार मोठा सहभाग

आहे. त्या कारणाने नोकरीमुळे सामाजिक सन्मानात वाढ झाली आहे असे ९५% कामगारांचे मत आहे.

२) श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील १० कामगार हे नोकरीमुळे सामाजिक सन्मानात वाढ झाली नाही असे म्हणतात. कारण या कामगारांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. त्यांची घरची परिस्थिती चांगली आहे. नोकरी हा त्यांचा दुय्यम स्त्रोत आहे. त्यामुळे कंपनीतील १० कामगारांचे मतानुसार नोकरीमुळे त्यांच्या सामाजिक सन्मानात वाढ झालेली नाही. त्यांचे प्रमाण ५% इतके आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमधील कामगारांना कंपनीच्या हमीमुळे बँकामधून अर्थसहाय्य उपलब्ध होऊ लागले आहे. त्यामुळे कामगारांनी घरे बांधली, जोडव्यवसाय सुरू केले, वाहन खरेदी केले इत्यादी गोष्टी अर्थसहाय्यामुळे सुलभ झाल्या आहेत. त्यामुळे साहजिकच कामगारांच्या सामाजिक सन्मानात वाढ झाली आहे. मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश घेता येऊ लागला आहे.

**५.८.२ राहणीमानात बदल:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कामगारांच्या राहणीमानात बदल झालेला आहे. कारण व्यक्तीच्या प्राथमिक गरजा या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या आहेत. श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील कामगारांचे कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन हे त्यांचा पगार आहे. पगारामधून प्राथमिक गरजांची पूर्तता झाल्यानंतर व्यक्ती स्वत:कडे पाहते. व्यक्तीचा समाजाशी सतत संपर्क येत असतो. त्यामुळे इतरांपेक्षा आपण वेगळे दिसू याचा प्रयत्न करीत असते. स्थानिक संस्कृतीशी मिळते जुळते राहण्याचा प्रयत्न करत असते. मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश घेत आहेत. मुलांचे दप्तर, बुट, युनिफॉर्म या बाबतीत शाळेप्रमाणे बदल होतो. शाळेत जाण्यामुळे स्थानिकांशी संपर्क वाढला. त्यातून अनुकरणाने स्वत:च्या राहणीमानामध्ये बदल घडवून आणला.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारांमध्ये राहणीमानामध्ये बदल घडून आला आहे कि नाही याचे अध्ययन केले आहे.

तक्ता क्र. ५.३६ राहणीमानात बदल

| अ.क्र | राहणीमानात बदल | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बदल झाला आहे. | १८० | ९०% |
| २ | बदल झाला नाही. | २० | १०% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १८० कामगारांच्या राहणीमानात बदल झाला आहे. त्यांचे प्रमाण ९०% आहे. २) २०० कामगारांपैकी २० कामगारांमध्ये राहणीमानात बदल झालेला नाही त्यांचे प्रमाण १०% आहे.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १८० कामगारांच्या राहणीमानात बदल झाला आहे. कारण हे कामगार या प्रकल्पामध्ये काम करीत आहेत. त्यांचा स्थानिक लोकांशी संपर्क वाढला आहे. मुलांच्या शाळेत कार्यक्रमानिमित्त जाणे. शाळेतून आणणे, सोडणे, यावेळी स्थानिक लोकांशी संपर्क येतो. त्यामुळे त्यांच्या राहणीमानामध्ये बदल झालेला आहे. त्यांचे प्रमाण ९०% इतके आहे.

२) श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील फक्त २० कामगारांच्यामध्ये राहणीमानात बदल झालेला नाही. कारण यातील १०% कामगार हे नवीन आहेत. त्यांचे प्रमाण १०% आहेत.

### ५.८.३ मनोरंजन:

व्यक्तीच्या जीवनात करमणूकीला अनन्य साधारण महत्त्व आहे. ज्या व्यक्ती किंवा कामगार कारखान्यात काम करतात त्यांना तर करमणूकीची अत्यंत आवश्यकता असते. ज्ञान, आरोग्य, कार्यक्षमता यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने

करमणुकीला खूपच महत्त्व आहे. कल्याणाचा एक भाग म्हणून करणमूकीच्या साधनांची व्यवस्था करून देणे आवश्यक आहे. कारण उत्पादनाच्या दृष्टीने कार्यक्षमता वाढविण्यासाठी कामगारांचे मन व शरीराच्या बाबतीत ते उत्साही असावे लागते.

सेवामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक, कार्यक्रम व इतर मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा समावेश होतो. मैदानी व बैठया खेळाची सोय करणे, क्रिडा स्पर्धाचे आयोजन करणे आवश्यक आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कामगार वर्गासाठी क्रिडा स्पर्धाचे आयोजन दरवर्षी केले जाते. पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण दिंडी, भित्तिचित्र स्पर्धा, निबंध स्पर्धा या सारख्या स्पर्धांचे आयोजन करतात. कामगार वसाहतीमध्ये नाटयगृह, क्रीडांगण इत्यादीची सोय आहे. या माध्यमातून कामगारांचे मनोरंजन केले जाते.

मनोरंजनामुळे कामगारांचे आरोग्य सुधारते. मानसिक आरोग्य सुधारते. थकवा दूर होतो. मन व शरीर पुन्हा कार्यक्षम बनते. फावळा वेळ सत्कारणी लागतो. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मधील किती कामगार मनोरंजनाचा लाभ घेतात ते खालील तक्त्यावरून दिसून येईल.

तक्ता क्र. ५.३७ मनोरंजन

| अ.क्र | मनोरंजन | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सहभागी होतात | १८० | ९०% |
| २ | सहभागी होत नाहीत | २० | १०% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील १८० कामगार मनोरंजनाचा लाभ घेतात तर २० कामगार हे मनोरंजनाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होत नाही.

**निष्कर्ष:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारांपैकी १८० कामगार हे मनोरंजनाचा लाभ होतात. त्याचे प्रमाण ९०% इतके आहे. डायनामिक्सने कामगारांसाठी केलेल्या सोयीसुविधांमुळे कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ झालेली आहे. कामगार वसाहतीमध्ये मनोरंजनासाठी नाटयगृह, खेळाचे मैदान, इत्यादी सोय उपलब्ध करून दिलेली आहे. मनोरंजनाच्या अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे कामगारामध्ये नेहमी चैतन्याचे, उत्साही, समाधानाचे वातावरण असते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील फक्त २० कामगार मनोरंजनाच्या कार्यक्रमामध्ये सामील होत नाही. त्याचे प्रमाण केवळ १०% इतकेच आहे.

**५.८.४ स्त्री कामगार: कामाच्या वेळा**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये महिला अधिकारी व महिला कामगार उपलब्ध आहेत. या दोन्ही वर्गातील महिलांना सर्वसाधारण पाळीमध्येच काम देण्यात आले आहे. कार्यक्षमता वाढविण्यासाठी व नवनिर्मितीसाठी कामामध्ये सतत नाविन्यपूर्ण बदल अपेक्षित असतो.

स्त्री कामगारांना कामगार म्हणून काम करताना पूर्णपणे सुरक्षित वाटते. काम करताना स्त्री – पुरूष भेदभाव जाणवत नाही.

मकर संक्रात, होळी इत्यादी सणामध्ये सर्व जण एकत्र येतात. स्त्री कामगारांची संख्या अत्यल्प असल्यामुळे महिला कामगारांना सर्वसाधारण पाळीमध्ये काम दिले जाते. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामाच्या वेळा या खालील प्रमाणे आहेत.

तक्ता क्र. ५.३८ स्त्री कामगार: कामाच्या वेळा

| अ. क्र | कामगारांचे विभागणी | अ | ब | क | सामान्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामाच्या वेळा | सकाळी ७:०० | दूपारी ३:०० | रात्री ११:०० | सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:०० |
| २ | महिला कामगार | — | — | — | ०८ (४%) |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कामकाजांचे वेळा या सकाळी ७:००, दुपारी ३:०० व रात्री ११:०० अशा आहेत. यामध्ये कामगारांचे अ, ब, क, ड असे गट पाडलेले आहेत.

**निष्कर्ष:** वरील सारणीवरून असे लक्षात येते की, श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील कामकाज हे ३ पाळयांमध्ये चालू असते. त्यांच्या कामकाजाच्या वेळा या सकाळी ७:०० दुपारी: ११:०० व रात्री ९:०० अशा आहेत. जनरल पाळी प्रशासन विभाग ही सकाळी ९:०० वाजता सुरू होते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील सर्व महिला कामगार जनरल शिफ्ट मध्ये कामावर आहे. या प्रकल्पातील महिला कामगार या प्रशासन विभागाशी निगडित कामकाजामध्ये आहे. यांत्रिक कामाशी संबंधित विभागामध्ये एकही महिला कामगार नाही. महिलाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महिलांसाठी जनरल शिफ्ट चांगली आहे. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाने महिला कामगारांसाठी चांगला निर्णय घेतलेला आहे.

## सारांश:

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकारी व कामगारांचे आर्थिक पैलूंचा आढावा घेत असताना वेतन, बोनस, विमा, वैद्यकीय सुविधा इत्यादी बाबतीत अधिकारी व कामगार समाधानी आहेत. तसेच शिक्षणाचा विचार

करत असताना शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण, पुढील शिक्षणासाठी प्रयत्न केले आहेत. मुलांचे शिक्षणाचे बाबतीत सर्तकता, कंपनीमध्ये काम करत असताना काही शैक्षणिक समस्या उदा. स्वयंप्रशिक्षण या संबंधीत चांगले निर्णय घेतले आहेत. तसेच सामाजिक घटकांचा अभ्यास करत असताना स्त्री पुरूष वर्गीकरण, प्राथमिक आर्थिक आधार, स्थलांतरिता, सामाजिक संम्मीलनता या विषयी माहिती घेतली आहे. सांस्कृतिक घटकामध्ये परकेपणा, कार्यसंस्कृती, सण समारंभ, कार्यक्रमातील सहभाग स्थानिकांशी संपर्क वाढल्यामुळे परप्रांतीय व स्थानिकामध्ये देवाणघेवाण वाढली आहे.

## ५.९ दूग्ध व्यावसायिक

- **दूग्धव्यावसायिकांची व्याख्या: दूध उत्पादक (जे असे कार्य ज्याने तुमचा दिवसाचा उदरनिर्वाह होतो).**

  व्यवसाय — पेशा

  व्यावसायिक — व्यवसाय करणारा.

- **दूध व्यावसायिक — श्रायबर डायनामिक्सच्याच संकलन केंद्रास दूध घालतात.**

दूध व्यावसय हा पूर्वी फक्त पुरूष करत होते. स्त्रीचा दूध व्यवसायाला मदत करत होत्या. त्यांच्या श्रमाला मोल नव्हते. हे संशोधकाच्या लक्षात आल्यानंतर बारामतीत काही स्त्रीया या दूग्धव्यवसाय करीत आहे. त्या व्यवसायाने त्यांच्या प्रगतीमध्ये कसा बदल झाला याकडे संशोधकाने लक्ष वेधले आहे.

प्राथमिक व्यवसाय म्हणजे फक्त दूध व्यवसायावर आधारित असणारे दूध उत्पादक हे प्राथमिक व्यवसायात आले आहे.

दुय्यम व्यवसाय — जे शेती करून दूध उत्पादन करतात ते दुय्यम व्यवसायिक आहे.

**उद्दिष्ट क्र. ४ बारामती तालुक्यातील दूग्ध व्यवसायिकांच्या आर्थिक, शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीचा अभ्यास करणे.**

**५.९.१ आर्थिक प्रगती**

मानव सुरूवातीच्या काळापासून उदरनिर्वाहासाठी व जीवनविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी कोणती ना कोणती आर्थिक क्रिया करत आलेला आहे. काळाच्या ओघात आर्थिक क्रियेचे स्वरूप बदलले पण प्रत्येक आर्थिक क्रियेचा विलक्षण परिणाम संपूर्ण मानवी जीवनावर झालेला आहे.

शेती, पशुपालन, उद्योगधंदे, या विविध आर्थिक क्रिया मानवाच्या प्रगतीचे लक्षण आहे. शेतीने मानवाला स्वास्थ व स्थैर्य दिले. शेतीला पूरक व्यवसाय पशुपालन हा मानवाला वरदान ठरला आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आर्थिक क्रियांचा वसा उमटलेला आहे. मानवी जीवनाचा कायापालट करणारा दूग्धव्यवसायाचा अभ्यास करण्यासाठी विविध पैलूंद्वारे माहिति प्राप्त केली आहे. त्यातून दूग्धव्यावसायिकांच्या आर्थिक घटकाच्या अभ्यासामध्ये विविध माध्यमातून प्रगती कशा प्रकारे साधली यांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा अभ्यास करण्यासाठी दूग्ध व्यवसायिकांमधील मुख्यत्त्वेकरून महिलांच्या राहणीमानाचा दर्जा, सामाजिक स्तर व आर्थिक स्वावलंबन यांचा सखोल अभ्यास केला आहे. पारंपारिक व्यवसाय हा आधुनिक पद्धतीने केल्यास त्याला व्यावहारिक स्वरूप प्राप्त होते. विविध आधुनिक यंत्राचा वापर करून दूग्धव्यवसाय केल्यास कमी खर्चात जास्त उत्पादन कशा प्रकारे निघते याचा अभ्यास केला आहे.

**५.९.२ दूग्ध व्यवसाय – शेती पूरक की मुख्य व्यवसाय**

शेतीपूरक व्यवसाय म्हणून दूग्ध व्यवसाय जीवनाचा आधार स्तंभ बनू शकतो. शेती असणाऱ्या शेतकऱ्याकडे घरचा चारा उपलब्ध होत असतो. दूग्ध व्यवसायात प्रामुख्याने चाऱ्याचीच गरज असते. शेतातील चारा उपलब्ध होत असेल तर फार मोठया प्रमाणावर खर्चात बचत होते.

दूग्धव्यवसायातील शेतीसाठी खत उपलब्ध होते. या खतामुळे शेती उत्पादनात वाढ होत आहे. छोटया व्यवसायामधून मुख्य व्यवसायाचे उद्दिष्ट गाठता येते. चिकाटी इच्छाशक्तीच्या जोरावर व्यक्ती व्यवसायात भरारी होऊ शकते. इच्छा शक्तीच्या जोरावर नवनवीन गोष्टी, नवीन तंत्रज्ञान अवगत करण्याची कला माणसाला व्यवसायात भरारी घ्यायला शिकविते. नोकरीपेक्षा जास्त पैसा व्यवसायात मिळतो. कारण शारीरिक व बौद्धिक क्षमतेचा वापर व्यवसायात करता येतो. या व्यवसायामुळे कुटूंबातील इतर सदस्यांनाही रोजगार उपलब्ध होतो. दूग्ध व्यवसाय शेतीपूरक आहे की मुख्य यासाठी संशोधिकेने अध्ययन केले आहे.

तक्ता क्र ५.३९ व्यवसाय प्रकार

| अ.क्र | व्यवसाय प्रकार | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुख्य व्यवसाय (दूग्ध) | ८० | ४०% |
| २ | शेतीपूरक व्यवसाय | १२० | ६०% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी ८० दूग्ध व्यावसायिक मुख्य व्यवसाय म्हणून दूग्ध व्यवसाय करतात. त्याचे प्रमाण (४०%) आहे व २०० दूग्धव्यावसायापैकी १२० दूग्ध व्यावसायिक शेतीपूरक व्यवसाय म्हणून दूग्ध व्यवसाय करतात.

**निष्कर्ष:** २०० दूग्ध दूग्धव्यवसायिकांपैकी ८० दूग्ध व्यावसायिक हे दूधाचा मुख्य व्यवसाय करतात. कारण दूध व्यवसायाची आवड, दर पंधरा दिवसांनी मिळणारे रोख पैसे, आधुनिक पद्धतीने करता येते. डेअरीकडून सोयी सुविधा मिळतात. त्यामुळे (४०%) दूग्ध व्यवसायिकांचा मुख्य व्यवसाय आहे.

२०० दूग्ध व्यवसायिकांपैकी १२० दूग्ध व्यवसायिक हा पूरक व्यवसाय म्हणून करतात. कारण यापैकी काही दूग्ध व्यवसायिकाकडे जास्त प्रमाणात जमीन

उपलब्ध असल्यामुळे शेती हा मुख्य व्यवसाय आहे. काही लोकांना नोकरी हा व्यवसाय आहे तर काही जण शेतमजूर आहेत. त्यामुळे (६०%) लोकांचा दूग्ध व्यवसाय हा पूरक व्यवसाय आहे.

**५.९.३ रोजची दूध विक्री:**

आज आधुनिक पद्धतीने कोणताही व्यवसाय केल्यास तो फायदेशीर ठरतो. नोकरीपेक्षा व्यवसायात प्रगती करता येते, रोख स्वरूपात उत्पन्न मिळते. बारामती तालुक्यामध्ये दूग्ध व्यवसायात भरभराटीस आला आहे. कारण दूधापासून दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणारा प्रकल्प बारामतीमध्ये सुरू झाला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामुळे अतिरिक्त दूधाचा प्रश्न सुटलेला आहे. व दूधाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. त्यामुळे दूध उत्पादन वाढीला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. बारामती परिसरातील शेतकरी सकाळी व संध्याकाळी सरासरी किती दूध घालतात याचे अध्ययन संशोधनकर्तीने केले आहे.

२०० दूग्ध दूग्धव्यवसायिकांपैकी एका दूग्ध व्यावसायिकांडील सरासरी ७ गायांचे एका दिवसाचे सरासरी दूध

तक्ता क्र. ५.४० सरासरी दूध

| अ.क्र | दूग्ध व्यावसायिक संख्या | एका कुटूंबातील सरासरी गाईची संख्या | दूध काढण्यासाठी वेळ | लिटर्समध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | १ | ०७ | सकाळ | ३५ लिटर |
| | | | संध्याकाळ | २४.५ लिटर |
| | | एका दिवसाचे सरासरी उत्पन्न | | ५९.५ लिटर |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्धव्यावसायिकांपैकी एका दूग्ध व्यावसायिकांकडील ७ गायांचे एक दिवसांचे सरासरी दूध उत्पादन ५९.५ लिटर एवढे आहे.

**निष्कर्ष:** बारामती तालुक्यातील २०० दूग्ध व्यावसायिकांकडे असणाऱ्या गाईंच्या संख्येवरून एका दूग्ध व्यावसायिकांकडे सरासरी ७ गाई आहेत. असे निदर्शनास आले. त्यावरून एका दूग्ध व्यवसायिकांकडील गायांचे एका दिवसाचे सरारसरी दूध उत्पादन ५९.५ लिटर्स एवढे आहे.

## ५.१० शिक्षण

### ५.१०.१ दूग्ध व्यावसायिकांचे शिक्षण

शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षणशिवाय पर्याय नाही. आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये शिक्षणाला फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने ज्ञान मिळविणे गरजेचे आहे. शिक्षणाचा उपयोग आपल्याला आपल्या व्यवहारी जीवनामध्ये करता येतो. कोणतेही दिलेले काम, कमी वेळात, कमी श्रमात, कमी खर्चात, आनंदाने दर्जेदार काम करण्यासाठी जी पद्धती किंवा तंत्र वापरतात ते शिकणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षण होय. तसे शिकणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. ती अखंडपणे चालू राहते. परंतु स्पर्धेत टिकण्यासाठी दर्जेदार शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे.

तक्ता क्र ५.४१ दूग्ध व्यावसायिकांचा शिक्षणाचा स्तर

| अ.क्र | दूग्ध व्यावसायिकांच्या शिक्षणाचा स्तर | दूग्ध व्यावसायिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ०० | ००% |
| २ | प्राथमिक | ०६ | ०३% |
| ३ | माध्यमिक | २२ | ११% |
| ४ | उच्च माध्यमिक | ७४ | ३७% |
| ५ | पदवीधर | ६८ | ३४% |
| ६ | पदव्युत्तर पदवी | ३० | १५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी निरक्षर कोणीही नाही. प्राथमिक शिक्षण घेतलेले ०६ दूग्धव्यावसायिक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण (०३%) इतके आहे. माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतलेले एकूण २२ दूग्धव्यावसायिक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण (११%) इतके आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले ७४ दूग्धव्यवसायिक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण (३७%) इतके आहे. पदवीधर दूग्धव्यवसायिकांची संख्या ६८ आहे. त्यांचे शेकडा प्रमाण (३४%) इतके आहे. तर पदव्युत्तर पदवी घेतलेले दूग्धव्यावसायिक ३० आहेत त्यांचे शेकडा प्रमाण (१५%) इतके आहे.

**निष्कर्ष:** वरील विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, बारामती तालुक्यातील दूग्धव्यवसायिकांमध्ये पदवीधरांची संख्या जास्त आहे. तसेच पदव्युत्तर पदवी घेतलेलेही जास्त संख्येने आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे (३७%) व (१५%) इतके आहे. म्हणजेच दूग्धव्यावसायिकांमध्ये (५०%) पेक्षा जास्त दूग्धव्यावसायिक हे उच्चशिक्षित आहेत. उच्च शिक्षणामुळे दूग्ध व्यवसायामध्ये आधुनिकीकरण झाले आहे. तसेच बारामती तालुक्यातील दूग्धव्यावसायिकांचा उच्च शिक्षित आहे असे दिसून येते.

## ५.११ सामाजिक

### ५.११.१ दूग्ध व्यवसायातील स्त्री व पुरूष वर्गीकरण.

लिंग हे व्यक्तीला जन्मत: मिळालेले ठळक वैशिष्टय आहे. या लिंग रचनेचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटनांवर परिणाम घडून येत असतो. त्यासाठीच लिंग रचनेचा अभ्यास महत्त्वाचा आहे. स्त्रियांच्या दर्जामध्ये सुधारणा होण्यासाठी स्त्री आणि पुरूषांच्या भूमिकामध्ये आणि दृष्टिकोणामध्ये बदल होणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रत्येक अंगातील महत्त्वाचा अत्यावश्यक भाग म्हणून स्त्रियांच्या विकासाकडे पाहणे आवश्यक आहे. म्हणून संशोधिकेने दूग्ध व्यवसायिकांमध्ये स्त्री पुरूष प्रमाणाचे अध्ययन केले आहे.

तक्ता क्र ५.४२ दूग्ध व्यवसायातील स्त्री—पुरूष वर्गीकरण

| अ.क्र | दूग्ध व्यावसायिक | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्त्री | ६२ | ३१% |
| २ | पुरूष | १३८ | ६९% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६२ महिला दूग्ध व्यावसायिक आहेत.

२) २०० दूग्ध व्यवसायिकांपैकी १३८ पुरूष दूग्ध व्यावसायिक आहेत.

**निष्कर्ष:** महिला दूग्धव्यावसायिकांची संख्या ६२ आहे. म्हणजे ३१% महिला दूग्धव्यवसाय करू लागल्या आहेत. या ३१% महिला स्वतंत्रपणे हा दूग्धव्यवसाय करीत आहेत. व्यवसायाशी संबंधित सर्व निर्णय घेतात.त्यामुळे या महिलामध्ये निर्णय क्षमता वाढीस लागली आहे.

२०० दूग्धव्यावसायिकांमध्ये १३८ पुरूष आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ६९% इतके आहे. पूर्वीपासूनच दूग्ध व्यवसायामध्ये पुरूषांचे प्रमाण जास्त आहे. हळूहळू या दूग्धव्यवसायामध्ये आधुनिकीकरण होऊ लागले आहे. वाढती महागाई, शेतमजूरांची टंचाई, इत्यादी कारणामुळे कुटूंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी महिलांचा सहभाग दूग्धव्यवसायामध्ये हळूहळू वाढत चालला आहे. कुटूंबातूनही महिलांना या व्यवसायासाठी पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे दूग्धव्यवसायामध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे. असा निष्कर्ष निघतो.

### ५.११.२ कुटूंबाचा आकार

लोकसंख्या हा देशाचा एक आधारभूत घटक आहे. त्यामध्ये संख्यात्मक व गुणात्मक वाढीला फार महत्त्व आहे. कुटूंबातील सदस्यावर त्या कुटूंबाचे दरडोई उत्पन्न ठरत आहे. प्रत्येक व्यक्ती ही वर्तमानाच्या साक्षीने आपल्या भविष्याकडे वाटचाल करीत आहे. व त्यासाठीच ती अविरत परिश्रम करीत असते. तिच्या त्या

श्रमाच्या पाठीमागे स्वत:बरोबरच ती कुटूंबाचा व देशाचा सर्वांगीण विकास साधत असते. विकास हा भौगोलिक परिस्थिती, तेथील लोक, त्यांची संख्या, यावर अवलंबून असतो. व्यक्तीच्या कुटूंबाच्या आकारमानाचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होत असतो. दूग्ध व्यावसायिकांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठीच त्यांच्या कुटूंबाच्या आकारमानाचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

तक्ता क्र. ५.४३ कुटूंबाचा आकार

| अ.क्र | कुटूंबाचा आकार | सदस्य संख्या | दूग्ध व्यवसायिक कुटूंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | लहान आकार | २ ते ४ | ७२ | ३६% |
| २ | मध्यम आकार | ४ ते ६ | ९२ | ४६% |
| ३ | मोठा आकार | ६ ते ८ | ३६ | १८% |
| | एकूण | | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्धव्यावसायिकांमध्ये २ ते ४ सदस्य असणारे ७२ दूग्धव्यावसायिक आहेत. त्यांचे प्रमाण ३६% इतके आहे. ४ ते ६ सदस्य असणारे ९२ दूग्धव्यावसायिक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ४६% आहे व ६ ते ८ सदस्य असणारे ३६ दूग्ध व्यावसायिक आहेत त्यांचे प्रमाण १८% इतके आहे.

**निष्कर्ष:** ३६% दूग्धव्यावसायिकांच्या कुटूंबामध्ये २ ते ४ सदस्य आहेत. त्यामुळे या कुटूंबाचा आकार लहान आहे. व मध्यम आकाराच्या कुटूंबात ४ ते ६ सदस्य संख्या आहे. या कुटूंबामध्ये दूग्धव्यावसायिकांच्या आईवडिलांचा समावेश होतो.

मोठा आकार असणाऱ्या कुटूंबातील सदस्या संख्या ६ ते ८ आहे. या कुटूंबामध्ये आई, वडिल, भाऊ, बहिण यांचा समावेश होतो. अशा कुटूंबाची संख्या १८% इतकी आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, ४ ते ६ सदस्य संख्या असणाऱ्या कुटूंबाची संख्या सर्वात जास्त आहे.

**५.११.३ मुख्य व्यवसायः**

स्वत:चा व कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला सतत काहीतरी धडपड करावीच लागते. कारण वर्तमानावर भविष्याची वाटचाल अवलंबून असते. व्यक्ती नेहमीच अविरत श्रम करीत असते तिला त्याचा मोबदला त्या श्रमाद्वारे मिळत असतो. व्यक्तीच्या शारीरिक क्षमतेच्या आधारावर स्वत:च्या शैक्षणिक पात्रतेवर व गुणवत्तेच्या आधारावर किंवा व्यवसायाची निवड करावी लागते. ते करत असतानाच भौगोलिक परिस्थितीचा, शिक्षणाचा व नवनवीन तंत्रज्ञानाचा तिच्यावर परिणाम होत असतो. त्यातून ती आपल्या व्यवसायाची निवड करीत असते. कमी वेळात दर्जेदार उत्पादन कमी श्रमात, कमी खर्चात कसे करता येईल याचाही विचार व्यक्ती करत असते. तसेच आपले राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी सतत प्रयत्न करत असते. खालील तक्त्यामध्ये २०० दूग्धव्यावसायिकांचा मुख्य व्यवसाय कोणता हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. ५.४४ मुख्य व्यवसाय

| अ.क्र | मुख्य व्यवसाय | व्यावसायिकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दूग्ध व्यवसाय | ८० | ४०% |
| २ | नोकरी | ०८ | ०४% |
| ३ | शेती व्यवसाय | १०२ | ५१% |
| ४ | शेतमजूर | १० | ०५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधारः प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचनः** २०० दूग्धव्यवसायिकांपैकी ८० दूग्धव्यावसायिक हे मुख्य व्यवसाय म्हणून हा व्यवसाय करतात. त्यांचे प्रमाण (४०%) इतके आहे. १०२

दूग्धव्यावसायिकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. त्यांचे प्रमाण (५१%) इतके आहे. तर १० दूग्धव्यवसायिक हे शेतमजूर आहेत. त्यांचे प्रमाण (५%) इतके आहे.

**निष्कर्ष:** २०० दूग्धव्यवसायिकांपैकी ८० दूग्धव्यावसायिक हे मुख्य व्यवसाय म्हणून हा व्यवसाय करतात. कारण या व्यवसायाला अनुकूल असे वातावरण, वाहतुक व्यवस्थित सोयी, इत्यादी पायाभूत सुविधा चांगल्या प्रकारच्या असल्यामुळे शेतकरी हा मुख्य व्यवसाय करतात. त्यांचे शेकडा प्रमाण (४०%) इतके आहे.

२०० दूग्धव्यवसायिकांपैकी ८० दूग्धव्यावसायिक हे मुख्य व्यवसाय म्हणून हा व्यवसाय कारण या व्यवसायाला अनुकूल असे वातावरण वाहतूक व्यवस्थेच्या सोयी, इत्यादी पायाभूत सुविधा चांगल्या प्रकारच्या असल्यामुळे ८० शेतकरी हा मुख्य व्यवसाय करतात. त्यांचे शेकडा प्रमाण (४०%) इतके आहे.

२०० दूग्धव्यवसायिकांपैकी ८ जण नोकरी करतात. नोकरी हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. नोकरीतून राहिलेल्या वेळात ते दूग्ध व्यवसायासाठी कुटूंबाला मदत करतात. त्यांचे शेकडा प्रमाण (४%) इतके आहे.

२०० दूग्धव्यवसायिकांपैकी १०२ शेतकरी हे मुख्य व्यवसाय म्हणून शेतीच करतात. कारण त्यांचेकडे शेतीचे क्षेत्र जास्त आहे. म्हणून १०२ दूग्धव्यवसायिक हे मुख्य व्यवसाय म्हणून शेती करतात. त्यांचे प्रमाण (५१%) आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की बारामती तालुक्यातील जास्तीत जास्त दूग्ध व्यावसायिकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे.

**५.११.४ पशुवैद्यकीय सेवांची उपलब्धता**

कोणताही व्यवसाय करताना त्या व्यवसायाशी निगडित मुलभूत सोयीसुविधांची स्थानिक पातळीवर गरज भागणे महत्त्वाचे असते. तरच त्या व्यवसायाची भरभराट होत असते. दूग्ध व्यवसायासाठी पशुवैद्यकीय सेवा अत्यंत आवश्यक आहे. ही तात्काळ व आधुनिक पद्धतीची असल्यास दूग्धव्यवसायाच्या

दृष्टीने फायदेशीर ठरते. दूग्धव्यवसायामध्ये अनेक गाई एकत्र असतात. त्यामुळे आजारी गाईचा संसर्ग लगेचच दुसऱ्या गाईला होतो. त्यामुळे गायांमधील आजार तात्काळ आटोक्यात आणणे महत्त्वाचे असते. त्यासाठी पशुवैद्यकीय सेवा ही महत्त्वाची असते. बारामती तालुक्यामध्ये सरकारी पशुवैद्यकीय उपचार केंद्रे एकूण २३ आहेत. त्यापैकी १४ पशुवैद्यकीय उपचार केंद्रेही अ दर्जाची आहेत व ९ केंद्रेही 'ब' दर्जाची आहेत. खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर उपलब्ध असतात. सरकारी पशुवैद्यकीय केंद्रामध्ये तज्ज्ञ तात्काळ घरी येऊन सेवा देत असतो. त्यामुळे बरेचसे दूग्ध उत्पादक खाजगी सेवा पसंत करतात. दूग्ध व्यवसायामध्ये पशुवैद्यकीय सेवा ही जागेवरच मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी संशोधिकेने कोणत्या प्रकारची पशुवैद्यकीय सेवेला दूग्धव्यावसायिक पसंती देतात याचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र ५.४५ उपलब्ध सेवा

| अ.क्र | उपलब्ध सेवा | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सरकारी पशुवैद्यकीय सेवा | ४८ | २४% |
| २ | खाजगी वैद्यकीय सेवा | १५२ | ७६% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी ४८ दूग्ध व्यावसायिक सरकारी पशुवैद्यकीय सेवेचा लाभ घेतात. त्यांचे प्रमाण (२४%) इतके आहे. तर २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १५२ दूग्ध व्यावसायिक हे खाजगी पशुवैद्यकीय सेवेचा लाभ घेतात. त्यांचे प्रमाण (७६%) इतके आहे.

**निष्कर्ष:** सरकारी पशुवैद्यकीय सेवा ही शक्यतो घरपोच मिळत नाही. त्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला त्याचे कार्यालय सोडून बाहेर जाणे शक्य होत नाही. तसेच सरकारी सेवा तात्काळ उपलब्ध होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे सरकारी

पशुवैद्यकीय केंद्र असलेल्या जवळचे दूग्धव्यावसायिक या सेवेचा फायदा घेऊ शकतात. तसेच सरकारी रोग निवारण, लसीकरण या सेवांचा लाभ घेता येतो. या सेवांचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण (२४%) इतके आहे.

खाजगी पशुवैद्यकीय सेवा ही तात्काळ उपलब्ध असते. स्थानिक पातळीवरच ही सेवा २४ तास उपलब्ध होऊ शकते. यामध्ये वेळेची बचत होते. त्यामुळे खाजगी पशुवैद्यकीय सेवेचा जास्त दूग्धव्यावसायिक उपयोग करून घेतात. याचे प्रमाण (७६%) इतके आहे.

**५.११.५ पशुविमा संरक्षण:**

पशुंचा विमा घ्यावयाचा किंवा नाही हे दूग्धव्यावसायिकांवर अवलंबून असते. पशु विमा संरक्षण हे फक्त एक वर्ष कालावधीसाठी असते. प्रत्येक वर्षी नवीन विमा घ्यावा लागतो. विमा घेतल्यानंतर वर्षभराच्या कालावधीमध्ये पशुला होणारे आजार, अपघात, नैसर्गिक मृत्यु अशा गोष्टींसाठी असतो. या विम्याची मुदत एक वर्ष कालावधीची संपल्यानंतर कोणताही परतावा मिळत नाही. त्यामुळे दुग्धव्यावसायिक सर्वच पशुंचा विमा घेतील हे सांगता येत नाही. पशुंच्या विम्यासाठी न्यू इंडिया इनश्युरन्स कंपनी व ओरियन्टल इनश्युरन्स कंपनी या दोन सरकारी कंपन्या विम्याचे काम करतात.

बरेचसे दूग्ध व्यावसायिक हे गायांच्या खरेदीसाठी बचत गटाचे किंवा बँकेचे कर्ज घेतात. या कर्ज मंजूरीसाठी बँक गायांचा विमा घेतल्याशिवाय कर्जदाराला पैसे दत नाही. त्यामुळे जास्त दूग्धव्यवसायिकांनी पशुविमा घेतलेला दिसून येतो.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे दूध विक्रीची समस्या राहिलेली नाही. हमीभाव, स्थानिक वातावरण हवामान चांगले असल्यामुळे या भागात दूग्ध व्यवसाय चांगला वाढीस लागला आहे. दूग्ध व्यवसायामध्ये आधुनिकीकरण होत आहे. चांगल्या दर्जाच्या गायींची पैदास होत आहे. त्यामुळे शेतकरी विमा संरक्षण घेण्याकडे प्रवृत्त होऊ लागला आहे. २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी किती व्यावसायिकांनी विमा संरक्षण घेतले आहे त्याचा अभ्यास संशोधिकेने केला आहे.

तक्ता क्र ५.४६ विमा संरक्षण

| अ.क्र | विमा संरक्षण | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | १२२ | ६१% |
| २ | नाही | ७८ | ३९% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी १२२ दूग्ध व्यावसायिकांनी पशुविमा संरक्षण घेतले आहे. त्यांचे प्रमाण (६१%) इतके आहे. ७८ दूग्ध व्यावसायिकांनी पशु विमा संरक्षण घेतले नाही. त्यांचे प्रमाण (३९%) इतके आहे.

**निष्कर्ष:** २०० दूग्ध व्यावसायिकापैकी १२२ व्यावसायिकांनी विमा संरक्षण घेणे पसंत केले आहे. त्यांचे प्रमाण (६१%) इतके आहे. दूध व्यवसायाचे दिवसेंदिवस आधुनिकता येत आहे. परदेशी वंशावेळी असलेल्या पशुंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पशुंना धोका निर्माण होतो. नैसर्गिक अपत्ती किंवा आजाराने गाई दगावल्यास फार मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे हे नुकसान टाळण्यासठी दूध उत्पादक जास्तीत जास्त गाईंना विमा संरक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**५.११.६ वित्तसहाय्य (कर्ज)**

कोणताही व्यवसाय सुरू करताना प्रत्येकाला आर्थिक मदतीची आवश्यकता असते. विविध स्त्रोतांद्वारे पतपुरवठा होत असतो. या स्त्रोतांची विभागणी स्थुल मानाने संस्थात्मक स्त्रोत व बिगर संस्थात्मक स्त्रोत या मुख्य प्रकारात केली जाते. बिगर संस्थात्मक स्त्रोतामध्ये सावकार, जमीनदार, नातेवाईक येतात तर संस्थात्मक मध्ये बँका, पतसंस्था, सहकारी संस्था इत्यादींचा समावेश होतो. कोणताही व्यावसायिक हा बँकेकडून अर्थसहाय्य घेणे पसंत करतो. बँकांचे व्याजदर व वसुली या प्रक्रिया सुटसुटीत असतात. वसुलीसाठी तगादा नसतो. त्यामुळे लोक बँकेकडून कर्ज घेणे पसंद करतात.

सर्वच सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीच्या स्वरूपात रोजगार मिळणे अशक्य आहे. दूग्धव्यावसायिक हे बँकेकडून कर्ज घेऊन दूग्ध व्यवसायामध्ये वाढ करत आहेत.

बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी किती दूग्धव्यावसायिकांनी बँकांचे अर्थसहाय्य घेऊन दूग्धव्यवसायमध्ये वाढ केली आहे त्यांचे अध्ययन संशोधिकेने केले आहे.

तक्ता क्र ५.४७ अर्थसहाय्य

| अ.क्र | अर्थसहाय्य | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | घेतले आहे. | १०७ | ५३.५% |
| २ | घेतले नाही | ९३ | ४६.५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी १०७ दूग्ध व्यावसायिकांनी बँकेकडून कर्ज घेतले आहे. त्यांचे प्रमाण (५३.५%) आहे. ९३ दूग्धव्यावसायिकांनी बँकेकडून कर्ज घेतलेले नाही. त्यांचे प्रमाण (४६.५%) इतके आहे.

**निष्कर्ष:** २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १०७ दूग्ध व्यावसायिकांनी बँकेकडून कर्ज घेऊन दूग्धव्यवसायामध्ये वाढ केलेली आहे. दूग्धव्यावसायिकांना वेगवेगळया प्रकारची अनुदाने मिळत असतात. यासाठी बँकेच्या कर्जाची मदत घेतली जाते. शेतीवर आधारित व्यवसायासाठी कमी व्याजदराने अर्थसहाय्य मिळते. त्यामुळे (५३.५%) लोकांनी बँकेचे अर्थसहाय्य घेतले आहे. ९३ दूग्धव्यावसायिकांनी अर्थसहाय्य घेतलेले नाही. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. अशांचे प्रमाण (४६.५%) इतके आहे.

एकंदरित जास्त दूग्ध व्यावसायिकांनी बँकेकडून अर्थसहाय्य घेऊन दूग्धव्यवसायासाठी प्रयत्न करीत आहेत.

### ५.११.७ दूध दराबाबत समाधानी

बारामती तालुक्यातील दूग्धव्यावसायिक हे सध्या मिळणाऱ्या दूध दराबाबत समाधानी आहेत. कारण बारामती तालुक्यामध्ये दूग्धव्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून मोठया प्रमाणावर केला जातो. काही दूधव्यावसायिकांनी या धंदयाला मुख्य व्यवसायाचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

गायासाठी चारा उत्पादन हे घरच्या शेतातच होत असते. कुटूंबातील सदस्यांच्या सहकार्याने दूग्ध व्यवसाय केला जातो. त्यासाठी बाहेरील माणसांची मदत घेतली जात नाही. डेअरीकडून विविध सुविधा मिळतात. पशुखाद्य माफक दरात उपलब्ध करून दिले जाते. कमी खर्चामध्ये दूध उत्पादन वाढविण्यासाठी वारंवार माहिती दिली जाते. दूध उत्पादनासाठी फार कमी खर्च केला जातो. त्यामुळे सध्याचा मिळणारा दर हा समाधानकारक आहे की नाही याचा अभ्यास संशोधिकेने केला आहे.

तक्ता क्र. ५.४८ व्यवसाय प्रकार

| अ.क्र | दूध दराबाबत समाधानी | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १३२ | ५६% |
| २ | नाही | ६८ | ३४% |
| | एकूण | २०० | १००% |

आधारः प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचनः** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी १३२ दूग्ध व्यावसायिक दूध दराबाबत समाधानी आहेत. त्यांचे प्रमाण (५६%) आहे. ६८ दूग्धव्यावसायिक दूध दराबाबत समाधानी नाहीत त्यांचे प्रमाण (३४%) आहे.

**निष्कर्षः** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी १३२ दूग्ध व्यवसायिक हे दूध दराबाबत समाधानी आहेत. कारण शेतीतील चाऱ्याची मदत, दूध व्यवसायाचे

आधुनिकीकरण, कमी प्रमाणात मजूरीवर खर्च, इत्यादी मुळे दूध दराबाबत समाधानी आहेत. त्यांचे प्रमाण (५६%) आहे.

२०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६८ दूग्धव्यावसायिक हे दूध दराबाबत समाधानी नाहीत. कारण त्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. पारंपारिक पद्धतीने दूग्ध व्यवसाय करतात. मजूरीवर जास्त खर्च होतो. त्यामुळे या दूग्धव्यावसायिकांना हा व्यवसाय फायदेशीर वाटत नाही. त्यामुळे ते दूधदराबाबत समाधानी नाहीत.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, सद्यस्थितीमध्ये दूधदर वाढवून मागण्यापेक्षा दूध उत्पादनावरील खर्च कमी करून दूध उत्पादनात भरीव वाढ करता येईल. व दूध व्यवसाय किफायतशीर ठरेल. या दृष्टीने प्रयत्न करावेत.

**५.११.८ दूग्ध व्यवसायासाठी यंत्राचा वापर**

आधुनिक पद्धतीने दूग्ध व्यवसाय करत असताना नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर दूग्ध व्यवसायामध्ये करावा लागतो. यामध्ये

१) कडबाकुट्टी, दूध काढणारे यंत्र, शेण गोळा करण्यासाठी लहान टॅक्ट्रचा वापर इ. यंत्राचा वापर दूग्ध व्यवसायामध्ये होऊ लागला आहे. या व्यवसायामध्ये मजूरांची कमतरता भासते. कारण बरेचसे मजूर एक दोन गाई पाळून हा व्यवसाय करीत असतात. त्यामुळे मजूर मिळणे फार कठीण काम आहे. जे मजूर उपलब्ध होतात ते ठराविकच काम करत असतात. त्यामुळे बरीचसी कामे स्वत:लाच करावी लागतात. यंत्रामुळे धारा काढणे, तसेच गायांचा चाराही कापणे, शेणगोळा करणे, ही कामे यंत्राद्वारे होत आहेत. तसेच गोठा साफ करण्यासाठी पाण्याचा वापरही मोटरद्वारे करण्यात येत आहे. तसेच मुक्त गोठा पद्धती ही संकल्पना रूजत आहे. त्यामुळे दूग्धव्यावसायिकांमध्ये मोठया प्रमाणावर यंत्राचा वापर सुरू झाला आहे. किती दूग्धव्यावसायिक यंत्राचा वापर करतात हे पाहण्यासाठी संशोधिकेने अध्ययन केले आहे.

तक्ता क्र ५.४९ यंत्राचा वापर

| अ.क्र | यंत्राचा वापर | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १७८ | ८९% |
| २ | नाही | २२ | ११% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी १७८ दूग्धव्यावसायिक यंत्राचा वापर करतात. त्यांचे प्रमाण (८९%) इतके आहे. २२ दूग्धव्यावसायिक कोणत्याही प्रकारच्या यंत्राचा वापर करीत नाही. त्यांचे प्रमाण (११%) इतके आहे.

**निष्कर्ष:** २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १७८ दूग्धव्यावसायिक हे यंत्राचा वापर करतात. दूध उत्पादनाचा खर्च कमी होतो. श्रमाची बचत होते, मजूरावर अवलंबून रहावे लागत नाही. त्यामुळे (८९%) दूग्धव्यावसायिक यंत्राचा वापर करतात.

२२ दूग्धव्यावसायिक यंत्राचा वापर करीत नाहीत. कारण त्यांचेकडे मनुष्यबळ उपलब्ध आहे. तसेच ते हा व्यवसाय शेतीपूरक म्हणून करतात. अशा दूग्धव्यावसायिकांचे प्रमाण (११%) इतके आहे.

**५.११.९ डेअरीकडून सोयी सुविधा:**

आधुनिक पद्धतीने व्यवसाय करत असताना दूध डेअरीकडून दूग्धव्यावसायिकांना काही सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. चांगल्या दर्जाच्या गाईंची पैदास होण्यासाठी डेअरीमार्फत चांगल्या दर्जाचे व गुणवत्ता धारक सिमेन उपलब्ध करून दिले जाते. डेअरी मार्फत पशुखाद्य क्रेडीटवर उपलब्ध करून दिले आहे. दूध डेअरीकडून वेळोवेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन केले जाते.

तक्ता क्र ५.५० डेअरीकडून दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा

| अ.क्र | सुविधा | सुविधा घेणारे दूग्ध व्यावसायिक | | सुविधा न घेणारे दूग्ध व्यावसायिक | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १ | पशुवैद्यकीय सेवा | १६५ | ८२.५% | ३५ | १७.५% |
| २ | पशुखाद्य | १८२ | ९१% | १८ | ९% |
| ३ | प्रशिक्षण व मार्गदर्शन | १९० | ९५% | १० | ५% |
| ४ | ॲडव्हान्स | ४५ | २२.५% | १५५ | ७७.५% |
| | एकूण | | | | |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्ध व्यवसायापैकी १६५ दूग्ध व्यावसायिक डेअरीने दिलेल्या सुविधांचा लाभ घेतात. त्यांचे प्रमाण (८२.५%) इतके आहे. ३५ दूग्ध व्यावसायिक डेअरीने दिलेल्या पशुवैद्यकीय सुविधेचा लाभ घेत नाहीत. त्यांचे प्रमाण (१७.५%)) इतके आहे. १८२ दूग्धव्यावसायिक पशुखाद्य डेअरीकडून घेतात. त्यांचे प्रमाण (९१%) इतके आहे. (९%) दूग्ध व्यावसायिक डेअरीचे पशुखाद्य घेत नाहीत. १९० दूग्ध व्यावसायिक डेअरीने आयोजित केलेल्या प्रशिक्षण व शिबीरामध्ये सहभागी होतात. त्यांचे प्रमाण (९५%) इतके आहे.

४५ दूग्ध व्यावसायिक डेअरीकडून ॲडव्हान्स घेतात. त्यांचे प्रमाण (२२.५%) झाले आहे. १५५ लोक डेअरीकडून ॲडव्हान्स घेत नाहीत त्यांचे प्रमाण (७७.५%) इतके आहे.

**निष्कर्ष:** २०० दूध व्यावसायिकांपैकी जवळजवळ सर्व दूग्ध व्यावसायिक डेअरीने पुरविलेल्या सुविधांचा लाभ घेत आहेत. कारण वेळेची बचत होते. त्यामुळे

व्यवसायामध्ये जास्त लाभ होतो. दूध उत्पादन वाढीसाठी डेअरी या सुविधा कायमस्वरूपी पुरवत असते. त्यामुळे दूध उत्पादनात वाढ होऊन दूध व्यावसायिकांचा आर्थिक दर्जा उंचावण्यास मदत होत आहे.

## ५.१२ सांस्कृतिक

### ५.१२.१ राहणीमानाचा दर्जा

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. शिक्षणाने व्यक्तीमध्ये बदल घडून येतो. जीवनाकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन आज बदलत चालला आहे. सर्वसाधारण राहणीमानाचा परिणाम व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो.

समाजामध्ये आज शिक्षणाचे महत्त्व पटू लागले आहे. शिक्षणाने व्यक्ती ज्ञानसंपन्न होते. समाजातील चांगले वाईट यांचे आकलन तात्काळ होते. ज्ञानाची व आपल्याजवळील माहितीची देवाणघेवाण होते. त्यामुळे व्यक्ती समाजाभिमुख बनल्या आहेत.

शिक्षणामुळे व्यवसायात प्रगती साधता आलेली आहे. त्यामुळे आर्थिक संपन्नता आलेली आहे. त्यामुळे व्यक्ती साहजिकच राहणीमानाच्या बाबतीत जागरूक झालेली आहे. राहणीमान म्हणजे फक्त आकर्षक दिसणे नव्हे तर स्वत:चे घर, घरातील सोयी सुविधा, दळणवळणाची साधने, व्यवसायातील आधुनिकीकरण या सर्व बाबींचा परिणम व्यक्तिमत्त्वावर होतो.

दूग्ध व्यावसायिकांचे राहणीमानामध्ये, दर्जामध्ये झालेला बदल आपणास दिसून येतो. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गोष्टी आहेत. दूग्धव्यवसायिकांमध्ये चांगली पक्की घरे बांधलेली आहेत. या घरांचा त्यांच्या राहणीमानावर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

तक्ता क्र ५.५१ घराचा प्रकार

| अ.क्र | घराचा प्रकार | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पक्के घर | १५६ | ७८% |
| २ | कच्चे घर | ४४ | २२% |
| ३ | झोपडी | ०० | ००% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १५६ दूग्ध व्यावसायिकांची घरी पक्के आहेत. त्यांचे प्रमाण (७८%) आहे. तर ४४ दूग्ध व्यावसायिकांची घरे कच्ची आहेत. त्यांचे प्रमाण (२२%) आहे.

**निष्कर्ष:** २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १५६ दूग्ध व्यावसायिकांची पक्की घरे बांधली आहेत. दूग्धव्यवसायामधून चांगले उत्पन्न मिळते. त्याचबरोबर शेती हाही व्यवसाय आहे. शेतीपासून चारा उत्पादन होत असल्यामुळे बराचसा खर्च कमी होतो. त्यामुळे पैशाची बचत करून (७८%) दूग्धव्यावसायिकांनी पक्की घरे बांधली आहेत. घर हे प्रत्येकाचे स्वप्न असते. तसेच कौटूंबिक सुरक्षेसाठी पक्के घर महत्त्वाचे आहे. तसेच पक्क्या घरामुळे सामाजिक प्रतिष्ठाही वाढते. त्यामुळे पक्की घरे बांधण्याकडे दूग्ध व्यावसायिकांचा कल आहे. फक्त २२% लोकांनी पक्की घरे बांधलेली नाहीत.

**५.१२.२ इंधनाचा वापर:**

प्रत्येक व्यक्तीची मुलभूत गरज अन्न, वस्त्र, निवारा आहे. या प्राथमिक गरजांची पूर्तता करून व्यक्ती चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असते. प्रत्येक व्यक्तीचे राहणीमान हे त्यांच्या आर्थिक उत्पन्नावर व शिक्षणावर अवलंबून असते. शिक्षणामुळे व्यक्ती राष्ट्राचा व समाजाचा विचार करते. दैनंदिन जीवन जगत असताना दैनंदिन गरजांची पूर्तता करीत असताना पर्यावरणाची काळजी घेणे

अत्यंत आवश्यक आहे. दूग्धव्यावसायिक कुटूंबे ही सर्वसाधारणपणे ग्रामीण भागातच राहत असतात. ग्रामीण भागामध्ये पूर्वी स्वयंपाकासाठी इंधन म्हणून लाकडाचा वापर केला जात होता. तर कुटूंबामध्ये अजूनही शेणाच्या गोवरीचा वापर केला जाते. घरामध्ये इंधन म्हणून सद्यस्थितीमध्ये गोबर गॅसही वापरला जात आहे. बारामती तालुक्यातील दूग्धव्यावसायिक कोणत्या प्रकारचे इंधन वापरतात त्याविषयी संशोधिकेने अध्ययन केले आहे.

तक्ता क्र. ५.५२ इंधनाचा वापर

| अ.क्र | स्वयंपाकासाठी वापरले जाणारे इंधन | दूग्ध व्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | गोबर गॅस | ४४ | २२% |
| २ | एल.पी.जी. गॅस | १४० | ७०% |
| ३ | रॉकेल गॅस | — | — |
| ४ | लाकूड फाटा | १६ | ०८% |
| ५ | शेणाचा वापर | — | — |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ४४ दूग्धव्यावसायिक गोबरगॅसचा इंधन म्हणून वापर करतात. १४० दूग्धव्यावसायिक एल.पी.जी.गॅसचा वापर करतात. त्यांचे प्रमाण (७०%) इतके आहे. तसेच १६ दूग्धव्यावसायिक कुटूंबे शेतातील लाकूडफाटाचा वापर इंधन म्हणून करतात. त्यांचे प्रमाण (८%) इतके आहे.

**निष्कर्ष:** २०० दूग्ध दूग्धव्यावसायिकांपैकी ४४ कुटूंबात गोबर गॅस इंधन म्हणून वापरतात. या व्यावसायिकाकडे गायांची संख्या जास्त आहे. तसेच एल.पी.जी गॅस महाग आहेत. शासकीय योजनेतून गोबरगॅस सयंत्रासाठी अनुदान प्राप्त झाले आहे.

गोबर गॅसमुळे सेंद्रीय खतासाठी शेणाचा वापर चांगल्या प्रकारे करता येतो. त्यामुळे २२% लोक गोबर गॅसचा वापर करतात.

१४० कुटूंबामधून एल.पी.जी गॅसचा वापर केला जाते. बरेच दूग्धव्यावसायिक हे गावात राहतात व त्यांच्या गाईचे गोठे हे शेतात आहेत. त्यामुळे त्यांना गोबरगॅसचा वापर करणे शक्य होत नाही. एल.पी.जी. गॅसमुळे स्वयंपाक उरकतो. कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. भांडी स्वच्छ राहतात. लहान कुटूंबाला परवडतो. त्यामुळे (७०%) कुटूंबे एल.पी.जी गॅसचा इंधन म्हणून वापर करतात. १६ कुटूंबामधून अजूनही इंधनासाठी लाकडाचाच वापर करतात. स्वत:च्याच शेतातली लाकडे स्वयंपाकासाठी वापरली जातात. बरीच लाकडे असल्यामुळे पैसे खर्च होत नाहीत. ही कुटूंबे शेतातच राहतात. त्यांचेकडे स्वयंपाकासाठी भरपूर वेळ उपलब्ध असतो. त्यामुळे ही कुटूंबे इंधन म्हणून लाकडाचा वापर करतात.

## संरचनेतील बदल

समाजाचे गुंतागुंतीचे स्वरूप समजून देण्यासाठी ही संकल्पना महत्त्वाची आहे. यामध्ये संस्था, समूह हे घटक आहेत. कुटूंब या संस्थेत कुटूबातील कार्ये बदलली आहे. दूग्धव्यावसायिक विशेषत: महिला दूग्धव्यावसायिक आहेत. त्यातून त्यांचे आर्थिक सबलीकरण होऊन त्यांच्या सामाजिक स्तरात वाढ झाली. त्या कुटूंबातील निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. पारंपारिक शिक्षणाची जागा व्यावसायिक शिक्षणाने घेतली आहे. कामगार संघटनामध्ये बदल झाला आहे. त्यांची कौशल्य विकसित झाली आहे. त्यांच्या क्षमतेत वाढ झाली आहे.

पारंपारिक पद्धतीने शेती न करता शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करत आहेत. दूग्धव्यवसायामध्ये आधुनिकीकरण झाले आहे. उदा दूध काढण्यासाठी दूध यंत्रे, चार कुटी यंत्र, मुक्त गोटा पद्धत, इ. दूधाची गुणवत्ता वाढविण्यासाठी व ती टिकविण्यासाठी शेतकरी सतत प्रयत्न करतो. कारण त्यावर दूधाचे दर अवलंबून

आहेत. दूग्ध व्यवसायात भेदभाव नाही. शेतमजूर, शेतकरी, स्त्री, पुरूष, श्रीमंत, गरीब, यापैकी कोणीही व कोणत्याही जातीधर्माचे लोक दूग्ध व्यवसाय करू शकतात. कामगार व अधिकारी वर्गाच्या समूह वर्तन प्रकारात चांगले बदल दिसले. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने सर्व जातीधर्माचे लोक एकत्र येतात. त्यांच्या समस्तरीय व उद्‌गामी गतीशीलता दिसून आली. दूग्धव्यावसायिकांना दूग्धव्यवसाय फायदेशीर ठरला. त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला शहरी व ग्रामीण संस्कृतीचा मिलाप झाला नवीन महानगरीय संस्कृतीचा उगम दिसून आला. समूह संस्थामध्ये पूर्वीपेक्षा बदल दिसून आला. या संस्थामध्ये सामाजिक परिवर्तन दिसून आले आहे.

- **कोणत्या संस्थेत बदल झाला.**

— कुटूंबसंस्थेत, शैक्षणिक संस्थेत, लिंगभावात, पिढीअंतर्गत,समूहातील गतीशीलतेत, पारंपारिक रितीरिवाजात, मुलींच्या शिक्षण पद्धतीत, लघुउद्योग संस्थेत, स्थलांतरितामध्ये, पौगंडावस्थेतील मुलांमध्ये, दूग्धव्यावसायिक विशेषतः महिला दुग्ध व्यवसायिकामध्ये व कामगार आणि अधिकारी वर्गात बदल झाला आहे.

- **कुटुंबसस्थेत झालेला बदलः** दूग्धव्यावसायिक म्हणून महिलांची संख्या वाढली. महिला निर्णय प्रक्रियेत सहभगी होऊ लागल्या.
- **शैक्षणिक संस्थेत बदल झालाः** पारंपारिक शिक्षण पद्धतीत बदल होऊन जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र या विद्याशाखा निर्माण झाल्या आहेत.
- **लिंगभावात बदल**ः स्त्री पुरूष असा भेदभाव न करता कोणी कोणताही व्यवसाय करू शकतात. त्यामुळे महिला दूग्धव्यवसाय करीत आहे. कोणत्याही जातीधर्मातल्या व्यक्ती दूध व्यवसाय करू शकतात.
- **पिढीअंतर्गत बदलः** परप्रांतीय कुटूंबातील पिढीअंतर्गत बदल दिसून आला.
- **समूहातील गतीशीलतेत बदल झालाः** कामगार वर्गामध्ये गतीशीलता वाढली.

- **परप्रांतीय रितीरिवाजामध्ये बदल झाला:** खानपानामध्ये बदल झाला. पोशाखामध्ये बदल झाला. भाषेत बदल झाला. विवाह पद्धतीत बदल झाला. पारंपारिक दूध व्यवसाय आधुनिक पद्धतीने केला जात आहे.
- **मुलांच्या शिक्षण पद्धतीत बदल झाला:** पारंपारिक शिक्षणाऐवजी मुले इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत आहेत.
- **लघुउद्योग संस्थेत बदल झाला:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे लघुउद्योगांची निर्मिती झाली आहे. उदा. कॅन्स उदयोग, टँकर उदयोग, पशुखाद्य उद्योग इ. ची निर्मिती झाली.

अशा विविध घटकामध्ये बदल दिसून आला.

**सारांश:**

बारामती तालुक्यातील दूग्ध व्यावसायिकांच्या प्रगतीचा आढावा घेताना तालुक्यामध्ये जास्त प्रमाणावर दूग्ध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून केला जात आहे. तरी काही शेतकरी मुख्य व्यवसाय म्हणून याकडे पाहत आहेत. या व्यवसायामुळे दूग्ध व्यावसायिक पैशासाठी कोणावरही अवलंबून राहत नाहीत. खाजगी सावकारी बंद झाली. शेतकरी सोसायटयांची पिक कर्ज कमी प्रमाणात घेऊ लागला. बारामती तालुक्यातील दूग्ध व्यवसायिकांची मुले शिक्षण घेऊ लागली आहेत. पक्की घरे बांधली आहेत. आर्थिक सुबत्तेमुळे सामाजिक सुबत्ता वाढली आहे. त्यामुळे बारामती तालुक्यातील दूग्ध व्यवसाय हा एक सबळ जोडधंदा मिळाला आहे.

## ५.१३ उद्दिष्ट क्र. ५: श्रायबर डायनामिक्स डेअरीच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदानाचा अभ्यास करणे.

### ५.१३.१ प्रस्तावना:

पुणे जिल्हयातील पूर्वेकडचा हा तालुका कायमस्वरूपी अवर्षण भागात येतो. तालुक्याचा जवळपास ७०% भाग हा दुष्काळी होता. त्यामुळे जमिनी कोरडया होत्या. बहुसंख्य लोकांचा व्यवसाय हा शेतीशिवाय उत्पन्नाचे साधने नाहीत. शिक्षणाचा अभाव, उद्योगधंदे नाहीत. ४० वर्षापूर्वीचे हे चित्र बारामती तालुक्याचे होते.

या सर्व गोष्टींवर मात करून तालुक्याने विकासाची असामान्य प्रगती केली आहे. हे कसे शक्य झाले होते. या प्रश्नाचे उत्तर आहे शरद पवार.

या नेतृत्वाने ४० वर्षापूर्वी या तुलक्याचा चेहरा मोहरा बदलण्याचे कार्य होती घेतले होते. चाळीस वर्षात या तालुक्याचे घडलेले परिवर्तन थक्क करणारे आहे. शरद पवारांचा विकासाभिमुख समाजकारणावर सतत भर राहिलेला आहे. लोकांचे प्रश्न काय होते. त्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी काय मार्ग निघू शकतो हा विचार त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये आपल्याला दिसून येत आहे. समजाच्या विकासाविषयी त्यांची एक धारणा होती.

- शहरी भागात ज्या दर्जाचे शिक्षण आहे त्याच दर्जाचे शिक्षण खेडयात मिळाले पाहिजे.
- तळागाळातील लोकांना विकासाच्या योग्य संधी मिळाल्या पाहिजे.
- ग्रामीण भागात रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. यासाठी शेती व शेतीपूरक धंदयाचा विकास करणे.
- समाजातील परंपरेने उपेक्षित असलेल्या महिलांना मुख्य प्रवाहात आणणे.

या त्यांच्या धारणेतूनच तालुक्याचे परिवर्तन घडले आहे. पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी म्हटले आहे की, ‘‘बारामती हे देशासमोर विकासाचे मॉडेल

आहे.'' स्थानिक राजकिय नेतृत्वाच्या मते, ''सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर उत्तर शोधून विकासाच्या मार्गाची आखणी करणे व तो अंमलात आणणे म्हणजे बारामती पॅटर्न.''

- **श्रायबर डायनामिक्सः हा दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करणारा अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असा डेअरी प्रकल्प बारामतीमध्ये प्रस्थापित करण्यासाठी शरद पवारांना डायनामिक्सला प्रोत्साहित केले.**

— यापाठीमागे त्यांची भूमिका स्पष्ट होते की, आधुनिक डेअरी व्यवस्थापनाचे प्रतीक असलेला डेअरी प्लांट बारामतीत असावा. त्यामुळे बारामती व परिसरात वाढत चाललेल्या व्यवसायामध्ये आधुनिकता आणता येईल व दूग्धउत्पादकांना जादा पैसे मिळतील. तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील म्हणून डायनामिक्स डेअरीला प्रोत्साहन दिले.

श्रायबर डायनामिक्स डेअरी सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांचा दूधाला स्वीकृतीची हमी मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना सबळ जोडधंदा प्राप्त झाला. स्थानिक तरूणांना आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये नोकरी करण्याची संधी मिळाली. हे सर्व स्थानिक नेतृत्त्वाची क्षेत्रीय विकास साधण्यामागील आत्मीयता होती.

शरद पवार यांच्या दूरदृष्टीतून इथे पाणलोट विकासाचा व्यापक कार्यक्रम राबविण्यात आला आहे. कृषी संशोधनाला विशेषतः कोरडवाहू भागातील उपयुक्त संशोधनाला चालना दिली होती. पशुसंवर्धन व पशुपालन प्रोत्साहन देण्यात आले आहे. फळबागांच्या लागवडीला पाठबळ दिले आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे या भागाचा कायापालट झाला आहे. इथली शेती बहरली आहे. साखर कारखाने उभे राहिले आहेत. दूध संघ उभे राहिले, दूग्ध प्रक्रिया उद्योग, द्राक्ष प्रक्रिया उद्योग उभे केले. अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. ग्रामीण भागातील लोकांना दूग्ध व्यवसाय हा सबळ जोडधंदा मिळाला आणि या परिसरातील लोकांचे जीवनच बदलले आहे. ही किमया होती ''बारामती पॅटर्नची''

भारत सरकारने दूग्धोत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने १९७१ साली दूध महापूर योजना राबविली. ही योजना तीन टप्प्यामध्ये राबविली होती. भारत सरकार, राज्य सरकार व बारामती कृषी विकास प्रतिष्ठानने केलेल्या सततच्या प्रयत्नामुळे ही दूध महापूर योजना यशस्वी झाली होती. १९५०—५१ मध्ये भारताचे एकूण दूग्धोत्पादन १७.० दशलक्ष टन होते. ते २००९—१० मध्ये ११२.७ दशलक्ष टन एवढे झाले होते.

महाराष्ट्रामध्येही १९९१ मध्ये दूध उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झालेली होती. त्यावेळी द्रवरूप दूधाची गरज भागवून अतिरिक्त दूधाची विल्हेवाट लावण्यासाठी दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती व त्याची बाजारपेठ शोधणे ही गरज होती. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी महाराष्ट्रातील दूग्धोत्पादन वाढले पाहिजे व उत्पादित होणाऱ्या सर्व दूधास भारतीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळाली पाहिजे या दृष्टीकोनातून अशी क्षमता असणाऱ्या उद्योजकांना महाराष्ट्रात डेअरी प्लांटस उभारण्याकरिता प्रोत्साहित केले. त्यामध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूध पदार्थाचे उत्पादन व विक्री करणारा त्यांची गुणवत्ता व दर्जा टिकविणारा व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर विक्रीचे जाळे असणारा आधुनिक तंत्रज्ञानाने व यंत्रसामुग्रीने सुसज्ज व दैनंदिन १५ लाख लिटर्स दूध हाताळणी क्षमता असणाऱ्या या प्लांटला 'शरद पवारामधील' नेतृत्वशक्ती, दूरदृष्टी व क्षेत्रीय विकास साधण्यामागील आत्मियतेतून बारामती येथे श्रायबर डायनामिक्स डेअरीला प्लांट उभारणीसाठी प्रोत्साहित केले.

संशोधिकेने श्रायबर डायनामिक्स डेअरीला राजकीय पाठिंबा आहे का नाही हे पाहण्यासठी प्रकल्पामधील अधिकारी व तालुक्यातील व्यावसायिकांकडून मिळालेल्या उत्तरानुसार

तक्ता क्र. ५.५३ राजकीय पाठिंबा

| अ.क्र | घटक | संख्या | राजकीय पाठिंबा | | शेकडा होय प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | | आहे | नाही | |
| १ | अधिकारी | ५० | ४३ | ०७ | ८६% |
| २ | दूग्धव्यावसायिक | २०० | १७० | ३० | ८५% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ५० पैकी ४३ अधिकाऱ्यांच्या मते या प्रकल्पाला राजकीय पाठिंबा आहे. तसेच २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १७० दूग्धव्यावसायिकांनी या प्रकल्पाला राजकीय नेतृत्वाचा पाठिंबा आहे असे सांगितले.

**५.१३.२ औद्योगिक स्थान निश्चिती:**

औद्योगिक स्थान निश्चिती करत असताना १९९१ मध्ये महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी अतिरिक्त दूग्ध उत्पादनावर उपाययोजना करण्याच्या हेतूने महाराष्ट्रामध्ये डेअरी प्लांटस उभे करण्याकरिता अनेक उद्योजकांना प्रोत्साहित केले होते. त्यावेळी एक लाख ते पाच लाख लिटर्स दैनंदिन क्षमता असणारे प्लांटस महाराष्ट्रात उभे केले होते. परंतू शरद पवार यांच्यामधील क्षेत्रीय विकास साधण्याबद्दलच्या आत्मियतेने त्यांनी १५ लाख लिटर्स दूधावर दैनंदिन प्रक्रिया करणाऱ्या श्रायबर डायनामिक्स डेअरीला बारामती मध्ये प्रकल्प उभा करण्यास राजकीय पाठिंबा दिला होता.

**रस्ते:** बारामती हे वाहतूकीच्या विविध प्रकारच्या साधनांनी मुख्य ठिकाणाशी जोडलेले आहे. कच्चा व पक्क्या मालाची वाहतुक, कर्मचाऱ्यांची वाहतूक जलद व वेळच्या वेळी होण्यासाठी राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे व हवाई वाहतुकीची सोय केलेली होती. या पाठीमागे राजकीय दूरदृष्टी होती.

**कच्चा मालाची उपलब्धता:** कच्चा मालाची उपलब्धता बारामती तालुक्यामध्ये मोठया प्रमाणावर होती. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अतिरिक्त दूध मोठया प्रमाणावर उपलब्ध होते. त्यामुळे मोठया दूग्धप्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पास पाठिंबा दिला गेला.

**प्रकल्पासाठी पुरेशी जागा:** श्रायबर डायनामिक्स डेअरी हा दूधावर प्रक्रिया करणारा प्रकल्प आहे. भविष्यात प्रकल्प विस्तारासाठी खडकाळ जमिन प्रकल्पातील कामागारांच्या निवास्थानासाठी जागा व प्रकल्पातील कचरा व सांडपाणी यांची विल्हेवाटीसाठी जागा उपलब्ध होती. प्रकल्पास एकूण ६० एकर जागा उपलब्ध करून दिली गेली.

**बाजारपेठेची उपलब्धता:** प्रकल्पातील उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी चांगल्या वाहतूकीच्या दळणवळणाच्या सोयी, रस्ते, लोहमार्ग, हवाई वाहतूक इ. सोयी आहेत. बारामतीपासून जवळच मुंबई, पुणे, अहमदनगर, सातारा, कोल्हापूर, सोलापूर यासारखी महानगरे आहेत. त्यामुळे उपलब्ध मालास मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे.

**पाणीपुरवठा व वीजपुरवठा:** पाणीपुरवठयाची सोय एम.आय.डी.सी साठी स्वतंत्रपणे जलशुद्धीकरण केंद्राची निर्मिती करून केली आहे.

वीज पुरवठयासाठीही स्वतंत्रपणे वीज वितरण कंपनीचे फिडर स्थापन करून दिले आहे. अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून दिला आहे. या अशा अनेक सोयी राजकीय योगदानामुळे मिळाल्या आहेत.

### ५.१३.३ राजकीय स्थैर्य

कृषी विकासाचा विलक्षण यशस्वी असा 'बारापती पॅटर्न' त्यांनी उर्वरित देशातही घडवून आणावा. आपण उभ्या भारताचाच विकास बारामतीच्या धर्तीवर करू शकलो तर एक राष्ट्र म्हणून आपण उन्नत मानेने जगभर निश्चितपणे वावरू शकू. असे मी त्यांना म्हटले आहे. पंतप्रधान — डॉ. मनमोहन सिंग.

या प्रतिक्रिया मिळविण्यासाठी शरद पवारांनाही १९६७ सालापासून प्रतिकूल परिस्थितीत उभे राहून बारामती तालुक्याचा कायापालट घडवून आणलेला आहे. बारामती कृषी विकासाचे मॉडेल सर्व देशात परिचित केले आहे. अशा राजकीय नेत्याची राजकीय कारकिर्दही बारामतीकरांनी तेवढयाच आत्मियतेने जपलेली आहे.

१९६७ साली शरद पवारांनी सक्रिय राजकारणात भाग घेतला होता. सुरूवातीच्या काही काळ आमदार, नंतर राज्यमंत्री, कॅबीनेट मंत्री, व त्यानंतर मुख्यमंत्री पदापर्यंत त्यांनी वाटचाल केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद चार वेळा भूषविले आहे.

१९९० च्या दशकात त्यांनी देशाच्या राजकारणामध्ये प्रवेश केला, देशाचे संरक्षण मंत्री, विरोधी पक्षनेता, म्हणून काम केले. विद्यमान पुरोगामी आघाडीमध्ये ते देशाचे कृषीमंत्री म्हणून गेली ८ वर्ष कार्यरत आहेत. शरद पवार हे केंद्रामध्ये खासदार म्हणून गेल्यानंतर बारामती विधानसभा मतदारसंघातून त्यांचे पुतणे अजित पवार हे विधानसभेवर निवडून गेले. अजित पवार यांनीही लढवलेल्या सर्व विधानसभा निवडणूकीत प्रचंड मताधिक्य प्राप्त केले आहे.

२००९ मधील निवडणूकीत शरद पवार यांनी माढा मतदार संघातून लोकसभा निवडणूक लढवली व बारामतीमधून त्यांच्या सुकन्या सौ. सुप्रिया सुळे यांना खासदारकी देण्यात आली. १९६७ पासून बारामती लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी पवार कुटूंबीयावरील विश्वास ढळू दिला नाही.

बारामती मतदार संघाचा पवार कुटूंबीयांनी केलेला विकास पाहून खुद्द पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी हा बारामती पॅटर्न देशभर अस्तित्वात यावा अशी इच्छा व्यक्त केली आहे.

१९६७ पासून येथील राजकीय पॅटर्न एकच राहिला ते म्हणजे ‘‘पवारांची बारामती व बारामतीचे पवार.’’

**५.१३.४ भांडवल निर्मिती**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये ५१% भागभांडवल श्रायबर फ्रुडस यु.एस.ए यांचे आहेत व ४९% भागभांडवल के. एम. गोयंका समूहाचे आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाला भांडवल निर्मितीसाठी राजकीय नेतृत्वाने कोणतेही योगदान दिलेले नाही.

### ५.१३.५ वाहतुक सुविधांची गुणवत्ता

वाढत्या विकासामुळे रोजगार व व्यवसायामध्ये अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. वाढते शहरीकरण व व्यापारीकरणाबरोबर एक महत्त्वाची बाजारपेठ म्हणून बारामतीला ओळखले जाते. त्यासाठी वाहतूक सुविधांची गुणवत्ता महत्त्वाची आहे. वाहतुक सुविधेसाठी बारामती एस.टी. आगाराने बारामती स्टॅण्ड ते एम.आय.डी.सी ही सिटी बससेवा दर २० मिनिटाला एक याप्रमाणे सुरू केलेली आहे. तसेच पुणे जिल्हयातील सर्वात मोठे बसस्थानक बारामतीत उभारले आहे. बारामती – पुणे या विना वाहक विना थांबा गाडया लोकप्रिय आहेत. बारामती पुणे हे अंतर सव्वा दोन तासांचे आहे. रेल्वेची ब्रॉडगेज प्रवासी व मालवाहतूक सेवा उपलब्ध आहे. बारामतीची साखर येथून देशभरात लोहमार्गाने जाते. शरद पवार व अजित पवार यांच्या राजकीय इच्छाशक्तीमुळे वाहतुक सुविधा दर्जेदार झाल्या आहेत.

### ५.१३.६ शैक्षणिक सुविधा

उच्च शिक्षण महानगरामध्येच केंद्रीत झाले होते. उच्च शिक्षणाचे विकेंद्रीकरण होऊन ते तळागाळातल्या ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने बारामती येथे विद्या प्रतिष्ठानची उभारणी केली आहे. विद्या प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय, माहिती तंत्रज्ञान, विधी महाविद्यालय इ. उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम विद्या प्रतिष्ठानने सुरू केले होते. देखण्या इमारती, सुसज्ज ग्रंथालये, सुसज्ज प्रयोगशाळा, तज्ज्ञ अध्यापक वर्ग, कुशल व्यवस्थापन ही विद्या प्रतिष्ठानची वैशिष्टये आहेत.

शरद पवार यांचे शैक्षणिक कार्य १९७२ साली सुरू झाले होते. त्यांनी प्रथम इंग्रजी माध्यमाची शाळा चालु केली होती. त्यानंतर त्यांनी १९८९ मध्ये शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरू केले होते. १९८२ साली स्थापन झालेल्या अनाथ आश्रमाचे कार्यही शरद पवार यांनी पुढे चालू ठेवले आहे.

मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून तीस वर्षापुर्वी आपल्या मातोश्रीच्या नावाने 'शारदाबाई पवार महिला महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाची सुरूवात शरद पवारांचे थोरले बंधू आप्पासाहेब पवार यांनी १९८९ मध्ये केली होती. पाचवी पासून ते पदव्युत्तर पदवीपर्यंत महिलांना शिक्षणाची सोय तेथे केली आहे. २००० हजार मुलींची वसतिगृहात राहण्याची सोय केली आहे इत्यादी शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या आहेत.

### ५.१३.७ पायाभूत सुविधांची गुणवत्ता

बारामती विकासामध्ये कोणत्याही प्रकारच्या कामामध्ये गुणवत्ता व दर्जा यामध्ये तडजोड केली जात नाही. इमारतीचे देखणेपण, त्याच्या बांधकामाचा दर्जा, रंगरंगोटी, याकडेही लक्ष दिले जाते. रस्त्याची कामे, रस्त्याच्या कडेची झाडे, दुभाजकामधील झाडे, यांचेही नियोजन दिसते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामधील रस्ते अतिशय दर्जेदार आहेत. स्वच्छ पाण्यासाठी स्वतंत्रपणे जलशुद्धीकरण यंत्रणा, पाणी पुरवठयासाठी व उद्योगासाठी अखंडित वीज पुरवठयाची स्वतंत्र फिडर यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

**मनुष्यबळः** बारामती हा शैक्षणिकदृष्टया विकसित तालुका आहे. त्यामुळे येथे उच्च शिक्षित मनुष्यबळ उपलब्ध आहे. दळणवळणाची साधने व दळणवळणाच्या सोयी गुणवत्ता प्राप्त असल्यामुळे अनेक कामगार इतर तालुक्यातूनही उपलब्ध होतात. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरीला मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे.

**कच्च्या मालाची गुणवत्ताः** दूध प्रक्रिया उद्योगाला चांगले दर्जेदार दूध मिळण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरीकडून दूग्धउत्पादकांना खालील गोष्टींचे प्रशिक्षण दिले आहे.

१) गोठयाची स्वच्छता २) जनावरांचे आरोग्य व आहार ३) जनावरांच्या चाऱ्याची काळजी ४) दूधाच्या भांडयाची स्वच्छता ५) धार काढल्यानंतर कमीत कमी वेळेत दूध संकलन केंद्रावर पोहचविणे इत्यादी काळजी घेणेसाठी प्रबोधन

केले जाते. अशा शेतकरी प्रबोधनासाठी वसुंधरा कृषी वाहिनी व शारदा कृषी वाहिनी ही दोन रेडिओ केंद्र सुरू केलेली आहेत. या वाहिन्याच्या माध्यमातून तज्ज्ञ लोकांची व्याख्याने प्रसारित करण्यात येतात. दूग्ध व्यवसायावरही अनेक तज्ज्ञांची व्याख्याने या वाहिन्यांमधून प्रसारित होत असतात. यामुळे दूधाची गुणवत्ता चांगली आहे.

### ५.१३.८ औद्योगिक कलहाची सोडवणूक

औद्योगिक संबंधाची वाईट बाजू म्हणजे औद्योगिक कलह होय. औद्योगिक कलहाची अनेक कारणे आहेत. त्यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे राजकीय हस्तक्षेप. राजकीय पक्ष स्वत:च्या नावाने कामगार संघटना स्थापन करतात. बरेचसे राजकीय पक्ष स्वत:च्या स्वार्थासाठी कामगार संघटनांचा उपयोग करून घेतात.

राजकीय पक्षांच्या कामगारांच्या संघटना उद्योगक्षेत्रामधील वर्चस्वासाठी संघर्ष करत असतात. त्यातूनच औद्योगिक कलह निर्माण होतात. बारामतीमध्ये एकाच पक्षाचे राजकीय वर्चस्व असले तरी कोणत्याही पक्षाच्या नावाने कामगार संघटना नाहीत. राजकीय पक्ष पुरस्कृत कामगार संघटनावर आंदोलने करण्यासाठी दडपण टाकले जाते.

बारामती औद्योगिक वसाहतीच्या स्थापनेपासून आजपर्यंत एकदाही औद्योगिक कलह निर्माण झालेला नाही. औद्योगिक वसाहतीमधील कोणतीही समस्या चेंबर ऑफ कॉमर्स च्या माध्यमातून मार्गदर्शन घेऊन सोडविली जाते.

### ५.१३.९ सहाय्यक उद्योगाची वाढ

बारामती तालुक्यामध्ये अनेक शेतीपूरक उद्योगधंदयाची उभारणी केली आहे. उदा. साखर कारखाने, द्राक्ष प्रक्रिया उद्योग, रेशीम उद्योग, दूध डेअरी, दूग्ध प्रक्रिया उद्योग व पशुखाद्य निर्मिती उद्योग व इ. उद्योग धंदे परस्पर पूरक आहेत. बारामती तालुक्यामध्ये दूग्ध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसायामधील आर्थिक फायदा देणारा व्यवसाय आहे. अनेक शेतकरी कुटूंबे हा व्यवसाय करीत आहेत. त्यांच्याकडे असणाऱ्या जनावरांना उत्तम दर्जाचे पशुखाद्य मिळावे यासाठी,

१. बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाने पशुखाद्य निर्मिती चालू केली आहे.

२. श्रायबर डायनामिक्स डेअरीने दूध उत्पादन वाढीसाठी पशुखाद्य उद्योग सुरू केला आहे.

३. बारामती ॲग्रो यांनी ही पशुखाद्य निर्मिती चालु केली आहे. तसेच

४. हिंदुस्थान लिवरचा कॅटल फिड उद्योग आहे.

अशा पद्धतीने परस्पर उद्योग वाढीसाठी राजकीय नेतृत्वाने सहकार्य केले आहे.

**सारांशः**

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्थानिक राजकीय नेतृत्वाने या भागाचा विकास करण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी त्यांनी पाणलोट विकासाचा व्यापक कार्यक्रम राबविला आहे. पशुपाल, पशुसंवर्धनाला प्रोत्साहन दिले. शेतीवर आधारित उद्योगधंदे उभारणीसाठी प्रयत्न केले. साखर उद्योग, द्राक्ष प्रक्रिया उद्योग, रेशीम उद्योग, फलोत्पादन, इत्यादी सारख्या उद्योगासाठी राजकीय मदत केली. दूग्धोत्पादन वाढीसाठी शासनाच्या मदतीने अनेक उपाय योजले. प्रत्यक्ष दूग्ध उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झाल्यानंतर त्याच्यावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारणीसाठी प्रयत्न केले.

आपल्या भागात तयार झालेली दूग्धोत्पादन आंतरराष्ट्रीय पातळीवर विकली जावीत. नुसती विकली जाऊ नयेत तर आपल्या शेतकऱ्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करीत टिकून रहावे. यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. यावरून असे दिसून येते की, शरद पवार यांची स्वतःच्या भागाचा विकास करण्याविषयीची आत्मीयता.

**५.१४ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाने पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.**

**५.१४.१ पर्यावरण व समाज**

भारतीय समाजात विविध जातीचे, विविध धर्माचे, व वेगवेगळी भाषा बोलणारे, विविध संस्कृती व चालीरिती असणारे लोक आहेत. विविध सांस्कृतिक परंपरांचा भारतीय समाज जगात आपला वेगळा ठसा उमटवितो. विविध जाती, धर्म, भाषा असल्या तरी त्यांच्यात राष्ट्रीय भावना दृढ आहे. एकमेकांना समावून घेण्याची, सहकार्य करण्याची भावना त्यांच्यामध्ये आहे. भारतीय भूमीची रचनाही अशीच वेगळी वेगळी आहे. पंजाबमधील भूमी रचना वेगळी, महाराष्ट्रातील वेगळी आहे. तसेच हवामानही वेगवेगळे आहे. विविध भागातील फुले, फळे, पिके ही सर्व साधारणपणे भारतीय समाजाचे तीन भाग पडलेले आहेत. १) आदिवासी समुदाय २) ग्रामीण समुदाय ३) शहरी समुदाय असे तीन समुदाय आहेत.

**१) अदिवासी समुदाय:** अदिवासी समुदाय हा डोंगराळ भागात राहणारा समाज आहे. पर्यावरणाशी व निर्सगाशी यांचा सर्वात जास्त संबंध येतो. त्यांचा उदरनिर्वाह हा वनस्पती व पशुंवर चालतो. त्यांचा व्यवसाय म्हणजे शिकार करणे, फळे व कंदमुळे गोळा करणे. मध गोळा करणे, पशुपालन करणे हा आहे. त्यांचा दिनक्रम म्हणजे भूक भागविण्यासाठी अन्न पदार्थ गोळा करणे. आदिवासी हे निसर्गाची नित्यनियमाने पुजा करतात. त्यांचे दैवत म्हणजे जंगले व वृक्ष, नदी, सूर्य, चंद्र ही आहेत.

आदिवासी निसर्गाला देव मानतात कारण निसर्ग अनुकूल असेल तर पिके चांगली येतात. पाऊस पडतो जर निसर्ग कोपला तर वादळे, भुकंप होतात. जंगलात वणवे पसरतात. आणि पाऊस पडतो. त्यामुळे अतिवृष्टी महापूर येतो त्यामुळे आदिवासींचे जीवन उद्‌वस्त होते. म्हणून आदिवासीच्या मनात निसर्गाबद्दल आदराची भावना निर्माण झाली आहे.

**आदिवासींचे जीवन:**

यांत्रिक जादूटोणा मंत्र तंत्र यांना महत्त्व दिले जाते. ते डोंगरदऱ्या कपारीत एकांतात राहतात. त्यामुळे अज्ञान, अंधश्रद्धा, उपासमार, रोगराई, गरीबी व नैसर्गिक संकटामुळे आदिवासी मागासलेले राहिले आहेत. त्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती नाही. मोलमजूरी करून आपली गुजराण करतात. व मद्य पितात. व्यसनाधीन होतात. आजारी पडतात. आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. औषधोपचार करत नाहीत मंत्र तंत्रावर विश्वास ठेवतात. आदिवासी लोकांकडून प्राणी पक्षी व निसर्गाचा विनाश होऊ नये वृक्ष तोड होऊ नये म्हणूनच स्वातंत्र्यानंतर शासनाने घटनात्मक तरतूदी करून विविध व्यवसायांसाठी अनेक सुविधा निर्माण केल्या. शैक्षणिक सोयी सवलती दिल्या.

**२) ग्रामीण समुदाय:**

भारत देशातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती हा प्रमुख आधार आहे. शेतीवर आधारित इतर व्यवसायातही लोक गुंतलेले आहेत. ग्रामीण समुदायाचे मुख्य व्यवसाय प्राथमिक स्वरूपाचे असतात. मुख्यत्त्वे कच्चा माल उत्पादन करणारे असतात. पशुपालनातून मिळणारे दूध, शेतामधून मिळणारी अन्नधान्ये, फळे इत्यादी उत्पादने प्राथमिक स्वरूपाची आहेत.

ग्रामीण भगाात शेती व्यवसायासाठी परस्परांना सहकार्य करावे लागते. त्यामुळे परस्परावलंबन, एकमेकांबद्दल जिव्हाळा असतो. साहजिकच गावातील लोकांवर सामाजिक नियंत्रण असते. शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे ते स्थलांतर करीत नाहीत. परंपरेचा प्रभाव जास्त असतो. तिच ती पिके तेच बियाणे त्यामुळे पिकांचा कस कमी होतो. जीवनातील प्रश्न निसर्ग देवाच्या रूपाने निर्माण करतो. रोगराई, अपयश यामागे व्यक्तीचे पाप कारणीभूत असते. यातून पाप पुण्य कल्पना रूजली जाते. त्यातून अंधश्रद्धेची भावना बळावते व ती विकासाला घातक ठरते.

कौटुंबिक नैसर्गिक अडचणी निर्माण झाल्या कि देव कोपला त्याला प्रसन्न करण्यासाठी मंत्र तंत्र केले जातात. निष्काळजीपणा, विज्ञानाचा अभाव साहजिकच त्यामुळे आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणविषयक नुकसान होते. शेतीची अयोग्य पद्धतीने मशागत करणे, झाडे तोडणे, शेतीसाठी पाण्याचा अमर्याद वापर करणे, गायरानावर अमर्याद गुरे चारणे, या सर्व क्रियातून पर्यावरणाचे नुकसान होते. यासाठी ग्रामीण भागातील लोकांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी धडे दिले पाहिजेत. शेतकऱ्यांना पर्यावरणासंबंधीचे ज्ञान दिले पाहिजे. तर पर्यावरणाची हानी होणार नाही. रासायनिक खतांऐवजी सेंद्रीय खताचा वापर करावा. प्राणी संपत्ती जपण्यासाठी प्रयत्न करावा यासाठी जनजागृती केली तर पर्यावरण रक्षण होईल.
वेगवेगळया सणाचे महत्त्व व निसर्गपुजा महत्त्वाची आहे त्यामुळे प्राणी व पक्ष्याबद्दल आस्था निर्माण होते. आर्थिक फायदयासाठी पर्यावरणाकडे दुर्लक्ष केले जाते. हवा, पाणी, दुषित हाणार नाही, जमिनी वनस्पती, पक्षी व प्राण्याचे रक्षण केले तर पर्यावरणाचे रक्षण होईल.

**२) शहरी समुदाय (नागरी समाज):**

शहरामधील मोठमोठे उद्योग सुरू झाले. कच्चा मालावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करणारे उद्योग उभे राहिले. या शहरी भागात दुय्यम व तृतीय व्यवसायांचा प्रभाव जास्त असतो. उदा. फळापासून फळ प्रक्रिया उद्योग, दूधापासून दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणारे उद्योग, कापासापासून कापडनिर्मिती करणारे उद्योग, आधुनिक साधनांची निर्मितीचे उद्योग, विविध वस्तूंची निर्मिती करणारे कारखांने शहरे निर्माण झाली. वस्तूंच्या खरेदी विक्रीच्या बाजारपेठा निर्माण झाल्या. सांस्कृतिक व सामाजिक केंद्रे निर्माण झाली. त्यामुळे शहरी लोकांच्या पर्यावरणाशी संबंध येऊ लागला. कारखान्यातून बाहेर पडणारे विषारी वायू, दुषित पाणी, यामुळे रोगांचा फैलाव होतो. ध्वनी प्रदूषण, बेकायदेशीर बांधकामामुळे आलेला बकालपणा, सांडपाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी इत्यादीमुळे प्रदूषण वाढले आहे.

झोपडपट्टीची वाढ, कचरा, गुन्हेगारी, गलीच्छ वस्त्या यामुळे पर्यावरणाची हानी होते. नगरपालिका या गोष्टीकडे डोळेझाक करीत आहेत. आधुनिकीकरणामुळे शिक्षणामुळे सामाजिक गतीशीलतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पर्यावरणाचे महत्त्व लोकांना पटू लागले आहे. लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी कुटुंबनियोजनाचा स्वीकार केला जात आहे. वैज्ञानिक, तांत्रिक शिक्षणातील परिवर्तनामुळे विज्ञान व वास्तव  स्विकारण्याची भावना नव्या पिढीमध्ये वाढते आहे. विविध योजना आंदोलने चळवळी यांच्या माध्यमातून जनजागृतीचे काम प्रभावीपणे राबविले आहे. सामाजिक वनीकरण संवर्धन व वनशेती करणे आवश्यक आहे.
बारामती येथील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाने प्रदूषण टाळण्यासाठी सर्व उपाययोजना केल्या आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

५.१४.२ **वनीकरण:**

सामाजिक वनीकरणामध्ये रस्ते, लोहमार्ग, कालवे, नदयांचे प्रवाह, महाविद्यालये, शासकीय मालकीच्या मोकळया जागा, औद्योगिक विकास महामंडळाची क्षेत्रे, नापीक जमिनी या ठिकाणी सामाजिक वनीकरण केले जाते.

इंधन व इमारतीसाठी लाकूड पुरविणे, जनावरांचा चारा उपलब्ध करून देणे, शेतजमीन संरक्षण, लोकांना करमणुकीसाठी उद्याने तयार करणे, इत्यादी सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टे आहेत.

**वनशेती:** अगदी प्राचीन काळापासून भारतामध्ये शेती हा व्यवसाय केला जातो. प्राचीन भारतीय शेतकरी शेतीची धूप थांबविण्यासाठी शेतीच्या कडेला झाडे लावत होते. परंतु त्या पाठीमागे शेतीची धूप थांबविणे एवढाचा उद्देश होता.

काळांतराने शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आले. शेतीच्या संरक्षणासाठी झाडे लावायची परंतु त्या झाडांपासून अनेक वर्षे उत्पादन मिळाले व शेतीचे संरक्षण झाले पाहिजे अशा वृक्षांची निवड करून त्याची लागवड शेतकरी करू लागले. त्यामध्ये प्रामुख्याने चिंच, जांभूळ, साग, लिंब या वृक्षांची लागवड करू लागले शेतीबरोबर वनांचीही लागवड करणे म्हणजेच वनशेती होय.

**वृक्षारोपण:** वृक्षारोपण हा २० कलमी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून त्यांची अंमलबजावणी सामाजिक वनीकरण संचालनालयामार्फत करण्यात येते.
बारामती येथील श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाच्या स्थापनेपासून पर्यावरण संर्वधनासाठी प्रयत्न करीत आहे.

बारामतीमध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील अधिकारी व कामगार प्रत्येक वर्षी ६ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त बारामतीमध्ये पर्यावरण दिंडी काढतात. या पर्यावरण दिनानिमित्त ते दरवर्षी १०० वृक्षांची लागवड करतात. वृक्षांची लागवड व संवर्धनाची जबाबदारी श्रायबर डायनामिक्स डेअरीच घेते. पर्यावरण दिनानिमित्त ते कामगारांसाठी प्रकल्पामध्ये पर्यावरणावर निबंध स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा या सारख्या स्पर्धांचे आयोजन करतात. प्रकल्प परिसरामध्ये प्रकल्पाने चांगल्या पद्धतीने वृक्ष संवर्धन केलेले दिसते. वृक्षांची विशेष काळजी घेतली जाते. मोठमोठे वृक्ष, सुंदर बागा, हिरवळ यामुळे कंपनी परिसर सुशोभित दिसत आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीच्या काऊ प्रकल्पामध्ये फार मोठया प्रमाणावर वनीकरण करण्यात आले आहे. या काऊ प्रकल्पाकडे जमीन फार मोठया प्रमाणावर आहे. येथे गायींसाठी चारा उत्पादनही घेतले जाते. प्रकल्पाच्या सभोवताली वृक्षांची लागवड केली आहे.

**५.१४.३ कमी प्रदूषण करणारी यंत्रे:**

कोणताही औद्योगिक प्रकल्प म्हटले की यंत्रसामुग्रीचा आवाज असतोच. साखर कारखाने, कापड उद्योग यांचे आवाज वाहन निर्मिती उद्योगापेक्षा थोडे कमी असतात. औद्योगिकीकरणामध्ये हवा, पाणी, जमीन यांच्या प्रदुषणाइतकेच ध्वनी प्रदूषण ही एक समस्या आहे. ध्वनी प्रदूषणामध्ये एका विशिष्ट मर्यादेपलीकडे तो आवाज गेला म्हणजे तो नकोसा होतो. त्याला ध्वनी प्रदूषण असे म्हणतात. ध्वनी प्रदूषण ही मानव निर्मित समस्या आहे.

ध्वनी प्रदूषणामुळे, गोंगाटामुळे रक्तदाब वाढतो. रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. मानसिक स्वास्थ बिघडते. स्वभाव चिडखोर होतो, निद्रानाश, अपचन, अनुत्साह अशी लक्षणे दिसतात. श्रवण शक्तीवर परिणाम होतो. बऱ्याचशा कारखान्यामध्ये आवाजासाठीच्या संरक्षक यंत्रणा नसल्याने कामगारांवर अल्पावधीत बहिरेपणा, रक्तदाब व हदयाविकार यासारखे भयानक परिणाम जाणवतात.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प दूधावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये मोठमोठा आवाज करणारी यंत्रे नाहीत. वाहन उद्योगापेक्षा फार कमी आवाज करणारी यंत्रसामुग्री या प्रकल्पामध्ये आहे. त्यामुळे या प्रकल्पामध्ये कसलाही गोंगाट आढळत नाही. प्रत्येक १२ तासानंतर संबंधित मशिनरीची स्वच्छता केली जाते. या प्रकल्पाने जागतिक दर्जाची सर्वश्रेष्ठ मशिनरी बसविली आहे. त्यामुळे प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषण होत नाही.

### ५.१४.४ कचरा पुनर्वापर

कोणत्याही कारखान्यामधून तयार होणारा घनरूपातील कचरा हा निरूपयोगी कचरा म्हणून बाहेर टाकून दिला जातो. त्यामुळे कचरा प्रदूषण होते. या कचऱ्याचा पाण्याशी संपर्क आल्यावर तो कुजतो व वातावरणात दूर्गंधी निर्माण होते. तसेच अनेक कृमी किटकांची वाढ होऊन अनेक रोग निर्माण होतात. त्यामुळे कारखान्यातील घनरूपी कचऱ्याची विल्हेवाट लावणे फार महत्त्वाचे असते.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पात तयार होणारा घनरूपी कचरा रोजच्या रोज प्लॅस्टीक बॅगमध्ये भरला जातो व तो घनरूपी कचरा महाराष्ट्र एनव्हायरो प्रायव्हेट लिमिटेड ही घनरूपी कचऱ्यावर प्रक्रिया करणारी कंपनी घेऊन जाते. त्यामुळे बारामतीतील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील कचऱ्यामुळे प्रदूषण होत नाही.

### ५.१४.५ सांडपाण्याचा पूनर्वापर

श्रायबर डायनामिक्स डेअरी हा दूधावर प्रक्रिया करून दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती करणारा प्रकल्प आहे.

इतर उद्योगधंदयापेक्षा या प्रक्रिया उद्योगाला फार मोठया प्रमाणात पाणी लागते. तेवढया प्रमाणात सांडपाण्याची निर्मिती होते. प्रकल्पामध्ये रोज १० ते १२ लाख लिटर दूधावर प्रक्रिया करून पदार्थ बनविले जातात. प्रकल्पामध्ये १३ विभागामध्ये विविध उत्पादने घेतली जातात. त्यामुळे पाण्याचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो. या प्रकल्पामध्ये असणारी यंत्रणा दर बारा तासांनी स्वच्छ केली जाते. स्वच्छ करताना ॲसिड पाणी यांचे मिश्रण वापरून स्वच्छता केली जाते. यामुळे बरेच दूषित पाणी तयार होते. तसेच मदर लिकर ची निर्मिती होते.

दूग्धजन्य पदार्थ निर्मितीमधून जे सांडपाणी तयार होते ते सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामध्ये साठवून त्याच्यावर प्रक्रिया केली जाते. हे प्रक्रिया केलेले सांडपाणी पुनर्वापरासाठी योग्य आहे की नाही हे ठरविण्यासाठी ''महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड'' यांनी ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे त्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सि.ओ. डी. हा १०० ते १५० mg/*P.lit. असेल तर त्याचा पूनर्वापर करता येतो.


महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड (M.P.C.B) हे प्रकल्पातील सांडपाण्याची प्रदूषण पातळीवर नियंत्रित ठेवण्याचे काम करणारी सरकारी यंत्रणा आहे. महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्ड हे दर महिन्याला प्रकल्पातील सांडपाण्याचे सँपल घेतात. व त्यांचे परिक्षण करून प्रकल्पाला प्रदूषण पातळीचा अहवाल दिला जातो.

या दूग्ध प्रकल्पातील सांडपाण्याचा C.O.D (Chemical Oxygen Demand) हा 2200 mg/pl. इतका असतो. सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा C.O.D 100 to 150 mg/pl. पर्यंत राखणे हे प्रत्येक दूग्धप्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पावर बंधनकारक आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील पाण्याचा पुनर्वापर प्रकल्पाच्या आवारातील झाडासाठी, लॉनसाठी करण्यात येतो. तसेच प्रकल्पामध्ये

असणाऱ्या शेतीसाठी या पाण्याचा उपयोग केला जातो. या प्रक्रियायुक्त पाण्यावर श्रायबर डायनामिक्स डेअरीने त्यांच्या ‘सहयाद्री ॲग्रो’ या २२०० गायांच्या ‘काऊ प्रकल्पासाठी’ चारा उत्पादन करण्यासाठी या पाण्याचा वापर सुरू केला आहे. या पाण्याच्या वापरामुळे चारा उत्पादनात वाढ झाली आहे. सहयाद्री ॲग्रो प्रकल्पातील झाडासाठी गायांचे गोठे स्वच्छ करण्यासाठी या पाण्याचा उपयोग करतात. श्रायबर डायनामिक्स डेअरीने सांडपाण्याचा पुनर्वापर अतिशय योजनाबद्ध रितीने केला आहे. त्यामुळे या भागात पाण्यापासून प्रदूषण होत नाही.


**आकृती क्र: २**




फोटो क्र. २




आकृती क्र: ३



**फोटो क्र. ३**




### ५.१४.६ महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड (M.P.C.B) या मंडळाची कार्ये:

१. प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे व ते टाळण्यासाठी विविध उपाययोजना करणे.

२. प्रदूषणासंबंधी माहिती गोळा करणे व त्यानुसार ते कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. सांडपाणी प्रक्रिया उद्योग, कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी सोयी, हवा प्रदूषण नियंत्रण यासारख्या गोष्टींकडे लक्ष देणे व त्यासंबंधी माहितीचा अभ्यास करणे.

४. हवा प्रदूषण नियंत्रण, पूनर्वापर व पर्यावरणपूरक गोष्टींना प्रोत्साहन व पाठिंबा देणे.

५. उद्योजकांना प्रदूषण नियंत्रणाबाबत प्रशिक्षण देणे.

६. स्वच्छता व आरोग्यपूर्ण वातावरणाबाबत जनजागृती करणे व लोकांच्या प्रदूषणासंबंधीच्या तक्रारीवर लक्ष देणे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या कार्याप्रमाणे श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड ही प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी काम करते.

**५.१४.७ OHSAS: 18001: (Occuptional Health & Safety Assessment Series):**

- OHSAS मुळे कंपनीमध्ये निरोगी आरोग्य आणि चांगली सुरक्षितता मिळते.
- OHSAS हा जगामध्ये सर्वात जास्त ओळखला जाणारा सुरक्षितते संबंधीचा दर्जा आहे.
- OHSAS हे निरोगी आरोग्य आणि सुरक्षित व्यवस्थेशी संबंधित आहे.

**OHSAS वैशिष्टये**

प्रकल्पामध्ये ज्या दुर्घटना होऊ शकतात त्याचे मूल्यमापन करणे व त्या दूर्घटना कमी करता येतील या विषयी योजना तयार करणे. की ज्यामुळे जिवित, वित्त, स्थावर मालमत्तेचे नुकसान कमी होईल.

**OHSAS चे उद्दिष्टे**

१. आरोग्य आणि सुरक्षेसंबंधी सतर्क राहणे.

२. सुरक्षितते विषयी सुधारणा करणे.

३. अपघात आणि आघाताशी संबंधित खर्च कमी करणे.

४. व्यवस्थापनाचा दर्जा वाढविणे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी मध्ये OHSAS १८००१ मुळे कामगारांचे निरोगी आरोग्य आणि सुरक्षिततेसंबंधीची ISO 14001; Environmental Management Standard:

**5.14.8 ISO 14001:**

हे एक पर्यावरण व्यवस्थापनाचा मापदंड आहे. ISO 14001 मध्ये पर्यावरण व्यवस्थापनाच्या गरजांच्या आखणी केली आहे. पर्यावरण व्यवस्थापनाच्या आखणीमुळे श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील पर्यावरणाचे

संरक्षण होते. तसेच प्रकल्पातील प्रदूषण कमी होते आणि सर्व प्रकल्पातील पर्यावरणाचा समतोल राखला जातो.

श्रायबर डायनामिक्स डेअरीने पर्यावरण संवर्धनाचे धोरण आखले आहे. सामान्य आणि असामान्य गोष्टींचा अभ्यास केला जातो. त्याचबरोबर अपघात, आपत्कालीन आणि तातडीच्या काळात परिस्थिती हाताळण्याचा अभ्यास केला जातो.

पर्यावरणासंबंधी कायदेशीर गोष्टीचे पालन व्यवस्थापनाने केले आहे. कायदेशीर बाबीमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायदयाबरोबरच स्थानिक आणि विभागीय पर्यावरणासंबंधीचे कायदयांचे पालन केले आहे. तसेच शासन, समाज आणि गिऱ्हाईकांच्या बरोबर केलेल्या करारांचे पालन केले जाते.

व्यवस्थापनामधील वातावरणाचा अभ्यास करून 'पर्यावरण व्यवस्थापन पद्धतीला (EMS) एका मर्यादेत ठेऊन ISO 14001 ला तडा जाणार नाही याची काळजी घेणे. श्रायबर डायनामिक्स डेअरीला ISO 14001 हे पर्यावरणासंबंधीचे आदर्श मानांकन आहे.

### 5.14.9 Health Safety and Environment (H.S.E)

श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे. कारण हा प्रकल्प दूधावर प्रक्रिया करणारा प्रकल्प आहे. येथे कामगारांचे आरोग्य आणि पदार्थाची सुरक्षितता फार महत्त्वाची आहे. कामगारांचा काम करत असताना दूग्ध प्रक्रियेशी संबंध येत असतो. अशा वेळी कामगार निरोगी असला पाहिजे. कामगाराला काही आजार झाले असतील, अपघात झाला असेल तर अशा कामगारांचा संबंध उत्पादनाशी येऊ नये म्हणून सतत काळजी घेतली जाते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये

- सुरक्षित आरोग्य आणि वातावरणाला फार महत्त्व दिले आहे. निरोगी आरोग्य आणि सुरक्षितता या व्यवस्थेमध्ये सतत चांगले बदल करून त्या अजून चांगल्या बनविणे.

- मानवी आरोग्य आणि स्वच्छ वातावरणाला खूप महत्त्व आहे.
- प्रत्येक कामगाराला प्रशिक्षण देणे कि ज्यामुळे दुर्घटना कमी होतील व सुरक्षित काम होईल. प्रत्येक अपघात किंवा जोखिम वाचावता येऊ शकतो. त्यासाठी आपण काळजी घेतली पाहिजे.
- आरोग्य, सुरक्षितता आणि परिस्थितीशी सतत संपर्कात राहून गरजेनुसार त्यामध्ये बदल करणे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये प्रत्येक पाळीपूर्वी अधिकारी व कामगार आरोग्य आणि सुरक्षितेसंबंधी प्रतिज्ञा करतात.

मी मनापासून प्रतिज्ञा करतो की, मी स्वत:ला सुरक्षितता व आरोग्य यांच्या रक्षणाकरिता पूर्णपणे समर्पित करेन. तसेच सुरक्षिततेचे नियम कायदे व कार्यपद्धती यांचे काटेकोरपणे पालन करेन. माझ्या कामाशी निगडीत असलेले संभाव्य धोके व त्यासाठी घ्यावयाची काळजी याची मला पूर्ण कल्पना देण्यात आलेली आहे.

मी स्वत: अपघात न होण्याची काळजी घेईनच व माझ्याबरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांना सुद्धा सुरक्षित काम करण्याचे महत्त्व पटवून देईन व जर माझा कोणी सहकारी सुरक्षा साधनाशिवाय व असुरक्षित पद्धतीने काम करत असेल तर मी त्याला सुरक्षा साधने वापरण्याचा व सुरक्षित पद्धतीने काम करण्याचा सल्ला देईन. अपघात हे व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या प्रगतीला अडथळा आणतात. तसेच अपघात शारीरिक अपंगत्व, मृत्यु, आर्थिक हानी यास कारणीभूत ठरतात. याची मला पूर्णपणे जाणीव आहे. मी माझ्या स्वत:च्या माझ्या कुटूंबाच्या व माझ्या व्यवस्थापनाच्या हितासाठी आणि आपल्या कंपनीचे शुन्य अपघात हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीन.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये दर वर्षी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह ४ मार्च ते ११ मार्च या कालावधीत आयोजित केले जाते. सुरक्षा दिनानिमित्त ‘रस्ते सुरक्षितता’ या विषयामध्ये कर्मचारी, अधिकारी व नागरिक यांची जनजागृती करण्यासाठी

कंपनीने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. प्रश्नमंजूषा, घोषवाक्य, स्पर्धा तसेच चालता बोलता अशा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

अशा पद्धतीने श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये H.S.C चे कार्य चालते.

**५.१४.१० सि.डी.एम. माहिती:**

जागतिक तापमानवाढ ही अवघ्या जगाची समस्या आहे. ते रोखणे, स्थिर राखणे यासाठी प्रत्येक देशाने प्रयत्न करण्याची गरज आहे.

- जगामध्ये ''विकसित देश सर्वात जास्त कार्बनडाय ऑक्साईड वायूचे उत्सर्जन करतात ते रोखण्यासाठी १९९७ साली जपानच्या क्योटो शहरामध्ये एक परिषद आयोजित करण्यात आली होती.
- या परिषदेमध्ये एक ठराव मंजुर झाला. या परिषदेमध्ये अनेक देशांनी कार्बन डाय ऑक्साईडचं प्रमाण कमी करण्याचे आश्वासन दिले. त्याला 'क्योटो प्रोटोकॉल'' (केपी) म्हणतात.
- आज हे पर्यावरणाशी संलग्न राहणाऱ्या संकल्पना शोधून आणि राबवून जागतिक तापमान वाढ रोखण्यासाठी मदत करीत आहेत. इतर देश दुसऱ्या विकसनशील व अविकसित देशांना पैसे, तंत्रज्ञान, अपारंपारिक उर्जा स्त्रोत पुरवून किंवा त्याविषयीचे तंत्रज्ञान पुरवून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मदत करीत आहेत.
- ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी कार्बन क्रेडीट ही संकल्पना राबविली जात आहे. एक कार्बन क्रेडीट म्हणजे एक टन उत्सर्जित कार्बनडाय ऑक्साईड. हा कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जित करण्यासाठी मिळालेली परवानगी म्हणजे कार्बन क्रेडिट किंवा त्यांच्या एवढे ग्रीनहाऊस वायू (जीएचजी) कार्बन क्रेडिट्स हे संयुक्त राष्ट्रांनी मंजूर केलेल्या क्लिअर डेव्हलपमेंट मिकॅनिझम (सिडीएम) प्रकल्पाची अंमलबजावणी करणाऱ्या

'युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेंट चेन्ज' (युएनएफसीसीसी) द्वारे देण्यात येणारे 'पात्रता प्रमाणपत्र' आहे.

**सारांश**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाने पर्यावरण रक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामध्ये स्वत:चे शेतीमध्ये वनीकरण केलेले आहे. पर्यावरण दिनानिमित्त जनजागृती केली जाते. इंधनबचत, सामाजिक सुरक्षितता, रस्ते सुरक्षा, कंपनीतील कामगार सुरक्षा या विषयी सर्तकता पाळली जाते. महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्डाकिडून दरमहा तपासणी करून प्रदूषण पातळी नियंति. केली जाते. सांडपाण्याचा पूर्ण वापर चांगल्या पद्धतीने करत आहेत. तसेच ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण नियंत्रणाखाली आणण्यासाठी कार्बन क्रेडीट ही संकल्पना राबवित आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, श्रायबर डायनामिक्स डेअरीने पर्यावरण रक्षणासाठी सुयोग्य उपाय योजले आहेत.

✪✪✪

# प्रकरण सहावे
# उद्दिष्टे, गृहीतके

**गृहीतक क्र. १**

## ६.० श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे दूग्ध व्यावसायिकांना एक सबळ जोडधंदा मिळाला आहे.

### ६.१ दूग्ध व्यवसायाचा पूर्वीच्या परिस्थितीचा आढावा:

आज जरीशेतीसंबंधित सर्व क्षेत्रामध्ये बारामतीची गगन भरारी असली तरी बारामती तालुका हा सतत दुष्काळाच्या छायेतील प्रदेश होता. ब्रिटिश कालीन कालव्याने पाणी पुरवण्याचे नियोजन केले तरी सुद्धा बराचसा भाग दुष्काळीच होता. लोकांना रोजगार हमीच्या कामावर जावे लागत होते. उत्पन्नाचे कोणतेही दुसरे मार्ग नव्हते. ज्या भागात कालव्याचे पाणी येत होते त्या भागातही आधुनिक शेतीचा प्रसार झालेला नव्हता.

दारामध्ये गाई होत्या पण दूधासाठी नव्हत्या, त्या गाईंना झालेली वासरे (खोंड) शेतीसाठी उपयोगी पडतील या उद्देशाने गाई पाळल्या जात होत्या व त्यापाठीमागे धार्मिक भावना होती.

वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारांची संख्या शहराबरोबर ग्रामीण भागातही वाढत होती. रोजगारासाठी ग्रामीण भागातील माणसे शहराकडे धावू लागली होती. हे कृषी विकास प्रतिष्ठानने वेळीच ओळखले होते. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातच शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभे रहावेत या दृष्टीने कृषी विकास प्रतिष्ठानने प्रयत्नांची शिकस्त केली. यासाठी कृषी तज्ञ आप्पासाहेब पवार यांनी गावोगावी व्याख्याने दिली. त्यासाठी प्रशिक्षणे आयोजित केली. कृषी विकास प्रतिष्ठानने केलेल्या वातावरण निर्मितीमुळे आणि पुढाकारामुळे शेतीपूरक जोडधंदयांच्या संस्था, शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग जागोजागी उभे राहिले.

कृषी विकास प्रतिष्ठानने प्रसार, प्रात्यक्षिके व प्रशिक्षण याद्वारे आधुनिक तंत्रज्ञान व कृषी पूरक व्यवसायाचे ज्ञान शेतीपर्यंत पोहचविण्यासाठी कृषी विकास प्रतिष्ठानने 'आदर्श शेती फार्म' १९७४ मध्ये स्थापन केला.

बारामतीमध्ये दूगधव्यवसाय भरभराटीस येण्याअगोदर शेतकरी शेतीपूरक जोडधंदे करत होते. याचा आढावा घेतला आहे.

तक्ता क्र. ६.१ जोडधंदा

| अ.क्र | जोड व्यवसाय | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ११० | ५५% |
| २ | नाही | ९० | ४५% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** १) दूग्धव्यवसायांची भरभराट होण्यापूर्वी २०० दूग्धव्यवसायिकांपैकी ११० जण जोडधंदा करीत होते. त्यांचे शेकडा प्रमाण (५५%) इतके आहे. ९० दूग्धव्यावसायिक जोंडधंदा करीत नव्हते त्यांचे प्रमाण (४५%) इतके आहे.

दूग्ध व्यवसायापूर्वी ११० दूग्धव्यावसायिक कोणता जोड व्यवसाय करीत होते हे खालील तक्त्याद्वारे अभ्यासले आहे.

तक्ता क्र. ६.२ पूरक व्यवसाय

| अ.क्र | व्यवसायाचे नांव | संख्या | व्यवसायापासूनची प्राप्ती |
|---|---|---|---|
| १ | कुक्कुटपालन | ४८ | मासिक प्राप्ती कमी होते |
| २ | शेळीपालन | २२ | मासिक प्राप्ती नव्हती |
| ३ | रेशीम उद्योग | २० | सहामाही मासिक प्राप्ती |
| ४ | नर्सरी रोपवाटिका | १० | कमी उत्पन्न |
| ५ | शेत मजूरी | १० | कमी उत्पन्न |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** दूग्धव्यवसायापूर्वी २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ११० (उत्तरदाते) दूग्धव्यावसायिक हे विविध पूरक व्यवसाय करत होते. त्यामध्ये कुक्कुटपालन ४८, शेळीपालन २२, रेशीम उद्योग २०, रोपवाटिका १०, शेतमजूरी १० असे एकूण ११० उत्तरदाते पूरक व्यवसाय करीत होते. कुक्कुटपालनामध्ये मासिक प्राप्ती कमी होती. शेळीपालन व्यवसायामधून निश्चित प्राप्ती मिळत असे. रोपवाटिकेमध्ये कमी उत्पन्न मिळत होते. तर शेतमजूरीपासून जेमतेम उत्पन्न मिळत होते. म्हणजेच दूग्धव्यवसायापूर्वीच्या जोडव्यवसायापासून कमी उत्पन्न मिळत होते. बारामती तालुक्यामध्ये दूग्धोत्पादन या व्यवसायाला १९७० साली प्रारंभ झाला. प्रारंभी फक्त ७० लिटर दूध (एक दिवसाचे) संकलित झाले होते. त्यानंतर

१९८१ मध्ये – २८०० लिटर्स / प्रति दिवस

१९९१ मध्ये – ९३००० लिटर्स / प्रति दिवस

२००१ मध्ये – १९४००० लिटर्स / प्रति दिवस

२००८ मध्ये – १३९२४६ लिटर्स / प्रति दिवस

प्रतिदिन संकलित होते. यावरून असे दिसून येते की बारामती तालुक्यामध्ये दूग्धोत्पादनामध्ये प्रतिवर्षी वाढ झाली आहे. बारामती तालुका दूध संघाने दूध उत्पादन वाढीसाठी केलेले प्रयत्न व श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविल्यामुळे बारामती तालुक्यातील दूग्धव्यावसायिक एक सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे.

**६.१.२** या सबळ जोडधंदयामुळे दूग्धव्यावसायिकांमध्ये झालेला बदल खालील सारणीवरून लक्षात येतो.

तक्ता क्र. ६.३ २०० दूग्ध व्यावसायिकांचा विविध घटकातील सहभाग

| अ. क्र | घटक | २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नियमित उत्पन्नाची प्राप्ती होते. | १८२ | ९१% |
| २ | शेतीसाठी भांडवलाचा स्त्रोत | १४० | ७०% |
| ३ | दूग्ध व्यावसायिक महिलांचा व्यवसायातील उत्पन्नातील वाटा | ६२ | ३१% |
| ४ | दूग्धव्यावसायिक महिलांचा बचत गटातील सहभाग | ४० | २०% |
| ५ | दूग्ध व्यावसायिक महिलांची मुलांच्या शिक्षणास मदत | ४६ | २३% |
| ६ | दूग्ध व्यावसायिक महिलांची गृहोपयोगी वस्तूंची खरेदीतील सहभाग | ४३ | २१.५% |
| ७ | दूग्ध व्यावसायिकांचा लग्नसमारंभावरील खर्च | ११ | ५.५% |
| ८ | दूग्ध व्यावसायिक महिलांचा दागदागिने खरेदीतील सहभाग | २१ | १०.५% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांना एक सबल जोडधंदा मिळाल्यामुळे त्यांचा विविध घटकामधील सहभाग वाढला आहे.

बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे २०० दूग्धव्यावसिकांपैकी १८२ दूग्धव्यावसायिक उत्पन्नाचा नियमित स्त्रोत निर्माण झाला आहे. त्यांचे प्रमाण दूग्धव्यवसाय हा एक सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे. कारण दूध विक्रीची हमी व तसेच उत्पादित सर्व दूधाची स्विकृती होती. दर पंधरा

दिवसांनी रोख पैसे मिळतात. तसेच पशुवैद्यकीय मदत, दूध उत्पादनवाढीविषयी मार्गदर्शन, सकस पशुखादय पुरवठा इत्यादीमुळे दूध उत्पादनामध्ये वाढ झाली आहे. ही उत्पादनवाढ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमुळे झाली आहे. त्यामुळे दूग्ध व्यावसायिकांना दूग्धव्यवसाय हा एक सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे.

तसेच १४० दूग्धव्यवसायिकांच्या मते, दूग्ध व्यवसाय हा शेतीसाठी भांडवलाचा स्त्रोत निर्माण झाला आहे. (त्यांचे प्रमाण ७०%) कारण या व्यवसायामुळे शेतकरी सोसायटयांचे पिक कर्ज घ्यावे लागत नाही. खाजगी सावकारांचे कर्ज घ्यावे लागत नाही. त्यामुळे शेतीसाठी हा एक प्रमुख भांडवलाचा स्त्रोत आहे.

बारामती तालुक्यातील २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी ६२ महिला दूग्ध व्यावसायिक आहेत. त्यामुळे या महिलांच्या उत्पन्नाचा वाटा आहे. अशा दूग्धव्यावसायिक महिलांचे प्रमाण (३१.५%) इतके आहे. या महिला दिवसभर गायांची देखभाल करतात. गायांना पाणी पाजणे, चारा टाकणे, दिवसभर स्वच्छेता राखणे, दूधाच्या भाडयांची स्वच्छता करणे. गायांच्या आरोग्याविषयी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा इत्यादी कामे महिलाच करत आहे. त्यामुळे या महिलांचा दूग्धव्यवसायात सक्रिय सहभाग आहे.

२०० दूग्ध व्यवसायिकांपैकी ४० महिला या बचत गटाच्या सदस्या आहेत. त्यामुळे त्या बचत गटामध्ये पैशाची बचत करत आहे. महिलांनी बचत करून बचत गटाकडून अर्थसहाय्य घेऊन गाई खरेदी केल्या आहे व दूग्ध उत्पादनामध्ये वाढ केली आहे. त्यामुळे दूग्ध व्यवसाय हा एक सबळ जोडधंदा झाला आहे.

४६ दूग्धव्यावसायिक महिला या मुलांचे शिक्षणासंबंधीचा निर्णय स्वत: घेतात. त्यांचे प्रमाण (२३%) आहे. उच्च शिक्षणासाठीची तरतूद महिला बचत गटाकडून अर्थसहाय्य घेऊन करत आहेत.

दूग्ध व्यवसायातील ४३ महिला या दूग्धव्यवसायातून आर्थिक बचत करत आहे. व या आर्थिक बचतीमधून आपल्या घरामध्ये गॅस कनेक्शन, डिश टी.व्ही, फ्रिज, पिठाची गिरणी या सारख्या वस्तू खरेदी केल्या आहे. हे प्रमाण (२१.५%) इतके आहे. या महिलांनी सामाजिक प्रतिष्ठेसाठी व गरजेसाठी वस्तु खरेदी केल्या आहे. पुरूष दूध व्यावसायिकांनी दूध वाहतुकीसाठी वाहन खरेदी केले आहे.

दूग्ध व्यवसायाअगोदर मुला—मुलींची लग्ने साध्या पद्धतीने दारातच केली जात. परंतू दूग्ध व्यवसायामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. त्यामुळे दूग्धव्यावसायिक घरातील लग्न कार्यालयात करत आहेत. लग्नामध्ये भरपूर खर्च केला जात आहे. सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी लग्नसमारंभामध्ये खर्च करित आहेत.

दूध दराचे नियमित उत्पन्न येत असल्यामुळे बचत करून २१ महिला दागदागिन्यांची खरेदी स्वत: करीत आहे. त्यांचे प्रमाण (१०.४%) आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे महिला अनेक बाबतीत प्रगती करत आहे. दागदागिने दुरूस्त करणे, मोडणे, नवीन करणे, याचे निर्णय स्वत: महिला घेत आहे. दूग्धव्यवसाय या सबळ जोडधंदयामुळे महिलांची निर्णय क्षमताही वाढली आहे.

**६.१.३ सामाजिक मनोवैज्ञानिक घटक**

**१) आत्मविश्वास:** दूग्ध व्यवसायात या सबळ पुरक जोडधंदयामुळे नियमित स्त्रोतामुळे महिला आर्थिक व्यवहार करू लागल्या आहेत. बँकेत जाणे, पैसे काढणे, भरणे, मुलांची शैक्षणिक फी भरणे, किरकोळ खरेदी इत्यादीमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. महिलांचा सामाजिक सहभाग वाढला आहे. त्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागला आहे.

**२) निर्णय प्रक्रियेत सहभाग:** शेतकरी कुटूंबातील महिलांचा आर्थिक देवाण—घेवाणीशी फारसा संबंध येत नव्हता. परंतु दूग्ध व्यवसाय हा जोडव्यवसाय सुरू झाल्यापासून त्यांचा आर्थिक व्यवहाराशी संबंध येऊ लागला आहे. दूध डेअरीवरून पगार आणणे, पशुखाद्याची खरेदी करणे, दूधाच्या दराबाबत चौकशी,

जनावरांचे आजाराविषयी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा व त्यावर उपायाबाबतचे निर्णय महिला घेत आहेत. घरातील किरकोळ खरेदी, मुलांची शैक्षणिक प्रगती विषयी शाळेत जाऊन चौकशी करतात. महिला बचत गटाच्या माध्यमातून उत्पादनांची विक्री, कच्चा मालाची खरेदी, दराबाबत चौकशी करून खरेदीचे निर्णय महिला घेत आहे. राज्य सरकारच्या महिला आरक्षण धोरणामुळे ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद, यासारख्या ठिकाणी महिलांच्या राजकीय सहभाग दिसून आला आहे. कारण दूग्धव्यवसाय हा सबळ जोडधंदा मिळाला आहे.

**३) नेतृत्व गुणांची निर्मिती:** सबळ पूरक जोडधंदयामुळे महिला आर्थिकदृष्टया सक्षम झाल्या आहेत. निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला आहे. साहजिकच त्यांच्या आत्मसन्मानामध्ये वाढ झालेली आहे. सक्षमीकरणाविषयीचा सरकारच्या सकारात्मक धोरणामुळे महिलामध्ये नेतृत्व गुणांची वाढ झाली आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे अतिरिक्त दूधाचा प्रश्न कायमचा सुटलेला आहे. त्यामुळे अधिक दूध उत्पादनास वाव मिळाला आहे. त्यामुळे बेरोजगारीही कमी होण्यास मदत होत आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास चांगल्या प्रकारे झाला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे दूध उत्पादकांना एक चांगला सबळ जोडधंदा मिळाला आहे.

**६.१.४** श्रायबर डायनामिक्स डेअरी स्थापनेनंतर दूग्धव्यावसायिकांना सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे. दूग्धव्यावसायिक या धंदयाकडे सबळ जोडधंदा म्हणून पाहत आहेत.

तक्ता क्र. ६.४ सबळ जोडधंदा

| अ.क्र | पर्याय | दूग्धव्यावसायिक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १८२ | ९१% |
| २ | नाही | १८ | ०९% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड मुळे १८२ दूग्धव्यावसायिकांना सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे. त्यांचे प्रमाण (९१%) आहे. १८२ दूग्धव्यावसायिकांपैंकी किती उत्तरदात्यांचा दूग्धव्यवसाय हा मुख्य व्यवसाय आहे. तर किती दूग्धव्यवसायिक जोडव्यवसाय करत आहे ते अभ्यासले आहे.

### ६.१.५ दूग्ध व्यवसाय प्रकार

तक्ता क्र ६.५ मुख्य व्यवसाय

| अ.क्र | व्यवसाय प्रकार | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जोड व्यवसाय | १२० | ६०% |
| २ | मुख्य व्यवसाय | ८० | ४०% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**अर्थनिर्वचन:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १२० दूग्ध व्यावसायिक जोडव्यवसाय व्यवसाय म्हणून दूग्धव्यवसाय करीत आहेत. त्यांचे प्रमाण (६०%) आहे. तर मुख्य व्यवसाय म्हणून ८० दूग्धव्यावसायिक हा व्यवसाय करीत आहेत. त्यांचे प्रमाण (४०) आहे. ८० मुख्य दूग्धव्यावसायिकांपैकी एका व्यावसायिकाचे एका दिवसाचे सरासरी उत्पन्न.

- एक दिवसाचे सरासरी दूध उत्पादन: ५९.५ लिटर.
- एक लिटरचा दूध दर : १२ रू.
- एक दिवसाचे सरासरी उत्पन्न : ७१४ रू.
- मासिक उत्पन्न सरासरी : २१४२० रू.

इतके आहे. हे उत्पन्न नियमित आहे. कारण श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे दूध स्विकृतीची हमी मिळाली आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प बारामती तालुक्यामध्ये १९९६ मध्ये कार्यान्वित झाला आहे. या प्रकल्पाच्या अगोदर महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या दूधाची स्विकृती आठवडयातून एकदा किंवा दोनदा होत नव्हती. परंतु श्रायबर डायनामिक्स डेअरी सुरू झाल्यानंतर एकही दिवस असा आला नाही की दूधाची स्विकृती झाली नाही. या प्रकल्पाची रोजची दूध हाताळणी क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे. महाराष्ट्रात दूध उत्पादनामध्ये सातत्याने वाढ होत आहे. शेतकऱ्यांना दूध उत्पादन वाढीविषयी प्रकल्पाकडून सतत मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे बारामती तालुक्यातील दूग्ध व्यावसायिकांच्या मते श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे एक सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे.

**सारांश:**

बारामती तालुका हा सतत दुष्काळाच्या छायेतील प्रदेश होता. ब्रिटीश कालीन कालव्याने पाणी पुरविल्याचे नियोजन केले तरीसुद्‌धा बराचसा भाग दुष्काळी होता. लोकांना रोजगार हमीच्या कामावर जावे लागत होते. उत्पन्नाचे कोणतेही दुसरे साधन नव्हते. ज्या भागात कालव्याचे पाणी येत होते. त्या भागातही आधुनिक शेतीचा प्रसार झालेला नव्हता. श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाच्या अगोदर दूग्धव्यवसायिक शेतीपूरक जोडधंदा करत होते. काही करत नव्हते. त्यामध्ये कुक्कुटपालन, शेळीपालन, रेशीम उद्योग, नर्सरी, रोपवाटीका व शेतमजुरी असे शेतीपूरक व्यवसाय करत होते. नंतर बारामती तालुक्यामध्ये दुग्धउत्पादन व्यवसायाला १९७० साली झाला. पहिल्या दिवशी फक्त ६० लीटर दूध एका दिवसाचे संकलित झाले होते. त्यानंतर १९८१ मध्ये सरासरी प्रतीदिवशी २८०० लिटर्स १९९१ मध्ये सरासरी प्रतीदिवशी २८०० लिटर्स, १९९१ मध्ये सरासरी ९३००० लिटर्स प्रतीदिवस नंतर २००१ मध्ये सरासरी १९४००० लिटर्स प्रतीदिवस आणि २००८ मध्ये सरासरी १३९२४६ लिटर्स प्रतीदिवस दूध संकलित झाले आहे. प्रतीवर्षी दूध उत्पादनात वाढ झालेली दिसते. बारामती तालुका दूध उत्पादनात वाढ झालेली दिसते. बारामती तालुका दूध संघाने दूध उत्पादन

वाढीसाठी केलेले प्रयत्न व श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे अतिरिक्त दुधाचा प्रश्न सोडविल्यामुळे बारामती तालुक्यातील दुग्धव्यवसायिकांना एक सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे.

या सबळ जोडधंद्यामुळे दूग्धव्यावसायिकांमध्ये बदल झाला आहे. त्यामध्ये दुग्धव्यवसायिकांना नियमित उत्पन्नाची प्राप्ती झाली आहे. शेतीसाठी भांडवलाचा स्त्रोत निर्माण झाला आहे. दूग्धव्यावसायिकांमध्ये माहिला दुग्धव्यावसायिकांची संख्या वाढली आहे. महिला बचत गटातील सहभाग वाढला. महिला दुग्धव्यावसायिक हया कुटुंबातील मुलांच्या शिक्षणास आर्थिक मदत करत आहेत. शिवाय गृहउपयोगी वस्तुंची खरेदी व दागदागिने खरेदी करणे यातील सहभाग वाढला आहे. व कुटुंबातील लग्नसमारंभाची पद्धत बदलली आहे. दुग्धव्यवयायिक महिलांमध्ये आर्थिक सबलीकरण झाल्यामुळे महिलांची निर्णय क्षमता वाढली आहे. तसेच त्यांच्यामध्ये असा विश्वास निर्माण झाला आहे. त्याच्या निर्णप्रक्रियेत सहभाग वाढला आहे. त्याचे राजकिय महत्त्व वाढले आहे. सरकारच्या सकारात्मक धोरणामुळे महिलांमध्ये नेतृत्त्व गुणांचा विकास झाला आहे. सहाजिक महिलांच्या आत्मविश्वासामध्ये वाढ झाली आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे अतिरिक्त दूधाचा प्रश्न कायमचा सुटलेला आहे. त्यामुळे अधिक दूध उत्पादनास वाव मिळाला आहे. त्यामुळे बेरोजगारी कमी झाली आहे. आर्थिक शैक्षणिक व सामाजिक व सांस्कृतिक प्रगती झालेली आहे. एक सबळ जोडधंदा डेअरीमुळे मिळाला आहे. व दुग्धव्यवसाय हा मुख्य व्यवसाय देखील झाला आहे.

**गृहीतक क्र: २: श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे दूग्ध व्यावसायिकांचे विशेषत: ६.२ महिलांचे आर्थिक सबलीकरण झाले आहे व त्यांच्या सामाजिक स्तरात वाढ झाली आहे.**

एखादया कुटुंबाचा तसेच गावाचा व तालुक्याचा विकास झाला आहे. असे जेव्हा म्हणतो तेव्हा तेथील महिलांचे सबलीकरण व विकास झालेला असतो. आज शिक्षण घेतलेल्या महिलांबरोबर अशिक्षित मजूरी करणाऱ्या महिला देखील आर्थिकदृष्टया सदन झालेल्या आहेत. याचे एकमेव कारण बचत गट. बचत गटामुळे महिला खऱ्या अर्थाने स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या आहेत. बांग्लादेशामध्ये पहिला बचत गट मोहम्मद युनूस यांनी १९७४ साली स्थापन केला. भारतामध्ये १९९२ साली बचत गटाची मुहर्तमेढ रोवली. तर बारामती तालुक्यामध्ये १९९६ साली पहिला बचत गट सुरू केला आहे.

प्रत्येक महिलामध्ये कला असते फक्त तिला गरज असते ती संधी मिळण्याची. संधी मिळाली की त्या अतोनात कष्ट करतात व त्यातून त्या यशस्वी होत आहेत.

पूर्वी पुरूष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. ग्रामीण भागातील महिला, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय यापैकी कोणत्याही क्षेत्रामध्ये स्थिर नव्हत्या. सबलीकरणापूर्वीच्या महिलांचा आर्थिक स्तराबाबत विचार केला असता तिला सतत दुसऱ्यांवर अवलंबून रहावे लागत होते. तिच्या नावावर कोणतीही मालमत्ता नव्हती. समाजातील स्थान दुय्यम होते. कुटूंबात नेहमीच दुय्यम दर्जाची वागणूक मिळत होती. साहजिकच तिला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यात अडथळे येत होते. शिक्षणाच्या बाबतीत ग्रामीण महिलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी होते. महिलांना घरगुती कामे करावी लागत होती. कुक्कुटपालन, पशुपालन, रेशीमउद्योग, केले जात होते. त्या पैशावर स्त्रियांना हक्क नव्हता. काही महिला शेतमजूर म्हणून काम करीत असत. त्यांचा पगारही कुटूंब

प्रमुख घेत होते. थोडक्यात, महिलांचा कोणत्याही पैशावर हक्क नव्हता. यांच्या श्रमाला मूल्य नव्हते. त्यांचेकडे उत्पन्नाचे साधनही नव्हते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे बारामती तालुक्यातील ६२ महिला दूग्ध व्यावसायिकांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय सबलीकरण झाले आहे. या दूग्धव्यावसायिक महिलांची सबलीकरणापूर्वीची परिस्थिती कशी होती ते खालील तक्त्यावरून लक्षात येते.

तक्ता क्र. ६.६ ६२ दूग्ध व्यवसायिक महिलाची आर्थिक सबलीकरणापूर्वीची परिस्थिती

| अ.क्र | सबलीकरणापूर्वीची परिस्थिती घटक | महिलांचा सहभाग | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होता | शे. प्रमाण | नाही | शे. प्रमाण |
| १ | उत्पन्नात वाटा | १२ | १९.३५% | ५० | ८०.६४% |
| २ | बचत गट सहभाग | २२ | ३५.४८% | ४० | ६४.५१% |
| ३ | मुलांचे शिक्षणाचा निर्णय | १९ | ३०.६४% | ४३ | ६९.३५% |
| ४ | वस्तु खरेदी | २१ | ३३.८७% | ४१ | ६६.१२% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

## ६.२.२

तक्ता क्र. ६.७ (६२) दूग्ध व्यवसायिक महिलांची सबलीकरणानंतरची आर्थिक परिस्थितीचा आढावा

| अ.क्र | सबलीकरणानंतरची परिस्थिती घटक | महिलांचा सहभाग | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होता | शे. प्रमाण | नाही | शे. प्रमाण |
| १ | उत्पन्नात वाटा | ४१ | ६६.१२% | २१ | ३३.८७% |
| २ | बचत गट सहभाग | ४० | ६४.५१% | २२ | ३५.४८% |
| ३ | मुलांचे शिक्षणाचा निर्णय | ४२ | ६७.७४% | २० | ३२.२५% |
| ४ | वस्तु खरेदी | ४३ | ६९.३५% | १९ | ३०.८४% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

बारामती तालुक्यातील २०० दूग्ध व्यावसायिकांपैकी ६२ महिला या दूग्धव्यावसायिक आहेत. या ६२ दूग्धव्यावसायिक महिलांची सबलीकरणापूर्वीचा व सबलीकरणानंतरचा आर्थिक घटकांचा अभ्यास.

**१) उत्पन्नात वाटा स्त्रोत:** ६२ दूग्ध व्यावसायिक महिलांपैकी १२ दूग्धव्यावसायिक महिलांना सबलीकरणापूर्वी उत्पन्नाचा वाटा मिळत होता. त्यांचे प्रमाण १९.३५% इतके आहे. उर्वरित ५० महिलांना उत्पन्नाचे स्त्रोत नव्हते. त्यांचे प्रमाण (८०. ६४%) इतके आहे.

सबलीकरणानंतर दूग्ध व्यवसायामुळे ४१ महिलांना उत्पन्नाचा (स्त्रोत निर्माण झाला त्याचे प्रमाण (६६.१२%) इतके आहे. उर्वरित २१ महिलांना उत्पन्नाचा स्त्रोत नव्हता. त्यांचे प्रमाण (३३.८७%) इतके आहे.

सबलीकरणापूर्वी १२ महिलांना उत्पन्नाचा स्त्रोत होता व सबलीकरणानंतर ४१ महिलांना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला. म्हणजेच २९ जादा महिलांना दूग्ध व्यवसायामुळे उत्पन्नाचा वाटा मिळू लागला आहे. त्यांचे शेकडा प्रमाण (४६.७७%) इतके आहे. यावरून असे निदर्शनास येते की, महिलांचे सबलीकरण मोठया प्रमाणात झाले आहे. सबलीकरणापूर्वी उत्पन्नाचा वाटा (१९.३५%) होता. सबलीकरणानंतर (८०.६४%) इतका झाला आहे. यावरून महिलांचे आर्थिक सबलीकरण मोठया प्रमाणात दूग्धव्यवसायामुळे झाले आहे.

**२) बचत गट सहभाग:** ६२ दूग्धव्यावसायिक महिलांपैकी २२ महिला सबलीकरणापूर्वी बचत गटाच्या सदस्या होत्या. त्यांचे प्रमाण (३५.४८%) इतके आहे. तर ४० महिला बचतगटामध्ये सहभागी नव्हत्या. त्यांचे प्रमाण (६४.५१%) इतके आहे.

सबलीकरणानंतर बचत गटामध्ये ४० महिला सहभागी झाल्या. त्यांचे प्रमाण (६४.५१%) इतके आहे. तर २२ महिला बचत गटामध्ये सहभागी झाल्या नाहीत त्यांचे शेकडा प्रमाण (३५.४८) इतके आहे.

**३) मुलांचे शिक्षणासंबंधी निर्णय:** महिला सबलीकरणापूर्वी ६२ दूग्धव्यावसायिक महिलांमधील १९ महिला मुलांचे शिक्षणासंबंधीचा निर्णय (फी भरण्यासंदर्भात) घेत होत्या. त्यांचे शेकडा प्रमाण (३०.६४%) इतके आहे. तर ४३ महिला मुलांचे शिक्षणासंबंधी निर्णय घेण्याची जबाबदारी घेत नव्हत्या. त्यांचे शेकडा प्रमाण (६९. ३५%) इतके आहे.

महिला सबलीकरणानंतर ६२ दूग्धव्यावसायिक महिलापैंकी ४२ महिला मुलांचे शिक्षणाविषयीचे निर्णय घेऊ लागल्या आहेत. त्यांचे प्रमाण (६७.७४%) इतके आहे. २० महिलांनी मुलांचे शिक्षणाविषयीची जबाबदारी नाकारली त्यांचे शेकडा प्रमाण (३२.२५%) इतके आहे.

**४) वस्तु खरेदी:** ६२ दूग्धव्यावसायिक महिलांपैकी २१ महिला या महिला सबलीकरणापूर्वी खरेदी करीत होत्या. स्वत:चे निर्णय घेत होत्या. त्यांचे शेकडा प्रमाण (३३.८७%) इतके आहे. तर ४१ महिला वस्तू खरेदीचा निर्णय घेऊ शकत नव्हत्या. त्यांचे प्रमाण (६६.१२%) इतके आहे.

सबलीकरणानंतर ६२ दूग्धव्यावसायिक महिलांमधील ४३ महिलांनी वस्तूची खरेदी केली आहे. त्यांचे शेकडा प्रमाण (६९.३५%) आहे. तर १९ महिला या वस्तू खरेदीचा निर्णय घेऊ शकत नव्हत्या. त्यांचे शेकडा प्रमाण (३०.८७%) इतके आहे. शासनाच्या विविध योजनांचे सहकार्य मिळत असल्यामुळे सबलीकरणाला वेग प्राप्त झाला आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पाने बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांना सबळ जोडधंदा प्राप्त करून दिला आहे. या २०० दूग्ध व्यवसायिकांपैकी ६२ महिला या दूग्ध व्यावसायिक आहेत. या ६२ दूग्ध व्यावसायिक महिलांची सबलीकरणापूर्वीची सामाजिक स्थिती व सबलीकरणानंतरची सामाजिक स्थितीचा आढावा घेतला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

### ६.२.३ दूग्धव्यावसायिक महिलांचे दूग्ध व्यवसायपुर्वीचे सामाजिक स्थान

तक्ता क्र. ६.८ (६२) दूग्धव्यावसायिक महिलांचे दूग्धव्यावसापूर्वीचे सामाजिक स्थान

| अ.क्र | साामजिक स्थान | सबलीकरणापूर्वीची सामाजिक परिस्थिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होता | शे. प्रमाण | नाही | शे. प्रमाण |
| १ | कौटूंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग | १९ | ३०.६४% | ४३ | ६९.३५% |
| २ | समाजातील स्थान | ०७ | ११.२९% | ५५ | ८८.७०% |
| ३ | गावातील राजकारणात सहभाग | ०९ | १४.५१% | ५३ | ८५.४८% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

तक्ता क्र. ६.९ (६२) दूग्धव्यावसायिक महिलांचे सबलीकरणानंतरचे सामाजिक स्थान

| अ.क्र | साामजिक स्थान | सबलीकरणानंतरची सामाजिक परिस्थिती | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होता | शे. प्रमाण | नाही | शे. प्रमाण |
| १ | कौटूंबिक निर्णय प्रक्रियेत सहभाग | ४१ | ६६.१२% | २१ | ३३.८७% |
| २ | समाजातील स्थान | ३६ | ५८.०६% | २६ | ४१.९३% |
| ३ | गावातील राजकारणात सहभाग | ३५ | ५६.४५% | २७ | ४३.५४% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६२ दूग्धव्यावसायिक या महिला आहेत. या ६२ दूग्धव्यावसायिक महिलापैकी सबलीकरणापूर्वी कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील सहभाग हा १९ महिलांचा होता. त्यांचे प्रमाण (३०.६४%) इतके आहे. तर ४३ महिला कौटूंबिक निर्णय प्रक्रियेत सहभागी नव्हत्या. त्यांचे प्रमाण (६९.३५%) इतके आहे.

सबलीकरणानंतर कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत ४१ महिलांचा सहभाग आहे. त्यांचे प्रमाण (६६.१२%) इतके आहे. २१ महिला निर्णय प्रक्रियेत सहभागी नव्हत्या. त्यांचे प्रमाण (३३.८७%) इतके आहे.

बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६२ दूग्धव्यावसायिक महिला आहेत. त्यांच्या सामजिक स्थानाचा विचार करता सबलीकरणापूर्वी फक्त ०७ महिलांना सामाजिक स्थान प्राप्त झाले होते. त्यांचे प्रमाण (११.२९%) इतके आहे. ५५ महिलांना सामाजिक स्थान नव्हते त्यांचे प्रमाण (८८.७०%) इतके आहे. सबलीकरणानंतर ६२ पैकी ३६ महिलांना सामाजिक स्थान प्राप्त झाले आहे. त्यांचे प्रमाण (५८.०६%) आहे. तर २६ महिलांचे सामाजिक स्थान उंचावले नाही. त्यांचे प्रमाण (४१.९३%) इतके आहे.

वरील विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, महिलांचे सामाजिक स्थानात वाढ होण्यासाठी आर्थिक घटक महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर निर्णय क्षमता, सार्वजनिक कार्यक्रमातील सहभाग, महिला मंडळातील सहभाग इत्यादीमुळे महिलांच्या सामाजिक स्थानात वाढ झाली आहे.

बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६२ दूग्ध व्यवसायिक या महिला आहेत. सबलीकरणापूर्वी गावातील राजकारणामध्ये महिलांना नगण्य स्थान होते. कारण महिलांना निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेत नसत. आर्थिक स्वावलंबन नव्हते. त्यामुळे महिलांना महत्त्व दिले जात नव्हते.

६२ दूग्धव्यावसायिक महिलांपैकी सबलीकरणापूर्वी फक्त ९ महिलांना गावातील राजकारणात महत्त्व होते. त्यांचे शेकडा प्रमाण (१४.५१%) इतके आहे.

सबलीकरणानंतर गावातील राजकारणामध्ये महिलांना बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. राजकीय क्षेत्रामध्ये महिलांना आरक्षण तसेच महिलांनी स्वबळावर केलेली आर्थिक, सामाजिक प्रगती, आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाल्यामुळे महिलांचा

गावातील राजकारणातील सहभाग वाढला. गावातील राजकारणामध्ये ३५ दूग्धव्यावसायिक महिला सक्रीय आहेत. त्यांचे प्रमाण (५६.४५%) इतके आहे.

राजकीय वारसा, आर्थिक सुबत्ता, तसेच सबलीकरणानंतर मिळालेला आत्मविश्वास, नेतृत्वगुण, इत्यादीमुळे महिलांचा गावातील राजकारणामध्ये सहभाग वाढला आहे.

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न 'कृषी विकास प्रतिष्ठानच्या' भिमथडी जत्रेतून होत आहे.

महिला बचत गटाच्या माध्यमातून संपूर्ण ग्रामीण भाागात एक मोठी चळवळ उभी राहिली आहे. ग्रामीण भागातील महिलाकडे उत्पादन कौशल्य आहे. त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ व मार्केटिंगची सोय भिमथडी जत्रेने उपलब्ध करून दिली आहे. ग्राहक व उत्पादक यांच्यातील दुवा बनण्याच्या दृष्टीतून भिमथडी जत्रा महत्त्वाची ठरली आहे. ग्रामीण महिलांच्यामध्ये भिमथडी जत्रेने आत्मविश्वास वृद्धींगत केला आहे.

भिमथडी जत्रा २००६ पासून सुरू केली आहे. पुण्यामध्ये ही जत्रा भरविली जाते. ग्रामीण भागातील महिला बचत गटांना शहराची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. शहरी ग्राहकांना उत्तम दर्जाचा माल त्यांच्या दारातच भिमथडी जत्रेमुळे उपलब्ध झाला आहे.

बचत गटातील महिलांना त्यांच्या उत्पादनाचे पॅकींग आकर्षक करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये पॅकींग, लेबलिंग, मार्केटिंगची माहिती दिली जाते.

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न भिमथडी जत्रेच्या निमित्ताने चालू आहे. भिमथडी जत्रेमुळे महिला बचत गटाच्या उत्पादनाला हक्काची बाजारपेठ मिळाली. जत्रेच्या निमित्ताने आपले कौशल्य दाखविण्याची मोठी संधी महिलांना मिळाली.

त्यामुळे महिलांच्यामध्ये वाढलेला आत्मविश्वास व त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हा सर्वांसाठी सर्वाधिक महत्त्वाचा आहे. भिमथडी जत्रेमुळे महिलांचे आर्थिक सबलीकरण झाले आहे. तसेच त्यांच्या सामाजिक स्तरात वाढ झाली आहे.

**६.२.४ मनोवैज्ञानिक फायदे:**

**व्यवहारात सडेतोडपणा:** ग्रामीण भागातील महिलांना शहरातील लोकांना आपले कौशल्य दाखविता आले. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला. त्यांच्यातील क्षमतांचा पुरेपुर विकास होऊ लागला आहे. निर्णयक्षमता वाढली. आपल्या कौशल्याला वाव मिळाला हे पाहून ग्रामीण महिलांचा आनंद द्विगुणीत झाला. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व आत्मविश्वास त्यांच्या वस्तू, उत्पादित वितरणातून दिसून आला. त्या आरोग्याबाबत अधिक काळजी घेऊ लागल्या आहेत. उदा. पिण्यासाठी शुद्ध पाण्याचे महत्त्व त्यांना कळू लागल्याने घरामध्ये स्वत:बरोबरच कुटूंबाची शुद्ध पाणी पिण्याची काळजी घेत आहे. घरातील वस्तु खरेदी, उदा. फ्रिज, पीठाची गिरणी, वॉटर प्युरीफायर या वस्तु घरात त्यांनी खरेदी केल्या कारण त्या आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाल्या होत्या.

दूग्ध व्यवसायामुळे महिला सबलीकरणास प्रेरणा मिळाली. बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या उत्पादित वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध झाली. चांगल्या दर्जाच्या मालाला फोनवरून मागणी येऊ लागली. उदा. गाईचे तुप, कुरडई, शेवई, मसाले या पदार्थांची विचारणा होऊ लागली. या पदार्थांचे वितरण शहरांमध्ये ग्रामीण महिला करू लागल्या आहेत. बँकेचे व्यवहार पाहू लागल्या आहेत. समाजाशी संपर्क वाढत गेल्यावर शहरी भागातील महिलांच्या भाषेचा प्रभाव पडू लागला. त्यातून इंग्रजी शब्द संभाषणामध्ये येऊ लागला, O.K. Thank You. Sorry, हे शब्द समजू लागले. दूग्धव्यवसायाशी संबंध येत असल्यामुळे दूधातील फॅट, डिग्री हे इंग्रजी शब्द त्यांना कळू लागले. हा बदल सबळ जोडधंदयामुळेच घडून आला आहे.

### ६.२.५ मुलांकडून अपेक्षा पूर्ती:

**शिक्षण:** दूग्ध व्यावसायिक महिलांचे शिक्षण कमी आहे. तरीही त्यांच्या आर्थिक स्वावलंबनामुळे त्या मुलांच्या शिक्षणाचे बाबतीत सतर्क आहेत. स्वत:चे शिक्षण कमी म्हणून त्या मुलांना जास्तीत जास्त शिक्षण देण्याविषयी कुटूंबप्रमुखाबरोबर चर्चेत सहभागी होत आहे. मुलांना मराठी माध्यमातून शिक्षण दयावयाचे का इंग्रजी माध्यमातून या विषयी निर्णय घेऊन मुलांचे शिक्षणाकडे लक्ष देत आहेत.

कुटूंबातील मुला—मुलींकडून गरज भासेल त्या वेळेस इंग्रजी शब्द शिकून घेतात. कंम्युटरचे शिक्षणही घेण्याचा प्रयत्न करत आहेत. मोबाईल सहजपणे हाताळत आहेत. एकंदरीत ग्रामीण भागातील महिला मुलांच्या शिक्षणाविषयी जागरूक झाल्या आहेत.

विशेष म्हणजे या ग्रामीण भागातील दूग्ध व्यावसायिक स्त्रिया इतर स्त्रियांना दूग्ध व्यवसायातून काम उपलब्ध करून नवीन रोजगार, निर्माण करून देत आहे. उदा. गायांची देखभाल करण्यास इतर महिलांची नेमणूक करतात. त्यांना दिवसभर चारापणी करणे, साफसफाई करणे, दूध डेअरीवर पोहचविणे इत्यादीसाठी शेतातील कामगारांच्या बायकांना रोजगार उपलब्ध करून देत आहे.

कामावर असलेल्या महिलानी बचत गटाचे माध्यमातून गायी घेत आहेत. त्याही दूध व्यवसाय करत आहे. परंतु गायींचे प्रमाण त्यांच्याकडे कमी आहे. या महिला गाईचे दूध डेअरीवर न घालता घरगुती रतीबासाठी घालत आहेत. कारण दूध डेअरीपेक्षा जादा दर मिळतो व गिऱ्हाईकालाही ताजे व स्वच्छ दूध घरपोच मिळते. खात्रीशीर दूध मिळण्याची सोय गिऱ्हाईकांना उपलब्ध झाली आहे. दूध विक्रेत्यालाही आठवडयाला पैसे मिळतात. या दूध व्यवसायाच्या बाबतीत महिला इतर महिला दूध व्यवसायिकांचा सल्ला, मार्गदर्शन, घेतात. तसेच व्यवसायासाठी, कुटूंबासाठी मदत करताना दिसतात. त्यामुळे सामुहिक भावना वाढीस लागत आहे. एकमेकांच्या गरजा पूर्ण होत आहे. स्वयंरोजगार प्राप्त होतो. रोजगाराची निर्मिती

होते व समाजाची गरज भागविली जाते. म्हणजेच महिलांचे आर्थिक सबलीकरण झाले आहे व महिलांच्या सामाजिक स्तरात वाढ झाली आहे.

**सारांश:**

प्रत्येक महिलांमध्ये कलाकौशल्य असते. फक्त तिला गरज असते ती संधी मिळविण्याची संधी मिळाली की, त्या अतोनात कष्ट करतात. व त्यातुन त्या यशस्वी होतात. पूर्वी पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना कोणता ही अधिकार नव्हता. त्या परावलंबी होत्या. समाज्यात तिला दुय्यम स्थान होते. स्वत:चे अस्तित्व सिद्ध करता येत नव्हते. चुल व मुल एवढेच तिचे कार्यक्षेत्र होते. तिच्या श्रमाला मूल्ये नव्हते. तिच्याकडे अर्थिक उत्पन्नाचे साधनही नव्हते.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमुळे बारामती तालुक्यातील ६२ महिला दुग्धव्यवसायिकांचे आर्थिक सामाजिक व राजकिय सबलीकरण झाले आहे. त्यामध्ये महिलांचा उत्पन्नाचा वाटा वाढला. बचत गटातील सहभाग वाढला. मुलांच्या शिक्षणांचे निर्णय त्या घेऊ लागल्या आहे. घरातील वस्तु व दागदागिण्यांची खरेदीचे निर्णय त्या घेऊ लागल्या आहे, कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील सहभाग त्यांचा वाढला आहे. समाजीतील स्थान, आर्थिक सबलीकरण व राजकीय सबलीकरणातून वाढले आहे. गावातील माहिलांचे आर्थिक सबलीकरण झाले आहे. त्याचबरोबर मनोवैज्ञानिक फायदे देखील दिसून आली. त्यामध्ये महिलांमध्ये व्यवहारात सडेतोडपणा निर्माण झाला आहे. निर्णयक्षमता वाढली आहे. स्वत:च्या आरोग्याबाबत अधिक काळजी घेऊ लागल्या आहे. संपर्कासाठी मोबाइलचा वापर करू लागल्या आहे. इंग्रजी शब्दांचा त्यांच्यावर प्रभाव पडला आहे. त्यांच्या मुलांकडून अपेक्षापूर्ती होऊ लागली आहे. म्हणजेच महिलांचे आर्थिक सबलीकरण होऊन महिन्यांच्या सामाजिक स्तरात वाढ झाली आहे.

**६.३ गृहितक: ३ श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड मधील कामगार व अधीकाऱ्यांच्या सामाजिक जीवनामध्ये समस्तरीय व उर्ध्वगामी गतिशीलतेच्या प्रक्रियेस वेग आला आहे.**

**६.३.१) सांस्कृतिकीकरण**

ग्रामीण समूदायाचा मुख्य आधार सामूहीक भावना व सहकार्य आहे. पाश्चिमात्य संस्कृतीमुळे ग्रामीण जनतेच्या जीवनाविषयक दृष्टीकोनात बदल घडून आला आहे. आज ग्रामीण जनतेला जीवनाविषयक दृष्टीकोनात बदल झाला आहे. शालेय शिक्षण व व्यावसायिक शिक्षण त्याला कारणीभूत आहे. अंधश्रध्दा कमी झाली आहे व राजकिय जीवनाबाबत ग्रामीण व्यक्ती जागृत झाली आहे. धर्माच्या व जातीच्या नावाखाली त्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध लढा देण्यास ती सज्ज झाली आहे. स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळेही ग्रामीण स्त्रीयांच्या सामाजिक दर्जात परिवर्तन झाले आहे. त्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्नही केले जात आहेत. ग्रामीण जीवनात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण व पाश्चिमात्य संस्कृती कारणीभूत ठरत आहे. प्रोत्साहन पद्धतीचा अवलंब करून तसेच प्रदर्शन पद्धतीद्वारे कायद्याचा वापर करून सामाजिक दबाव पद्धतीद्वारे ग्रामीण समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे.

**समस्तरीय व उर्ध्वगामी गतिशीलता** — सामाजिक स्तरीकरण ही सार्वत्रिक घटना आहे. सर्व मानवी समाजात कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील विषमता असतेच व्यक्ती आणि समुहाची स्तर बदलण्याची पद्धत सुद्धा प्राचीन सार्वत्रिक आहे. सर्व समाजात संपत्ती, सत्ता, आणि प्रतिष्ठा यांची वाटणी ही विषम झालेली आहे. त्यामुळे वेगवेगळा दर्जा असणारे विविध स्तर निर्माण होत आहे. या स्तरातील सामाजिक दर्जातील भिन्नतेमुळे त्यांची श्रेष्ठ कनिष्ठ अशी रचना झालेली आहे. समाजातील एखादा स्तर सर्वाधिक श्रेष्ठ, दूसरा त्याहून कमी श्रेष्ठ, तिसरा त्याहूनही कमी दर्जा असणारा अशा विभिन्न दर्जाच्या अनेक स्तरात झालेली समाजाची विभागणी म्हणजेच सामाजिक स्तरीकरण होय.

स्तरीकरण हे बंद स्तरीकरण व खुले स्तरीकरण अशा दोन प्रकारामध्ये दिसून येते. खुल्या स्तरीकरणात गतीशिलतेस वाव असतो. स्वकर्तृत्वाने किंवा स्वयंप्रयत्नाने व्यक्तीला आपला सामाजिक दर्जा बदलता येतो. म्हणजेच व्यक्तीला आपला सामाजिक स्तर बदलण्याच्या क्रियेला गतीशिलता असे म्हणतात.

हार्टन आणि हंट

व्यक्तीची एका सामाजिक दर्जाकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे जाण्याची क्रिया म्हणजेच सामाजिक गतीशिलता होय. (पान नं २४९)

सामाजिक गतीशिलतेत समस्तर सामाजिक गतीशिलता व स्तंभीय सामाजिक गतीशिलता असे दोन प्रकार पडतात. स्तंभीय सामाजिक गतिशिलतेचे दोन उपप्रकार १) उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलता. २) अधोगामी सामाजिक गतीशिलता

**समस्तर सामाजिक गतीशिलता** — व्यक्तीच्या किंवा समूहाच्या सामाजिक दर्जात (स्थानात) बदल होतो पण.... तिचा सामाजिक वर्ग मात्र बदलत नाही, तेव्हा घडवून येणाऱ्या केवळ सामाजिक स्थानातील या बदल समस्तर सामाजिक गतीशिलता म्हणतात.

**उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलता** — सापेक्षत: खालच्या किंवा कनिष्ठ सामाजिक स्तरातून किंवा वर्गातून त्यापेक्षा वरच्या किंवा श्रेष्ठ दर्जा असलेल्या सामाजिक स्तरात व्यक्ती किंवा समुहाने प्रवेश करणे होय.

### ६.३.२ स्थलांतर व सांस्कृतिक बदल

जागतिक पातळीवरील स्थलांतराची प्रक्रिया ही सर्वप्रथम युरोपियन देशापासून सुरू झाली आहे. नैसर्गिक व सामाजिक परिस्थितीमुळे किंवा अन्य घटकामुळे व्यक्तीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करावी लागते. प्रत्येक व्यक्तीला आपली आर्थिक परीस्थीती सतत सुधारावी असे मनोमन वाटत असते. व्यक्तीची आर्थिक सुबत्ता व्यक्तीचे राहणीमान उंचावते, अनेक कारणाने व्यक्ती एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी जात असते. त्याला अनेक कारणे असतात. स्थलांतर हेतू व कालावधी विचारात घेतला जातो. स्थलांतर हा लोकसंख्येशी

निगडीत असा एक महत्त्वाचा घटक आहे. स्थलांतर हा मानवी जीवनातील अपरिहार्य अशी घटना विषयक प्रक्रिया समजली जाते. व्यक्तीला कधीकधी जाणीवपूर्वक स्थलांतर करावे लागते. स्थलांतराच्या मुळाशी व्यक्तीचा आर्थिक विकास दडलेला असतो. म्हणूनच व्यक्ती आर्थिक घटकांची व साधनांची अनुकुलता असलेल्या प्रदेशात स्थानिक होण्यासाठी जे स्थलांतर केले जाते. त्याला आर्थिक स्थलांतर म्हणतात.

**सांस्कृतिक बदल**

उद्योगधंद्याच्या निमित्ताने एकत्र आल्यावर व्यक्ती आपली संस्कृती व दुसऱ्याच्या संस्कृतीची देवाणघेवाण करते. त्यावेळी सांस्कृतिक बदल दिसून येतात. मनोरंजनाच्या माध्यमातून एकमेंकांच्या संपर्कातून संस्कृतीची आदानप्रदान होत असते. एका समूहाचा दुसऱ्या समूहावर प्रभाव पडत असतो. स्थानिक भाषा, रूढी, परंपरा चालीरितीची संस्कृती टिकून राहते व सांस्कृतिक बदल दिसतो.

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. सामाजिक संरचनेत बदल झाला की, सामाजिक परिवर्तन घडून येते. सामाजिक संरचनेतील बदल परिवर्तन दर्शवितो. त्यातून सांस्कृतिक बदल होत असतो.

**६.३.३** समाजात व्यक्तीच्या मूल्याप्रमाणे भूमिका व संस्थामध्ये संबंधमध्ये स्वरूपात बदल दिसून येतो. त्यातून परिवर्तन घडून येते. उर्ध्वगामी व अधोगामी अशाप्रकारे परिवर्तन होत असते. सत्रस्तरीय परिवर्तनही समाजाला दिसते. त्यातून सांस्कृतिक बदल होत असतो.

श्रायबर डायनामिक्स डेअरीमध्ये परप्रांतीय कर्मचाऱ्यांची संख्या

| | |
|---|---|
| १) ५० अधिकारी वर्गापैकी | — १२ अधिकारी परप्रांतीय. |
| २) २०० कामगारांपैकी | — ५१ कामगार परप्रांतीय |
| एकूण २५० पैकी | ६३ परप्रांतीय |

तक्ता क्र ६.१० खानपान विषयक बदल

| अ.क्र | वर्ग | खानपान विषयक बदल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | शेकडेवारी | नाही | शेकडेवारी |
| १ | अधिकारी | ११ | ९१.६६% | ०१ | ८.३% |
| २ | कामगार | ४३ | ८४.३१% | ०८ | १५.६८% |
| | एकूण | ५४ | ८७.७१% | ०९ | १६.६६% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित झालेल्या माहितीवर आधारित

स्थलांतरीय अधिकारी व कामगारांमध्ये बदल घडून येताना खानपान विषयीचा बदल घडून येतो. इतर राज्यामधून बारामतीमध्ये झालेले स्थलांतर हे रोजगारासाठी झालेले आहे. कुटूंबासहीत स्थलांतरीत झाले आहेत. या लोकांचा खानपान विषयक माहिती घेतली असता एकूण खाणपानविषयक सवयीमध्ये बदल झाला आहे. स्थलांतरीय हे वेगवेगळया राज्यातून आलेले आहेत. त्यांची संख्याही मर्यादीत आहे. स्थलांतरितामध्ये बिहार, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या राज्यातून आलेले आहेत. प्रत्येकाच्या खाणपानविषयक सवयीमध्ये प्रामुख्याने जेवन, नाश्त्याचा समावेश समावेश होतो. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांमध्ये गुजरात या राज्यामध्ये गहू, ज्वारी, बाजरी, मका या धान्यांचा रोटीसाठी उपयोग करत आहेत. गुजरातमध्ये जास्त गोड खातात. तर बिहारमध्ये भात जास्त खातात. उत्तरेकडील राज्यामध्ये मोहरीचे तेल भाज्यांसाठी वापरतात. तर महाराष्ट्रात स्वयंपाकात सोयाबिन, करडई, सुर्यफुल, शेंगदाणा या तेलबियांचे तेल वापरतात. उत्तरेकडील राज्यांमध्ये नाष्टा फार कमी लोक करतात. बरीचीश कुटुंबे ही शेतीतच उदरनिर्वाह करीत असल्यामुळे स्वयंपाक लवकर झालेला असतो. त्यामुळे नाश्ता करत नाहीत. त्यांचे सांस्कृतीक कार्यक्रम, धार्मीक कार्यक्रम, सण, समारंभ ते इथेही साजरे करतात. व इथल्या कार्यक्रमामध्येही सहभागी होत आहेत. चहा, नाष्टा जेवणातील बदल त्यांनी स्विकारलेला आहे. एकंदरीत ६३ स्थलांतरीतापैकी ५४ कर्मचारी

वर्गाने खाणपान विषयक बदल स्विकारलेला आहे व ९ परप्रांतीय कर्मचारी वर्गाने खानपान विषयक बदल स्विकारला नाही.

**बदलाची कारणे**

रोजगार व नोकरीसाठी आलेले आहेत. त्यामुळे त्यांना कँटीन व मेसमध्ये सर्वांवर जेवण नाष्टा स्थानिक पद्धतीप्रमाणेच असतो. त्यामुळे तो नाष्टा व ते जवन यांना सक्तीने घ्यावेच लागले. त्यातून त्यांना हया जेवण नाष्टाची सवय लागली.

कंपनीच्या कामगारांच्या वेळा वेगवेगळया असतात. खाण्याच्या सवयीमध्ये बदल करतो. कारण कंपनी ज्या भागात आहे तेथील स्थानिक लोकांप्रमाणेच जेवन देते. सर्वांसाठी एकच प्रकारचा पदार्थ असतो.

कामगार ज्या भागामध्ये वास्तव्य करतो. तेथेही शेजारी स्थानिकच असतात. स्थानिक लोकांच्या खाणपान विषयक बाबींचाही परिणाम परप्रांतीयांवर होत असतो. स्थानिक लोकांच्या सवयी, खाणेपिणे, मनोरंजन या विषयीचे अनुकरण करून त्याप्रमाणे परप्रांतीय स्थानिक लोकांमध्ये सहभागी होऊ लागले आहेत. जे परप्रांतीय स्थलांतरील झाले आहेत त्यांच्या मुलांमध्ये लवकर बदल घडून आला आहे.

कारण शाळेतील स्थानिक सर्वच मुलांचे जेवन हे भाजी/पोळी/लोणचे अशा प्रकारचे असते. त्यामुळे हे पाहून परप्रांतीय मुलेही तशा जेवणाचा आग्रह धरतात. कँटीनमधील वडापाव, मिसळपाव असे काही खास महाराष्ट्रीयन पदार्थ कुटुंबासोबत घेत आहेत. परप्रातींयाची संख्या कमी असल्यामुळे परप्रांतीय हॉटेलही नसतात. त्यामुळे स्थानिकांचा प्रभाव पडून तशाच प्रकारचे जेवण व नाष्टा करत आहे. नाष्टयामध्ये काही परप्रांतीयांमध्ये भिजवलेली कडधान्ये, गुळ, मकेचा चिवडा, चुरमुरे यांचा समावेश आहे. तशा पद्धतीचा नाष्टा करण्याचा प्रयत्न स्थानिक कधीतरी करत आहे. काही सण, समारंभ घरगुती कार्यक्रमामध्ये परप्रांतीय सहभागी होताना दिसून येते आहे. इथल्या संस्कृतीशी जूळवून घेताना दिसून येत आहे. कामगार वसाहतीस राहणाऱ्या परप्रांतीयांवर शेजारील कुटुंबाचा लवकर प्रभाव

पडला. अशा वसाहतीमधून सांस्कृतीक कार्यक्रम होत आहे. त्या कार्यक्रमामध्ये काही परप्रांतीय त्यांचे कार्यक्रमही सादर करतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने संस्कृतीची देवाण घेवाण होते.

**६.३.४ स्थानिक भाषा**

भाषा हे कोणत्याही संस्कृतीचे एक मुलभूत वैशिष्टय होय. भाषेतील शब्द ही प्रतीके असतात. भाषेमुळेच माणुस अमुर्त पातळीवर विचार करू लागला आहे. कोणत्याही भाषेवर संस्कृतीचा विकास अवलंबुन असतो, संस्कृतीचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे भाषेच्या माध्यमातूनच होत असते. कोणत्याही संस्कृतीच्या विकासाचे, निर्मितीचे व हस्तांतरांचे भाषा हे एक प्रमुख साधन आहे. त्यामुळे व्यक्ती विविध भाषा सतत शिकण्याचा प्रयत्न करत असते.

तक्ता क्र. ६.११ स्थानिक भाषेचा प्रभाव

| अ.क्र | वर्ग | परप्रांतीय कर्मचारी | स्थानिक भाषेचा प्रभाव | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | होय | शेकडेवारी | नाही | शेकडेवारी |
| १ | अधिकारी | १२ | ०९ | ७५% | ०३ | २५% |
| २ | कामगार | ५१ | ४१ | ८०.३९% | १० | १९.६०% |
| | एकूण | ६३ | ५० | | १३ | |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित झालेल्या माहितीवर आधारित

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पातील ५० अधिकारी वर्गापैकी १२ परप्रांतीय अधिकारी आहेत. १२ परप्रांतीय अधीकाऱ्यामधील ९ अधीकाऱ्यांवर स्थानिक भाषेचा प्रभाव पडलेला आहे. त्यांचे प्रमाण ७५% इतके आहे. स्थानिक भाषेचा प्रभाव न पडणाऱ्या अधीकाऱ्यांची संख्या ३ आहे. त्यांचे प्रमाण २५ इतके आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पातील २०० कर्मचाऱ्यांपैकी ५१ कर्मचारी हे परप्रांतीय आहेत. ५१ कर्मचाऱ्यांमधील ४१ कर्मचाऱ्यांवर स्थानिक भाषेचा प्रभाव पडला आहे. त्यांचे प्रमाण ८०.३९% इतके आहे. स्थानिक भाषेचा

प्रभाव न पडणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या १० आहे. त्यांचे प्रमाण १९.६०% इतके आहे.

एकूण ६३ कर्मचाऱ्यांपैकी ५० कर्मचाऱ्यांवर स्थानिक भाषेचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

दैनंदिन व्यवहारासाठी, मनोरंजनासाठी प्रकल्पात काम करताना अडचणी येत होत्या त्या सोडविण्यासाठी, सांस्कृतिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी स्थानिक भाषा कर्मचाऱ्यांनी शिकून घेतलेली आहे. म्हणजेच भाषची देवाण—घेवाण वेगाने घडली आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमध्ये अधिकारी व कामगारांमध्य परप्रांतीय आहे. त्यांचे प्रमाण साधारणपणे २५% इतके आहे. यामध्ये काही मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, गुजरात, कर्नाटक या राज्यातून आलेले आहे. या अधिकाऱ्यांना व कामगारांना स्थानिकांशी संपर्क साधताना भाषेची अडचण येते. काही वेळेस राष्ट्रभाषेचा वापर करत आहे. हळूहळू मराठी भाषा समजु लागली आहे. निवासस्थानाच्या ठिकाणीही आजूबाजूला मराठीच भाषा बोलणारी कुटुंबे आहे. घरगुती देवाण घेवाणीमुळे इतर कुटुंबाशी संबंध येऊन मराठी भाषा येऊ लागली. स्थानिक लोकसंख्या, समाज यांचा प्रभाव पडून त्यांना येथील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी मराठी भाषेचा वापर करावा लागते. प्रादेशिक वर्तमानपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे हिंदी, इंग्रजी, मराठी वर्तमानपत्रे वाचण्यास शिकण्याचा प्रयत्न केला आहे.

सध्या दूरचित्रवाणीवरून बरेचसे प्रादेशिक चॅनल सुरू झालेले आहे. सुट्टीच्या दिवशी तसेच वेळ असेल त्यावेळेत टी.व्ही वरील प्रादेशिक कार्यक्रम पाहतात. कुंटुंबामध्ये त्यांच्या स्थानिक भाषेतूनच बोलतात. संपर्कासाठी त्यांनी मराठी भाषा अवगत केली आहे. त्यांची मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळेत आहे. शाळेमध्ये इतर पालकांचा संबंध येतो. त्यामुळे स्थानिक शाळेतील माहिती त्यांना मिळते. महाराष्ट्रीयन मुलांचा जेवणाचा व परप्रांतीयांच्या मुलांचा जेवणाचा पदार्थ यामध्ये

भाजीची देवाणघेवान व चवीत बदल त्यामुळे स्थानिक बदल होऊन मुले व परप्रांतीयांची मुले एकमेकांच्या भाज्या खातात. त्यामुळे त्यांच्यामध्ये जवळीकता निर्माण होते. हा एक फार मोठा सांस्कृतिक बदल आहे. अधिकारी, कामगार, स्थानिक, परप्रांतीय असा भेदभाव आढळत नाही.

**वेशभूषा**

प्रत्येक राज्याची संस्कृती ही वेगळी आहे. प्रत्येक नागरिक स्वत:च्या राज्याची सांस्कृतिक परंपरा जपण्याचा प्रयत्न करीत असतो. वेगवेगळया राज्यात वेगवेगळया वेशभूषा आढळतात. जो तो आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतात. व्यक्ती आपले जीवन जगत असताना संस्कृतीचे दर्शन घडवीत असते. प्रत्येकाला आपली प्रादेशिक अस्मिता जपावी असे वाटते. त्यातून त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडते.

प्रस्तुत अध्ययनामध्ये प्रामुख्याने मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, गुजरात या राज्यातून स्थलांतरीत आले आहे. प्रत्येक राज्याची वेशभूषा थोडयाफार प्रमाणात वेगळी दिसून येते.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पामधील जे अधिकारी व कामगार परप्रांतीय आहेत. ते महाराष्ट्रीय संस्कृतीशी मिळते जूळते. वेशभूषा परिधान करू लागले आहे. कारण जे कामगार व अधिकारी ज्या कंपनीमध्ये काम करतात. तेथे यूनिफॉर्म आहेत. यूनिफॉर्म सर्वांसाठी सक्तीचा असतो. मुलांना शाळेचा यूनिफॉर्म घालावा लागतो. जे कामगार वसाहतीमध्ये लग्नसमारंभ, वाढदिवस, मुंज किंवा इतर कार्यक्रमामध्ये स्थलांतरीत सहभागी होत आहे. त्या निरीक्षणातून सामाजिक प्रभावावरून ते स्थानिक संस्कृतीशी मिळते जूळते घेत आहे. परप्रांतीयांमधील विवाह किंवा सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ते त्यांच्या संस्कृतीप्रमाणे वेशभूषा, धार्मिक विधी करत आहे. महाराष्ट्रीयन महिलांना त्या पद्धतीने वेशभूषा करण्यासाठी मदत करत आहे. उदा. गुजरातमधील दांडीया उत्सव प्रसिद्ध आहे. गुजराती पद्धतीने वेशभूषा करणे स्थानिक महिलांना आवडते. शाळेमध्ये पारंपारिक

दिवस (Tradional day) या निमित्ताने स्थानिक व परप्रांतीयांची मुले एकमेकांच्या राज्याप्रमाणे वेशभूषा करतात. त्यामुळे संस्कृतीचे आदानप्रदान होते.

प्रस्तुत संशोधनामध्ये परप्रांतीय स्थानिक सणसमारंभामध्ये किती प्रमाणात सहभागी होतात. खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पामधील ५० अधिकाऱ्यांपैकी १२ परप्रांतीय अधिकारी आहेत. व २०० कामगारांपैकी ५१ परप्रांतीय आहेत.

तक्ता क्र. ६.१२ स्थानिक सण—समारंभातील सहभाग

| अ.क्र | वर्ग | एकूण परप्रांतीय | खानपान विषयक बदल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | होय | शेकडेवारी | नाही | शेकडेवारी |
| १ | अधिकारी | १२ | ११ | ९१.६६% | ०१ | ८.३३% |
| २ | कामगार | ५१ | ३६ | ७०.५८% | १५ | २९.४१% |
| | एकूण | ६३ | ४७ | ७४.६०% | १६ | २५.३९% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित झालेल्या माहितीवर आधारित

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पातील ५० अधीकाऱ्यांपैकी १२ अधिकारी हे परप्रांतीय स्थलांतरीत आहेत. २०० कामगारांपैकी ५१ कामगार हे परप्रांतीय कामगार आहेत. या १२ अधीकाऱ्यांपैकी ११ परप्रांतीय अधिकारी हे स्थानिक सण—समारंभ व विवाहमध्ये सामील झाले आहे. स्थानिक लोकांशी जवळीकता साधतात. स्थानिक कार्यक्रमामध्ये हिरारीने भाग घेत आहे. एकमेकांची मदत करतात. स्थानिक भाषा त्यांनी अवगत केली आहे. त्यामुळे स्थानिक लोकांच्या कार्यक्रमामध्ये सहजपणे ते वावरतात. त्यांचे शेकडा प्रमाण ९१.६६ इतके आहे. फक्त १ अधिकारी स्थानिक सणसमारंभ व विवाहामध्ये सहभागी होत नाही. त्यांचे प्रमाण ८.३३% आहे.

२०० कामगारांपैकी ५१ कामगार हे परप्रांतीय स्थलांतरीत आहे. या ५१ कामगारांपैकी ३६ कामगार हे स्थानिक लोकांच्या सणसमारंभ, विवाहामध्ये सहभागी होतात. त्यांचे शेकडा प्रमाण ७०.५८ टक्के इतके आहे. १५ कामगार हे स्थानिक

लोकांच्या, अधिकाऱ्यांच्या, कामगारांच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होत नाही. कारण त्यांचा स्थानिकांशी संपर्क कमी असतो. अशा कामगारांचे शेकडा प्रमाण २९.४१ टक्के इतके आहे.

वरील तक्तयावरून असे दिसून येते की, श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील परप्रांतीय हे स्थानिक संस्कृतीशी जुळवून घेत आहे.

**६.३.५ विवाह व सणसमारंभ**

धार्मिक दृष्टीकोनातून सणांना फार महत्त्व आहे. स्थलांतरितांच्या सांस्कृतिक जीवनात सण समारंभामुळे बदल घडून आला आहे. प्रस्तुत अध्ययनामध्ये परप्रांतीय हे सणावाराला स्थानिक महाराष्ट्रीय लोकांच्या भोजन बनविण्याच्या पद्धतीचा अवलंब करतात. उदा. पुरणपोळी. विवाह समारंभामध्ये सहभागी होतात.

परप्रांतीयांची एक विशिष्ट संस्कृती असल्याने विवाहविषयीची निकष वेगवेगळे आहेत. त्यांचे सण—समारंभ यासाठी स्थानिकांना निमंत्रित करतात.

**६.३.६ परंपरा**

मानवेत्तर प्राण्याहून मानवी वर्तन अगदी वेगळे आणि वैशिष्टपूर्ण आहे. म्हणूनच मानवासारखे परिपूर्ण असे सामाजिक जीवन अन्य प्राण्यात दिसत नाही. केवळ माणुसच संस्कृती निर्माण करतो. संस्कृती मानवप्राण्याचे एक अनन्य साधारण असे वैशिष्ट आहे. माणुस रूढी, परंपरा नियमने, मुल्ये, सामाजिक संस्था, समूह जीवनाची वैशिष्टे इत्यादी विविध अंगांनी अशा मानवाच्या सामाजिक जीवनचा अभ्यास केला जातो. स्थलांतरीत लोकांच्या परंपरांचे जतन व स्थानिक लोकांच्या परंपरा कशाप्रकारे कळत नकळत अंगिकारतात हे अभ्यासावरून दिसून येते. त्यांनी त्यांची विवाहपद्धती बदलली नाही. पारंपारिक चालीरिती आहे. त्यांचे अनुकरण करत लग्नसोहळा मुळ ठिकाणी जाऊनच पार पाडला जातो. काही परंपरा जपल्या जात आहेत.

### ६.३.७ मनोरंजनातील बदल

स्पर्धेच्या युगामध्ये माणुस खूप वेगवान धावत आहे. या धकाधकीच्या या जीवनात सतत ताणतणावाखाली जीवन जगावे लागत आहे. त्यावर उपाय म्हणून माणसांनी वेगवेगळे छंद जोपासून फावल्या वेळेचा आनंद लुटणे महत्त्वाचे आहे.

क्रिडा, खेळ, चित्रकला, नाटय, संगीत, नृत्य, फोटोग्राफी कलेचा अविष्कार करण्याची संधी व्यक्तीने घेतली पाहीजे. ऑटोमोशनमुळे कंपनीतील कामगारांना, अधिकाऱ्यांना आठवडयातून दोन दिवस सुट्टी मिळते. अशा वेळेत एकत्रितपणे आपल्या आवडीचे खेळ खेळतात. महाराष्ट्रामध्ये होळी सणाला रंग खेळत नाहीत. परंतु परप्रातींयामध्ये रंग खेळतात. त्यावेळी सर्वजण रंगखेळण्यामध्ये सहभागी होतात. परप्रांतीयांच्या उत्सवामध्ये स्थानिक लोक सहभागी होत आहेत. स्थलांतरीत झालेले कर्मचारी स्थानिक लोकांच्या प्रभावाने आज तेथील मनोरंजनाच्या सवयी त्यांनी आत्मसात केलेल्या आहे. उदा. गावच्या जत्रा, नाटक, लोककला यामध्ये ते सक्रीय सहभागी होताना दिसत आहे. वेगवेगळया सणामध्ये एकमेकांकडे ते जात आहे. उदा. मकर संक्रांती, दसरा, दिवाळी यावेळी एकमेकांना शुभेच्छा देत आहे. वाढदिवस, दसरा, दिवाळी यावेळी एकमेकांना शुभेच्छा देत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने एकमेकांकडे जाणे, गावच्या यात्रेतील जेवणाचे निमंत्रण स्विकारले अशा अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. गणेशोत्सवामध्ये सहभीगी होतात. दहीहंडीमध्ये भाग घेतात. विविध व्याख्याने, स्पर्धा, यांचा ते लाभ घेतात. दूरदर्शनवरील वरील चित्रपट, सिनेमागृह, नाटयगृहामध्ये देखील चित्रपट, नाटके पाहतात. करमणुकीच्या साधनांचा ते पुरेपुर आनंद घेतात. विविध वाचनालयामधून ते साहित्याचे वाचन करीत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमामधून भाग घेतात.

**सारांश:**

पाश्चामात्य संस्कृती व शिक्षणाने ग्रामीण समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आले आहे. ग्रामीण भागातील लोकांमध्ये विचार व प्रवृत्तीतही बदल घडवून आला आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील कर्मचारी वर्गात परप्रांतीय कर्मचारी आहेत. त्यांच्यातील सांस्कृतिक बदल, खानपानविषयक बदल झाला आहे. विवाह, सणसमारंभातील सहभाग वाढला आहे. परंपरेत बदल झाला आहे. विशेषत: मनोरंजनात बदल दिसून आला आहे. करमणूकीच्या साधनांमध्ये बदल दिसून आला आहे. म्हणजेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमामधून कर्मचारी वर्गात बदल दिसून आला आहे.

**६.४ गृहितक: ४ स्थानिक व स्थलांतरित यांच्यात होणाऱ्या सांस्कृतिक देवाण—घेवाणीमध्ये (आदान प्रदानामध्ये) स्थलांतरीतामध्ये विशेषत: स्थलांतरितांच्या पुढच्या पिढीमध्ये स्थानिक सांस्कृतिक जवळीकता असते.**

**प्रत्यक्षवाद:** कॉन्तचा प्रत्यक्षवाद: कॉम्त या आद्य समाजशास्त्रज्ञाने आपल्या 'Law of the Three Stages' मधील सर्व काल्पनिकतेच्या व सत्ताशास्त्रीय आध्यात्मिक विचारांचा त्याग करून प्रत्यक्षवादाचा पुरस्कार केला. Course in Positivist Philosophy (1830) या खंडाच्या ग्रंथात प्रत्यक्षवादाच्या आधारे सामाजिक घटनांचे शास्त्रीय विवेचन केले आहे.

— सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा कोश (पृ.क्र.१२३)

प्रत्यक्षवाद यामध्ये अनुभव, परिक्षण व विश्लेषण महत्त्वाचे आहे. म्हणजे निरीक्षण करता येते. अशा घटनांमधील संबंध अभ्यासता येतो. म्हणजेच ज्ञानाची मर्यादा एवढयापुरतीच निश्चित केली पाहिजे. इतर प्रकारच्या ज्ञानाचा विचार केला जात नाही. थोडक्यात वैज्ञानिक पद्धतीनेच ज्ञान प्राप्ती होत असते. हा विचार प्रत्यक्षवादामध्ये कॉन्त यांनी मांडला आहे. याचाच आधार घेऊन प्रस्तुत संशोधन करताना वास्तव काय आहे हे अभ्यासले आहे. येथे कल्पनाविश्वाचा आधार न घेता अभ्यास केला आहे. त्यातून वास्तव ज्ञान अभ्यासले आहे.

ऑगस्त कॉन्त' यांच्या मते, निरीक्षण, परिक्षण प्रयोग आणि वर्गीकरणाच्या व्यवस्थित अध्ययन प्रणालीच्या आधारावर सामाजिक घटनांचे अध्ययन करता येते. (समाजशास्त्रीय विचारवंत — प्रदिप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००१)

याचा आधार घेऊन सामाजिक घटनांचे अध्ययन केले आहे. सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करीत असताना प्रत्यक्षवाद हा सेंद्रीय सत्याशी संबंधित आहे. म्हणून ऑगस्त कॉन्त यांच्या प्रत्यक्षवादाचा सिद्धांत अभ्यासला आहे.

सामाजिक प्रगतीसाठी प्रत्यक्षवाद हा सहाय्यक आहे. कारण समाजामध्ये तथ्यांचे संशोधकाने निरीक्षण, परिक्षण आणि वर्गीकरणाच्या व्यवस्थित कार्यपद्धतीद्वारेच वास्तविक आणि प्रत्यक्ष ज्ञान अभ्यासले आहे. हे ज्ञान सामाजिक पूर्वसंघटनेसाठी एक ठोस आधार होईल.

मानवाची कितीही प्रगती झाली तरी मानवी समाजातील प्रश्न संपण्याची शक्यता नाही. जोपर्यंत समस्या आहे तोपर्यंत सामाजिक विचार राहतील. सामाजिक सिद्धांताचे महत्त्व म्हणजे विज्ञान केवळ तथ्यावर आधारित असू शकत नाही. विज्ञानाला तंत्रज्ञानाला वर्णनापेक्षा आणखी आवश्यकता असते. ऑगस्त कॉम्त यांचा सिद्धांत वैयक्तिक वर्तन वापरण्याचे कारण म्हणजे मानवाच्या मनात प्रेरणा निर्माण होतात व तो कृती करण्यास उद्युक्त होतो. मानवी विचार भावनावर आधारित असतात पण त्यावर विचारांचे नियंत्रण असते व कृती करून आपण विचार करतो. मानवी कृती भावनावर आधारित असाव्या व त्यात वाढ होते. अशा तऱ्हेने मानवी विकास हा विचार करण्याच्या कृतीच्या वाढीस संबंधित असतो. भिन्न अवस्थांमधून विकसित होतो म्हणून मानवाला सामाजिक विकासाच्या अवस्थेत घडणाऱ्या घटनांच्या कारणांचे स्पष्टीकरण स्वतःच्या कुवतीनुसार करतो. कॉम्तच्या विज्ञानाच्या कार्यकारणाविषयी विचार तीन अवस्थात सांगितले. मानवाची प्रगती ३ अवस्थांमधून होते. प्रत्येक नवीन अवस्था जुन्या अवस्थेवर अवलंबून असते. ज्ञानाचे स्वरूप जितके सामान्य, साधे, स्वतंत्र, तितकी त्याची प्रगती अधिक त्यातून त्याला वैज्ञानिक स्वरूप प्राप्त होते. व या आधारेच विज्ञानाचा विकास होतो.

प्रत्यक्षवादामुळे निश्चित स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होते. व त्या ज्ञानाचा समाज जीवन एकसंघ व दृढ होण्याच्या दृष्टीने नक्कीच उपयोग होतो. ही पद्धत विज्ञानाला पोषक अशी पद्धत आहे.

वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेण्याची मानसिक तयारी जुन्या पिढीमध्ये नसते. ते बदलांनी विरोध करतात. कारण त्यांच्या संस्कृती विषयीची धारणा पक्की नसते. ते सांस्कृतिक बदल स्वीकारण्यास तयार नसतात. स्थानिक लोकांच्या कार्यक्रमामध्ये ते सहभागी होत नाही. श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील स्थलांतरित कुटूंबातील वृद्ध हे वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेत नाही. त्यांच्या सामाजिक गतीशीलतेस वाव मिळत नाही. त्यास त्यांचा हेकड स्वभाव कारणीभूत आहे. परंतू प्रकल्पातील स्थलांतरित कर्मचारी व त्यांची मुले ही वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेत आहेत. त्यामुळे सामाजिक गतिशीलतेस वाव मिळतो. कर्मचारी व त्यांची मुले यांच्यामध्ये समायोजन करण्याची क्षमता विकसित झाली आहे. ऐकमेकांच्या सहवासातून विचारांचे आदान — प्रदान झाले आहे. नवनवीन गोष्टी आत्मसात केल्या आहेत. परकेपणा दूर झाला आहे. आपुलकी स्नेहभाव वाढीस लागला आहे. वेळप्रसंगी एकमेकांना मदत करत आहे. संस्कृतीशी मिळते जुळते घेण्याची सवय लागली आहे. श्रेष्ठ व कनिष्ठ भावना कमी झाली आहे.

सामाजिक गतिशीलता: कोणत्याही समाजातील सामाजिक स्तरीकरणाच्या श्रेणीतील व्यक्तींच्या / गटांच्या विभिन्न स्थानात झालेला बदल म्हणजे सामाजिक गतिशीलता होय. सामाजिक स्थानातील सापेक्ष बदल दिसून येतो. गतीशीलता म्हणजे प्रगती किंवा वेग, विकास होय. सामाजिक गतिविज्ञान हे समाजाच्या क्रमश: परिवर्तनाचे विज्ञान आहे. ते एका निर्धारित क्रमाने घडून येते. कारण मानवी जीवनात सतत बदल होत असतात. मानवी जीवनाच्या बदलाचा अभ्यास सामाजिक गतिशीलतेत होतो. सामाजिक गतीशीलतेच्या प्रक्रियेचा तो एक भाग म्हणून सामाजिक गतीशीलतेचा फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रकल्पातील कर्मचारी वर्गात प्रगती दिसून आली आहे. कारण त्यांच्यात सांस्कृतिक बदल

घडवून आला आहे. प्रकल्पातील परप्रांतीयांच्या मुलांना तर मूळ संस्कृती स्थानिक सांस्कृतिक बदलासी एकरूप झाले आहे. याचाच अर्थ असा की पुढच्या पिढीमध्ये सांस्कृतिक बदल दिसून आला आहे.

### ६.४.२ सकारात्मक सांस्कृतिक बदलः

श्रायबर डायनामिक्स डेअरी या प्रकल्पातील कर्मचारी व त्यांची मुले यांच्यात स्थानिक लोकांच्या प्रभावामुळे सकारात्मक सांस्कृतिक बदल दिसून येतो. तसेच त्यांच्या सभोवतालची परिस्थिती व त्यास कारणीभूत ठरत आहे. कर्मचाऱ्यांचा मुलांचा स्थलांतरित झाल्यामुळे येथील संस्कृतीशी प्रत्यक्ष संबंध येतो. स्थानिक शाळेतील मित्र परिवार यांच्या सान्निध्यात असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला आहे. शिवाय त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क अत्यंत कमी असतो. साहजिकच सकारात्मक सांस्कृतिक बदल हा स्थलांतरित कर्मचारी व त्यांच्या मुलांमध्ये जास्त प्रमाणात दिसून आला आहे.

### ६.४.३ महानगरीय संस्कृतीचा उदयः

भारतामध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त नागरी लोकसंख्या आहे. शिक्षण, उद्योगधंदे, नोकरी निमित्त व्यक्ती शहरात राहते. महानगरामधील उपलब्ध जागा व त्यावरील बांधकामे यांचा विचार करता बहुमजली इमारती दिसून येतात. या इमारतीची रचना, सोयी, सुविधा, क्रिडांगणे व व्यायामशाळा, मनोरंजन केंद्रे, वाचनालये, यावर पाश्चिमात्य शैलीचा प्रभाव दिसून येतो.

भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या ४२% एवढी लोकसंख्या नागरी आहे. नोकरी व्यवसायामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. रोजगाराच्या सुविधा प्राप्त झाल्यामुळे महानगरातील लोकसंख्या वाढली आहे. औद्योगिक विकास हा नागरी भागात झाला आहे.

व्यक्ती व्यक्तीमधील संपर्क, प्रसारमाध्यमामुळे बदल घडून आला आहे. त्याचा व्यक्तीच्या इच्छा आकांक्षावर परिणाम झाला आहे. महानगरीय संस्कृतीमध्ये व्यक्तीचा आर्थिक क्षेत्रातील सहभाग वाढला आहे. सामाजिक गतीशीलतेचे प्रमाण

वाढले आहे. त्यामुळे व्यक्तीविचारांचे स्वरूप निश्चित होते. समाजव्यवस्थेत व्यक्ती स्वत:च्या भविष्यासंबंधीचे निर्णय स्वकर्तृत्वावर घेते. म्हणजे ध्येयपूर्तीसाठी ती सतत प्रयत्न करत आहे. व्यक्ती गुणांना त्यामुळे वाव मिळतो. व्यक्तीला स्वातंत्र्य मिळते. म्हणजेच महानगरीय संस्कृतीचा उदय ही प्रक्रिया आहे. चांगली प्रक्रिया म्हणून तिचा स्वीकार केला आहे. एकंदर जीवनशैलीत महत्त्वपूर्ण बदल घडून आला आहे. कुटूंब, शिक्षण या संस्थेत बदल झाला आहे. आरोग्य सुविधामध्ये वाढ, संदेशवहन यंत्रणा प्रभावी, वर्गव्यवस्था निर्माण झाली आहे. सामाजिक गतिशीलतेत वाढ झाली. आचार विचारांचे आदान प्रदान होते. नवीन संस्कृती व पर्यावरणाशी मिळते जुळते घेतात. सामाजिक संक्रमणाला वाव मिळतो. शहरांची वाढ झाल्याने साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. या शहरीकरणामुळे व्यक्तीचा राजकीय व आर्थिक क्षेत्रातील सहभाग निश्चित वाढतो. तसेच विविध ठिकाणी होणारे बदल व शिक्षणाचा वाढता प्रवाह यामुळे जाती धर्मामधील तणाव यांच्या वर नियंत्रण आलेले आहे. महानगरीय संस्कृतीच्या उदयामुळे समाज परिवर्तन मोठया प्रमाणावर दिसून येते. प्रत्येक महानगराची संस्कृती ही वेगवेगळी दिसते. त्यामुळे संस्कृतीत बदल घडून येत आहे.

**६.४.४ औद्योगिक स्थलांतर व नवी संस्कृती यांच्यात सहसंबंध:**

रोजगार/नोकरीच्या निमित्ताने परप्रांतीय लोक औद्योगिक विकास झालेल्या राज्यात स्थलांतर करतात. रोजगार निमित्त परप्रांतीय कामगार विविध उद्योगधंदयाच्या विकासाच्या ठिकाणी स्थलांतरित होतात. तसेच बुद्धिवंत लोक देखील स्थलांतर करताना दिसून येतात.

महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्टया प्रगत राज्य आहे. त्यामुळे मोठमोठया महानगरात व परिसरात उद्योगधंदयाची मोठी वाढ झाली आहे. साहजिकच त्यामुळे रोजगार व्यवसाय व नोकरी व शिक्षणाच्या चांगल्या सुविधा निर्माण होतात. त्यामुळे भारताच्या सर्वच राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरितांचा ओघ वाढला आहे.

महाराष्ट्रामध्ये स्थलांतरितांची कारणे, व्यवसाय, रोजगार, शिक्षण, विवाह, कुटूंबासह जन्मानंतर इतर कारणांनी स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पामध्ये २०० कामगारांपैकी ५१ कामगार हे परप्रांतीय आहेत. त्यांचे प्रमाण २५.५% आहे तर ५० अधिकारीवर्गापैकी १२ अधिकारी हे परप्रांतीय आहेत. त्यांचे प्रमाण २४% इतके आहे. हे व्यवसायानिमित्त बारामतीमध्ये स्थलांतरित झाले आहेत. त्या अनुषंगाने त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय ही चांगल्या प्रकारे उपलब्ध झाली आहे. औद्योगिक स्थलांतरामुळे नवीन ठिकाणच्या सवयी लावून घेणे. दैनंदिन संपर्कासाठी स्थानिक भाषा शिकण्यासाठी प्रयत्न, स्थानिक सण, समारंभ, यामध्ये भाग घ्यावा लागतो. वेशभूषा, मनोरंजन, शिक्षण यामधील बदल स्विकारणे विविध जातीधर्माचे एकत्रीकरण, अनुकरण, नवीन तंत्रज्ञानाचा प्रभाव, विभक्त कुटूंब पद्धती, स्वतंत्र विचार सरणी, वैचारिक आदानप्रदान, रूढी परंपरांचा व जाती धर्माचा प्रभाव कमी, नाविन्याची आस, एकात्मता इत्यादी घटकामधून परप्रांतीय स्थलांतरित व स्थानिक लोकांमध्ये नवीन संस्कृतीचा उगम झालेला दिसतो.

### ६.४.५ सामाजिक लाभ व नुकसान (खर्च) विश्लेषण:

**लाभ:**

आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. आचार विचारांची देवाणघेवाण (आदानप्रदान) होत आहे. स्वावलंबीपणा वाढला असून स्वतंत्र विचार शक्तीचा विकास झाला आहे. व्यक्तिमत्त्व विकासात भर पडत आहे व नवनवीन कौशल्ये आत्मसात केली आहेत. व्यक्तीच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे व विभक्त कुटूंबपद्धतीची निर्मिती झाली आहे. आरोग्यसंदर्भात सर्तकता निर्माण झाली आहे. लघुउद्योगांना प्रोत्साहन मिळाले आहे.

थोडक्यात एकमेकांच्या संस्कृतीचे आदानप्रदान झाले आहे व राष्ट्र एकसंघ राहण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**नुकसानः**

परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील, वृद्धांच्या भावनांचा कोंडमारा होत असून सणसमारंभावर मर्यादा आल्या आहेत. वैयक्तिक उपभोगावर मर्यादा आल्या आहेत. परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या राज्यातील कुटूंबाचा संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. परप्रांतीय लोकांच्या मित्र व नातेवाईकांचा संपर्क कमी झाला आहे. परप्रांतीय कर्मचारी कुटूंबातील लोकांना आपल्या भाषेचा काही प्रमाणत त्याग करावा लागला आहे.

व्यक्ती जीवन जगत असताना अनेक नवनवीन गोष्टी आत्मसात करते. त्यातून आपली जीवन जगण्याची पद्धत निर्माण होते. त्याला आपण संस्कृती म्हणतो. संस्कृती ही स्थिर स्वरूपाची असते. संस्कृतीत काळाच्या प्रवाहानुसार बदल होत असतो. मानवाला नवीन ज्ञान प्राप्त झाले की संस्कृतीत नवीन ज्ञानाची भर पडते व संस्कृतीत परिवर्तन दिसून येते. नवीन समस्या सोडविण्यासाठी बदलत्या परिस्थितीनुसार जुन्या पिढीकडून नवीन पिढीकडे संस्कृतीचे हस्तांतरण करताना सर्व गोष्टी जशाच्या तशा स्वीकारत नाही. त्यात थोडेफार बदल होतात ते बदल सहजपणे व त्वरित होत नाहीत. त्यासाठी प्रदिर्घ कालावधी लागतो यातून संस्कृतीत परिवर्तन दिसून येते.

**६.४.६ सामाजिक संम्मीलनतेची जाणीवः**

स्थलांतराची प्रक्रिया ही आधुनिक काळात अतिशय विस्तृत व व्यापक स्वरूप धारण करित आहे. देशांतर्गत अव्यवस्था, अशांतता, आर्थिक प्रश्न, रोजगाराचा प्रश्न अशा विविधा कारणामुळे अनेक व्यक्तींना इच्छा असो वा नसो आपले राज्य सोडून दुसऱ्या राज्यात जावे लागते. स्थलांतराच्या प्रक्रियेत स्थलांतरामध्ये कालखंड, अंतर व हेतु या तीन घटकांना महत्त्वाचे स्थान असते. एकंदरित स्थलांतरामुळे संस्कृतीत परितर्वन घडून येते. भारतातील लोकसंख्या व बहुसांस्कृतिकतेचे प्रतिक आहे. उत्सव, सण, समारंभ, जत्रा, यात्रा यांच्यातील सक्रिय सहभाग अभ्यासण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील

अधिकारी व कामगार यांच्यातील परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या व स्थानिक कर्मचाऱ्यांत सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त असणारा सहभाग तक्ता ६.१३ क्रमांकात आहे.

**सामाजिक संम्मीलन** :

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील स्थानिक अधिकारी व परप्रांतीय अधिकारी यांच्या सांस्कृतिक घटकांचा अभ्यास.

तक्ता क्र. ६.१३ सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग

| अ.क्र | स्थानिक परंपरा | स्थानिक व परप्रांतीय अधिकारी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सणसमारंभ | ३८ | ७६% |
| २ | उत्सव | ४२ | ८४% |
| ३ | जत्रा व यात्रा | ३४ | ६८% |
| ४ | विवाह | ३२ | ६४% |
| ५ | वाढदिवस | ४३ | ८६% |
| | एकूण | २०० | १००% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

संम्मीलन ही संघटनात्मक प्रक्रिया आहे. अल्पसंख्याक समूह हा मोठया समूहाची मुल्ये व वर्तनप्रकार आत्मसात करतात. व बहुसंख्य समूहामध्ये अल्पसंख्याक समूह विलीन होतात. त्यातूनच सम्मलिन प्रक्रिया घडून येते. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील एकूण अधिकारी वर्गातील १२ परप्रांतीय अधिकारी हे स्थानिक लोकांच्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. स्थानिक अधिकारी ही त्यांच्या सण व वाढदिवसामध्ये सहभागी होतात. परंतु परप्रांतीय समूह हा छोटा समूह असल्यामुळे तो स्थानिक मोठया समूहाचे मूल्य व वर्तनप्रकार अनुकरण करतात. त्यातून ते स्थानिक अधिकारी वर्गात विलीन होतात. त्यातूनच सामाजिक संम्मीलन दिसून येते.

**१) सणसमारंभ:** स्थानिक सण उदा. दसरा, दिवाळी, मकर संक्रात या सणामध्ये ३८ अधिकारी सहभागी होतात. यामध्ये स्थानिक व परप्रांतीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे हे सर्व अधिकारी स्थानिक अधिकाऱ्यांच्या घरी सणसमारंभामध्ये सहभागी होतात. तसेच परप्रांतीयंच्या सण समारंभामध्येही स्थानिक अधिकारी सामील होतात. त्यांचे प्रमाण ७६% आहे.

**उत्सव:** श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील ४२ अधिकारी उत्सव साजरे करतात. या उत्सवामध्ये दहीहंडी, गणेशोत्सव यासारखे उत्सव असतात. या उत्सवामध्येही स्थानिक व परप्रांतीय अधिकारी सामील होतात. गणेशउत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कंपनीच्या वसाहतीमध्ये परप्रांतीय अधिकारी व स्थानिक अधिकारी आपआपल्या पारंपारिक कला सादर करत असतात. यातून मुलांना एकमेकांच्या संस्कृतीची ओळख झाली. पारंपारिक वेशभूषा सारख्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामुळे इतर राज्यातील परंपरागत वेशभूषांविषयी माहिती झाली. एकमेकांचे उत्सव साजरे करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण ८४% इतके आहे.

**जत्रा व यात्रा:** स्थानिक यात्रा व जत्रा या मध्ये परप्रांतीय व स्थानिक अधिकारी सहभागी होत आहेत. प्रत्येक गावामध्ये कोणतेतरी एक दैवी श्रद्धास्थान असतेच. त्यामध्ये सर्व स्थानिक अधिकारी व परप्रातीय अधिकारी सामील होत आहेत.

मारूती मंदिर, दत्त मंदिर, महादेव मंदिर, देवीचे मंदिर, कृष्णमंदिर यापैकी कोणते तरी एक मंदिर असतेच. परप्रांतीय असो किंवा स्थानिक असो प्रत्येकाची श्रद्धा कोणत्यातरी देवावर असतेच. देवांच्या यात्रा गावोगावी असतात या यात्रेमध्ये हे स्थानिक व परप्रांतीय अधिकारी सामील होतात.

जत्रा व यात्रामध्ये एकूण ३४ अधिकारी सामील होत आहे. त्यांचे प्रमाण ६८% आहे. सणसमारंभ व उत्सवामध्ये जास्त अधिकारी सामील झालेले दिसून येतात. कारण जत्रा व यात्रा या गावाकडे असतात. कामाच्या व्यापामुळे अधिकाऱ्यांना जाणे शक्य होत नाही.

**विवाह:**

स्थानिक व परप्रांतीय असे ३२ अधिकारी एकमेकांच्या शुभ कार्यामध्ये सहभागी होतात. त्यांचे प्रमाण ६४% इतके आहे. बरेचसे परप्रांतीय मुलामुलींचे विवाह येथेच होतात किंवा विवाह जरी त्यांचे गावे झाले तरी रिसेप्शन ते नोकरीच्या ठिकाणी होते. एकमेकांचे आनंद द्विगुणीत करण्यासाठी लग्न समारंभासाठी कुटूंबासह उपस्थिती लावतात. अशा कार्यक्रमामध्ये एकमेकांच्या परंपरागत सांस्कृतिक कार्यक्रमांची माहिती घेतात. काही गोष्टींचे अनुकरणही करतात. एकमेकांचे वेशभूषेविषयी देवाणघेवाण होते. खानपान विषयी माहिती मिळते. अशा कार्यक्रमातून विचारांचे आदान प्रदान होते.

**वाढदिवस:**

स्थानिक व परप्रांतीय अधिकारी स्वत:च्या कुटूंबातील व्यक्तीचा वाढदिवस एकमेकांना आमंत्रण देऊन करतात. वाढदिवसांच्या कार्यक्रमामध्ये एकूण ४३ अधिकारी उपस्थित राहतात. त्यांचे प्रमाण ८६% इतके आहे. अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने कौटुंबिक जवळीकता निर्माण हाते. यामध्ये एकमेकांच्या सणांना येण्याचे आग्रह केला जातो. त्यातून सांस्कृतिक देवाण—घेवाण वाढते. उदा. मकर संक्रात.

यावरून असे दिसून येते की, परप्रांतीय अधिकारी हे स्थानिक अधिकाऱ्यांच्या सहवासात राहिल्यामुळे व स्थानिक अधिकारी मोठया संख्येने असल्यामुळे त्यांची मुल्ये वर्तन प्रकार परप्रांतीयांनी आत्मसात केले आहेत. व स्थानिक अधिकाऱ्यांच्या समूहामध्ये विलीन झाले आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांया संस्कृतीचा प्रभाव हा परप्रांतीय अधिकाऱ्यांवर पडला आहे व त्यांनी स्थानिक संस्कृती आत्मसात केली आहे.

**पिढीतील अंतर:** कुटूंबसंस्था व्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य करते. कुटूंबामध्ये विविध प्रकार दिसून येतात. एकत्र कुटूंब, विभक्त कुटूंब, कुटूंबामध्ये जुन्या पिढीतील समन्वय व नवीन पिढीतील सांस्कृतिक बदल कुटूंबात दिसून येतात. त्यांचा जीवनावर परिणाम दिसून येत असतो. शिक्षणामुळे नवनवीन गोष्टी

आत्मसात केल्या जातात. जुन्या गोष्टी  काळाच्या ओघात अभ्यासलेल्या पाहिजेत म्हणजेच शिक्षणाचा प्रभाव व्यक्तीच्या जीवनावर पडतो. त्यातून नवीन संस्कृती निर्माण होते.

### ६.४.७ जुनी पिढीची संस्कृती

कुटूंबामध्ये जुनी पिढीची संस्कृती वेगळी दिसते. त्यांच्याही पुढच्या पिढीत नवीनच संस्कृती निर्माण होत असते. त्यामुळे कळत नकळत त्यांच्या कुटूंबव्यवस्थेत बदल दिसून येतो.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व परप्रांतीय कर्मचारी यांच्या कुटूंबातील ४२ वृद्धांच्या बदलांचा अभ्यास केला आहे.

तक्ता क्र ६.१४ जुनी पिढी

| अ.क्र | विविध सांस्कृतिक कार्यक्रम | वृद्धांचा कार्यक्रमातील सहभाग | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | शेकडेवारी | नाही | शेकडेवारी |
| १ | स्थानिक सणसमारंभ | ०६ | १४.२८% | ३६ | ८५.७१% |
| २ | स्थानिक भाषा | ०२ | ४.७६% | ४० | ९५.२३% |
| ३ | स्थानिक वेशभूषा व खाद्यपदार्थ | ०२ | ४.७६% | ४० | ९५.२३% |
| ४ | स्थानिक संस्कृतीविषयी असणारे मत | ०४ | ९.५२% | ३८ | ९०.४७% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

**जुनी पिढी:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व परप्रांतीय कामगार यांच्या कुटूंबातील ४२ वृद्धांचे स्थानिक परिस्थिती बद्दलचे मत आजमावण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) स्थानिक सण समारंभ:** परप्रांतीय ४२ वृद्धांचे स्थानिक सण समारंभ याविषयी मत जाणून घेतले असता ६ वृद्धांना स्थानिक सणसमारंभामध्ये सहभागी झाली

आहे त्यांचे  शेकडा प्रमाण १४.२८% इतके आहे. ३६ वृद्धांना सणसमारंभाविषयी माहिती नाही. त्यांचे प्रमाण ८५.७१% इतके आहे ते सहभागी होतच नाही.

यावरून असे दिसून येते की, परप्रांतीय वृद्ध स्थानिक सणसमारंभामध्ये सहभागी होत नाहीत. कारण त्यांना आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटतो. प्रादेशिक अस्मिता जपण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांचा स्वभाव हेकेखोर आहे. ते सहसा दुसऱ्यांचे एकत नाहीत. त्यांचे मत ते बदलत नाहीत. अज्ञानाचा पगडा त्यांच्यावर दिसून येतो.

२) स्थानिक भाषा: श्रायबर डायनामिक्स डेअरीमधील परप्रांतीय अधिकारी व परप्रांतीय कामगार वर्गाच्या कुटूंबातील २ वद्धांना स्थानिक भाषा अवगत आहे. परंतु भाषेवर प्रभुत्त्व नाही. त्यांचे प्रमाण ४.७६% इतके आहे. व स्थानिक भाषा येत नाही अशा वृद्धांची संख्या ४० आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ९५.२३% इतके आहे.

यावरून असे लक्षात येते की, परप्रांतीय वृद्धांना आपल्या भाषेबद्दल अभिमान आहे. ते इतर भाषांचा तिरस्कार करतात म्हणून ते स्थानिक लोकांच्या कार्यक्रमात जास्त सहभागी होत नाही.

३) स्थानिक वेशभूषा व खाद्य संस्कृतीशी जुळवून घेण्याची प्रवृत्ती: श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामधील परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील ४२ वृद्धांची स्थानिक खाद्य व वेशभूषा संस्कृतीशी जुळवून घेण्याची प्रवृत्ती अभ्यासली.

परप्रांतीय ४२ वृद्धांपैकी फक्त २ वृद्ध स्थानिक लोकांच्या खाद्य पदार्थाचा आहारात वापर करतात. परंतू त्यांचे प्रमाण फक्त ४.७६% इतके आहे. तर ४० वृद्धांनी स्थानिक खाद्य संस्कृतीशी जुळवून घेण्याविषयी असमर्थता दर्शविली आहे. स्थानिक लोकांचे खाद्य पदार्थ परप्रांतीय वृद्धांना आवडत नाहीत. ते जेवण नाष्टा बाहेर घेत नाहीत. घरातच बनवून घेत आहे. त्यांचे प्रमाण ९५.२३% इतके आहे.

४) संस्कृती विषयी मत: श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील वृद्ध मातापित्यांचे स्थानिक संस्कृतीविषयीचे मत अजमावले आहे.

४२ वृद्धांपैकी फक्त ०४ वृद्धांनी स्थानिक संस्कृतीविषयीचे सकारात्मक मत व्यक्त केले आहे. त्यांचे प्रमाण ९.५२% इतके आहे. तर ३८ वृद्धांनी स्थानिक संस्कृतीविषयक आपुलकी नाही. कारण ते कोणत्याच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत नाहीत. त्यांचे प्रमाण ९०.४७% इतके आहे.

यावरून असे लक्षात येते की परप्रांतीय वृद्धांना आपल्या संस्कृतीचा, अस्मितेचा, भाषेचा अभिमान आहे. ते दुसऱ्या राज्यातील संस्कृतीचा तिरस्कार करतात. नाईलाजास्तव त्यांना आपल्या मुलांच्या नोकरीसाठी परराज्यात राहावे लागत आहे. परंतु परिस्थिती अनुरूप ते समायोजन करू शकत नाहीत. साहजिकच त्यांच्यामध्ये एकलकोंडेपणा निर्माण झाला आहे. थोडयाफार वृद्धांनी स्वत:ला बदलण्याचा प्रयत्न केला आहे. तो शेजारील स्थानिक समवयस्क लोकांच्या सहवासामुळे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व कामगार यांच्या कुटूंबातील मुलांचा स्थानिक लोकांच्या कार्यक्रमामध्ये सहभाग दिसून आला.

स्थलांतरित कर्मचाऱ्यांची मुले ही स्थानिक लोकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये हिरारीने सहभागी झालेली दिसतात. उदा. गणेशोत्सव, दहीहंडी या सारख्या कार्यक्रमामध्ये मुलांचे मित्र हे स्थानिक आहेत. या मुलांचा स्थानिक समाजाशी संबंध येत असल्यामुळे त्यांच्यावर स्थानिक संस्कृतीचा प्रभाव पडतो. या मुलांचा त्यांच्या मुळ पिढीशी संपर्क येत नाही. त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क कमी होतो. याचा परिणाम परप्रांतीयांची मुले मुळ संस्कृतीपासून दूर जावून नवीन ठिकाणची संस्कृती आत्मसात करतात.

### ६.४.८ नवी पिढीतील सांस्कृतिक बदल

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील ६२ परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या  कुटूंबातील पौंगडावस्थेतील ५० मुलांचा सांस्कृतिक बदलांचा अभ्यास केला.

तक्ता क्र. ६.१५  सांस्कृतिक घटकातील बदल

| अ.क्र | तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | शेकडेवारी | नाही | शेकडेवारी |
| १ | स्थानिक भाषा | ५० | १००% | ०० | ००% |
| २ | स्थानिक सणसमारंभ | ४८ | ९६% | ०२ | ०४% |
| ३ | स्थानिक खाद्य पदार्थाची आवड | ४६ | ९२% | ०४ | ०८% |
| ४ | स्थानिकात संम्मीलन भावना | ४८ | ९६% | ०२ | ०४% |
| ५ | सकारात्मक सांस्कृतिक बदल | ४४ | ८८% | ०६ | १२% |

आधार: प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीवर आधारित.

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील पौगंडावस्थेतील ५० मुलांच्या वर्तनातील बदल अभ्यासला त्यात पुढीलप्रमाणे सांस्कृतिक बदल दिसून आला.

**१) स्थानिक भाषा:** परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील ५० पौंगडावस्थेतील मुलापैकी ५० मुलांना स्थानिक भाषा येते. त्यांचे  प्रमाण १००% इतके आहे. कारण त्यांनी स्थानिक लोकांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला आहे. शाळेत मित्रपरिवार शेजारचे मित्र यांच्या भाषेचा त्यांच्यावर प्रभाव पडला आहे. दैनंदिन व्यवहारासाठी स्थानिक भाषा महत्त्वाची असल्याने त्यांनी ती आत्मसात केली आहे. परंतु यातील काही मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आहे. राष्ट्रभाषा

म्हणून हिंदी भाषा अवगत केली आहे. तसेच त्यांची मातृभाषा देखील त्यांना येते. कारण घरामध्ये मातृभाषेमधून संभाषण होते. काळाची गरज ओळखून या परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या मुलांनी स्थानिक भाषेचा स्वीकार केला आहे.

**२) स्थानिक सण समारंभ:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील ५० पौंगडावस्थेतील मुलांचा स्थानिक सण समारंभामध्ये सहभागी होण्याचा अभ्यास केला.

५० परप्रांतीय पौगडावस्थतील मुलांपैकी ४८ मुलांनी स्थानिक सणसमारंभात सहभागी होत असल्याचे सांगितले. त्यांचे प्रमाण ९६% इतके आहे.

स्थानिक सण समारंभामध्ये ९६% मुलांचा सहभाग असल्याचे कारण शाळा महाविद्यालय, शेजार, प्रकल्पातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम (उदा. मकर संक्रात, रक्षाबंधन, गणेशोत्सव, दहीहंडी) अशा कार्यक्रमामध्ये परप्रांतीय युवा वर्ग आवडीने सहभागी होत आहे.

**३) स्थानिक खाद्य पदार्थांची आवड:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील ५० पौंगडावस्थेतील मुलांची स्थानिक खाद्यपदार्थांची आवड लक्षात घेतली आहे.

५० परप्रांतीय पौंगडावस्थेतील मुलांना स्थानिक खाद्यपदार्थाची आवड ही ४६ मुलांना आहे. त्यांचे प्रमाण ९२% इतके आहे तर फक्त ४ मुलांना स्थानिक खाद्य पदार्थाची आवड नाही. ४६ मुलांना खाद्य पदार्थाची आवड असण्याचे कारण शाळेत स्थानिक मुलांच्या बरोबर जेवणाचा डबा खाणे, स्थानिक मुलांच्या डब्यात पोळी, भाजी, असा मेनु असतो. सततच्या सहवासातील जेवणामुळे सवय लागली व एकटयाचाच जेवणाचा मेनू वेगळा असल्यामुळे त्याने स्वत:च्या जेवणाचा मेनू बदल केला. स्थानिक मुलांबरोबर कॅटींगला नाष्टा करणे. स्थानिक लोकांचे सण समारंभातील जेवण, यात्रा, जत्रेमधील जेवण यामुळे स्थानिक खाद्यपदार्थाची आवड निर्माण झाली आहे व त्यांची सवय झाली आहे.

**४ स्थानिकात संम्मीलनपणाची भावना:** परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या ५० मुलांपैकी ४८ मुलांमध्ये स्थानिक संम्मीलनपणाची भावना निर्माण झाली आहे. त्यांचे प्रमाण ९६% आहे. तर फक्त २ मुलांमध्ये संम्मीलनपणाची भावना नाही. त्यांचे प्रमाण ४% इतके अत्यल्प आहे.

संम्मीलनतेची भावना ९६% असण्याचे कारण सतत स्थानिक लोकांचा सहवास, मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त विचारांचे आदान प्रदान होते.

तसेच त्यांच्या नातेवाईकांचा व मित्रपरिवाराचा संपर्क कमी झाला आहे. त्यातूनच स्थानिक लोकांशी जवळीकता निर्माण झाली व स्थानिक लोकांशी संपर्क वाढला.त्यामुळे स्थानिकता सम्मलिनपणाची भावना निर्माण झाली.

**५) सकारात्मक सांस्कृतिक बदल:** स्थलांतरित परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील ५० मुलांपैकी ४० मुलांमध्ये सकारात्मक सांस्कृतिक बदल घडून आला आहे. त्याचे प्रमाण ८८% इतके आहे. तर सकारात्म्क सांस्कृतिक बदल न घडून आलेली मुलांची संख्या ६ आहे त्यांचे प्रमाण १२% इतके आहे.

यावरून सकारात्मक सांस्कृतिक बदलाची प्रक्रिया जलद झालेली दिसते. नवीन पिढीने समायोजन साधले आहे. नवीन संस्कृतीचा स्विकार केला आहे. नवनवीन गोष्टी आत्मसात केल्या आहेत. सकारात्मक सांस्कृतिक बदल घडून आला आहे. जुन्या पिढीपेक्षा नवीन पिढी सांस्कृतिक बदल लवकर स्विकारते.
बदल दिसून आला आहे.

**सारांश:**

**प्रत्यक्षवाद:—** Comte Positivism कॉम्तचा प्रत्यक्षवादाचा आधार घेऊन वास्तव ज्ञान अभ्यासले आहे. त्यामध्ये अनुभव, परीक्षण व विश्लेषण महत्त्वाचे आहे. वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेण्याची मानसिक तयारी यामध्ये आहे. जुनी पिढी व नवीन पिढी यांच्या संस्कृती विषयीच्या धारणाचा अभ्यास केला आहे. जुनी पिढी वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेत नाही. विरोध करतात. सांस्कृतिक बदल

स्विकारत नाही. परंतु परप्रांतीय कर्मचारी वर्गामधील कुटुंबातील मुले मात्र वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेत आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील परप्रातीय कर्मचारी कुटुंबामधील जुनी पिढी वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेत नाही. त्यांच्या सामाजिक गतीशिलतेस वाव मिळत नाही. त्यांच्या हेकंड स्वभाव कारणीभूत ठरतो. याउलट नवी पिढी वास्तविक परिस्थितीशी जुळवून घेत आहे. त्यामुळे गतीशिलतेस वाव मिळतो. म्हणजे परप्रांतीय कर्मचारी व त्यांची मुले यांच्यामध्ये समायोजन करण्याची क्षमता विकसित झाली आहे. एकमेकांच्या सहवासातून विचारांचे आदान प्रदान झाले आहे. नवनवीन गोष्टी आत्मसात केल्या आहे. त्यांच्यातील परकेपणा दूर झाला आहे. आपूलकी, स्नहभाव वाढीस लागत आहे. वेळप्रसंगी एकमेकांना मदत करत आहे. सहकार्याची भावना वाढीत लागली आहे. श्रेष्ठ व कनिष्ठ भावना कमी झाली आहे.

सकारात्मक सांस्कृतिक बदल परप्रांतीय कुटुंबातील मुलांमध्ये दिसून आला आहे. मुळ संस्कृतीशी प्रत्यक्ष संबंध येत नसल्यामुळे सहाजिकच स्थानिक संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसला आहे. महानगरीय संस्कृतीचा उदय यामुळे लघु व दिर्घ गतीशीलता दिसून येत आहे. औद्योगिककरणामुळे स्थलांतरीयांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे स्थानिक व परप्रांतीय यांच्यात नवी संस्कृती यांच्या संबंधातून निर्मिती झाली आहे. त्याचे सामाजिक लाभ नुकसान दिसून आले आहे.

**लाभ:—**

- आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.
- आचार विचारांचे आदान प्रदान होत आहे.
- स्वावलंबीपणा वाढला आहे. स्वतंत्र विचार शक्तीचा विकास झाला आहे.
- व्यक्तिमत्त्व विकासात भर पडली आहे. व नवीन कौशल्ये आत्मसात केली आहे.

- व्यक्तीच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे.
- विभक्त कुटुंब पद्धतीची निर्मीती झाली आहे.
- आरोग्याबाबत सर्तकता वाढली आहे.
- लघु उद्योगांना प्रोत्साहन मिळाले आहे.

थोडक्यात एकमेंकांच्या संस्कृतीचे आदान—प्रदान झाले आहे. व राष्ट्रएकसंघ राहण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे.

**नुकसानः—**

- परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील बृध्दांच्या भावनांचा कोंडमारा होत असून सणसमारांभावर त्यांच्यात मर्यादा आल्या आहे.
- वैयक्तिक उपभोगावर मर्यादा आल्या आहे.
- परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या राज्यातील कुटुंबाचा संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.
- परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या राज्यातील कुटुंबाचा संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.
- परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा त्याच्या राज्यातील नातेवाईक व मित्र परिवार यांचा संपर्क कमी झाला आहे.
- परप्रांतीय कर्मचारी कुटुंबातील कर्मचाऱ्यांना आपल्या भाषेचा काही प्रमाणात त्याग करावा लागला आहे.

सामाजिक सम्मीलनतेची जाणीव निर्मीती झाली आहे. त्यामध्ये विविध सणसमारंभ, उत्सव, जत्राा व यात्रा आणि विवाह, सणसमारंभ व वाढदिवस या कार्यक्रमांच्या निमित्ताने संस्कृतीक जवळीकता निर्माण झाली आहे. स्थलांतरीत जुनी पिढी ही विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत नाही. म्हणजे स्थानिक सणसमारंभ, स्थानिक भाषा, ऊंची वेशभूषा व खाद्यपदार्थ यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होत नाही. त्यांचे स्थानिक संस्कृती विषयाचे मत चांगले नाही. याउलट

नवी पिढी म्हणजे परप्रांतीय कुटुंबातील मुलांना हे सांस्कृतिक बदल लवकर स्विकारला आहे. त्यातुन त्यांची संम्मीलनतपणाची भावना वाढीस लागली आहे. म्हणजेच सकारात्मक सांस्कृतिक बदल नवीन पिढीने स्विकारला आहे. यावरून स्थलांतरिताच्या कुटुंबाच्या पुढऱ्या (नवीपिढी) पिढीमध्ये स्थानिक संस्कृतीशी जवळीकता निर्माण झाली आहे.

**गृहीतक : ५ श्रायबर डायनामिक्स डेअरीच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान लाभले आहे.**

कायमस्वरूपी दुष्काळी असलेल्या तालुक्याचे रूपांतर कृषीप्रधान तालुक्यामध्ये केलेले आहे. तालुक्यातील शेती व्यवसायाच्या जोडीला पूरक व्यवसाय उभे केले आहे. व कायमस्वरूपी उत्पादनाचे साधन निर्माण केले आहे.

अनेक प्रतिकूल गोष्टीवर मात करून प्रगती साधलेली आहे. या तालुक्याचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक परिवर्तन घडून आणले आहे. यापाठीमागे राजकीय नेतृत्वाचे योगदान आहे.

**६.५.१ समाजाविषयी राजकीय दृष्टिकोन**

समाजाविषयीच्या राजकीय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून १) उच्च शिक्षणाची सोय आहे. २) अनेक कुटूंबाचा सर्वांगीण विकास सबळ दूग्ध उत्पादनामुळे झाला आहे. ३) अनेक शेतीपूरक जोडधंदे निर्माण केले आहेत. ४) महिला सबलीकरणामध्ये महिलांना बचत गटाच्या माध्यमातून चांगली प्रगती साधलेली आहे.

सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर मार्ग काढून दिर्घकालीन उपाययोजना केल्या आहेत. पाणलोट विकासाची अनेक कामे केलेली आहेत. साखर उद्योग, द्राक्ष प्रक्रिया उद्योग, दूध संघ, दूग्ध प्रक्रिया उद्योगांची भरभराट झालेली आहे. ही किमया साधली आहे. 'बारामती पॅटर्नने'

दूध उत्पादन या व्यवसायाला एक सबळ जोडधंदा बनविण्यासाठी बारामतीत श्रायबर डायनामिक्स डेअरी या आंतरराष्ट्रीय पातळीवर दूग्धजन्य पदार्थाचे वितरण

करणाऱ्या दूग्ध प्रक्रिया प्रकल्पात बारामती येथे प्रकल्प उभारण्यास राजकीय नेतृत्वाने प्रेरित केले.

प्रस्तुत संशोधनामध्ये केलेल्या अधिकारी व दूग्ध व्यावसायिकांचे प्रश्नावलीवरून सर्वेक्षण करताना असे आढळले की, श्रायबर डायनामिक्स डेअरीला राजकीय योगदानाचा पाठिंबा लाभला आहे.

राजकीय योगदानामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये खालील प्रकारे बदल घडून आले आहेत.

महाराष्ट्रामध्ये १९९१—९५ या कालावधीत अनेक दूग्ध प्रक्रिया प्रकल्प झाल्याचे दिसून येते. परंतु राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूग्धजन्य पदार्थाची विक्री व वितरण करणारा हा अशिया खंडातील एक प्रकल्प आहे. क्षेत्रीय विकास साधन्याच्या शरद पवार यांच्या आत्मियतेने हा प्रकल्प उभा आहे. रस्ते अनेक शहरे पक्क्या रस्त्यांनी जोडलेली आहेत. रस्ते, वाहतूक, लोहमार्ग, वाहतूक, चांगल्या दर्जाची आहे. कच्चा मालाची उपलब्धता ७ जिल्हयातील अतिरिक्त दूध संकलन केले जाते. श्रायबर डायनामिक्स डेअरीची दूध हाताळणी क्षमता दैनंदिन १५ लाख लिटर्स एवढी आहे. प्रकल्पासाठी सध्या दैनंदिन ८ ते १० लिटर्स दूध संकलन होत आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध करून दिली आहे. प्रकल्प एकूण ६० एकर जागेत विस्तारलेला आहे.

बाजारपेठांच्या उपलब्धतेसाठी अनेक महानगरांना जोडणारे रस्त्याचे जाळे, रेल्वेमार्ग, हवाई मार्ग, उपलब्ध आहे. वाहतुकीच्या व दळणवळणाच्या सोयी त्वरित उपलब्ध आहेत.

**राजकीय स्थैर्य:** १९६७ साली शरद पवार यांनी सक्रीय राजकरणात प्रवेश करून विधानसभेसाठी बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. तेव्हापासून आजपर्यंत बारामतीच्या राजकीय नेतृत्वामध्ये बदल झालेला नाही. १९६७ पासून

आजपर्यंत बारामतीचा राजकीय पॅटर्न एकच राहिला आहे. पवारांची बारामती व बारामतीचे पवार. त्यामुळे बारामती तालुक्यात चांगले राजकीय स्थैर्य लाभले आहे.

**भांडवल निर्मिती:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प श्रायबर फूडस, यु.एस.ए व गोयंका फॅमिली यांच्या भागीदारीतील महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे.

वाहतुक सुविधांच्या गुणवत्तेमध्ये रिंगरोडच्या दूसऱ्या टप्प्याचे काम झाले आहे. संपूर्ण शहराबरोबर उत्तम रस्त्यांचे जाळे तयार केले आहे. ताजी फळे, भाज्या परदेशात निर्यात करणेसाठी विमानतळाची रचना करण्यात येत आहे. रेल्वे वाहतुकीमध्ये लोडिंग व अनलोडिंगची सोय आहे.

शैक्षणिक सुविधामध्ये पदवी, पदव्युत्तर, अभियांत्रिकी तसेच अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयास परवानगी मिळाली आहे. तसेच आय.टी व कायद्याचे व थेट विमान चालविण्याचे प्रशिक्षणापर्यंत उच्च शिक्षणाचे सोयी आहेत. शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यामध्ये राजकीय नेत्यांचे योगदान आहे.

पायाभूत सुविधांमध्ये पाणी, रस्ते, वीज, कच्चा मालाची उपलब्धता, मनुष्यबळ, यामध्ये प्रत्येक विभागाचे स्वतंत्रपणे नियोजन केलेल असल्यामुळे विनाखंडीत या सेवा उपलब्ध आहेत.

**६.५.२ औद्योगिक कलह:**

कोणत्याही राजकीय पक्षाचे नावाने औद्योगिक कामगार संघटना नाही. राजकीय पक्षाचे काम करण्यासाठी कामगार संघटनावर दबाव आणला जात नाही. राजकीय पॅटर्न एकच असल्यामुळे कोणताही औद्योगिक कलह होत नाही.

**सहाय्यक उद्योगाची वाढ:**

बारामतीचा औद्योगिक विकास वेगाने होत आहे. भारत फोर्ज, आय.एस.एम.टी., बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, सोमा टेक्सटाईल, स्पेंटक्स टेक्सटाईल, पियाजिओ व्हेईकल्स, ईमसोफर चॉकलेट या कंपन्या कार्यरत आहेत. बारामती तालुका सहाकरी दूध संघाचा दूध प्रक्रिया प्रकल्प, श्रायबर डायनामिक्सचा दूग्ध प्रक्रिया उद्योग असे प्रकल्प आहेत.

या दूग्ध प्रक्रिया प्रकल्पावर आधारित पशुखाद्य प्रकल्प कार्यान्वित झाला आहेत. यामध्ये १) बारामती तालुका दूध संघाचे पशुखाद्य प्रकल्प आहे. २) श्रायबर डायनामिक्स डेअरीचा पशुखाद्य प्रकल्प ३) बारामती ॲग्रोचा पशुखाद्य प्रकल्प इत्यादी अशा सहायक उद्योगांची वाढ झाली आहे. हे प्रकल्प स्थापन करण्यामागे तालुक्यातील दूग्ध व्यावसायिकांना उत्कृष्ट दर्जाचे पशुखाद्य सवलतीच्या दरात मिळावे. म्हणून राजकीय नेतृत्वाने असे परस्पर उद्योग स्थापनेसाठी राजकीय पाठिंबा दिला आहे.

श्रायबर डायनामिक्स डेअरीच्या विकासात स्थानिक राजकीय नेतृत्वाचे योगदान लाभले आहे.

**६.५.३ स्थानिक राजकीय नेतृत्वाचे योगदान:**

तक्ता क्र. ६.१६ (५० अधिकारी व २००) दूग्धव्यवसायिकांच्या मतानुसार राजकीय नेतृत्वाचे योगदान.

| अ. क्र | वर्ग | संख्या | राजकीय नेतृत्वाचे योगदान. | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | होय | शेकडेवारी | नाही | शेकडेवारी |
| १ | अधिकारी | ५० | ४३ | ८६% | ७ | १४% |
| २ | दूग्धव्यावसायिक | २०० | १७० | ८५% | ३० | १५% |
| | एकूण | २५० | २१३ | ८५.२१% | ३७ | १४.८% |

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पामुळे बारामती तालुक्यातील अधिकारी, कामगार व दूग्धव्यावसायिकांचे सामाजिक परिवर्तन झाले आहे. सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करत असताना

१. श्रायबर डायनामिक्स डेअरीमधी ५० अधिकाऱ्यांपैकी या प्रकल्पाच्या विकासात ४३ अधिकाऱ्यांच्या मते राजकीय योगदान आहे असे म्हटले आहे. याचे प्रमाण ८६% इतके आहे. राजकीय नेतृत्वाचे योगदान नाही असे दूग्धव्यावसायिक ७ आहे त्यांचे प्रमाण १४% आहे.

२. बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १७% दूग्ध व्यावसायिकांनी श्रायबर डायनामिक्स डेअरीच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान आहे असे सांगितले त्यांचे प्रमाण ८५% इतके आहे तर राजकीय नेतृत्वाचे योगदान नाही असे दूग्धव्यवसायिक ३० आहे त्यांचे प्रमाण १५% आहे.

२५० अधिकारी व दूग्धव्यवसायिंकापैकी २१३ दूग्ध व्यावसायिकांच्या मतानुसार असे दिसून येते की, श्रायबर डायनामिक्स डेअरीच्या विकासात राजकीय नेतृत्वाचा पाठिंबा आहे. याचे प्रमाण ८५.२% आहे कारण, १७० अधिकारी व दूग्धव्यावसायिक यांच्या मतानुसार राजकीय पाठिंबा आहे व त्यांचे प्रमाण ८५% आहे.

- दूग्धजन्य पदार्थांची निर्मिती करून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची विक्री करण्याचे जाळे असणारा व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने युक्त असा उद्योग दूग्धव्यवसाय वाढीस उपयुक्त ठरला. त्यामुळे या दृष्टिकोनातून या प्रकल्पाला राजकीय नेतृत्वाचा पाठिंबा दिला आहे.
- या प्रकल्पाने दूग्धव्यावसायिकांना आर्थिक पाठबळ देणारा हा व्यवसाय आहे. या दृष्टिकोनातून या प्रकल्पाला राजकीय नेतृत्वाने पाठिंबा दिला आहे.
- कोणत्याही प्रदेशाचा विकास त्या ठिकाणच्या राजकीय नेतृत्वावर अवलंबून असतो. येथील राजकीय नेतृत्वाने दळणवळणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. राजकीय इच्छशक्तीतून विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.

**सारांश:**

कायमस्वरूपी दुष्काळी असलेल्या तालुक्याचे रूपांतर कृषीप्रधान तालुक्यामध्ये केले आहे. तालुक्यातील शेती व्यवसायाच्या जोडीला पूरक व्यवसाय उभे केले आहे. व कायमस्वरूपी उत्पन्नाचे दुग्धव्यवसाय हे साधन निर्माण केले

आहे. अनेक प्रतीकूल गोष्टींवर मात करून प्रगती साधलेली आहे. या तालुक्याचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतीत परीवर्तन घडवून आणले आहे. त्यापाठीमागे राजकिय नेतृत्त्वाचे योगदान आहे. बारामती तालुक्यामध्ये उच्चशिक्षणाच्या सुविधा, सबळ दुग्धव्यवसाय, शेतीपुरक जोडधंदे, मुळ व्यवसाय दुग्धव्यवसाय, महिलांचे सबलीकरण, यातुन चांगली प्रगती साधली आहे. सर्व प्रकारच्या प्रतीकुलतेवर मात करून दिर्घकालीन उपयोजना केल्या आहेत. साखर उद्योग, दुधसंघ, दुग्धप्रक्रीया उद्योगांची भरभराट झालेली ही किमया साधली आहे बारामती पॅटर्नने.

दुग्ध उत्पादन व्यवसायाला एक सबळ जोडधंदे बनविण्यासाठी बारामतीत श्रायबर डायनामिक्स डेअरी या आंतरराष्ट्रीय पातळीवर दुग्धजन्य पदार्थाचे वितरण करणाऱ्या दुग्धप्रक्रिया प्रकल्पास बारामती येथे प्रकल्प उभारण्यास राजकिय नेतृत्वाने प्रेरीत केले. म्हणजे श्रायबर डायनामिक्स डेअरी विकासात राजकिय नेतृत्त्वाचे योगदान लाभले आहे. औद्योगिक क्षेत्रातील बदल, रस्ते, राजकिय स्थैर्य, वाहतुक सुविधा, म्हणजेच सर्व पायाभूत सुविधा म्हणजेच सर्व पायाभूत सुविधा निर्माण होण्यापाठीमागे राजकिय नेतृत्त्वाचे मोठे योगदान आहे.

थोडक्यात क्षेत्रीय विकासात साधण्यामागील राजकिय नेतृत्त्वाची आत्मीयता दिसून येते.

दुग्धजन्य पदार्थाची निर्मीती करून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची विक्री करण्याचे जाळे असणारा व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने युक्त असा उद्योग दुग्धव्यवसाय वाढीस उपयुक्त ठरला. त्यामुळे हा प्रकल्प दुग्धव्यवसायिकांना आर्थिक पाठबळ देणारा व्यवसाय आहे. या दृष्टीकोनातून या प्रकल्पाला राजकिय नेतृत्त्वावर अवलंबून असतो. येथील राजकीय नेतृत्त्वान पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहे. राजकिय इच्छाशक्तीतून विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहे. त्यामुळे श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाच्या विकासात

राजकीय नेतृत्त्वाचे योगदान लाभले आहे. या सर्व घटकांमुळे बारामती तालुक्यात सामाजिक परिवर्तन घडून आले आहे.

## ६.६ संशोधनाच्या नव्या संकल्पना

१. समस्तरीय, उर्ध्वगामी व अधोगामी गतिशिलता.

२. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे व्यक्ती जीवनात निर्माण होणाऱ्या लघु आणि दिर्घ गतीशीलता.

३. शहरीकरणाच्या प्रक्रियेत स्थानिक व स्थलांतरित यांच्यातील संबंध + स्थलांतरितामधील विविध पिढीतील व्यक्तीचा स्थलांतर विषयीचा दृष्टिकोन.

४. स्थलांतरिताच्या वारसामधील स्वयं ओळखीचा कलह / प्रश्न.

५. आर्थिक सबलीकरणाचे सामाजिक व मानसिक लाभ.

६. सर्वांगीण विकासासाठी आदर्श नागरी व्यवस्थेची निर्मिती.

**संशोधनाच्या नव्या संकल्पना.**

१. **समस्तरीय:** प्रस्तुत संशोधनाच्या विषयामध्ये श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकारी व कामगार यांचा विविध पैलूंचा अभ्यास करत असताना असे आढळून आले की समस्तरीय गतीशीलता या दोन्हीही वर्गात दिसून आली. त्यांच्या राहणीमानात एकमेकांचे सहवासात राहून बदल दिसून आला. एकमेकांच्या भाषा आत्मसात केल्या आहे. कामगार वर्गामध्येही एकमेकांच्या अनुकरणाने त्यांच्यात बदल घडून आला आहे. कामगार व अधिकाऱ्यांमध्ये बदल्या होऊन वर्ग न बदलता विभाग बदलणे म्हणजे समस्तरीय गतिशीलता.

२. **सांस्कृतिकरण:** व्यक्ती जीवन जगत असताना अनेक प्रकारची संस्कृती शिकवून आत्मसात करत असते. चांगल्या गोष्टी, चांगली मूल्ये नेहमी लगेच आत्मसात केली जातात. एकमेकांच्या सहवासाने संस्कृतीची देवाण घेवाण होते. कामगार अधिकारी यांच्यात व परप्रांतीय कामगार व अधिकारी

यांच्यामध्ये सांस्कृतीकरण घडून आले आहे. एकमेकांमध्ये समायोजन साधण्याची क्षमता व विविध कौशल्ये वाढले आहे.

३. **उर्ध्वगामी:** श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील परप्रांतीय अधिकारी व कामगार यांच्या कुटूंबातील मुलांचा अभ्यास केला. त्यावेळी असे निदर्शनास आले की, त्यांच्या मुलांमध्ये जास्तीत जास्त चांगल्या नवीन गोष्टींची भर पडली आहे. त्यांचे वर्तनात बदल दिसून आला. त्यांनी स्थानिक संस्कृतीशी जुळवून घेतले आहे. स्थानिक संस्कृतीशी जवळीकता निर्माण झाली आहे. त्यावर स्थानिक संस्कृतीचा चांगला प्रभाव पडला आहे. येथील कामगार व अधिकारी स्वत:च्या कौशल्याने, अनुभवाने आहे त्यापेक्षा श्रेष्ठ दर्जा मिळवित आहेत. यालाच उर्ध्वगामी गतिशीलता असे म्हणतात. नवनवीन चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या आहे.

४. **अधोगामी:** परप्रांतीय कामगार व अधिकारी यांच्या कुटूंबातील वृद्धांचा अभ्यास केला तेव्हा असे लक्षात आले की, वद्ध व्यक्ती सहसा आपला स्वभाव बदलत नाही. त्याकडे स्वभावाच्या दिसून आल्या आहे. त्यांना आपल्या भाषेचा, संस्कृतीचा अभिमान आहे. त्यांची अस्मिता ते जपण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु त्यामुळे त्यांची होणारी वैयक्तिक प्रगती खुंटली आहे. नवनवीन चांगल्या गोष्टी ते स्वीकारत नाहीत. शहरीकरणामुळे व्यक्तीच्या जीवनात छोटे छोटे बदल दिसून आले. लघु गतिशीलता दिसून आली. शिवाय अतिसुक्ष्म बदल दिसून दिर्घ गतिशीलता दिसून आली. महागनरीय संस्कृती उगम घडून आला. फ्लॅट पद्धत, सण साजरा करण्याची पद्धत इत्यादी गतिशीलतेच्या प्रमाणात बदल दिसून आले आहे.

५. स्थलांतरितांच्या वारसामधील स्वयं ओळखीचा कलह निर्माण झाला आहे. मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुळ संस्कृतीचा लोप होऊन स्थानिक संस्कृती आत्मसात केली आहे. आपलेपणा निर्माण झाला. परकेपणा दूर झाला आहे. प्रादेशिक भिन्नता कमी झाली आहे. द्वेशाची

भावना कमी झाली आहे. स्थानिक संस्कृती बद्दल आपुलकी निर्माण झाली आहे. स्थलांतरीच्या वारसामधील ओळखीचा कलह निर्माण झाला आहे. कारण दोन संस्कृतीचा मिलाप त्यांच्या घडून आला आहे. स्वओळखीच्या प्रश्नातून स्वयनिर्णय व क्षमता वाढीस लागली आहे. नवनवीन चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या आहेत.

६. महिला सबलीकरणामुळे महिलांना सामाजिक लाभ मिळाला आहे. तसचे मानसिक लाभही मिळालेला आहे. महिलांच्या आत्मसन्मानात वाढ झाली आहे.

७. सामाजिक स्तर उंचावला आहे व आर्थिक सबलीकरण घडून आले आहे. तिच्यातील आत्मविश्वास वाढला आहे. बुजरेपणा कमी झाला आहे. व्यवहारात सडेतोडपणा आला आहे. स्त्रीमध्ये स्त्रियाबद्दलची आत्मीयता दिसून आली आहे. विविध भाषा आत्मसात करू लागल्या आहेत. नवीन यंत्राचा वापर सराईतपणे करत आहे. निर्णय क्षमतेत वाढ झाली आहे. राजकीय महव वाढले आहे. राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. कुटूंबातून मान, सन्मान प्राप्त झाला आहे. अशा पद्धतीने प्रस्तुत संशोधनामध्ये नवी संकल्पना दिसून आल्या आहेत. पुढील संशोधन विषयासाठी तयाचा नक्कीच उपयोग होईल.

८. सर्वांगीण विकासासाठी आदर्श नागरी व्यवस्थेची निर्मिती महत्त्वाची आहे. आदर्श नागरी व्यवस्थेमुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य होतो. समाजासाठी आदर्श नागरी व्यवस्था फलदायी आहे.

✪✪✪

# प्रकरण सातवे
# निष्कर्ष आणि शिफारशी

## ७.० प्रास्ताविक

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अन्नटंचाईमुळे गर्भवती स्त्रीया व लहान मुले यांचे कुपोषण टाळण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर पालिकेने दूध वाटप योजना सुरू केली. त्यानुसार प्रति महिला अर्धा शेर दूध वाटप करण्यात येत होते. दूध उकळण्याची सोय नसल्यामुळे कच्चा स्वरूपात दूध वाटप करण्यात येत होते. व त्यामुळे काही अडचणी निर्माण होत होत्या. तसेच हेच दूध त्याकाळच्या ब्रिटीश सैनिक कर्मचारी/आधिकारी यांनाही पुरविण्यात येत होते. त्यांना कच्चे दूध पिण्याची सवय नसल्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. मुंबईतील गोठे अत्यंत अस्वच्छ वातावरणात ठेवण्यात येत होते. व गुरांचे पालन पोषण अशास्त्रीय रित्या करण्यात येत होते. तसेच गोठयांमुळे त्या परिसरातील लोकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत होत्या. मुंबई शहरातील गोठयांचे पूर्नवसन शास्त्रीयरित्या करण्याच्या उद्देशाने आरे दूग्धवसाहतीची १९४९ साली स्थापना करण्यात आली आहे. आरे दूग्धवसाहतीत ३० गोठे स्थापन करण्यात येऊन तेथे मुंबई शहरातील १६००० म्हशींचे स्थलांतर करण्यात आले. शहरातील नागरीकांना निर्जंतूक दूध मिळण्याच्या उद्देशाने १९५१ साली आशियातील पहिली दूग्धशाळा स्थापन करण्यात आली. या मध्यवर्ती दूग्धशाळा आरे चे उद्घाटन दि ४/३/१९५१ रोजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले होते.

दुग्धव्यवसायाची प्रगती पूर्ण क्षमतेने होण्याच्या दृष्टीने शासनाने स्वतंत्र दुग्धव्यवसाय विभाग १९५८ साली स्थापन केला. १९६० सालापासून ग्रामीण भागातील दूध स्विकृत करून शहरी भागातील लोकांना दूध वितरीत करण्याची योजना सुरू करण्यात आली.

बारामती तालुक्यामध्ये बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाची १९७७ साली स्थापना केली. १९९१ मध्ये भारतामध्ये श्वेत क्रांती झाली होती. १९९१ साली गॅट करार समंत होऊन खाजगी दूध व्यावसायिकांना परवानगी देण्यात आली. त्यावेळेस अतीरिक्त दूधाचा प्रश्न निर्माण झाला होता. अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी दूधावर प्रक्रिया करून विविध दुग्धजन्य पदार्थ बनवून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वितरण करण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पाची निर्मीती झाली.

श्रायबर डायनामिक्स डेअरीने स्थापनेपासून ते आजतागायत दूधावर प्रक्रिया करणे व त्यापासून दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करून ते वितरीत करणे यामध्ये खंड पडू दिलेला नाही. दूध व दूग्धजन्य पदार्थाची गुणवत्ता व दर्जा टिकवनू ठेवला आहे. त्यामुळे श्रायबर डायनामिक्सच्या दूधासाठी व दुग्धजन्य पदार्थासाठी ग्राहक वाढले, खप वाढला. महाराष्ट्रातून अनेक ठिकाणाहून दूध संकलन केले जाते. दूध उत्पादकांना दूधाच्या दर्जानुसार किंमत दिली जात होती. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगली आर्थिक प्राप्ती होत आहे. महाराष्ट्रातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न श्रायबर डायनामिक्स डेअरीने सोडविला आहे. या प्रकल्पाची दैनंदिन दूध हाताळणी क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे. त्यामुळे या प्रकल्पाने स्वत:ची क्षमता सिद्ध केलेली आहे. या प्रकल्पाने अतिरिक्त दूधाचा प्रश्न कायमचा सोडविला आहे. तसेच दूग्धव्यवसायात वाढीसाठी प्रयत्न केले आहेत. अशा प्रकल्पाचा समाजशास्त्रीय पातळीवर अभ्यास करून त्यांची सर्व माहिती सामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी ‘बारामती पॅटर्न’ या संकल्पनेतून श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमुळे झालेला सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करण्याकडे संशोधिकेने लक्ष केंद्रित केले आहे.

## ७.१ अध्ययनाचा उद्देश

१. बारामती पॅटर्न व परिसर ही संकल्पना स्पष्ट करणे.

२. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पाची कार्यप्रणाली अभ्यासणे.

३. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पात कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कामगार वर्गाच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास करणे.
४. बारामती तालुक्यातील दूग्ध व्यावसायिकांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीचा अभ्यास करणे.
५. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पाच्या विकासात राजकिय नेतृत्त्वाच्या योगदानाचा अभ्यास करणे.
६. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाने पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

## ७.२ गृहीतके

१. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पामुळे एक सबळ जोडधंदा प्राप्त झाला आहे.
२. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पामुळे दूग्धव्यावसायिक महीलांचे सबलीकरण व सामाजिक स्तरात वाढ झाली आहे.
३. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील अधिकारी व कामगारांच्या सामाजिक जीवनामध्ये समस्तरीय व उर्द्धगामी सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेस वेग प्राप्त झाला आहे.
४. स्थानिक व स्थलांस्तरीत यांच्यात होणाऱ्या आदान — प्रदानाचे स्थलांतरितामध्ये विशेषत: स्थलांतरितांच्या पुढच्या पिढीमध्ये स्थानिक संस्कृतीची जवळीकता निर्माण झालेली आहे.
५. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पाच्या विकासात राजकिय नेतृत्त्वाचे योगदान लाभले आहे.

## ७.३ अध्ययन क्षेत्र

बारामती तालुका हे अध्ययन क्षेत्र आहे. बारामती तालुक्यातील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पातील कार्यरत अधिकारी व कामगार वर्ग व बारामती तालुक्यातील दुग्धव्यावसायीक.

## ७.४ नमुना निवड पद्धती

प्रकल्पातील अधिकारी व कामगार यांची निवड:

संभाव्यता नमुना निवड पद्धतीची निवड केली. संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील व्यक्तींची संख्या माहित असल्यामुळे विश्वातील प्रत्येक व्यक्तीला नमुण्यात निवडून येण्याची समान संधी मिळण्यासाठी नमुना निवडताना नियमित अंकन पद्धतीचा वापर केला आहे.

**तथ्य संकलन पद्धती व तंत्र**

तथ्य संकलन पद्धतीसाठी प्राथमिक पद्धती व दुय्यम पद्धतीचा वापर केला आहे व त्यासाठी प्रश्नावली पद्धतीचा वापर केला आहे व निरीक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

## ७.५ निष्कर्ष

**उद्दिष्ट क्र १ नुसार निष्कर्ष:**

**१) बारामतीचा सर्वांगीण विकास साधन्यामागे स्थानिक, राजकीय नेतृत्त्वाचे योगदान आहे.**

बारामतीमध्ये कृषी विकासाबरोबरच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण विस्तार केला आहे. तांत्रिक तसेच व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, आरोग्य सुविधा, महिला सबलीकरण तसेच मुलींच्या शिक्षणाची सोय केली आहे. यावरून असा निष्कर्ष बारामतीच्या सर्वांगीन विकासामध्ये राजकिय मोलाचे योगदान आहे.

**२) कृषी विकास प्रतिष्ठानचा प्रसार, प्रात्यिक्षके, व प्रशिक्षण या त्रीसुत्रीमुळे 'बारामतीचा कृषी विकास झाला आहे'.**

शेती विकासासंबंधी शिबिरांचे आयोजन करून प्रसार केला जात होता. प्रसार केलेल्या उत्पादनाची प्रात्यक्षिके दाखविली जात होती. त्यासंबंधी प्रशिक्षण ही दिले जात होते. त्यामुळे त्यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रसार, प्रात्यक्षिके व प्रशिक्षणामुळे कृषी विकास झाला आहे.

**उद्दिष्ट क्र. २ नुसार निष्कर्ष:**

**१) दूग्धप्रक्रिया उद्योगातून दूग्धजन्य पदार्थाची निर्मीती होऊ लागल्यामुळे उत्पादित दूधास स्विकृतीची हमी मिळाली.**

दूध महापूर योजनेच्या यशामुळे दूग्धउत्पादनामध्ये महाराष्ट्रामध्ये अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाचे अतिरिक्त दूध खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती करत असल्यामुळे उत्पादीत दूधास स्विकृतीची हमी मिळाली आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाची दैनंदिन दूध हाताळणी क्षमता १५ लाख लिटर्स एवढी आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो एवढया मोठया प्रमाणावर दूध स्विकृती करणाऱ्या प्रकल्पाची उभारणी झाल्यामुळे दूध उत्पादकांना दूध स्वीकृतीची हमी मिळाली आहे.

**२) बारामती तालुक्यातील दूग्धजन्य पदार्थाची उत्पादने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वितरीत होऊ लागल्यामुळे बारामतीला आंतराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे.**

बारामतीच्या श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये दूधावर प्रक्रिया करून विविध दूग्धजन्य पदार्थांची निर्मीती केली जाते. या पदार्थाचे वितरण, मॅक्डोनाल्ड, नेस्ले, ब्रिटानीया, पिझ्झा हट या आंतराष्ट्रीय ब्रँन्ड द्वारे केले जाते. त्यामुळे बारामतीला आंतराष्ट्रीय स्तरावर औद्योगीक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**३) दूग्धव्यवसायामुळे पूरक उद्योग धंद्याची निर्मीती झाली आहे.**

दूग्धव्यवसायामुळे दुग्धप्रक्रिया उद्योग उभे राहीले आहेत. दूग्धप्रक्रियामुळे उद्योगामुळे पशुखाद्य प्रकल्प उभा राहीले. दूध वाहतुकीसाठी लागणारे टँकर निर्मीती उद्योग उभे राहीले. किटली, कॅन तयार करणारे उद्योग चालू झाले. त्यामुळे अनेक बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. यावरून असे दिसून येते. दूग्धव्यवसामुळे अनेक पूरक उद्योगधंद्याची निर्मीती झाली आहे.

**४) बारामतीमधील दूग्धप्रक्रिया प्रकल्प जागतिक पातळीवर श्रेष्ठ आहे.**

बारामती येथील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड या प्रकल्पाला अमेरीकन इन्स्टिटयूट ऑफ बेकर्स (ए.आय.बी) या संस्थेच्या अन्न पदार्थ सुरक्षा व गुणवत्ता प्रणालीच्या मूल्यांकनामध्ये सर्वोत्कृष्ट समजले जाणारे गोल्ड मानांकन प्राप्त झाले आहे.

२०१० मध्ये ए.आय.बी ने केलेल्या मुल्यांकनामध्ये डायनामिक्स सिल्व्हर मानांकन मिळाले होते.

२८ ते ३० नोव्हेंबर २०११ च्यादरम्यान पूर्वसूचनेशिवाय केलेल्या तपासणीनंतर सर्वोकृष्ट समजले जाणारे गोल्ड मानांकन कंपनीस मिळाले आहे. यावरून असे दिसून येते की, बारामती मधील श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड हा प्रकल्प जागतीक पातळीवर श्रेष्ठ आहे.

**उद्दिष्ट क्र. ३ नुसार निष्कर्ष:**

**१) श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामधील अधिकाऱ्यांना शैक्षणिक अर्हता, अनुभव व गुणवत्ता यांचे आधारावर वेतन निश्चिती केली आहे.**

**सरासरी वेतन:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामध्ये १२ अधिकाऱ्यांचे सरासरी दरमहा वेतन रू. ७०,०००/— एवढे आहे. त्यांचे शेकडा प्रमाण २४% आहे. तर २१ अधिकाऱ्यांचे सरासरी दरमहा वेतन ४४,०००/— एवढे आहे. अशा

अधिकाऱ्यांचे प्रमाण ४२% आहे तर ०५ अधिकाऱ्यांचे सरासरी दरमहा वेतन ३७,०००/— एवढे आहे त्यांचे प्रमाण १०% एवढे आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, सरासरी दरमहा ३७,०००/— च्या पुढे वेतन असणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या ३७ आहे म्हणजेच ३८ अधिकारी हे गुणवत्ताधारक अनुभवी व उच्च शैक्षणिक अहर्ता प्राप्त केलेले आहेत.

**निवास:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी चांगल्या वेतनामुळे निवास व्यवस्थेची व भविष्यकालीन आर्थिक तरतूदीची सोय केली आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेडमधील ५० अधिकाऱ्यांपैकी ४२ अधिकाऱ्यांनी स्वत:ची पक्की घरे बांधली आहेत. त्यांचे प्रमाण (८४%) इतके आहे.

**विमा:**

५० अधिकाऱ्यांपैकी ४८ अधिकाऱ्यांनी वैयक्तिक विमा पॉलिशी घेतल्या आहेत. त्यांचे प्रमाण (९६%) इतके आहे.

**वैद्यकीय सेवा:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाने अधिकारी वर्गासाठी विविध सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. ५० अधिकाऱ्यांपैकी ४२ अधिकारी हे कंपनीने पुरविलेल्या वैद्यकीय सेवेचा लाभ घेत आहेत. याचे प्रमाण ८४% इतके आहे.

**वाहतुक व्यवस्था:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पाने अधिकारी व कामगारांमध्ये विचारांचे आदान प्रदान होण्यासाठी, सुरक्षित प्रवाहासाठी, इंधन वाचविण्यासाठी व प्रदूषण टाळण्यासाठी व सुरू केलेल्या वाहतूक व्यवस्थेचा लाभ कर्मचारी घेत आहेत. ५० अधिकाऱ्यांपैकी कंपनीच्या वाहतुक व्यवस्थेचा उपयोग ३२ अधिकारी करीत आहेत. त्यांचे प्रमाण ६४% इतके आहे. १३ अधिकारी स्वत:चे वाहन वापरतात. त्यांचे प्रमाण २६% इतके आहे. सार्वजनिक वाहन व्यवस्थेचा उपयोग २ अधिकारी

करतात. त्यांचे शेकडा प्रमाण ०४% आहे. कंपनीचे स्वत:चे वाहन वापरणारे अधिकारी ३ आहेत त्यांचे शेकडा प्रमाण ६% इतके आहे.

**कामाच्या ठिकाणची परिस्थिती:**

कामाच्या ठिकाणच्या चांगल्या परिस्थितीचा कामावर सकारात्मक परिणाम झाला आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील ५० अधिकाऱ्यांपैकी ४६ अधिकाऱ्यांच्या मतानुसार कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली आहे. त्यांचे प्रमाण ९२% इतके आहे. ३ अधिकाऱ्यांच्या मते कामाच्या ठिकाणची परिस्थिती बरी आहे त्यांचे शेकडा प्रमाण ६% आहे व १ अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे कामाच्या ठिकाणची परिस्थिती चांगली नाही त्यांचे प्रमाण २% आहे.

**शैक्षणिक:**

**शैक्षणिक वर्गीकरण:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पाने शैक्षणिक अर्हतेनुसार कर्मचारी वर्गाची नेमणूक केली आहे.

५० अधिकाऱ्यापैंकी पदव्युत्तर पदवी शिक्षण घेतलेले अधिकारी संख्या ३८ आहे. त्यांचे प्रमाण ७६% आहे. व्यावसायिक शिक्षण घेणारे ९ अधिकारी आहेत. त्यांचे प्रमाण १८% आहे. तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले अधिकारी ३ आहेत त्यांचे प्रमाण ६% आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, अधिकारी वर्गाच्या नेमणूका शैक्षणिक पात्रतेनुसार झाल्या आहेत.

**स्वयंप्रशिक्षण:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी स्वयं:प्रशिक्षण घेतले आहे. ५० अधिकाऱ्यांपैकी ४२ अधिकाऱ्यांनी स्वयं:प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचे प्रमाण ८४% आहे. आपल्या कामात नेहमी दक्ष, स्वत:चे कंपनीमधील स्थान बळकट करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी ८४% अधिकाऱ्यांनी स्वयंप्रशिक्षण घेतले आहे.

**सामाजिक:**

परप्रांतीय अधिकारी व स्थानिक अधिकारी यांच्यात सांस्कृतिक आदान प्रदानातून सामाजिक संम्मीलन भावना वाढली आहे.

— परप्रांतीय अधिकारी व स्थानिक अधिकारी यांच्यात सामाजिक संम्मीलन करणाऱ्या घटकामध्ये सण समारंभातील सहभाग ५० अधिकारी वर्गापैकी ३८ अधिकाऱ्यांचाच आहे. त्यांचे प्रमाण ७६% आहे. स्थानिक उत्सवामध्ये ४२ अधिकारी असहभागी झाली आहेत. त्यांचे प्रमाण ८४% आहे. स्थानिक जत्रा, यात्रा यामध्ये २६ अधिकारी सहभागी झाले आहेत त्यांचे प्रमाण ५२% आहे व वाढदिवसासारख्या कार्यक्रमामध्ये ४३ अधिकाऱ्यांचा सहभाग असतो. त्यांचे प्रमाण ८६% आहे. विवाह समारंभासाठी ३२ अधिकारी उपस्थित राहतात त्यांचे प्रमाण ६४% आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, ५०% पेक्षा जास्त अधिकारी वर्ग एकमेकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होतात. त्यातूनच त्यांची सामाजिक संम्मीलन भावना वाढली आहे.

**सांस्कृतिक:**

१. स्थानिक अधिकारी व परप्रांतीय अधिकारी यांच्यात सांस्कृतिक बदल घडून आला आहे.
२. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील स्थानिक अधिकारी व परप्रांतीय अधिकारी यांच्यातील कार्य संस्कृतीचा अभ्यास करताना त्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग हा पुढीलप्रमाणे दिसून आला.
३. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ४२ अधिकारी सहभागी झाले होते. त्यांचे शेकडा प्रमाण ८४% आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की जास्तीत जास्त अधिकारी सांस्कृतिक सहभागी होतात. त्यामुळे त्यांच्यात सांस्कृतिक बदल दिसून येतो. तसेच १२ परप्रांतीयांचा स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क त्यांचे प्रमाण १००% आहे.

४. तसेच ४७ अधिकाऱ्यांना कामगार वर्गाचे सहकार्य मिळते. त्याचे प्रमाण ९४% इतके आहे. कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी अधिकारी वेळोवेळी मदत करतात त्यामुळे अधिकाऱ्यांना देखील जास्तीत जास्त कामगार वर्गाकडून सहकार्य मिळत आहे.
५. यावरून असा निष्कर्ष निघतो कि विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक लोकांशी संपर्क वाढला आहे. स्थानिक अधिकाऱ्यांचा परप्रांतीय अधिकाऱ्यांवर सांस्कृतिक प्रभाव पडला आहे.

**कामगार:**

**सरासरी वेतन:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी प्रकल्पातील कामगारांचा आर्थिक स्तर उंचावला आहे.

२०० कामगारांपैकी २६ कामगारांना सरासरी दरमहा रू. २७००० इतके वेतन मिळते. त्याचे प्रमाण १३% इतके आहे.

७६ कामगारांना सरासरी दरमहा १७००० रू. इतके वेतन आहे. त्याचे प्रमाण ३८% आहे.

९८ कामगारांचे सरासरी दरमहा रू ८००० रू. इतके आहे त्याचे प्रमाण ४९ इतके होते.

**पगाराबाबत समाधानी**

२०० कामगारांपैकी १९२ कामगार पगाराबाबत समाधीन आहेत. त्याचे प्रमाण ९६% इतके आहे.

**बोनस:**

बोनसच्या बाबतीत सर्वच कामगार समाधानी आहेत. त्याचे प्रमाण १००% आहे.

**विमा:**

२०० कामगारांपैकी २०० कामगारांना वैद्यकिय सुविधा प्रकल्पाकडून मिळतात. त्यांचे प्रमाण १००% आहे. १६५ कामगारांनी विमा उतरवला आहे. त्याचे शेकडा प्रमाण ८२.५ % इतके आहे. (तक्ता क्र. पा. क्र )

**वाहतुक:**

२०० कामगारांपैकी वाहतूक बससेवेचा लाभ १६० कामगार घेतात. त्यांचे प्रमाण ८०% आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रकल्पातील कामगार बोनसबाबत समाधानी आहेत. वैद्यकिय सुविधा अन्यदरात मिळतात. तसेच बस सेवाही नाममात्र दरात उपलब्ध केली आहे. त्यामुळे कामगारांची खर्चात बचत होऊन त्यांचा आर्थिक स्तर उंचावला आहे. कामगारांचा सामाजिक स्तर उंचावला आहे.

**निवास व्यवस्था:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २०० कामगांरानी कामगार सुरक्षेबाबतचे सर्व नियमांचे काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. असे सांगितले आहे. याचे प्रमाण १००% आहे. कामाच्या ठिकाणी परिस्थिती चांगली आहे असे १९६ कामगारांनी स्वत:चे घर बांधले आहे. त्याचे प्रमाण ५४% इतके आहे. ८६ कामगार कंपनीच्या निवासस्थानामध्ये राहतात. त्याचे प्रमाण ४३% आहे.

**जोड धंदा:**

२०० कामगारांपैकी १७४ कामगार जोडधंदा करतात त्याचे प्रमाण ८७% आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, वरील घटकांमुळे कामगारांचा सामाजिक स्तर उंचावला आहे.

**स्त्री — पुरूष वर्गीकरण:**

कामगार वर्गामध्ये महीला कामगारांचे प्रमाण नगण्य आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमीटेड प्रकल्पामध्ये २०० कामगारांपैकी ६ महीला कामगार आहेत. त्याचे प्रमाण ४% इतके आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की प्रकल्पामध्ये महीलांना सामावून घेण्याचे प्रमाण कमी आहे.

**प्रशिक्षण सुविधा:**

श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील २०० कामगारांपैकी सर्वच कामगारांची औद्योगिक प्रशिक्षण घेतले आहे. त्याचे प्रमाण १००% आहे. व कंपनीअंर्तगत प्रशिक्षण हे सर्वच कामगारांनी कंपनीतर्फे दिले आहे. त्याचे प्रमाण १००% आहे. त्यामुळे कामगाराच्या कौशल्यात वाढ होते व कार्यक्षमता वाढून प्रकल्पाला त्याचा फायदा झाला आहे.

**सामाजिक सन्मानात वाढ:**

नोकरीमुळे कामगारांच्या सामाजिक सन्मानात वाढ झाली आहे. त्याचे प्रमाण ९५% आहे. जास्तीत जास्त कामगारांच्या सामाजिक सन्मानात वाढ झाली आहे.

**परप्रांतीय कामगारांना श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पामध्ये रोजगार उपलब्ध झाला आहे.**

२०० कामगारांपैकी ५१ कामगार हे परप्रांतीय आहेत. त्यांचे प्रमाण २५.५% इतके आहे. परप्रांतीय कामगारांना प्रकल्पामध्ये सामावून घेऊन सामाजिक बांधीलकी जपली आहे.

**उद्दिष्ट क्र. ४ नुसार निष्कर्ष:**

१. दूग्ध व्यवसायाचे महिलांचा सहभाग वाढला आहे. बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यवसायापैकी ६२ महिला दूग्धव्यावसायिक आहेत. यांचे शेकडा प्रमाण ३१% इतके आहे. १३८ पुरूष दूग्धव्यवसायिक आहेत त्यांचे प्रमाण ६९% इतके आहे. दूग्ध व्यावसायिकांमध्ये उच्च शिक्षितांचे प्रमाण वाढले आहे

२. बारामती तालुक्यामधील २०० दूग्ध व्यवसायिकांपैकी ६८ दूग्धव्यवसायिक हे पदवीधर आहेत. त्याचे प्रमाण ३४% आहे. पदव्युत्तर पदवी घेतलेले दूग्धव्यवसायिक हे ६० आहेत. त्यांचे प्रमाण ३०% आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या दूग्धव्यावसायिकांची संख्या ५४ आहे. त्यांचे शेकडा प्रमाण २७% आहे व माध्यमिक शिक्षण घेतलेल्या दूग्धव्यावसायिकांची संख्या ६ आहे त्यांचे प्रमाण ३% इतके आहे.

३. एकंदरीत दूगधव्यवसायामध्ये उच्च शिक्षितांचे प्रमाण वाढले आहे. ३. दूध उत्पादकांचा दूग्ध व्यवसाय हा मुख्य व्यवसाय बनला आहे.

४. बारामती तालुक्यातील २०० दूग्धउत्पादकापैकी ८० कुटूंबाचा मुख्य व्यवसाय हा दूग्धव्यवसाय आहे. त्यांचे प्रमाण ४०% आहे. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामुळे ४०% कुटूंबाचा मुख्य हा दूग्धव्यवसाय झाला आहे.

५. आधुनिक तंत्रज्ञानाचा दूग्ध व्यवसायामध्ये वापर केल्यामुळे दूग्ध व्यवसाय किफायतशीर झाला आहे.

६. २०० दूग्ध व्यवसायापैकी १७८ दूग्धव्यवसायिक आधुनिक तंत्रज्ञानाचा दूग्धव्यवसायासाठी वापर करतात. त्यांचे प्रमाण ८९% आहे. यंत्रसामुग्रीमुळे श्रम व पैशाची बचत होते. म्हणून दूग्ध व्यवसाय हा किफायतशीर झाला आहे.

७. दूग्ध व्यवसायिकांना विविध सेवा सुविधा उपलब्ध झाल्यामुळे दूग्धव्यवसाय वाढीस लागला आहे.

८. २०० दूग्धव्यवसायिकांपैकी सरकार पशुवैद्यकीय सेवा ४८ दूग्धव्यावसायिक घेतात त्यांचे प्रमाण २४% आहे. तर खाजगी पशुवैद्यकीय सेवेचा लाभ १५२ दूग्धव्यावसायिक घेतात त्यांचे प्रमाण ७६% आहे. तसेच २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १२२ दूग्ध व्यावसायिकांनी गायांना विमा संरक्षण घेतले आहे. त्यांचे प्रमाण ६१% आहे. २०० दूग्धव्यावसायिकांपैकी १८२ दूग्धव्यावसायिक दूध दराबाबत समाधानी आहेत. त्यांचे प्रमाण ९१% आहे. वरील सर्व सोयी उपलब्ध झाल्यामुळे दूग्धव्यवसाय वाढीस लागला आहे.

९. दूग्धव्यवसायामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला गेला आहे. २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ४४ दूग्धव्यावसायिक गोबर गॅस सयंत्राचा वापर केला आहे त्यांचे प्रमाण २२% आहे. गाईच्या शेणापासून सेंद्रीय खत तयार करून त्याचा शेतीसाठी वापर केला आहे. दूग्ध व्यावसायिकांनी आपल्या कुटूंबासाठी शुद्ध दूध, तूप, दही, ताकाचा वापर आरोग्यासाठी केला आहे.

१०. दूग्ध व्यवसायामुळे दूग्धव्यावसायिकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. २०० दूग्ध व्यवसायिकांपैकी १५६ दूग्ध व्यवसायासिकांनी पक्की घरे बांधली आहेत. त्यांचे प्रमाण ७८% आहे.

**गृहीतकानुसार निष्कर्ष:**

१. दूग्ध व्यवसायात महिला दूग्धव्यावसायिकांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे महिलांचे विविध घटकामधील सहभाग वाढला आहे.

२. बारामती तालुक्यातील २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६२ महिला दूग्धव्यावसायिक आहेत. त्यांचा विविध घटकामधील सहभाग बचत गटामध्ये ४० महिलांचा सहभाग आहे. त्यांचे प्रमाण ६४.५१% आहे. मुलांच्या शिक्षणात मदत ४२ महिला करत आहेत. त्यांचे प्रमाण ६७.७४% आहे. गृहोपयोगी वस्तु खरेदी मध्ये ४३ महिला स्वनिर्णय घेतात त्यांचे प्रमाण ६९.३५% आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, दूग्धव्यवसायात सहभाग वाढल्यामुळे त्यांचा विविध घटकामध्ये सहभाग वाढला आहे.

३. दूग्धव्यवसायामुळे महिला आर्थिक स्वावलंबी झाल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला आहे.

४. २०० दूग्धव्यावसायिकांपैकी ६२ महिला दूग्धव्यावसायिकांना सबळ पूरक जोडधंदयामुळे नियमित उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला. बँकेचे व्यवहार करू लागल्या आहेत. पाल्याची शैक्षणिक फी भरणे. गृहपयोगी वस्तू खरेदी करणे. यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे. महिला आरक्षण धोरणमुळे महिलांचा राजकरणातील सहभाग वाढला आहे. नेतृत्व गुणांची निर्मिती झाली आहे.

५. स्थानिक अधिकारी व कामगार आणि परप्रांतीय अधिकारी व कामगार यांच्यात खानपानविषयक बदल घडून आला आहे.

६. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड प्रकल्पातील २५० कर्मचाऱ्यांपैकी ६३ परप्रांतीयांमध्ये खानपानविषयक बदल ५४ कर्मचाऱ्यामध्ये दिसून आला आहे. ८७.७१% आहे. ११ अधिकाऱ्यांमध्ये खानपानविषयक बदल झाला आहे. त्यांचे प्रमाण ३१.६६% आहे. म्हणजेच ४३ कामगारांमध्ये खानपान विषयक बदल झाला आहे. त्यांचे प्रमाण ८४.२१% आहे.

७. परप्रांतीय कुटूंबामधील जुन्या पिढीवर स्थानिक संस्कृतीच प्रभाव पडला नाही.— श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पातील ६३ परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या जुन्या पिढीमध्ये स्थानिक सण समारंभामध्ये ३६ कुटूंबातील वृद्ध सहभागी झाले नाही. त्यांचे प्रमाण ८५.७१% आहे व स्थानिक भाषा ४० वृद्धांना येत नाही त्यांचे प्रमाण ९५.२३% आहे. ४० वृद्धांनी स्थानिक वेशभूषा व खाद्यपदार्थाचा स्विकार केला नाही. त्यांचे प्रमाण ९५.२३% आहे. ३८ वृद्धांचे स्थानिक संस्कृतीविषयी मत चांगले नाही. त्यांचे प्रमाण ९०.४७%

आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, परप्रांतीय कुटूंबातील जुन्या पिढीवर स्थानिक संस्कृतीचा प्रभाव पडत नाही.

८. परप्रांतीय कर्मचाऱ्याच्या कुटूंबातील पौंगडाव्यवस्थेतील मुलांमध्ये सांस्कृतिक बदल घडून आला आहे. — श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड या प्रकल्पामधील ६३ परप्रांतीय अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटूंबातील पौगंडावस्थेतील मुलांचा सांस्कृतिक बदलांचा अभ्यास केला त्यामध्ये ५० मुलांनी स्थानिक भाषा अवगत केली आहे. त्यांचे प्रमाण १००% आहे. ५० पैकी ४८ मुले स्थानिक सण समारंभामध्ये सहभाग नोंदवतात. त्यांचे प्रमाण ९६% आहे. तसेच ५० पैकी ४६ मुलांमध्ये स्थानिक खाद्यपदार्थाविषयी आवड निर्माण झाली आहे. त्यांचे प्रमाण ९२% आहे व ५० पैकी ४८ मुलांमध्ये स्थानिक मुलांबद्दल संम्मीलनतेची भावना निर्माण झाली आहे. त्यांचे प्रमाण ९६% आहे. तसेच परप्रांतीय ५० पौंगडावस्थेतील मुलांपैकी ४४ मुलांमध्ये सकारात्मक सांस्कृतिक बदल घडून आला आहे. त्यांचे प्रमाण ८८% आहे. यावरून परप्रांतीय कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील पौगंडावस्थेतील मुलामध्ये सांस्कृतिक बदल घडून आला आहे. म्हणजेच नवीन पिढी सांस्कृतिक बदल लगेच स्विकारते.

९. ग्रामीण व शहरी संस्कृतीच्या मिलनातून नवीन महानगरीय संस्कृतीचा उगम झाला आहे. औद्योगिकता सुरू झाल्यापासून ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी शहरात आले. शहरामध्ये रोजगारातून चांगली अर्थप्राप्ती होऊ लागल्यामुळे शहरी संस्कृतीचे अनुकरण करण्यास सुरूवात झाली. त्यातून मौजमजा, चंगळवाद, सिनेमा, पब, ड्रग्ज या गोष्टींच्या प्रभावाला नविन पिढी बळी पडू लागली. पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न नवीन पिढी करू लागली. त्यातून एका नवीन महानगरीय संस्कृतीचा उगम झाला आहे. असे दिसून येते.

## ७.६ शिफारशी

१. प्रत्येक तालुक्यामध्ये शेतमाल प्रक्रिया उद्योग निर्मिती करण्यासाठी सरकारी / खाजगी व्यावसायिकांना प्रोत्साहित करून उद्योग उभा करणे. शेतमालापैकी अनेक उत्पादने नाशवंत असतात. त्यावर प्रक्रिया केल्यास ती अधिक काळ टिकतात. त्यामुळे शेतकऱ्यांना जास्त पैसेही मिळतात. त्यामुळे असे शेतमाल प्रक्रिया उद्योग प्रत्येक तालुक्यामध्ये निर्माण व्हावेत यासाठी प्रयत्न करणे.

२. तालुका सहकारी दूध संघाप्रमाणे तालुका सहकारी फलोत्पादन संघाची निर्मिती करून त्यामार्फत प्रिकुलिंग व कोल्ड स्टोअरजेची उभारणी करून शेतकऱ्यांना मालाची साठवणूक करता येईल व योग्य किंमत आल्यावर बाजारामध्ये टिकू शकेल. त्यासाठी अशा प्रिकुलिंग व कोल्ड स्टोअरजेची निर्मिती करणे यासाठी प्रयत्न करणे.

३. औद्योगिक भागातील दुषित पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने सर्व कारखान्यांच्या दूषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 'सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प' (Waste Water Treatment) तयार करून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर एम.आय.डी.सी. मधील झाडांसाठी व बागासाठी करावा. जेणेकरून या दुषित पाण्यामुळे स्थानिक लोकांचे आरोग्यास धोका उत्पन्न होणार नाही व पाण्याचीही बचत होईल. त्यासाठी एम.आय.डी. सी ने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की ज्या राज्यामध्ये दूधाच्या खरेदी विक्रीचा दर शासनाच्या दूग्धविकास खात्यामार्फत ठरविला जातो. दूधाच्या खरेदीचा दर ठरविण्याचा अधिकार संबंधित सहकारी दूध संघास अथवा दूध प्रक्रिया प्रकल्पास दिल्यास तो दूध उत्पादकांना फायदेशीर ठरेल त्यामुळे शासनाचे दूध खरेदीचा दर ठरविण्याची मुभा संबंधित संघाला दयावी. ज्यामुळे दूग्ध उत्पादकांचा फायदा होऊन दूग्ध उत्पादन व्यवसास वाढीस चालना मिळेल.

५. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे दूग्धजन्य पदार्थाची निर्मिती करून त्यांचे वितरण करणारे प्रकल्प इतर जिल्हयात व्हावेत की जेणेकरून तेथील दूग्धव्यवसाय वाढविण्यास प्रोत्साहन मिळेल. यासाठी शासनाने अशा आंतरराष्ट्रीय प्रकल्पांना पायाभूत सुविधा देऊन प्रकल्प निर्मितीस प्रोत्साहन दयावे.

६. स्थानिक राजकीय नेतृत्वाने समाजहित साधण्यासाठी निरनिराळया शासकीय योजनांच्या मदतीने आपल्या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न करावे व त्यासाठी बारामतीच्या राजकीय नेतृत्वाचे क्षेत्रीय विकास साधन्याच्या दूरदृष्टीचे अवलोकन करावे. की जेणेकरून आपल्या भागाचा विकास होईल.

७. अवर्षण प्रवण मागास भागातील कृषी विकास साधण्यासाठी ‘कृषी विकास प्रतिष्ठानच्या धर्तीवर इतर ठिकाणी अशा संस्था उभारण्यास शासनाच्या कृषी विभागाने प्रयत्न करावेत. त्यासाठी सामाजिक कर्ता संस्थांना शासनाने शेतजमीन उपलब्ध करून दयावी. जेणेकरून अवर्षणप्रवण भागाचा शेती विकास होईल.

८. शेतीला जोडधंदा म्हणून दूग्धव्यवसायिकांना ग्रामीण महिलांना जास्तीत जास्त संधी प्राप्त झाल्यास त्यांच्यातील आत्मसन्मानात वाढ होईल व त्यांच्यातील सुप्त क्षमतांचा जास्तीत जास्त विकास साध्य करता येईल.

९. दूग्धव्यवसायाकडे जोडधंदा म्हणून न पाहता आधुनिक तंत्रज्ञान व योग्य नियोजन करून मुख्य व्यवसाय बनविला तर त्यामध्ये चांगला फायदा होऊ शकतो. म्हणून हा व्यवसाय वाढविण्यावर जास्तीत जास्त भर दिला जावा.

१०. दूध उत्पादनापेक्षा त्यावर प्रक्रिया करणाऱ्या व्यावसायिकांना अधिक फायदा होत असल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दूध उत्पादनाबरोबरच त्यापासून तयार होणाऱ्या पदार्थांच्या निर्मिती व वितरणाला महत्त्व दिले पाहिजे.

११. बुद्धी आणि शक्तीच्या या देवतेचा उत्सव पवित्रमय, मंगलमय वातावरणात सामाजिक बांधिलकीची जपणूक करून केला जावा.

१२. दूग्ध व्यावसायिकांनी आपल्या दूग्ध व्यवसायामध्ये जास्त मोबदला मिळविण्यासाठी प्रक्रिया युक्त दूधापेक्षा नैसर्गिक पद्धतीने काढलेले ताजे, स्वच्छ

व भेसळ मुक्त दूधासाठी स्थानिक पातळीवर ग्राहकामध्ये विश्वासार्हता निर्माण करून दूध विक्री केल्यास दूध संस्थापेक्षा जास्त पैसे मिळतात म्हणून दूग्ध व्यावसायिकांनी दूध संस्थावर जास्त अवलंबून न राहता स्वत:चा ग्राहक वर्ग निर्माण करावा.

१३. सत्तेचे केंद्रीकरण होऊन सुद्धा विकास व प्रगतीचा वेग सातत्यपूर्ण आहे. त्यामुळे विरोधक मोजके ते अडथळा आणत नाही. त्यामुळे राजकीय विकासाचा एक राजकीय पॅटर्न निर्माण झाला आहे. या आदर्शाचे अनुकरण केल्यास इतर ठिकाणच्या स्थानिक राजकीय नेतृत्वास राजकीय विकासाचा पॅटर्न राबविता येईल.

## ७.७ नवीन संकल्पना

१. समस्तरीय, उर्ध्वगामी, अधोगामी गतिशीलता, या संकल्पनांचा अभ्यास करण्यासाठी वाव आहे.

२. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे व्यक्ती जीवनात निर्माण होणाऱ्या लघु व दीर्घ गतिशीलता अभ्यासता येते.

३. शहरीकरणाच्या प्रक्रियेत स्थानिक व स्थलांतरित यांच्यातील संबंध व स्थलांतरितामधील नवीन पिढीचा स्थलांतर विषयीचा दृष्टिकोन अभ्यासता येईल.

४. स्थलांतरितांच्या वारसामधील स्वयं ओळखीचा कलह/प्रश्न यावर संशोधन करता येईल.

५. आर्थिक सबलीकरणाचे सामाजिक व मानसिक लाभ संशोधन विषयासाठी उपयुक्त ठरतील.

६. सर्वांगीण विकासासाठी आदर्श नागरी व्यवस्थेच्या निर्मितीचा अभ्यास करता येईल.

✪✪✪

# संदर्भ

## अ) पुस्तके


१. ठोंबरे शिवाजीराव, कृषीभगीरथ आप्पासाहेब पवार, २०००, प्रकाशक सन पब्लिकेशन, पुणे. ३०.

२. टिकेकर अरूण, संपादन, अभय टिळक अनुवाद, स्पर्धा काळाशी...वेध भारतातील आर्थिक व सामाजिक संक्रमणाचा, शरद पवार भाषणे व मुक्त संवाद, रोहन प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती डिसेंबर २००८,

३. सोनवणे मनोहर आणि खेतमर प्रदिप, आठवणीतला चंद्र, गोल्डन पेज पब्लिकेशन, पुणे.

४. साळुंके सर्जेराव, मुलभूत समाजशास्त्रीय संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

५. सहस्त्रबुद्धे श्री. म., बारामती नगरपालिका, शताब्दीपूर्ती समाचार ग्रंथ, (१८६५ ते १९६५) प्रकाशक: अध्यक्ष बारामती नगरपालिका १९६७, प्रकाशन, मे १९६७.

६. जोशी पंडित महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, खंड तिसरा. भारतीय संस्कृती कोश मंडळ, ४१३, शनिवार पेठ पुणे २. प्रथम आवृत्ती शके १८८७. (इ.स. १९६५).

७. धनागरे द. ना. डिसेंबर २००५, प्रकाशित पुस्तक: संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव.

८. ठोंबरे शिवाजी, भगीरथ आप्पासाहेब पवार, २००१, प्रकाशित पुस्तक, शेतीपूरक जोडधंदे.

९. जोशी प्र. ना., जागतिक शब्दकोश, सिंद्धांताचा निर्माता, ऑगस्त कॉम्त,

१०. स्वामीनाथन एम.एस, चैतन्याच चांदण २००२, पृ.क्र. २३. फलशेती क्रांतीचे शिल्पकार.

११. मंगेशकर लता, चैतन्याच चांदण, २००२, पृ.क्र. ९३, समाजकारणातही अग्रेसर.

१२. माशेलकर रघुनाथ, चैतन्याच चांदण, २००२, पृ.क्र ५१, जैवतंत्रज्ञानावर दृढ विश्वास,

१३. गोवारीकर वसंत, चैतन्याच चांदण, २००२.

१४. गिडन्स ॲथनी, अनुवाद: अनुराधा भोईटे, The National State In the Global Age.

१५. महानोर ना. धो, १९९१ प्रकाशित पुस्तक, शेतीसाठी पाणी.

१६. शिंदे आण्णासाहेब, १९९३, प्रकाशित पुस्तक, शेती व पाणी नियोजन व धोरणासंबंधीचे काही प्रश्न.

१७. कुलकर्णी शिल्पा, २००८, पर्यावरण आणि समाज, डायमंड प्रकाशन.

१८. श्रायबर डायनामिक्स डेअरी लिमिटेड – प्रकल्पातील उपलब्ध कागदपत्रे

१९. आगलावे प्रदिप, प्रकाशित २००६, अभिजात समाजशास्त्रीय विचार.

२०. काटोले रविंद्र, प्रकाशित पुस्तक २००८, छोटा दूध प्रक्रिया प्रकल्प.

२१. चौगुले महादेव प्रकाशित पुस्तक १९९०, आपली शेती नवी दृष्टी.

२२. ठोंबरे शिवाजीराव, कृषीभगीरथ आप्पासाहेब पवार, २००१. प्रकाशक सन पब्लिकेशन, पुणे. ३०.

२३. कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती जिल्हा पुणे. तीन दशकातील ग्रामीण विकास कार्याची वाटचाल (१९६० ते १९९८)

२४. जोशी बी. आर. समाजशास्त्र (मानवशास्त्र) डायमंड पब्लिकेशन, १९९१, सदाशिव पेठ, पुणे.

२५. समकालीन समाजशास्त्रीय सिद्धांत, व्ही.एन.गजेंद्रगड, १९९३, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२६. संस्थांचे समाजशास्त्र, पी.के.कुलकर्णी, १९९६, विद्या प्रकाशन, नागपूर.

२७. विकासाचे समाजशास्त्र, माधवी रेणावीकर, २०००, प्राची प्रकाशन, मुंबई ९२.

२८. नागरिकीकरणाचे समाजशास्त्र, जयश्री महाजन व शैला सोमन, २०००, प्राची प्रकाशन, मुंबई.

२९. समाजशास्त्रीय विचारवंत, प्रदिप आगलावे, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर. २००६.

३०. प्रबोधन—पर्वातील सामाजिक बदलाची दशा व दिशा, अरूण टिकेकर, २००१, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

३१. मुलभूत संकल्पना, सर्जेराव साळुंके, १९९६, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

३२. उद्योगांचे समाजशास्त्र, पी.के.कुलकर्णी १९९७, मंगेश प्रकाशन, नागपूर.

३३. जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, जगन कऱ्हाडे, २००८, डायमंड प्रकाशन, पुणे.

३४. समाजशास्त्रीय सिद्धांत, दा.धो.काचोळे, २००२, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

३५. सामाजिक संशोधन पद्धती, सुमन बेहेरे, २००४, विद्या प्रकाशन,नागपूर.

३६. समाजशास्त्र संशोधन पत्रिका (वर्ष २५ वे) अंक नववा: डिसेंबर २००७ संपादक: प्रा. किशोर राऊत.

**ब) संशोधन प्रबंध**

१. देशमुख अमीत : Ph.D Thesis_1987 ; Sub_An Emprical Study of Costs and Prices of Milk.

२. देवीकर अशोक: Ph.D Thesis_1998 ; Sub_A Geographical Study of Dairy Activitiy In Baramati Tahsil, Dist: Pune. (Maharashtra)

३. भामरे दिपक : Ph.D. Thesis_1996.

विषय: महाराष्ट्रातील सहकारी डेअऱ्यांची प्रगती आणि धुळे जिल्हयातील प्राप्तीकरणाचा अभ्यास.

४. मुलाणी एम.यू. : Ph.D. Thesis_2007.

विषय: आर्थिक सबलीकरण प्रक्रियेत महिला स्वयंसहाय्यता बचतगट चळवळीचे योगदान, विशेष अभ्यास: पुणे जिल्हा.

५. घाडगे शामराव: : Ph.D. Thesis_2009.

**विषय:** दि. गो. पवार: जीवन आणि कार्य.

६. जाधव जयश्री प.: : Ph.D. Thesis_2009.

**विषय:** दूध उत्पादन आणि सहकारी दूध संस्थांचा अभ्यास विशेष संदर्भ: नाशिक जिल्हा. (२००१ ते २०१०)

७. राणे मनिषा : Ph.D. Thesis_1996.

**विषय:** स्वातंत्र्योत्तर काळातील नाशिक महानगर पालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा व त्यांच्यातील परिवर्तनाचा अभ्यास.

८. तांबे शितल विश्वनाथ विना, शोधनिबंध २०००.

**विषय:** हवेली तालुका (पुणे जिल्हा) दूग्ध शेतीच्या प्रमुख प्रकारांचे व्यय – लाभ, विश्लेषण पान नं. १६९.

**क) वृत्तपत्रे**

१. सकाळ वृत्तपत्र, ०२/०९/२००२, संगई मिलिंद, स्वच्छतेचा बारामती पॅटर्न.

**ड) Website**

1. www.google.com_Basic pattern Recognition concept_(Xiaojun Qi)
2. Online Oxford Dictionary Pattern.
3. www.dairy.maharashtra.gov.in
4. http://en.wikipedia.org
5. www.maharashtra.gov.in
6. www.dahd.nic.in
7. www.kvkbaramati.com
8. www.baramatidoodhsang.com